# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूर शिक्षण केंद्र

सत्र पाचवे

अर्थशास्त्र : ऐच्छिक पेपर १०

# विकासाचे अर्थशास्त्र

सत्र सहावे

अर्थशास्त्र : ऐच्छिक पेपर १५

# नियोजनाचे अर्थशास्त्र

**बी. ए. भाग–३**

(शैक्षणिक वर्ष २०१५–१६ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१५
**द्वितीय आवृत्ती :** २०१७
बी. ए. (विकासाचे अर्थशास्त्र/नियोजनाचे अर्थशास्त्र) भाग - ३ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ५००**

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN-978-81-8486-628-5

- दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
  शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)
- दूर शिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

## दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### सल्लागार समिती

**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. एम. ए. काकडे**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### अर्थशास्त्र समन्वय समिती

अध्यक्ष – **डॉ. पी. एस. कांबळे**
अर्थशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. तेजस्विनी मुडेकर**
  कमला कॉलेज, कोल्हापूर
- **डॉ. वाय. एस. गायकवाड**
  विलिंग्डन कॉलेज, विश्रामबाग, सांगली.

दूर शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**विकासाचे अर्थशास्त्र / नियोजनाचे अर्थशास्त्र**
बी. ए. भाग–३ अर्थशास्त्र पेपर १० व १५

**अभ्यास घटकांचे लेखक**

| लेखन सहभाग | सत्र–५ घटक क्रमांक | सत्र–६ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **प्रा. डी. बी. इंगवले**<br>एम. एच. शिंदे आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, तिसंगी | १ | १ |
| **प्रा. डॉ. सौ. सुनिता राठोड**<br>श्री शहाजी छ. कॉलेज, कोल्हापूर | २, ४ | – |
| **प्रा. एस. एस. सावंत**<br>आर. बी. एम. कॉलेज, चंदगड | २, ४ | – |
| **प्रा. डॉ. एस. एस. रूपे**<br>देवचंद कॉलेज, अर्जुननगर | ३ | – |
| **डॉ. आनंद लोदाडे**<br>शहाजीराजे महाविद्यालय, खटाव | – | २ |
| **डॉ. अनिलकुमार वावरे**<br>छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा | – | ३ |
| **प्रा. सुनिता तेलसिंगे**<br>आण्णासाहेब डांगे महाविद्यालय, हातकणंगले | – | ३ |
| **डॉ. एच. एन. कटरे**<br>राजाराम कॉलेज, कोल्हापूर | – | ४ |
| **प्रा. एम. जी. पाटील**<br>कन्या महाविद्यालय, मिरज | – | ४ |

**■ संपादक ■**

**डॉ. एच. एन. कटरे**
राजाराम कॉलेज, कोल्हापूर

**डॉ. अनिलकुमार वावरे**
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

# प्रस्तावना

जून २००७ पासून शिवाजी विद्यापीठाने बहि:स्थ विद्यार्थ्यांसाठी दूर शिक्षण कार्यक्रम राबविण्याचे ठरविलेले आहे. यावर्षी बी. ए. भाग ३ (अर्थशास्त्र) या वर्गाच्या नवीन बदललेल्या अभ्यासक्रमानुसार सत्र-५ पेपर क्र. १० ''विकासाचे अर्थशास्त्र'' व सत्र-६ पेपर क्र. १५ साठी ''नियोजनाचे अर्थशास्त्र'' हे पुस्तक लिहिले आहे. अर्थशास्त्र या विषयातील विविध अभ्यासू व अनुभवी लेखकांनी वेगवेगळे घटक या पुस्तकांमध्ये लिहिले आहेत. या पुस्तकातील विषयाच्या विविध संकल्पना, सिद्धांत व आर्थिक नियोजन यांची मांडणी सोप्या व दर्जेदार भाषेत करून हा विषय विद्यार्थीभिमुख करण्याचा प्रयत्न केला आहे. बहि:स्थ विद्यार्थ्यांना या विषयातील विविध संकल्पना, सिद्धांत व धोरणे समजण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी कोष्टके व आकृत्या काढून विषय अधिक सोपा करून सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

या पुस्तकात बी. ए. भाग-३ (अर्थशास्त्र) या वर्गाच्या बहि:स्थ विद्यार्थ्यांसाठी असलेल्या 'विकासाचे अर्थशास्त्र' सत्र-५ पेपर क्र. १० व 'नियोजनाचे अर्थशास्त्र' सत्र-६ पेपर १५ या बदललेल्या सुधारीत अभ्यासक्रमाची एकूण आठ घटकांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. यामध्ये सत्र ५ साठी आर्थिक विकास, विकसनशील आणि विकसित देश, आर्थिक वाढ व विकासाचे सिद्धांत, आर्थिक विकासासाठी साधनसंपत्ती तर सत्र ६ साठी आर्थिक नियोजनाची ओळख, आर्थिक नियोजनातील समस्या, भारतातील आर्थिक नियोजन भाग-१ व भारताचे आर्थिक नियोजन भाग-२ यांची सविस्तर मांडणी केलेली आहे.

बहि:स्थ विद्यार्थ्यांना विषयाचे त्वरीत व मुद्देसूद आकलन व्हावे यासाठी घटकांची मांडणी एका विशिष्ठ पद्धतीने म्हणजेच उद्दिष्टे, प्रास्ताविक, विषय विवेचन, सारांश, पारिभाषिक शब्द तसेच प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयं अध्ययनासाठी प्रश्न व त्यांची उत्तरे सरावासाठी दीर्घोत्तरी प्रश्न व टीपा दिलेल्या आहेत. पुस्तकाच्या शेवटी अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तकांची नावे दिलेली आहेत. या पुस्तकाची मांडणी आणि विवेचन विद्यार्थ्यांना विषयाचे चांगले आकलन होण्यासाठी उपयुक्त ठरेल अशी अपेक्षा आहे.

या पुस्तकाचा वापर करणाऱ्या सर्व विद्यार्थी व शिक्षक वर्गाला आमची नम्र विनंती अशी की त्यांनी त्यांच्या सूचना प्रकाशक वा संपादकांकडे जरूर पाठवाव्यात. पुढील आवृत्ती अधिक बिनचूक, अद्ययावत व उपयुक्त करण्यासाठी त्याचा उपयोग होईल.

या पुस्तकाचे प्रकाशन करण्याच्या कामी मदत केलेल्या शिवाजी विद्यापीठातील दूर शिक्षण केंद्रातील सर्व कर्मचारी व प्रशासकीय अधिकारी यांना मनःपूर्वक धन्यवाद. या पुस्तकाच्या सर्व घटक लेखकांनी आपले घटक वेळेत पूर्ण केल्याबद्दल संपादक या नात्याने कृतज्ञ आहोत.


■ **संपादक** ■

**डॉ. एच. एन. कटरे**
राजाराम कॉलेज, कोल्हापूर

**डॉ. अनिलकुमार वावरे**
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **सेमिस्टर–५** | |
| | **विकासाचे अर्थशास्त्र** | |
| | **पेपर क्रमांक – १०** | |
| १. | आर्थिक विकास | १ |
| २. | विकसनशील आणि विकसित देश | २६ |
| ३. | आर्थिक वाढ व विकासाचे सिद्धांत | ४० |
| ४. | आर्थिक विकासासाठी साधनसंपत्ती | ५८ |
| | **सेमिस्टर–६** | |
| | **नियोजनाचे अर्थशास्त्र** | |
| | **पेपर क्रमांक – १५** | |
| १. | आर्थिक नियोजनाची ओळख | ७५ |
| २. | आर्थिक नियोजनातील समस्या | ९९ |
| ३. | भारतातील आर्थिक नियोजन भाग–१ | १२९ |
| ४. | भारताचे आर्थिक नियोजन भाग–२ | १४४ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

---

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१५-१६ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

घटक १

# आर्थिक विकास

## (Economic Development)

अनुक्रमणिका


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ आर्थिक विकासाची संकल्पना
(I) आर्थिक विकासाची व्याख्या
(II) आर्थिक विकासाचे महत्त्व
(III) आर्थिक वृद्धी
(IV) आर्थिक वृद्धीवर परिणाम करणारे घटक
(V) आर्थिक वृद्धी व आर्थिक विकास यातील फरक

१.२.२ आर्थिक विकासाचे निर्देशक घटक

१.२.३ आर्थिक विकासातील अडथळे

१.२.४ (अ) शाश्वत विकासाची संकल्पना
(I) शाश्वत विकासाचा अर्थ व व्याख्या
(II) शाश्वत विकासाची उद्दिष्टे
(III) शाश्वत विकासाचे धोरण

१.२.४ (ब) हरित विकास
(I) हरित विकासाची संकल्पना
(II) हरित विकासाची मार्गदर्शक तत्त्वे

(III) हरित विकासाची उद्दिष्टे

(IV) हरित विकासाची अर्थ व व्याख्या

१.२.४ (क) विस्थापना

(I) विकास प्रवृत्त विस्थापना

(II) विस्थापनाचा अर्थ

(III) विस्थापनाचे प्रकार

(IV) विकासप्रवृत्त विस्थापनातून निर्माण होणारे प्रश्न किंवा समस्या

(V) विस्थापितांचा विस्तार

(VI) पुनर्वसनाच्या धोरणातील उणीवा

(VII) पुनर्वसनाच्या धोरणाचे परिणाम

(VIII) पुनर्वसनाच्या धोरणाबाबत उपाययोजना

१.३ सारांश

१.४ स्वयं अध्ययन प्रश्न

१.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ क्षेत्रीय कार्य

१.८ अधिक वाचनासाठी संदर्भ

## १.० उद्दिष्ट्ये

- आर्थिक विकासाचा अर्थ, संकल्पना समजावून घेणे.
- आर्थिक विकास व वृद्धी यातील फरक समजावून घेणे.
- आर्थिक विकासाचे निर्देशक आणि अडथळे जाणून घेणे.
- शाश्वत विकासाची संकल्पना अभ्यासणे.
- हरित विकास व विस्थापना समजावून घेणे.

## १.१ प्रास्ताविक :

सध्याच्या प्रगतीशील जगात विकासाच्या प्रेरणा अत्यंत वेगाने पसरत आहेत आणि जगातील विविध देशामध्ये हेच एक सामान्य वैशिष्ट्य आढळते.

आर्थिक विकास हा सध्या महत्त्वाचा अध्ययनाचा घटक असून समस्या देखील आहे. राष्ट्रीय उत्पन्न, राहणीमानात सुधारणा व दारिद्र्य दूर करणे या भौतिक घटकाबरोबरच अभौतिक घटक देखील विचारात घेऊन, आर्थिक विकासाबरोबरच एकूण मानसिक समाधानाच्या पातळीचा विचार केला पाहिजे. त्याचबरोबर आर्थिक विकास हा पर्यावरणपूरक असणे गरजेचे आहे. तरच 'शाश्वत विकास' प्रस्थापित होऊ शकतो.

## १.२ विषय विवेचन :

### १.२.१ आर्थिक विकासाची संकल्पना :

आर्थिक विकास ही आधुनिक संकल्पना असून दुसऱ्या महायुद्धानंतर याच्या अभ्यासाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. अल्पविकसित अर्थव्यवस्थेमध्ये सार्वत्रिक दारिद्र्य, बेकारी, अल्प उत्पादकता, कनिष्ठ राहणीमान इत्यादी समस्या आणि अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स इत्यादी विकसित राष्ट्रांना आर्थिक विकासाचा वेग टिकवणे, चक्रीय प्रवाह टाळणे यासाठी आर्थिक विकास अभ्यासाची गरज असते. याचाच अर्थ भांडवलशाही, समाजवादी, मिश्र, विकसित, अविकसित अशा सर्वच राष्ट्रांना विविध समस्या सोडविण्यासाठी हा अभ्यास गरजेचा असतो.

**(I) आर्थिक विकासाची व्याख्या** :

आर्थिक विकास म्हणजे औद्योगिकीकरण होय. शेतीवर अवलंबून असणारी लोकसंख्या कमी करून ती लोकसंख्या उद्योग, सेवा क्षेत्राकडे स्थानांतरित करणे म्हणजे आर्थिक विकास होय. किंडलबर्गरच्या मते, ''अधिक उत्पादन व ते ज्यामुळे शक्य होते त्या तांत्रिक व संख्यात्मक व्यवस्थेतील बदल म्हणजे आर्थिक विकास होय.''

प्रो. लुईसच्या मते, ''दरडोई उत्पन्नात होणारी वाढ म्हणजे आर्थिक विकास होय.''

प्रा. ब्राईट सिंह, ''आर्थिक विकास म्हणजे देशाच्या, समाजाचा अल्पविकसित स्तरातून उच्च आर्थिक स्तराला गाठण्याचा प्रयत्न होय.''

मायर व बाल्डविनच्या मते, ''आर्थिक विकास एक अशी न संपणारी प्रक्रिया आहे व ती दीर्घकालीन असून एका अर्थव्यवस्थेत वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडून येते.''

वरील सर्व व्याख्या भौतिक सुखामध्ये वाढ दर्शविणाऱ्या आहेत. त्या (I) प्रक्रिया (II) वास्तव राष्ट्रीय उत्पन्न (III) दीर्घकालीन व सतत विकास या बाबी स्पष्ट करतात.

**(I) प्रक्रिया** (Process) **:** आर्थिक विकास ही सततची प्रक्रिया असून काही विशेष शक्ती विशिष्ट काळापर्यंत सतत कार्यरत असल्याने आर्थिक बदलत्या मुल्यामध्ये सतत बदल होत असतात. त्यामुळे विभिन्न क्षेत्रातही बदल होतात आणि यांचा प्रमुख लाभ म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न वाढते. तसेच राष्ट्रीय उत्पन्न व उत्पादनवाढी शिवाय साधनांच्या पुरवठ्यात बदल आणि संसाधनाच्या पुरवठ्यात बदल होतात.

**(II) वास्तव राष्ट्रीय उत्पन्न :** आर्थिक विकासाचा संबंध हा वास्तविक राष्ट्रीय उत्पन्नात वृद्धीशी संबंधीत आहे. म्हणजेच वस्तू व सेवांच्या शुद्ध मुल्यात होणाऱ्या वाढीशी संबंधित आहे.

**(III) दीर्घकालीन व सतत विकास :** आर्थिक विकास हा पाच ते पंचवीस वर्षापर्यंत चालू शकतो. म्हणजेच तो दीर्घकालीन आहे. आर्थिक विकास एक प्रवाह असून तो नियमित चालतो.

तसेच संयुक्त राष्ट्रसंघाच्या तज्ज्ञ समितीच्या मते, ''आर्थिक विकास म्हणजे केवळ आर्थिक अभिवृद्धी नसून त्याबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक, संस्थात्मक आणि आर्थिक बदल होय.''

थोडक्यात, आर्थिक विकास ही एक गतिमान, दीर्घकालीन प्रक्रिया असून ज्यामध्ये वास्तव दरडोई उत्पन्नात वाढ आणि सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व तांत्रिक संरचना यासारख्या सर्व घटकात उपलब्ध साधनांचा पर्याप्त वापर करून मोठे बदल घडवून आणणे व शाश्वत विकास प्राप्त करणे.

**(II) आर्थिक विकासाचे महत्त्व :**

जगातील सर्व देशाची विभागणी प्रामुख्याने श्रीमंत व गरीब किंवा विकसित व विकसनशील अशा दोन विभागात करता येईल. सध्या प्रत्येक देश विकासाची प्रक्रिया वाढविण्याचा प्रयत्न करीत असतो. त्यामुळे विकासाचे महत्त्व अनन्य साधारण असल्याचे आढळून येते.

प्रा. लुईसच्या मते, ''आर्थिक विकासाचे महत्त्व खालीलप्रमाणे :

**१) लोकांचे निवड क्षेत्र व्यापक असले पाहिजे :** आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत नवीन उद्योग, नवीन निर्माण कार्य व नव्या क्षेत्रांना पुढे आणले जाते. त्यामुळे लोकांना आपापल्या आवडी-निवडी व क्षमतेनुसार निवड करणे शक्य होते. लोकांना आवडीनुसार काम उपलब्ध झाल्यास त्यांची कार्यक्षमताही वाढते.

**२) आर्थिक विषमतेवर नियंत्रण :** न्यायाच्या दृष्टीने सामाजिक व आर्थिक विषमता कमी करणे आवश्यक आहे. नियोजन करताना विषमता दूर करण्याचे उपाय प्रथम लक्षात घेतात. संपत्तीचे वाटप पूर्णपणे न्यायपूर्ण व समान पद्धतीने झाल्याशिवाय विकासाचा वेग वाढणार नाही. एका बाजूला बरीच प्रगती व दुसऱ्या बाजूला अति दारिद्र्य देशाच्या विकासात अडथळा ठरत असते.

**३) आर्थिक लाभ :** विकासाच्या प्रक्रियेत देशाला अनेक प्रकारचे लाभ होतात. त्यात आर्थिक लाभ म्हणजे, उत्पादनवाढ, भांडवलनिर्मिती, व्यापारचक्रांचा प्रभाव कमी करणे, उत्पादन घटकांचे न्यायोचित वितरण, राष्ट्रीय उत्पन्नाचे योग्य वाटप, नैसर्गिक संसाधनाचे योग्य वाटप इत्यादी येतात.

**४) समाजातील लोकांना आर्थिक सुरक्षा :** जास्तीत जास्त लाभ मिळविण्याच्या वृत्तीने वस्तूचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून जास्त किंमतीला वस्तूची विक्री केली जाते. सरकारने हस्तक्षेप करून ही स्थिती बदलणे आवश्यक ठरते. नियोजित अर्थव्यवस्थेत अशा प्रकारची सुरक्षा देणे अत्यंत आवश्यक आहे.

**५) राहणीमानात सुधारणाा व दारिद्र्यातून मुक्ती :** राष्ट्रीय उत्पन्नात वाढ केल्यास लोकांच्या उत्पन्नात आपोआप वाढ होईल व परिणामत: राहणीमान वाढते व लोकांची दारिद्र्यातून मुक्ती मिळते.

**६) आर्थिक विकासाने मानवतावादाचा जन्म होतो :** प्रा. लुईसच्या मते, आर्थिक संपन्नतेमुळे सामाजिक कल्याणात वाढ होईल.

**(III) आर्थिक वृद्धी** (Economic Growth) **:**

आर्थिक विकास व आर्थिक वृद्धी या दोन वेगवेगळ्या संकल्पना आहेत, याबाबत अर्थशास्त्रज्ञांमध्ये मतभेद आहेत. सर्वसाधारणपणे आर्थिक विकास व आर्थिक वृदधी ह्या शब्दांचा वापर एकाच अर्थाने करण्यात येत असला तरी प्रो. शुम्पिटर यांनी आर्थिक विकास व आर्थिक वृद्धी यातील फरक प्रथम स्पष्ट केला.

**शुम्पिटर** यांच्या मते, ''आर्थिक विकास हा अर्थव्यवस्थेच्या स्थैतिक (Stationary) अवस्थेतील उत्स्फूर्त बदल असून विकासाची प्रक्रिया ही खंडीत (Discontinuous) असू शकते; याउलट आर्थिक वृद्धी म्हणजे अर्थव्यवस्थेत दीर्घकाळात संथपणे व सातत्याने होणारा बदल म्हणजे आर्थिक वृद्धी होय.''

**प्रो. जे. के. मेहताच्या** मते, ''आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत जे बदल होतात ते गुणात्मक असतात. वृद्धीच्या काळात होणारे बदल हे मागात्मक स्वरुपाचे असतात. विकसनशील किंवा अल्पविकसित देशात असलेली संसाधने, तंत्रज्ञानाचा स्तर इत्यादी गोष्टींचा विचार करता तेथे जलद आर्थिक विकास आणि गुणात्मक बदल आवश्यक ठरतात. विकसित देशात हे घटक आधीच प्रगत असल्याने मुख्य प्रश्न आर्थिक वाढीशी संबंधीत असतो. त्यामुळे प्रगत देशातील बदल हे प्रामुख्याने मात्रात्मक असतात.

**किंडलबर्जर :** आर्थिक विकास व आर्थिक वृद्धी यातील अंतर स्पष्ट करताना म्हणतात की, आर्थिक वृद्धीचा अर्थ उत्पन्नातील वृद्धी आहे तर आर्थिक विकासाचा संबंध हा संरचना व उत्पादन ह्या दोहोंत होणाऱ्या बदलांशी आहे. असे असले तरी विकासाचा मापदंड हा उत्पन्नातील वाढ आहे.

**(IV) आर्थिक वृद्धीवर परिणाम करणारे घटक** (Factors affecting Economic Growth) **:**

आर्थिक वृद्धीवर पुढील काही घटक प्रभाव पाडतात.

**१) भांडवल** (Capital) **:** भांडवलाची पर्याप्त मात्रा व त्याचा योग्य दर्जा असणे आर्थिक प्रगतीसाठी आवश्यक असते. आर्थिक वृद्धीवर प्रभाव टाकणारा मुख्य घटक भांडवल निर्मिती असून उत्पादन साधनांची निर्मिती म्हणजेच भांडवल निर्मिती होय. त्यामुळे भांडवल वाढून राष्ट्रीय उत्पादन व राष्ट्रीय उत्पन्न वाढते.

**२) श्रम** (Labour) **:** प्रो. किंडलबर्जरच्या मते, देशाच्या आर्थिक वृद्धीवर व विकासावर परिणाम करणाऱ्या गोष्टी म्हणजे देशाची लोकसंख्या होय. श्रमाला मानवी संपत्ती म्हणतात व श्रमपुरवठा लोकसंख्येवर अवलंबून असतो.

**३) तांत्रिक प्रगती** (Technological Progress) **:** आर्थिक वृद्धीचा महत्त्वाचा घटक म्हणजे तांत्रिक प्रगती होय.

**४) नवप्रवर्तन :** विकसित देशात नवप्रवर्तनाचे स्वरूप अधिक व्यापक असते. त्याचा संबंध तांत्रिक प्रगतीबरोबर किंवा उद्योजकतेबरोबर जोडला जातो. नवप्रवर्तन ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. नवप्रवर्तनाचा आर्थिक वृद्धीवर परिणाम होतो.

**५) उद्योजकता व उपक्रम :** उद्योजकाची भूमीका औद्योगिक विकासामध्ये महत्त्वपूर्ण आहे.

**(V) आर्थिक वृद्धी व आर्थिक विकास ह्यातील फरक :**

(Difference between Economic Growth and Economic Development) **:**

सामान्यत: आर्थिक वृद्धी व आर्थिक विकास यांचा एकच अर्थ आहे, असे मानले जाते. तरी आर्थिक वाढ आणि आर्थिक वृद्धी विकास यातील मूलभूत फरक पुढीलप्रमाणे मांडता येतील.

| आर्थिक वृद्धी | आर्थिक विकास |
|---|---|
| १) हि संकल्पना विकसित अर्थव्यवस्थेशी संबंधीत आहे. | १) हि संकल्पना विकसनशील अर्थव्यवस्थेशी संबंधीत आहे. |
| २) उपयोगात असलेल्या संसाधनांचे कार्यक्षमपणे पुनर्वितरण आर्थिक वृद्धीशी संबंधीत असते. | २) बेकार पडून असलेल्या साधनाचा उपयोग करण्याचे प्रयत्न आर्थिक विकासाशी संबंधीत असते. |
| ३) आर्थिक प्रक्रिया संथपणे होणारी व दीर्घकालीन स्वरूपाची असते. | ३) आर्थिक प्रक्रिया ही स्वयंपूर्ण व तुटक किंवा खंडीत स्वरूपाची असते. |
| ४) साधने विकसित असून त्यांचा वापर होतो, म्हणून आर्थिक प्रगतीला आर्थिक वृद्धी असे म्हणतात. | ४) अपुऱ्या ज्ञानाअभावी उपलब्ध संसाधनांचा वापर शक्य नसतो. म्हणून या संसाधनाचा विकास करणे हे आर्थिक विकासात समाविष्ठ असते. |
| ५) सरकारी मार्गदर्शनाची व मदतीची फारशी गरज नसते. | ५) विकासाकरिता सरकारी मदतीची अंतिम गरज असते. |
| ६) प्रगतीची एक किमान पातळी गृहीत धरूनच वृद्धीची प्रारूपे मांडण्यात येतात. | ६) प्रगतीच्या विशिष्ट पातळीच्या अभावी गुणात्मक परिवर्तनाची आधी गरज असते. |
| ७) यामध्ये नवनिर्मितीची शक्यता नसते. | ७) यामध्ये नवीन शक्तीद्वारे नवमुल्याची निर्मिती केली जाते. |
| ८) आर्थिक वृद्धी स्थौतिक संतुलनाची एक अवस्था आहे. | ८) गतिशील संतुलनाची अवस्था असून वेगाने प्रगती करीत असते. |
| ९) आर्थिक वृद्धित एखादा देश पुढे येत असतो; पण त्याची गती अत्यंत मंद असते. | ९) एका देशाच्या कार्यामध्ये गतीशीलता असून तो उन्नतीकडे तीव्र वेगाने वाढत जातो. |
| १०) आर्थिक बदल व परस्परात सतत घडणाऱ्या घटकांचा परिणाम आहे. | १०) आर्थिक विकास जसे प्रगतीचे पाऊल आहे ज्याच्यातून सृजनात्मक शक्तीचा जन्म होतो. |

अशा प्रकारे आर्थिक वाढ व आर्थिक विकास यांच्यामध्ये मूलभूत स्वरूपाचा फरक असला तरी अनेक अर्थशास्त्रज्ञांना ह्या दोन्ही संकल्पना समान वाटतात.

### १.२.२ आर्थिक विकासाचे निर्देशक घटक (Indicators of Economic Development) :

सध्या प्रत्येक देश दुसऱ्या देशाच्या पुढे जाण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे आर्थिक विकास ही संकल्पना दोन अर्थव्यवस्थाकरिता स्पर्धात्मक झाली आहे. त्यामुळे आर्थिक विकासाचे मापन कसे होते? त्या पद्धतीमध्ये कोणकोणते घटक असावेत? प्रगतीच्या कोणत्या स्तराला आर्थिक विकासाचे निर्देशांक मानावे? याविषयी अर्थतज्ञांमध्ये प्रचंड मतभेद आढळतात. म्हणूनच अनेक प्रकारचे मापदंड याकरिता विचारात घेतले आहेत. प्रत्यक्षात आर्थिक विकासाचे योग्य मापन खूप कठीण असते.

तरी आपण प्राचीन विचारधारा व आधुनिक विचारधारा या प्रचलीत मापदंडाच्या आधारावर खालील काही निष्कर्ष मांडू शकतो.

**प्राचीन विचारधारा** (Traditional View Point) **:**

**वणिकवाद :** देशात सोन्या-चांदीचे प्रमाण वाढत जाईल तो देश आर्थिकदृष्ट्या अधिक विकसित होत जाईल.

**ॲडम स्मिथ :** आर्थिक विकासाचा निर्देशांक राष्ट्रीय उत्पन्नाला मानतात. स्मिथच्या मते, राष्ट्रीय उत्पादन अधिकतम करण्यासाठी व्यक्तीगत स्वातंत्र्य हवे, राजाचा हस्तदोष नको.

**कार्लमार्क्स :** समाजवादाची स्थापना हाच आर्थिक विकासाचा पाया आहे. कारण भांडवलशाही संपल्यानंतर समाजवादाची स्थापना करूनच लोक कल्याणात वाढ करता येईल, असे कार्ल मार्क्सने स्पष्ट केले.

**आधुनिक विचारसरणी :**

आधुनिक अर्थतज्ञानी दिलेल्या मापदंडाना (अ) संकुचित दृष्टिकोन व (ब) विस्तृत दृष्टिकोन अशा दोन भागामध्ये विभाजित करता येईल.

**(अ) संकुचित दृष्टिकोन :** काही अर्थतज्ञांनी विकसनशील अर्थव्यवस्थेच्या एकाच विशेष वैशिष्ट्याला महत्त्व देऊन आर्थिक विकाससंबंधी विचार मांडले आहेत. उदा. औद्योगिकरण हाच आर्थिक विकासाचा मापदंड असला पाहिजे तर काही अर्थतज्ञ भांडवल निर्मितीचा व त्यात होणाऱ्या वाढीला आर्थिक विकास मानतात. गणितीय पद्धतीवर भर देणाऱ्या तज्ञाने, तंत्रज्ञानाचा स्तर व उत्पादन पद्धतीत होणाऱ्या बदलांना आर्थिक विकासाचे निर्देशक घटक मानले आहे. आर्थिक स्थैर्यच विकासाचा गाभा आहे असे काहींनी म्हटले आहे. तर दुसऱ्याने उत्पत्तीच्या घटकामुळे होणारी उत्पादनकतेतील वाढ सर्वाधिक महत्त्वाची बाब आहे, असे सांगितले आहे. त्यामुळे असे म्हणता येईल की, वरील सर्व विचार एकांगी, अपूर्ण अपरिपक्व किंवा अवैज्ञानिक आहेत.

**(ब) विस्तृत दृष्टिकोन** (Broad View Point) **:**

**१. राष्ट्रीय उत्पन्नात वाढ :** प्रो. माथर आणि बाल्डविन, साईमन कुल्नेटझ्, ए जे. यंगसनसारख्या विकासवादी

अर्थशास्त्रज्ञांनी वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात होणाऱ्या वाढीलाच आर्थिक विकासाचे निर्देशक घटक मानले आहे. त्यांच्या मते, राष्ट्रीय उत्पन्नात होणारी वाढ ही सतत स्थिर असणे गरजेचे असते.

वास्तविक राष्ट्रीय उत्पन्न हाच आर्थिक विकासाचा सर्वश्रेष्ठ मापदंड आहे असे हे सर्वजण मानतात. कोणत्याही देशात वास्तविक राष्ट्रीय उत्पन्नात होणारी वाढ अधिक व्यावहारिक स्थितीची माहिती देऊ शकते.

**२) दरडोई उत्पन्नात वाढ :** एकूण देशांतर्गत उत्पादन (Gross Domestic Product- GDP) या आधारे अर्थव्यवस्थेने एका विशिष्ट कालखंडामध्ये किती उत्पादन केले त्याची पातळी समजून घेता येते. परंतु लोकांचे वस्तू सेवावरील नियंत्रण ही GDP पेक्षा वेगळी बाब आहे. वास्तव राष्ट्रीय उत्पन्नास लोकसंख्येने भागले असता वास्तव दरडोई उत्पन्न मिळते.

आधुनिक अर्थतज्ञांच्या मते, राष्ट्रीय उत्पन्नाबरोबर दरडोई उत्पन्नालाही महत्त्व द्यावे लागते. कारण अविकसित देशांचा मुख्य प्रश्न राहणीमानाच्या सुधारणेशी संबंधीत असतो. राहणीमानाचा संबंध दरडोई उत्पन्नाशी असतो. लोकांचे आर्थिक कल्याण राहणीमानात वाढ या दृष्टीने पाहिल्यास दरडोई उत्पन्नातील वाढ देणारी आर्थिक विकासाची स्थिती स्पष्ट करू शकेल.

**३) जीवनमान निर्देशांक :** ओकन व रिचर्डसनच्या मते, राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्न वाढ उपयोगाची नाही लोकांच्या राहणीमानाचा स्तर प्रामुख्याने उपभोगाच्या स्तरावर अवलंबून असतो. अमेरिकेतील ओव्हरसीन डेव्हपमेंट कौन्सिल या संस्थेने जीवनमानाच्या भौतिक गुणवत्ता निर्देशांक (PQLI : Physical Quality of Life Index) तयार केला. त्यासाठी सरासरी आयुर्मान, बालमृत्यूचे प्रमाण, साक्षरता वगैरे घटक विचारात घेतले.

प्रो. बी. एन. घोष यांनी १९९३ साली नवीन दृष्टीकोन मांडला. राष्ट्राची प्रगती पाहण्यासाठी जीवनाच्या मानवी गुणवत्तेचा निर्देशांक (Human Quality of Life Index - HQLI) विचारात घेतला आहे. साक्षरता, प्रती डॉक्टर लोकसंख्येचे प्रमाण, आयुमर्यादा, बालमृत्यूप्रमाण, प्रति व्यक्ति प्रति दिन उष्मांक उपभोग, प्रति दूरदर्शनच्या मागे लोकसंख्या, प्रति टेलिफोन मागे लोकसंख्या हे सात घटक घेतले आहेत.

**४) मूलभूत गरजांचा निर्देशांक :** अत्यंत कमी विकास झालेल्या देशात दारिद्र्य, बेकारी आणि विषमता यासारख्या गंभीर समस्यांना तोंड द्यावे लागते. तेव्हा सामान्य जनतेला मूलभूत गरजा पूर्ण करण्याच्या गुंतागुंतीत त्यांचे इतर प्रश्नही अडकलेले असतात.

**भारताचा विचार :** भारतासारख्या विकसनशील देशात भौगोलिक, आर्थिक, सामाजिक परिस्थितीत विविधता आढळून येत असल्याने विकासाचे मोजमाप करताना कोणताही एक निर्देशांक वापरणे योग्य नसते. त्यामुळे विकासाचे मापन करायचे असेल तर वेगवेगळे निर्देशक वापरणे योग्य ठरते. त्यापैकी प्रमुख खालीलप्रमाणे-

१) उपभोग निर्देशक
२) बचत निर्देशक
३) उत्पन्न निर्देशक
४) रोजगार निर्देशक

५) आरोग्य निर्देशक

६) शैक्षणिक निर्देशक

७) निवास निर्देशक

८) मूलभूत सोयीचा निर्देशक

९) सामाजिक निर्देशक इत्यादी.

आर्थिक विकासाचे मापन करणे ही गुंतागुंतीची प्रक्रिया असल्याने एकूण परिस्थितीचा विचार करून योग्य असे निरनिराळे निर्देशक वापरणे अधिक वास्तववादी ठरते.

### १.२.३ आर्थिक विकासातील अडथळे (Obstacles to Economic Development) :

जगामध्ये एकूणच घडामोडी प्रचंड प्रमाणात बदलत असल्याने सध्या होणारे बदल सतत एक नविन लाट निर्माण करून प्रत्येक अर्थव्यवस्थेसमोर एक नविनच प्रश्न उभा करीत आहे. त्यातच जगामध्ये मूठभर देश श्रीमंत तर बहुसंख्य देश मागासलेले व दरिद्री आहेत. अशा देशाच्या आर्थिक विकासातील अडथळे पुढीलप्रमाणे मांडता येतील.

**१) बाजारातील अपूर्णता :** अर्थव्यवस्थेच्या एकूण व्यवस्थेमध्ये काही शक्ती, अडथळे निर्माण करतात. त्यामध्ये किंमत स्थिरता, बाजारपेठेचे अपूर्ण ज्ञान, अचल घटक न बदलणारी सामाजिक परिस्थिती इत्यादी. देशांच्या उत्पादन साधनाचा अविकसित, अल्प विकसित व चुकीचा वापर या अपूर्णतेमुळे होतो.

**२) दृष्टचक्रांचे अस्तित्व :** अप्रगत अर्थव्यवस्थेमध्ये काही घटकांचा असा संयोग होतो की, त्यांचा चक्रीय संबंध होतो व विकासवेग मंदावतो. विशेष म्हणजे अनेक घटकापैकी कोणता घटक मूळ कारण आहे व कोणता घटक परिणाम आहे ते स्पष्टपणे दर्शविता येत नाही.

**३) सामाजिक, सांस्कृतिक अडथळे :** सामान्यत: अल्प विकसित देशामध्ये अशा सामाजिक, सांस्कृतिक संस्था, संघटना, संयुक्त कुटुंब पद्धती, चालीरीती असतात की त्या आर्थिक विकासाला पोषक असतात. यामध्ये आवश्यक व योग्य सुधारणा केल्यास विकास पोषक वातावरण तयार होते. हे काम बरेच कठीण असते. कारण त्यावेळी असंतोष निर्माण होतो व त्याचा अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होतो.

**४) बदलांना सामान्य विरोध :** लोकांचा बदलाबाबत आवश्यक व योग्य विचार नसल्याने विरोध होतो. लोक बहुधा आळशी, कामचुकार असतात. सण, समारंभ, उत्सव यातच त्यांचा जास्त रस असतो. शेतीमध्ये नवीन उत्पादन पद्धती वापरण्यास त्यांचा पूर्ण विरोध असतो.

**५) पाश्चात्य तंत्रज्ञान वापरण्यामध्ये कठीणता :** आज अविकसित देशात अद्ययावत तंत्रज्ञान वापरले जात नाही. अशा देशात श्रमाची विपूलता व भांडवल टंचाई असते. कुशल कामगारांचीही कमतरता असते. त्यामुळे आर्थिक विकासात अडथळे येतात.

**६) लोकसंख्येचा प्रश्न :** जलद वाढणारी लोकसंख्या हा अविकसित किंवा विकसनशील देशातील

विकासातील मोठा अडथळा आहे. सर्व गरीब देशांना लोकसंख्या वाढ ही भितीदायक प्रश्नासारखी वाटत असते. देशातील इतर घटकांनी आर्थिक प्रगतीसाठी केलेले सर्व प्रयत्न वाढती लोकसंख्या निष्फळ ठरवते.

**७) शेतीतील अडथळे :** अनेक अविकसित देश परंपरागत शेतीप्रधान आहेत. त्यांच्या राष्ट्रीय उत्पन्नामध्ये शेती उत्पादकाचाच प्रमुख हिस्सा असतो. प्रत्यक्षात शेती विकासामध्ये शेतकऱ्यांची वागणूक हा अडथळा आहे असे नाही. तर ते ज्या परिस्थितीमध्ये शेती उत्पादन करतात ती परिस्थिती, त्यांना उपलब्ध असणारे तंत्रज्ञान, उत्पादन वाढीची प्रेरणा, उत्पादन साधनांची उपलब्धता व त्यांच्या किंमती, पाणीपुरवठा व हवामान इत्यादी बाबी शेतकऱ्यांना अकार्यक्षम बनवतात. अशा परिस्थितीमध्ये शेती उत्पादन वाढत नाही. लोकसंख्या वाढीचा दर जास्त असताना दरडोई शेती उत्पन्न व अन्नपुरवठा वाढण्याऐवजी घटत आहे. अशाप्रकारे शेती क्षेत्राची अकार्यक्षमता हा विकासातील मोठाच अडथळा ठरत आहे.

**८) आंतरराष्ट्रीय शक्ती :** मागासलेल्या राष्ट्राना मागासलेले ठेवण्याचीच आंतरराष्ट्रीय परिस्थिती असते. आंतरराष्ट्रीय व्यापाराचा मोठा फायदा विकसनशील देशांना मिळू शकेल असे आधुनिक अर्थतज्ज्ञ मानत नाहीत. गेल्या १५० वर्षामध्ये आंतरराष्ट्रीय व्यापार व भांडवलाच्या हालचालीमुळे निर्माण झालेल्या शक्तीने अल्पविकसित अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणामच केलेले आहेत. जगातील अर्थव्यवस्थेमध्ये अशा काही शक्ती कार्यरत होत्या की, आंतरराष्ट्रीय व्यापाराने मिळणारे फायदे प्रामुख्याने विकसित देशांनाच मिळावेत प्राथमिक वस्तूंच्या विस्तारित निर्यातीचे प्रतिकूल परिणामच विकसनशील देशावर झाले आणि ते स्थितीशीलच राहावेत अशा शक्ती बनवल्या.

**९) भांडवल टंचाई :** विकसनशील देशामध्ये बचत कमी म्हणून भांडवल कमी असते. अल्प उत्पादकता कमी उत्पन्न, अल्प बचत यामुळे कमी भांडवल ही साखळीच असते. म्हणजेच गरीबी हीच गरीब देशामध्ये भांडवल टंचाईचे कारणही व परिणामही असते.

**१०) आधुनिक उद्योजकता व व्यवस्थापन कौशल्य नसते :** इंग्लंड, अमेरिकेचा आर्थिक विकास मुख्यत: तेथील उद्योजकांनी पुढे होऊन धोका पत्करला म्हणूनच झाला. अल्पविकसित देशात विशिष्ट सामाजिक, सांस्कृतिक वातावरणामुळे असे उद्योजक नसतात. विकसित देशातील पुढे होणाऱ्या उद्योजकांना प्रो. शुंपीटर विशिष्ट उद्योजक (Typical - Entrepreneur) असे संबोधतात. गरीब देशामध्ये वातावरणच असे असते की, तेथील लोक परंपरांना चिकटून राहतात व वेगळ्या, नवीन व चांगल्या पदधतीविरुद्ध राहतात.

**११) राजकीय अस्थैर्य :** प्रशासनातील सततचा बदल, परकीय आक्रमणाचा धोका आणि अंतर्गत विनाशाची स्थिती यामुळे अल्पविकसित देशात राजकीय अस्थैर्य निर्माण होते. त्यामुळे भविष्यकाळाविषयी अनियमितता निर्माण होऊन भांडवल गुंतवणूकीवर प्रतिकूल परिणाम होतो. अनेकवेळा हे भांडवल अविकसित देशाकडेही नसते. येथील पुष्कळशी शक्ती व साधने गरीबीविरुद्ध लढण्याऐवजी राजकीय लढ्यातच नष्ट होतात.

**१२) कमकुवत व भ्रष्ट सार्वजनिक प्रशासन :** गरीब देशामध्ये आर्थिक बदलाचे पुढारीपण सरकारने घ्यावे, किमान या क्षेत्रात सक्रीय सहभाग घ्यावा अशी अपेक्षा असते. परंतु तेथील राजकारणी त्यांचे समाजातील स्थान डळमळीत होईल म्हणून देशाचा विकास इच्छित नाहीत. तसेच तेथील प्रशासकीय यंत्रणा विकासाचा भार

सहन करणाऱ्या कमकुवत व अशक्त असते. शिवाय ती भ्रष्ट व अकार्यक्षम असलेने विकासाच्या प्रश्नाकडे दुर्लक्षच करते.

**१३) धार्मिक घटक :** समाजातील प्रत्येक गोष्टीचा अतिरेक हा वाईटच असतो. गरीब देशातील लोक फारच मोठ्या प्रमाणात धर्म आणि धार्मिक कल्पना यामध्ये गुंतलेले असतात. उत्पादक कामामध्ये ते नसतातच. त्यामुळे आर्थिक प्रगतीसाठी आवश्यक असणारी उद्योजकता लोकांच्यामध्ये नसते.

**निष्कर्श :**

अल्पविकसित देशाच्या विकासामध्ये अडथळे आणणारे आणखी खूप घटक आहेत. उदा. नैसर्गिक साधनांचा अयोग्य वापर, शेतीवरच अतिरिक्त अवलंबित्व, दूरवर पसरलेली निरक्षरता, कुशल कामगारांची उणीव, उद्योजकतेची उणीव आणि तांत्रिक मागासलेपण इत्यादी. हे सर्व घटक परस्पर संबंधीत व परस्परावर परिणाम करणारे असतात. मेयर आणि बाल्डवीन यांच्या मते, ''बाजारातील अपूर्णता उत्पादन साधनांची पर्याप्त विभागणी होऊ देत नाही, दृष्टचक्रे रचनात्मक बदल घडविण्यामध्ये प्रतिबंध करतात आणि आंतरराष्ट्रीय प्रवाह गरीब राष्ट्रांच्या दृष्टिकोणातून पर्याप्त नाहीत.''

## १.२.४ (अ) शाश्वत विकासाची संकल्पना (Concept of Sustainble Development) :

'विकास' याचा अर्थ स्पष्ट करणे खूप कठीण आहे. कारण समान सरासरी उत्पन्न असणाऱ्या दोन देशातील लोकांचा जीवन दर्जा (Quality of Life) वेगवेगळा असू शकतो.

युनोच्या (United Nations) कागदपत्रानुसार जीवनाची अपेक्षा, प्रौढ साक्षरता, शिक्षण, सरासरी उत्पन्न यावरून मानवी विकास स्पष्ट होतो. मानवी विकासामध्ये मनुष्याच्या आरोग्यमय जीवनापासून ते आर्थिक, राजकीय स्वातंत्र्यापर्यंतच्या सर्व बाबी समाविष्ठ होतात.

शाश्वत विकास ही संकल्पना अलीकडचीच आहे. निसर्ग व नैसर्गिक साधने संरक्षणाच्या आंतरराष्ट्रीय संघाने सादर केलेल्या १९८० च्या जागतिक संरक्षक योजनेचे (World Conservation Strategy) ची संकल्पना प्रथमच वापरली.

Sustainble म्हणजे शाश्वत, टिकाऊ, चिरस्थायी, स्वयंपोषणक्षम होय. सध्या प्रत्येक देश विकासासाठी प्रयत्न करतो. मात्र एकदा विकास झाल्यानंतर तो चिरकाल टिकविणे महत्त्वाचे असते.

''विकास व पर्यावरणावरील जागतिक आयोगाने'' शाश्वत विकास ही संज्ञा सामान्य वापरात आणली. आपले सामाईक भविष्य (Our Common Future) या अर्ध-वार्षिक अहवालामध्ये ही संज्ञा सांगितली होती. ती ब्रुटलँड अहवाल म्हणूनही ओळखली जाते.

### (I) शाश्वत विकासाचा अर्थ व व्याख्या :

शाश्वत विकास ही संकल्पना सखोल असून सर्वांशीच संबंधित आहे. भविष्यकालीन विकासाच्या गरजांच्या संदर्भासह सध्याचा विकास असे शाश्वत विकास मानतो. उपलब्ध साधनसंपत्तीच्या अतिरिक्त पिळवणुकीने

भविष्यकालीन पिढ्यांसाठी अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. साधनसामग्रीच्या शाश्वत उपयोगावर भविष्यकालीन पिढ्यांच्या गरजांचा विचार करून निर्णय घेणे योग्य असते. शाश्वत विकास, अर्थशास्त्रातील एक महत्त्वपूर्ण व विशेष प्रकारची संकल्पना असून एका बाजूला ती प्रत्यक्षपणे विकासाच्या अर्थशास्त्राला संबंधीत आहे तर दुसऱ्या बाजूला ती पर्यावरणाचा अंतर्गत भाग असते.

'शाश्वत विकास' या संकल्पनेच्या व्याख्या पुढीलप्रमाणे मांडता येतील.

''शाश्वत विकास म्हणजे असा विकास की जो भविष्यकालीन पिढ्याच्या त्यांच्या स्वत:च्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेशी कोणतीही तडजोड न करता सध्याच्या गरजा पूर्ण करणे होय.''

**- ब्रूटलँड अहवाल.**

''शाश्वत विकास म्हणजे असा विकास कि जो मानवी गरजांचे समाधान चिरकाल टिकवणे आणि मानवी जीवनाचा दर्जा सुधारणे हे साध्य करणे होय.''

**- रॉबर्ट ॲलन** (Robert Allen)

''शाश्वत विकासाची व्याख्या अशी करणे शक्य आहे की, निसर्गाच्या अवस्थेपासून प्राप्त केलेल्या त्याच वस्तू व सेवा अर्थव्यवस्थेचे उत्पादन शक्यतेची तजवीज करून चालू ठेवणे होय.''

**- K. Parikh**

वरील व्याख्यावरून शाश्वत विकासाचा अर्थ स्पष्ट होतो की, तळागाळातील पातळीवरील गरीबांच्या मूलभूत गरजा पूर्ण करणे व त्यांच्या भौतिक जीवनाच्या पातळीत वाढ करणे होय.

**(II) शाश्वत विकासाची उद्दिष्टे :**

१) सर्व लोकांच्या जीवनाची गुणवत्ता वाढविणे.

२) सर्वांच्या मूलभूत गरजा भागवून राहणीमान उंचावून आर्थिक विकास सुधारणे.

३) सार्वजनिक जीवनात सहभागी होण्याची संधी देणे व शारीरिक, सामाजिक, सांस्कृतिक स्वच्छतेसाठी सहकार्य करणे.

४) पिढ्या पिढ्यामधील एकता वाढविणे.

५) देशातील नैसर्गिक, सामाजिक, सांस्कृतिक संसाधने, संपत्तीचा साठा अबाधित ठेऊन, आर्थिक विकासाचा जास्तीत जास्त निव्वळ फायदा मिळविणे.

६) भविष्यकालीन पिढ्यांसाठी अडचणीचे वाईट ठरू नये अशा दृष्टीने सामाजिक व सांस्कृतिक, नैसर्गिक, मानवी भांडवलाचा साठा राखणे व वाढविणे यासाठी आर्थिक विकासाची गती वाढविणे.

७) नैसर्गिक भांडवली साठा घटू नये अशी शक्तीमान शाश्वती तयार करणे.

८) जगातील निरपेक्ष गरीबी कमी करणे.

जागतिक शिखर परिषद (Earth Summit) सध्या वाढत्या पर्यावरण समस्येने अनेक देशांचे लक्ष शाश्वत विकासाकडे वेधले गेले आहे. त्यातून जगातील सर्व राष्ट्रांची याविषयावर चर्चा व जागरूकता निर्माण होण्यासाठी वसुंधरा शिखर परिषद दरवर्षी भरवावयाचे ठरले. सन १९८८ मध्ये हवामान बदलाच्या 'आंतरशासकीय चौकशीची समिती' निर्माण झाली (Intergovernmental Panel of Climate Change - IPCC). यायोगे हरितगृह गॅस सोडण्याचे प्रमाण कमी करता येईल. अलीकडे अनेक कारणांनी जगातील तापमान सातत्याने वाढत आहे. यासाठी एखाद्याच देशाला जबाबदार धरता येणार नाही. यामध्ये हरितगृहातील वायूंचा (Green house gases) तापमान वाढविण्यातील हिस्सा प्रतिदिन वाढत आहे.

ऑक्टोबर २००८ मध्ये जागतिक शिखर परिषदेमध्ये २००७ च्या आंतरराष्ट्रीय हरित शिखर परिषदेकडे वाटचाल व त्यात शाळा, व्यावसायिक, सहकारी अधिकारी, माध्यमे, उद्योग यांचा सहभाग वाढवला.

तसेच दुसरी जागतिक हवामान परिषद १९९० मध्ये क्योटो (Kyoto) येथे भरवली. यामध्ये १७४ देश सामील झाले होते.

**(III) शाश्वत विकासासाठीचे धोरण** (Policies for Sustainable Development) **:**

सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक इत्यादीचा दर्जा घसरल्याने लोकांच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होतो, आर्थिक उत्पादकता घटते आणि सुखसोयी कमी होतात. त्यासाठी योग्य धोरण स्विकारणे ही काळाची गरज ठरते. ते पुढीलप्रमाणे -

१) दारिद्र्य घटविण्यासाठी, नवीन रोजगार संधी देण्यासाठी मोठमोठे प्रकल्प राबविले पाहिजेत.

२) अनुदान (Subsidies) घटविल्यास किंवा काढून टाकल्यास देशाला अनेक बाजूंनी फायदेशीर ठरेल.

३) बाजारावर आधारित दृष्टिकोन स्वीकारावा.

४) संपत्तीच्या हक्कांची विभागणी करावी.

५) विक्री वाढीसाठी किंमत घट, संस्थावाढ इत्यादींना उत्तेजन द्यावे.

६) दर्जाघट रोखण्यासाठी नियंत्रण असावे.

७) देशांतर्गत व परदेशी व्यापारवाढीसाठी योग्य धोरण आखावे.

८) समाजजागृती व समाजाचा सहभाग मोठा असावा.

९) जागतिक आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणात्मक प्रयत्नामध्ये आवश्यक सहभाग असावा.

## १.२.४ (ब) हरित विकास (Green Development) :

**प्रस्तावना :**

जुलै २०१४ मध्ये नवी दिल्ली येथे युनोच्या (UN) साऊथ आशिया रिजनल नेटवर्कचे (South Asia Regional Network) उद्‌घाटन कोलंबिया विद्यापीठातील (Columbia University) डॉ. जेफरी सचेस् (Dr. Jeffrey Suchs)

यांच्या हस्ते संपन्न झाले. त्यावेळी त्यांनी असे प्रतिपादन केले की, शहरी शाश्वत विकास, लिंगभेद आणि सार्वजनिक आरोग्य ही भारतापुढील आव्हाने आहेत. त्यांच्या मते, भारताची लोकसंख्या १९५० पासून आठपट वाढली आहे. त्यामुळे शहरांच्या शाश्वत विकासासाठी शुद्ध हवा, शुद्ध पाणी, हरीत क्षेत्र, मलमूत्र विसर्जनाची योग्य व्यवस्था ही उद्दिष्टे अर्थव्यवस्थेपुढे असणे गरजेचे आहे. भारत हा मुख्यत: कोळसा अर्थव्यवस्था (Coal Economy) असून येथे अन्न शिजविण्यासाठी सर्वत्र स्टोव्हचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात असल्याने भारतातील हवेचा दर्जा अत्यंत निकृष्ठ झाला आहे. त्यामुळे विविध रोगांना बळी पडण्याचीच शक्यता जास्त आहे. शाश्वत विकासाच्या सतरा उद्दिष्टामध्ये (Sustaible Development Goals) शहरे आणि तेथील वसाहती ह्या सुरक्षित व शाश्वत असाव्यात हे एक प्रमुख उद्दिष्ट आहे. तसेच युनोच्या 'हजार विकास उद्दिष्टांचा' (UN's Millennium Development Goals - MDGs) संच हा शाश्वत विकासाच्या माध्यमातून सन २०१५ पर्यंत पूर्ण करेल. मानवाच्या निरोगी जीवनामध्ये वाढ करणे, दारिद्र्य नष्ट करणे, विषमता घटविणे इत्यादी शाश्वत विकासाची उद्दिष्टे आहेत. शाश्वत विकासाची उद्दिष्टे हजार विकास उद्दिष्टांची (Millennium Development Goals) तार्किक प्रगती असून आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक बाबीकडे विशेष लक्ष दिल्यांशिवाय दारिद्र्य कमी होणार नाही. अर्थव्यवस्थेत केवळ आर्थिक प्रगती पुरेशी नाही तर झालेल्या प्रगतीचा फायदा पुनश्च कसा गुंतवता येईल, मानवी भांडवल कसे उभारता येईल, नैसर्गिक भांडवल कसे टिकविता येईल हे महत्त्वपूर्ण आहे.

**(I) हरित विकासाची संकल्पना** (Concept of Green Development) **:**

हरित विकासाची संकल्पना हे एक असे बदलेले विकास प्रतिमान आहे की, ज्यामध्ये आर्थिक प्रगती बरोबरच नैसर्गिक साधनांचा वाढता उपयोग व ecosystem ची शाश्वतता व समाजामध्ये मित्रत्वाची व बंधुत्वाची भावना असल्यामुळे मनुष्य (लोक) सुखी, समाधानी, आनंदी जीवन जगतो.

**(II) हरित विकासाची मार्गदर्शक तत्त्वे :**

१) उत्पादन साधनांचा कार्यक्षम, परिणामकारक व वाजवी उपयोग.

२) क्षेत्रिय धोरणे व योजना ह्या हरित विकास संकल्पनेशी मिळत्या-जुळत्या व संबंधित असाव्यात.

३) स्वच्छ व सुधारित तंत्रांना बढती देणे.

४) हरित आर्थिक प्रगतीमध्ये नागरिकांच्या सहभागाला शाश्वती देणे.

५) सांघीक, सामाजिक, मित्रत्वाचे संबंध वाढविणे.

६) बदल, तपासणी व नियंत्रण असावे.

**(III) हरित विकासाची मार्गदर्शक तत्त्वे :**

१) उत्पादन साधनांच्या कार्यक्षमतेत सुधारणा, गॅस घटविणे, टाकाऊ माल नसणारे (Wastage) उत्पादन व सेवा करणे.

२) वातावरणातील दूषितपणा व दर्जा रोखून त्यांचे संरक्षण करणे.

३) हरित अर्थव्यवस्थेला योग्य आधार देण्यासाठी कर, कर्ज व अर्थपुरवठा यांना उत्तेजन देणे आणि वातावरण संरक्षण, मानवी विकास व स्वच्छ तंत्रज्ञान यात सुधारणा करण्यासाठी गुंतवणूक वाढविणे.

४) हरित विकास, दारिद्र्य घट व हरित जीवन पद्धती यात सुधारणा करणे.

५) निसर्गाबरोबर प्रेमाने, जिव्हाळ्याने वागणे (Live in harmony with nature) वाढविणे व सांस्कृतिक मूल्ये जपून शिक्षण, शास्त्र, संशोधन करणे.

६) हवामानातील बदल आपल्या भागात असणारी नैसर्गिक व अन्य उत्पादन साधनसंपत्ती आणि पुनर्निर्मिती किंवा पुनर्बांधणी यातील आपली शक्ती ओळखून लोकसंख्याविषयक योजना अवलंबिणे.

**(IV) हरित विकासाचा अर्थ व व्याख्या :**

'हरित विकास' यांचा अर्थ व व्याख्या आपण खालीलप्रमाणे मांडू शकतो.

''हरित विकास म्हणजे नैसर्गिक संसाधनांचा कार्यक्षम व परिणामकारक उपयोग, दारिद्र घट, टाकाऊ पदार्थ नसणे, सर्व सेवांचा योग्य आधार आणि गॅस मिश्रीत हवेचा अभाव होय.'' (Green Development means a development model with efficient and effective use of netural resources, ecosystem services support, lower green house gas emission, wasteless reduced poverty through inclusiveness.)

''हरित अर्थव्यवस्था म्हणजे लोकांचे जीवनमान उंचावणे, एकता असणे, सामाजिक न्याय, सामाजिक व आर्थिक जबाबदाऱ्या कमी करणे आणि दर्जा घटक रोखणे होय.'' ('Green Economy' means on economy aimed to improve human well-being, social justice and inclusiveness along with reduced enivronmental risks and degradation.)

''हरित विकास म्हणजे सामाजिक, आर्थिक शाश्वतता, सामाजिक एकता व सहभाग आणि शुद्ध हवा (गॅस मिश्रण नसणे) होय.' ('Green Growth' means an economic growth that ensures environmental sustainbility, support social inclusiveness/participation and with lower green house gas emission.)

''हरित रोजगार म्हणजे असा रोजगार की जो शक्ती (energy) कच्चा माल, पाणी वापर कमी करतो आणि गॅस उत्सर्जन कमी, टाकाऊ माल कमी, अस्वच्छतासाठी कमी आणि हवामान बदल अवलंबून वातावरण दर्जा सुधारतो तो होय.'' (Green Job means any Job that contributes to reduced consumption of energy, raw materials and water and limitations of green house gas emission, waste and pollution reduction, improvement of environmental quality through climate change adaptation)

''हरित शहर म्हणजे असे शहर व शहरी वसाहत की, जी आरामात मानवी जीवन जगू देते व विकासाच्या संधी देते. शिवाय अशा शहरात शक्ती, उष्णता, पाणी पुरवठा, सार्वजनिक उत्तम वाहतूक, टाकाऊ पदार्थांच्या विल्हेवाटीची योग्य व्यवस्था असते.'' ('Green City' menas a city and Urban settlement that ensures comfortable

human living and development opportunities with smart energy, heating, water supply, communication, public transportation and optimal waste management infrastructure.)

''हरित घट म्हणजे जे की जेथे आरामी जीवन जगता येते आणि काम करता येते. तसेच जेथे वस्तू मानवी आरोग्याला हानीकारक ठरत नाहीत, तेथे कार्यक्षम शक्ती, गॅस उत्सर्जन कमी असणारी उष्णता व्यवस्था, मलमूत्र विसर्जनाची दूषीत पाणी आणि पावसाचे पाणी व टाकाऊ वस्तूंची निर्णय व्यवस्था चांगली असते.'' ('Green building' means a building structued and constitutes a comfortable living and working environment with the use of biliding materials that does not couse negative impacts, on human health and environment, energy efficient, heating system with low carbon emission technology of rain water collection and with the sewage or waste water treatmet system.)

''हरित मिळकत म्हणजे अशा वस्तू, सेवा आणि कामे की, ज्यांच्या वापरामुळे शक्ती व नैसर्गिक साधनांचा चांगला (योग्य) उपयोग होतो.'' ('Green rocurement' means a procurement of goods, works and services that are directed to ensuring efficient use of energy and natural resources, sustainbility of ecosystem services, climate change adaptation and creation of green environment.)

''हरित गुंतवणूक म्हणजे असे प्रकल्प, प्रक्रिया व कामे यातील गुंतवणूक की जेथे शक्ती व साधनांची (वस्तू इत्यादी) कार्यक्षम वापर होतो व पाण्याशिवायचे तंत्र वापरले आहे.'' (Green Investment' means a financing of and investing in projects and operations whith use energy and material efficient and waterless technologies with ecosystem conservation value.)

''हरित कर म्हणजे एकूण वातावरणावर नकारार्थी परिणाम न करता उत्पादन, सेवा, आयात व उपभोग यामध्ये घट घडवतो तो होय.'' ('Green Tax' means a tax that aims to reducing production, services, imports and consumption with negative environmental impacts.)

परिसंस्था (Ecosystem) सेवांची किंमत म्हणजे लाभदायक व सेवा पुरविणारे यांच्यात ठरलेली किंमत यंत्रणा होय.'' ('Payment for ecosystem service' means payment mechanism between beneficiers of ecosystem services and contributors to ensuring subsanitability of ecosystem services.)

### १.२.४ (क) विस्थापना (Displacement) :

विकास (Development) ही प्रामुख्याने अलीकडच्या शतकातील संकल्पना असून यातून अनेक देशांनी विज्ञान-तंत्रज्ञानाची प्रगती, दळणवळणाची साधने व राहणीमानाचा दर्जा वाढ आणि विशेषत: उत्पादनवाढ व उत्पादन साधनांची वाढ झालेली अनुभवणे व त्यातून भौतिक साधन संपत्तीत प्रचंड वाढ झालेली पाहिली अशा विविध मार्गांनी विकासाची संकल्पना सामाजिक जीवनाशी निगडीत झालेली आहे.

आर्थिक विकास म्हणजे केवळ विकास ही संकल्पना संकुचित वाटते. वास्तविक 'विकास' या संकल्पनेत आर्थिक-सामाजिक अशा सर्वच घटकांचा अपरिहार्य विचार करावा लागतो. नियोजनबद्ध विकास यामुळे वरील

दोन्ही गोष्टी परस्परपुरकही आहेत हे स्पष्ट होते. नियोजनबद्ध विकास म्हणजे विशिष्ट उद्दिष्टे समोर ठेऊन साधलेला विकास होय.

भारतामध्ये ही संकल्पना विविधांगी आहे. सामाजिक, भौतिक, आर्थिक अशा विविध कारणामुळे देशात सगळीकडे सारख्याच प्रमाणात विकास झालेला दिसत नाही. त्याचबरोबर विकासासाठीचे प्रयत्न व त्यातून निर्माण होणारे प्रश्न हा एक वेगळाच विषय आहे.

**(I) विकासप्रवृत्त विस्थापन** (Development Induced Displacement) **:**

विकास हे प्रगतीचे मापदंड आहे. परंतु विकास जमिनीचा वापर किंवा उपयोग आणि नवीन संरचनात्मक निर्मितीशिवाय शक्य नसतो. त्यामुळे जमीनीचा धारणकर्ता किंवा मालक विस्थापित होतो. हे धारणकर्त्याच्या इच्छेविरुद्ध असते व त्यात त्यांची गैरसोयही होते. त्यातूनच जमीन धारकापुढे गंभीर प्रश्न निर्माण होतात त्यातच विकास प्रवृत्त विस्थापनाचे प्रश्न असे म्हटले जाते.

वैज्ञानिक आणि तंत्रशास्त्रीय विकासामुळे समाजाला अनेक प्रगत साधने व तंत्रे मिळाली आहेत. मानवाने अनेकदा स्वत:च्या फायद्यासाठी निसर्गाच्या विरुद्ध कृती केली आहे किंवा निसर्गाचा वापर केला आहे. अशा प्रकारच्या अनेक विकास प्रक्रिया राबवल्या जात असलेने विस्थापनाची गंभीर समस्या उद्‌भवली आहे.

**(II) विस्थापनाचा अर्थ :**

मानवी वसाहती ह्या प्रामुख्याने नदीकाठी व सुपीक जमीन असलेल्या ठिकाणी होत असल्याचे आपणाला प्राचीन काळापासून आढळते. धरणाचे बांधकाम, वीज प्रकल्प, रस्ते-रेल्वे बांधणी प्रकल्प, औद्योगिक वसाहती, लष्करी वसाहती अशा प्रकल्पासाठी जमीन सरकार संपादन (Land acquition) करते. त्यावेळी मुळ जमीन मालकाला मोबदला (Compensation) दिला जातो. जमीन मालकाने स्वेच्छेने जमीन सोडली नाही तर जबरदस्ती करून अनेक प्रसंगी बळ वापरून सरकार ताब्यात घेते. यालाच विकासप्रवृत्त विस्थापन (Development Induced Displacement) असे म्हणतात.

**(III) विस्थापनाचे प्रकार :**

'विस्थापन' हे स्थलांतर नव्हे कारण स्थलांतर हे व्यक्तीच्या इच्छेनुसार, संमतीने होते व ते त्याच्या हिताचे असू शकते. अपवादात्मक स्थितीमध्ये काही वेळा दुष्काळ, भूकंप, महापूर अशा कारणामुळे स्थलांतर होते.

परंतु विस्थापन हे विकासासाठी सरकारने लादलेले असते.

विस्थापनाचे प्रकार खालीलप्रमाणे -

**१) नैसर्गिक विस्थापन :** काही वेळा महापूर, दुष्काळ, भूकंप अशा नैसर्गिक आपत्तीमुळे विस्थापन होते. उदा. त्सुनामी सारख्या समुद्री तुफानामुळे लक्षावधी लोक विस्थापित झाले. त्यांचे अजूनही पुनर्वसन होतच आहे.

**२) औद्योगिक विस्थापन :** अर्थव्यवस्थेत काही कारणाने उद्योगधंदे बंद पडले तर तेथील कामगारांना संबंधीत घटकांना सक्तीने दुसरीकडे जावे लागते.

**३) राजकीय विस्थापन :** स्वातंत्र्याच्यावेळी हिंदुस्थानच्या फाळणीमुळे अनेक लोक भारत-पाकिस्तानमध्ये स्थलांतरित झाले.

**४) दहशतवादी विस्थापन :** साधारणत: १९८० पासून जम्मू काश्मिरमध्ये दहशतवाद सुरू झाल्यावर सुमारे ७५% हिंदू लोकांनी भारताच्या इतर भागात कायमच्या वास्तव्यासाठी स्थलांतर केले.

**५) विकासप्रवृत्त विस्थापन :** कोणत्याही विकास कामासाठी शासन जमीन संपादन करते तेंव्हा त्या जमीनीचे मालक विस्थापित होतात.

**(IV) विकासप्रवृत्त विस्थापनातून निर्माण होणारे प्रश्न किंवा समस्या :**

**१) प्रचंड मोठी धरणे व जलाशयातून निर्माण होणारे प्रश्न :** सरकारने भाक्र नानगल, सरदार सरोवर, टेहवी प्रकल्प, नागार्जुन सागर, कोयना व इतर अनेक लहान मोठी धरणे बांधली आहेत. यातून सुमारे ५० लाख लोक बेघर, विस्थापित, स्थलांतरित झाली. यांचे सरकार जरी पुनर्वसन करीत असले तरी ते अत्यल्प समाधानाचे आहे. यातून सर्वांचेच समाधानकारक पुनर्वसन होते असे नाही.

**२) औद्योगिक विकास :** अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी मोठे औद्योगिक प्रकल्प निर्माण केले जातात. त्यासाठी मोठ्याप्रमाणावर जमीन संपादन केली जाते. मात्र त्या जमीनीचे मालक निर्वासित उघड्यावर येतात. २००७ साली पश्चिम बंगालमधील 'नंदीग्राम' येथील टाटा उद्योगसमुह प्रकल्पाने विस्थापितांना तुटपुंजीच नुकसान भरपाई दिली आणि अनेकवेळा कारखान्यांना टाळे ठोकले जाते, अशा विस्थापितांची गणना करणे कठीण असते.

**३) जंगल धोरण व विस्थापन :** सरकारच्या जंगलविषयक जमीन धोरणामुळे आदिवासी लोकांना वनौषधी गोळा करण्यास बंदी केली त्यामुळे त्यांच्या पारंपरिक व्यवसायावर संकट कोसळून त्यांचे उदरनिर्वाहाचे साधनच बंद झाले. त्यातून अनेकजण विस्थापित झाले.

**४) नागरी सुविधातून निर्माण झालेले विस्थापन :** नागरी भागात शिक्षण संस्था, क्रीडा संकुल, व्यापारी संकुल, परिवहन सोई, मंडई इत्यादीसाठी जमीन संपादन केली जाते. त्यामुळे अनेक लोक विस्थापित होतात.

**(V) विस्थापितांचा विस्तार :**

देशात विकास योजनांतर्गत प्रकल्प हाती घेतले. परंतु तेथील काही लोक प्रकल्पग्रस्त होऊन विस्थापित झाले. त्यामुळे अनेकजण दारिद्र्य व धोक्याच्या खाईत पडले. प्रामुख्याने शेतीसाठी पाणी व उद्योगासाठी वीज अशा मोहिमामुळे भारतात विस्थापितांचा असंघटीत असा वर्गच निर्माण झाला.

आर्थिक, सामाजिक संस्थेचे बालाजी पांडे यांच्या मते, १९५१ ते १९८५ या काळात देशात २ कोटी १६ लाख व्यक्ती विस्थापित झाले आहेत. त्यामधील १ कोटी ८५ लाख लोक पाटबंधारे प्रकल्प, उद्योग २४ लाख तर खाणीमुळे २१ लाख लोक विस्थापित झाले आहेत.

परंतु केंद्र सरकारच्या मते, विस्थापितांची संख्या १ कोटी ६५ लाख इतकी आहे. परंतु १९८५ ते १९९५ व त्यानंतरही विकासाचा वेग वाढल्याने विस्थापितांची संख्या वाढली असेल, असा एक अंदाज आहे.

विस्थापनाचा सर्वात मोठा फटका आदिवासींना बसला आहे. कारण पाटबंधारे प्रकल्प दऱ्याखोऱ्यात होत आहेत. विस्थापितांमध्ये सुमारे ४०% लोक आदिवासी व दुर्बल, दलित ६०% आहेत. यावरून विकास कोणाचा आणि प्रत्यक्षात त्यात बळी कोण जातो यांचे हे एक विदारक चित्रच दिसून येते.

याशिवाय ही आकडेवारी ही विस्थापितांची समस्या उग्र बनल्यावर संकलीत केलेली आहे. सुरुवातीला प्रकल्प खर्च व त्याचा लाभ या गुणोत्तरात विस्थापिताचा विचारच होत नव्हता. सध्या मात्र प्रकल्प खर्चात विस्थापनाचा खर्च गृहीत धरला जातो.

**(VI) पुनर्वसनाच्या धोरणातील उणीवा :**

विस्थापितांचे पुनर्वसन होणे गरजेचे आहे, त्यांनाही माणूस म्हणून वागणूक मिळाली पाहिजे, हा विचार वाढल्यानंतर शासनाने याकडे गांभीर्याने पाहायला सुरुवात केली तरी प्रत्यक्षात खालील उणीवा अजूनही दिसतात.

१) विस्थापितांना नोकरीचा अभाव.

२) तटपुंजी रक्कमच मोबदला.

३) नापिक जमीनीचे वाटप.

४) मानसिक आधाराचा अभाव.

**(VII) पुनर्वसनाच्या धोरणाचे परिणाम :**

१) भावनिक धक्का

२) निराश्रितांची अवस्था

३) सर्वंकष शोषण व फसवणूक

४) बलिष्ठांचा (श्रीमंताचा) फायदा.

**(VIII) पुनर्वसनाच्या धोरणाबाबत उपाययोजना :**

१) विस्थापितांचे संघटन व संघर्ष

२) अपूर्ण पुनर्वसनाची पूर्णता:

३) पुनर्वसन व पुनर्स्थापन याबाबत मानवतावादी धोरण

४) विस्थापित व निर्णय घेणारे यांच्यात सुसंवाद वाढवणे.

५) गुणात्मक पुनर्वसवनावर भर

६) पर्यायी योजना व धोरण

७) लोकांचा व विस्थापितांचा सहभाग.

विकास योजना ह्या लोकांच्या विकासासाठी असतात व त्यांचे यशापयश त्यांच्या सहभागावर व सहकार्यावर

असते. मॅगसेसे पारितोषिक विजेते, जलतज्ज्ञ ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र सिंह यांनी लोकांच्या सहकार्याने राजस्थानात मोठा भूभाग हिरवळीचा बनवला आहे.

ज्येष्ठ अर्थशास्त्रज्ञ ऑर्थर यंग यांच्या मते, ''एखाद्यास तुझ्या मालकीचे म्हणून दलदलीचा भाग द्या तो त्यांचे नंदनवन करील; पण केवळ वापरण्यासाठी त्याला बाग दिली तर तो त्याचे वाळवंट करील.''

त्यामुळे असे प्रकल्प लोकांना आपले वाटले पाहिजेत तर ते त्यात सहभागी होतील. याबाबत शासन व जागतिक बँक यांनी प्रशंसनीय अशी कृतीशील पावले उचललेली आहेत. त्यांच्या पुढाकाराने महाराष्ट्रातील कृष्णा, भीमा, उजनी, वैनगंगा प्रकल्पात विस्थापितांना व स्वयंसेवी संस्थांना सहभागी करून घेतले आहे.

या संदर्भात पाण्याकडे व विकासाकडे पाहण्याचा दृष्टिकोन सर्वांनीच बदलला पाहिजे. आपण प्रकल्प राबवितो, पाणी उपसतो; पण पुनर्वसन होते का हे महत्त्वाचे आहे.

विकासाबरोबरच विस्थापना, पर्यावरण व हरित विकास यांचे सध्याच्या अर्थव्यवस्थेत महत्त्व वाढत आहे.

## १.३ सारांश :

आर्थिक विकास व आर्थिक वृद्धी या संकल्पनाचा अर्थ समजावून घेतानाच त्यातील फरकही जाणून घेणे गरजेचे आहे. कारण या दोन्ही संकल्पनाबाबत अर्थशास्त्रज्ञामध्ये अनेक प्रकारचे मतप्रवाह आढळतात. आर्थिक विकासाचे निर्देशक घटक जाणून घेताना यामध्ये प्राचीन विचारधारा व आधुनिक विचारधारा या प्रचलीत मापदंडाच्या आधारावर आपण आर्थिक विकासाचे योग्य मापन करू शकतो. त्यानंतर आर्थिक विकासाबरोबरच शाश्वत विकास, हरित विकास व विस्थापन यांचे महत्त्व जाणून घेणे गरजेचे आहे. कारण अर्थव्यवस्थेचा चिरंतन किंवा शाश्वत विकास घडवून आणण्यासाठी देशातील संसाधनाचा काळजीपूर्वक पर्यावरणपूरक व पर्याप्त वापर करणे काळाची गरज आहे.

## १.४ स्वयं अध्ययन प्रश्न :

**(अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. आर्थिक विकासामध्ये अल्पकालीन वास्तव राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ अभिप्रेत असून दीर्घकालीन ............. राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ अभिप्रेत असते.
(अ) वास्तव (ब) पैशातील (क) अवास्तव (ड) यापैकी नाही

२. प्रो. लुईसच्या मते, ''............. उत्पन्नात होणारी वाढ म्हणजे आर्थिक विकास होय.''
(अ) वास्तव (ब) दरडोई (क) पैशातील (ड) यापैकी नाही

३. सामान्यत: आर्थिक विकासाचा प्रश्न हा ............. अर्थव्यवस्थेशी निगडीत असतो.
(अ) विकसित (ब) विकसनशील (क) अविकसित (ड) यापैकी नाही

४. शास्वत विकास म्हणजे असा विकास कि जो मानवी गरजांचे समाधान ............. टिकवणे होय.
(अ) चिरकाल (ब) तात्पुरते (क) अल्पकाळ (ड) यापैकी नाही

५. दुसरी जागतिक हवामन परिषद १९९० मध्ये .............. येथे संपन्न झाली.

(अ) क्योटो (ब) बहरीन (क) दिल्ली (ड) यापैकी नाही

६. हरित विकासाची संकल्पना हे असे एक मॉडेल आहे की, ज्यामध्ये आर्थिक विकासाबरोबरच .............. असतो.

(अ) नैसर्गिक साधनाचा वाढता वापर (ब) यंत्रसामग्री (क) यापैकी नाही

७. २००७ मध्ये .............. प्रकल्पामुळे विस्थापनाचा प्रश्न निर्माण झाला.

(अ) नंदीग्राम (ब) डहाणू (क) यापैकी नाही

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. आर्थिक विकास म्हणजे काय?
२. आर्थिक वाढ म्हणजे काय?
३. शाश्वत विकासाचा अर्थ सांगा.
४. आर्थिक वृद्धी ही कोणत्या अर्थव्यवस्थेशी संबंधीत आहे?
५. आर्थिक विकासामध्ये आर्थिक प्रक्रिया कशी असते?
६. हरित विकासा म्हणजे काय, हे थोडक्यात स्पष्ट करा.
७. विकास प्रवृत्त विस्थापन म्हणजे काय?

## १.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**(अ)** १. (अ) वास्तव, २. (ब) दरडोई, ३. (ब) विकसनशील
४. (अ) चिरकाल ५. (अ) क्योटो, ६. (अ) नैसर्गिक साधनाचा वाढता वापर
७. (अ) नंदीग्राम

**(ब)** १. प्रो. लुईसच्या मते, ''दरडोई उत्पन्नात होणारी वाढ म्हणजे आर्थिक विकास होय.''

२. प्रो. शुंपीटरच्या मते, ''आर्थिक वृद्धी म्हणजे अर्थव्यवसति दीर्घकाळात संथपणे व सातत्याने होणारा बदल म्हणजे आर्थिक वृद्धी होय.''

३. शाश्वत विकास म्हणजे असा विकास की जो भविष्यकालीन पिढ्यांच्या, त्यांच्या स्वत:च्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेशी कोणतीही तडजोड न करता सध्याच्या गरजा पूर्ण करणे होय.

४. विकसित

५. स्वयंपूर्ण व तुटक किंवा खंडीत स्वरूपाची.

६. हरित विकास म्हणजे नैसर्गिक संसाधनाचा कार्यक्षम व परिणामकारक उपयोग होय.

७. प्रकल्पाच्या उभारणीच्या वेळी जमीन मालकाने स्वच्छेने जमीन सोडली नाही तर जबरदस्ती करून अनेक प्रसंगी बळ वापरून लवकर ताब्यात घेणे यालाच विकासप्रवृत्त विस्थापन म्हणतात.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय :

### (अ) टीपा लिहा.

१. आर्थिक विकास
२. आर्थिक वृद्धी
३. शाश्वत विकास
४. हरित विकास
५. विस्थापना

### (ब) दिर्घोत्तर प्रश्न :

१. आर्थिक विकास म्हणजे काय? आर्थिक विकासाचे महत्त्व स्पष्ट करा.
२. आर्थिक वृद्धी स्पष्ट करा.
३. आर्थिक विकास व आर्थिक वृद्धी यातील फरक सांगा.
४. शाश्वत विकासाची संकल्पना स्पष्ट करा.
५. हरित विकास व विस्थापना या संकल्पनांचा आढावा घ्या.
६. विस्थापना म्हणजे काय सांगून, त्यांचे प्रकार स्पष्ट करा.

## १.७ क्षेत्रीय कार्य :

१) आपल्या परिसरातील पर्यावरणीय समस्यांचा आढावा घ्या.
२) आपल्या शहराचे किंवा गावाचे हरित परीक्षण (Green Audit) अभ्यासा.

## १.८ संदर्भ :


1) Ahuje Ram : "Social Problems in India",

2) Debi Sailababa & Annigeri V. B. : "Sustainable Development and the Indian Economy : Issues and Challanges", Serials Publication, New Delhi. For centre for multi-Disciplinary Development Research (CMDR), Dharwad.

3) "Green Development Policy of Mongolia", http://unoffical translition, Ministery of Environment and Green Development of Mongolia, Policy passed by State Great Khural (parliement of Mongolia). On http:// friday Jun 13, 2014 with immediate effect (http:// cover mongolia.blogspot.in/294/06/ green development policy.....)

4) Jhingan M. L. : "The Economic of Development and Planning, Vrinda Publication (P) Ltd., Delhi.

5) Kuppuswamy B. : "Social Change in India"

6) Kusum (Ed.) women: "March Towards Dignity"

7) Lekhi R. K. : "The Economic of Development and Planning", Kalyani Publishers, New Delhi.

8) Madan G. R. : "India Social Problems", Vol. I-II.

9) Mamoria C. B. : "Social Problems and Social Disorganisation"

10) Ojha N. M. : "Ecology and Environment"

11) Papalia D. E. & Olds S.N. : "Human Development" 5th Ed.

12) Parasuraman S. : "Development Projects, Displacement and outcomes for Displaced Two case studies", Epw, June 15, 1996, P.N. 1529 to 1531 (http://proxy.inflibnet.ac.in.2055/system/files/pdf/1996. 31/24/development-projects, displacement and outcomes for case studies.pdf).

13) Ramnath Shankar : "Social Problems and Welfare in India".

14) Ray Sarwatch Parshuram : "Development Induced Displacement in India." (http://www.calternatives. org/resource/pdf/Development % 20 Induced % Displacement % 20 in % India.pdf.)

15) Rist Gilbert : "The History of Development", Acudemic Foundation, New Delhi.

16) Santra S. C. : "Environment Science", MCBA, 8/1, Chintamani Da Lane, Kolkatta.

17) Sharma P. D. : "Ecology and Environment", Rastogi Publications, Meerut.

18) Smith Stephen's & Todaro Michael P. : "Economic Development", Pearson Education Lim. Indian edition published by Dorling Kimdersley India, pvt. Ltd., Noida.

19) Stanley William : "Machkand Upper Kolab and NALCO Projects in koraput Districit Orissia, EPW, Jun 15, 1996, page no. 1533 to 1538.

(http://proxy.inflibnet.ac.in.2055/system/files/pdf./1996-31/24/mackund -upper-kolab and nalco.projects - in koraput.districit.orissia.pdf.)

20) "The Sustainable Development Defination, back grount, issues and objectives." (http://www.legrand.com/En/sustainble development.description. 1....)

21) The World Bank Group, Development, Education Programme, "Beyond Economic Growth", meeting the challanges of Global Development (http://www.world bank.org/deepweb.beyon/global/chapter 1.html.)

22) Tonya Wragg Morris, with Contributors from Leiso Perch. (Dams Development and Displacement : Towards more Inclusive of social futures). research breif December 2012 / no.35, The International Policy Centre for Inclusive Growth is Jointly Supported by the Bureau for Development Policy, United Nations, Development Programme of the Government of Brazil.
(http://www.ipc-undp.org/pub/Ipc.policy Research Brief 35. pdf).

23) Vijayan Suchita, "Sustaible, green development and gender equality are leading challanges for India" The Hindu (http://www.the hindu.com/news/cities/Delhi/sustainble - green development and gender equality are leading challanges for india/articles 184657.ece.)

24) Vigil Sara, "Displacement as a consequence of Climate change mitigation policies (http://www. fmreview.org/en/climate change disasters/vigil.pdf.)

25) Weinberg Rubington and Hanmersmith, "The Solution of Social Problems; five perspectives"

26) कविमंडन विजय : ''विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन'', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

27) झामरे जी. एन. : ''भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरणात्मक'', पिंपळापुरे ॲण्ड कं., पब्लिशर्स, नागपूर.

28) पाटील जे. एफ : ''वृद्धी व विकासाचे अर्थशास्त्र'', फडके प्रकाशन, कोल्हापूर.

29) फडणवीस मृणालिनी : ''विकासाचे अर्थशास्त्र व सिद्धांत'', विद्या प्रकाशन, नागपूर.

30) भोसले, काटे : ''सुबोध व्यावसायिक अर्थशास्त्र'', फडके प्रकाशन, कोल्हापूर.

31) भोसले, काटे, दामजी : ''साधनसंपत्तीचे अर्थशास्त्र'', फडके प्रकाशन, कोल्हापूर.

32) कोंडेकर ए. वाय आणि : ''भारतातील सामाजिक समस्या'', फडके बुक हाऊस, कोल्हापूर.
मारुलकर विजय

33) कुंभार (डॉ.) राजाराम अरुण : ''पर्यावरणशास्त्र''

34) साळुंखे, जत्राटकर मारुलकर : ''समकालीन भारतातील सामाजिक समस्या'', नरेंद्र प्रकाशन, पुणे.

35) Web side :-

i) www.nyenglishslpages.com/site.php: files/reading sustainble.

ii) www.iisd.org / sd / # one (International Institute for sustainable Development)

iii) http://proxy.inflibnet.ac.in.2055/ system / files / pdf / 1996, 31/ 24 / whose nation.pdf (Kothari Smita, "Whose Nation? The Displaced as Victimes of Development EPW, June, 1996.)

घटक २

# विकसनशील आणि विकसित देश

अनुक्रमणिका

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ अविकसित व विकसीत अर्थव्यवस्थेचा अर्थ
२.२.२ अविकसित अर्थव्यवस्थेची मूलभूत वैशिष्ट्ये
२.२.३ आधुनिक आर्थिक वृद्धीची वैशिष्ट्ये
२.२.४ आर्थिक विकासातील प्रमुख अडथळे

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द

२.५ स्वयं अध्ययन प्रश्न

२.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.७ सरावासाठी स्वाध्याय

२.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## २.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास पुढील बाबींचे आकलन होईल.

- अविकसीत व विकसीत अर्थव्यवस्था म्हणजे काय ते समजेल.
- अविकसीत राष्ट्रांची मूलभूत वैशिष्ट्ये लक्षात येतील.

- आधुनिक आर्थिक वृद्धीची वैशिष्ट्ये समजतील.
- आर्थिक विकासातील प्रमुख अडथळ्यांचे आकलन होईल.

## २.१ प्रास्ताविक :

साधारणपणे २० व्या शतकाच्या मध्यावर व विशेषत: दुसऱ्या महायुद्धानंतर आर्थिक विकासाच्या अभ्यासाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले. कारण आज सर्व अर्थव्यवस्थांना आर्थिक विकासाच्या अभ्यासाची आवश्यकता भासते. अल्पविकसीत अर्थव्यवस्थेत आपल्यासमोरील अनेक प्रश्न सोडविण्यासाठी विशेषत: सार्वत्रिक दारिद्र्याचा प्रश्न, बेरोजगारी, अज्ञान, आर्थिक मागासलेपणा, अल्प उत्पादकता, निम्न स्तरावरील राहणीमान यासारख्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी अर्थव्यवस्थेच्या विकासाचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते. विकसीत राष्ट्रांच्याही काही समस्या असतात. त्यांची सोडवणूक करण्यासाठी सुद्धा विकासाचा अभ्यास करणे आवश्यक असते. भांडवलशाही, समाजवादी, लोकशाही या राष्ट्रांनादेखील आपापल्या अर्थव्यवस्थेसमोरील विविध समस्या सोडविण्यासाठी आर्थिक विकासाच्या अभ्यासाची आवश्यकता आहे.

## २.२ विषय विवेचन :

प्रस्तुत घटकामध्ये आपण अविकसित व विकसीत अर्थव्यवस्था म्हणजे काय? अविकसीत अर्थव्यवस्थांची मूलभूत वैशिष्ट्ये, आधुनिक आर्थिक वृद्धीची वैशिष्ट्ये तसेच आर्थिक वृद्धीच्या प्रक्रियेतील प्रमुख अडथळ्यांविषयी चर्चा करणार आहोत.

### २.२.१ अविकसीत व विकसीत अर्थव्यवस्थेचा अर्थ :

जगातील सर्व देशांचा आपण विचार केल्यास जगाची विभागणी विकसित देश, विकसनशील देश आणि अविकसित देश या तीन भागामध्ये केली जाते. विकसित देश म्हणजे, ज्यांनी आपला विकास साध्य केलेला आहे असे देश होय किंवा उपलब्ध तांत्रिक ज्ञानाच्या आधारे अर्थव्यवस्थेतील शक्य व सुप्त उत्पादक शक्तीचा जो देश पूर्णपणे वापर करतो त्यास विकसित देश म्हणतात विकसित देशामध्ये अमेरिका, जपान, कॅनडा, इंग्लंड इत्यादी देशांचा समावेश होतो. विकसनशील देश म्हणजे अशी राष्ट्रे की जी जाणीवपूर्वक शास्त्रशुद्ध पद्धतीने आर्थिक विकासासाठी अनेक विविध कार्यक्रम, धोरणे राबवीत असतात अशा देशांना विकसनशील देश म्हणतात. यामध्ये भारत, पाकिस्तान, कोलंबिया या देशांचा समावेश होतो. अविकसित देश म्हणजे शक्य व सुप्त शक्तीचा जो देश पुरेपूर किंवा पर्याप्त वापर करीत नाही त्यास अविकसित देश म्हणतात. अशा देशात नैसर्गिक साधनसामग्री मोठ्या प्रमाणात असून देखील त्या साधनसामग्रीचा पुरेपूर वापर करण्याचे कौशल्य किंवा ज्ञान अशा देशांकडे नसते त्यामुळे ते अविकसित म्हणून संबोधले जातात. यामध्ये अंटार्टिका, सहारा व सैबेरियाचा काही भाग यांचा समावेश होतो.

अविकसित हा शब्दप्रयोग अलिकडच्या काळात की झालेला आहे. कारण गुन्नार मिर्डाल यांनी म्हटले आहे की, अविकसित या शब्दातून गतिमानता सूचित होत नाही. त्यामुळे अविकसित हा शब्दप्रयोग जास्तीचा वापरला जात नाही. अविकसित देशांचा अर्थ समजावून घेण्यासाठी पुढील काही व्याख्यांचा अभ्यास करू.

**व्याख्या (Definitions) :**

**१) प्रा. नर्क्स :** ''अविकसित देश म्हणजे असे देश की, त्या देशातील लोकसंख्येशी तुलना करता देशात उपलब्ध असणारी नैसर्गिक साधनसंपत्ती, भांडवल हे विकसित देशांपेक्षा खूपच कमी असणे होय.''

**२) प्रा. क्लार्क :** ''अविकसित राष्ट्र किंवा देश म्हणजे त्या देशातील अर्थव्यवस्थेतील प्रमुख व्यवसाय हा शेती असतो आणि सेवाक्षेत्राची प्रगती झाल्याशिवाय त्या देशाचा विकास घडून येऊ शकत नाही. अशा प्रकारचा देश होय.''

**३) युनोच्या तज्ज्ञ समितीने केलेली व्याख्या :** ''अविकसित देश म्हणजे, ज्या देशाचे उत्पन्न अमेरिका, ऑस्ट्रेलिया, कॅनडा कमी व पश्चिम युरोपमधील काही राष्ट्रांच्या दरडोई वास्तव उत्पन्नापेक्षा कमी आहे अशी राष्ट्रे होय.''

वरील व्याख्यांचा आपण अभ्यास केल्यास दरडोई वास्तव उत्पन्नाचे प्रमाण खूपच कमी आहे. उत्पादकता कमी आहे. अशा देशांचा प्रमुख व्यवसाय शेती हा आहे. त्याचबरोबर अविकसित देशातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा पर्याप्त होत नाही. अशा राष्ट्रांना अविकसित राष्ट्र असे म्हणतात.

## २.२.२ अविकसीत अर्थव्यवस्थेची मूलभूत वैशिष्ट्ये :

अल्पविकसित अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये पाहण्यापूर्वी अल्प विकसितपणाचा अर्थ जाणून घेणे महत्त्वाचे ठरते. 'अविकसित' (Undeveloped) आणि अल्पविकसित (Underdeveloped) देश या दोन संकल्पना बऱ्याचवेळा समान अर्थाने वापरतात. परंतु या दोन संकल्पनांमधील फरक सहजरित्या स्पष्ट करता येईल. 'अविकसीत' देश म्हणजे असे देश की, ज्या राष्ट्राकडे विकासाची कोणतीही 'आशा' किंवा 'संभव' नसलेला देश होय. उदा. अन्टार्टिका, आर्टिक, सहारा वाळवंटातील काही भाग आणि 'थर' वाळवंटातील कांही भागाचा समावेश अविकसित देशात होतो. तर 'अल्पविकसित' देश म्हणजे असे देश की ज्या देशाकडे विकास करण्याची क्षमता असते अशा देशास अल्पविकसित देश म्हणून ओळखतात. उदा. भारत, पाकिस्तान, श्रीलंका, कोलंबिया, युगांडा, पनामा इ. देशांचा समावेश अल्पविकसित देशात होतो. तसेच अल्पविकसित राष्ट्रासाठी 'गरीब राष्ट्रे' (Poor countries) 'मागासलेली राष्ट्रे' (backward countries) विकसनशील राष्ट्रे (Developing countries) अशाही संकल्पना वापरल्या जातात. 'गरीब राष्ट्रे' म्हणजे ज्या राष्ट्रातील लोकांचे दरडोई उत्पन्न कमी असते अशी राष्ट्रे होय.' तर 'मागासलेली राष्ट्रे' ही संकल्पना अविकसीत राष्ट्रांप्रमाणेच स्थितीशीलता दर्शवितात. जागतीक बँक अल्पविकसीत राष्ट्रांसाठी 'विकसनशील देश' (developing countries) अशी संकल्पना वापरते. अलिकडे अल्प विकसित राष्ट्रांसाठी 'तिसरे जग' (Third world) अशीही संकल्पना वापरली जाते. थोडक्यात अल्पविकसित राष्ट्रासाठी गरीब राष्ट्रे, मागासलेली राष्ट्रे, विकसनशील राष्ट्रे, तिसरे जग अशा विविध संकल्पना वापरल्या जातात.

- **अल्पविकसित देशाची व्याख्या :**

अल्पविकसित अर्थव्यवस्थेची एकच अशी अचूक व्याख्या करणे कठीण असे काम आहे. तथापी कांही

तज्ञांनी अल्प विकसितपणाचा अर्थ जाणून घेण्यासाठी केलेल्या कांही महत्त्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे -

**१) संयुक्त राष्ट्र संघाच्या तज्ज्ञ गटाच्या मते** ''अल्पविकसित देश म्हणजे असा देश की, ज्या राष्ट्रातील वास्तव दरडोई उत्पन्न हे अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि पश्चिम युरोप या राष्ट्रांच्या तुलनेने कमी असणारे देश होय.''

**२) रॅग्नर नर्क्सेच्या मते** ''अल्प विकसीत देश म्हणजे असे देश की, विकसीत राष्ट्राच्या तुलनेने भांडवल त्या ठिकाणची लोकसंख्या आणि नैसर्गिक साधन संपत्ती मागासलेले असणारे देश होत.''

**३) एम. पी. तडारोच्या मते** ''अल्पविकसीत देश म्हणजे असे देश की, ज्या अर्थव्यवस्थेतील लोकांच्या राहणीमानाचा दर्जा हलक्या प्रतीचा असतो. निरपेक्ष दारिद्र्य, दरडोई उत्पन्नाचे कमी प्रमाण, कमी उपभोग पातळी, आरोग्य सेवांची कमतरता, मृत्यू दराचे जास्त प्रमाण, जास्त जनन दर आणि परकीय अर्थव्यवस्थेवरील अवलंबित्व जास्त असणाऱ्या अर्थव्यवस्थेस अल्पविकसित देश म्हणतात.''

**४) सायमन कुझनेटच्या मते** '' अल्पविकसित देश म्हणजे असे देश की, जे देशातील बहुसंख्य लोकांना सुयोग्य असे राहणीमान प्राप्त करून देण्याच्या बाबतीत अपयशी ठरतात व त्याचा परिणाम लोकांचे दैन्य आणि भौतिक वंचितता यात आढळते.''

**५) जेकब वायनरच्या मते** ''अल्पविकसित अर्थव्यवस्थेची व्याख्या लोकांच्या राहणीमानाच्या पातळीच्या आधारावर केलेली आहे. त्यांच्या मते 'अल्पविकसित देश म्हणजे ज्या राष्ट्राकडे विकास घडवून आणण्यासाठी आवश्यक असलेल्या अतिरिक्त श्रमाचा वापर, भांडवल अथवा अतिरिक्त प्रमाणात उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर करून लोकांना उच्च पातळीचे राहणीमान प्राप्त करून देण्याची क्षमता असलेला देश अल्पविकसीत देश म्हणून ओळखला जातो.

**६) कोलिन क्लार्कच्या मते** 'अल्प विकसित देश म्हणजे अशी अर्थव्यवस्था की, ज्या अर्थव्यवस्थेत शेतीसारख्या प्राथमिक व्यवसायाचे प्राबल्य असते, आणि अर्थव्यवस्थेतील तृतीय क्षेत्रातील व्यवसायांचा प्रगतशीलपणे विस्तार करून अर्थव्यवस्थेचा विकास घडवून आणता येतो अशी अर्थव्यवस्था होय.'

वरील सर्व व्याख्यांच्या आधारे अल्पविकसित अर्थव्यवस्थेची व्याख्या पुढील शब्दात करता येईल. ''अल्पविकसीत अर्थव्यवस्था म्हणजे अशी अर्थव्यवस्था की जी प्रगत राष्ट्राशी तुलना करता आर्थिक दृष्ट्या जे राष्ट्र गरीब असते. ज्या राष्ट्राचे दरडोई वास्तव उत्पन्न कमी असते, सार्वत्रिक दारिद्र्य, हलक्या प्रतीचे राहणीमान, भांडवल उभारणीचा दर कमी असतो, आणि तांत्रिक मागासलेपण न वापरलेल्या किंवा अपुऱ्या वापरलेल्या मानवी आणि नैसर्गिक साधन सामग्रीच्या बरोबरीने पण त्याचवेळी, अल्पविकसीत देश म्हणजे ज्या राष्ट्राकडे विकासाची क्षमता असते अशा राष्ट्राला विकसनशील देश म्हटले जाते.''

- **अल्पविकसित अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये :**

अल्पविकसित देशाची अथवा अर्थव्यवस्थेची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) कमी दरडोई उत्पन्न :** कमी दरडोई उत्पन्न हे अल्पविकसित अर्थव्यवस्थेचे मुलभूत वैशिष्ट्य आहे. प्रा. कुरिहारा यांच्या मते, कमी दरडोई उत्पन्न हे अल्पविकसित अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. अशा अर्थव्यवस्थेतील कांही समस्यांमुळे तिच्या अभिवद्धीचा वेग कमी राहतो त्याचा परिणाम म्हणून स्थूल राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्नाचे प्रमाण अशा राष्ट्रात कमी राहते.

जागतिक बँकेने २००९ सालच्या जागतिक विकास अहवालात जगातील राष्ट्रांचे दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्ना आधारे खालील प्रमाणे विभाजन केले आहे.

**अ) अल्प उत्पन्नाचे देश :** २००७ साली ९३६ डॉलर्सपेक्षा कमी दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्न असणारे देश.

**ब) मध्यम उत्पन्न असणारे देश :** २००७ साली ९३६ डॉलर्स ते ११,४५६ डॉलर्सच्या दरम्यान दरडोई स्थूलराष्ट्रीय उत्पन्न असणारे देश.

**क) उच्च उत्पन्न असणारे देश :** २००७ साली ११,४५६ डॉलर्स पेक्षा जास्त दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्न असणारे देश.


सन २००७ साली अल्प उत्पन्न असणाऱ्या राष्ट्रात एकूण जागतिक लोकसंख्या जवळजवळ १९.६% लोकसंख्या (१,२९६ दशलक्ष) होती. पण त्यांच्या वाट्याला येणारे जागतिक स्थूल उत्पन्नाचे प्रमाण फक्त १.४ टक्के होते. तर मध्यम उत्पन्न गटातील राष्ट्रात जागतिक लोकसंख्येच्या ६४% लोकसंख्या रहात होती. तथापी त्यांच्या वाट्याला येणाऱ्या जागतिक स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या २३.२% इतका वाटा होता. याचा अर्थ वरील दोन्ही गटातील राष्ट्रांची लोकसंख्या एकत्र केली तर जगाच्या एकूण लोकसंख्येच्या ८४% लोकसंख्या विकसनशील राष्ट्रात राहत होती व त्यांच्या वाट्याला जगातील स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाचा फक्त २४.६% वाटा होता. तर दुसऱ्या बाजूला उच्च उत्पन्न असणाऱ्या देशांत एकूण जागतिक लोकसंख्यैकी १६% इतकी लोकसंख्या रहात होती. (२००७ मध्ये) तर त्यांच्या वाट्याला जागतिक स्थूल राष्ट्रीय उत्पन्नापैकी ७५% इतका वाटा येत होता.

तर सन २००७ साली भारतात राहणारी एकूण लोकसंख्या १,१२३ दशलक्ष इतकी होती व त्यावेळी भारताचे दरडोई उत्पन्नाचे प्रमाण ९५० डॉलर्स इतके होते व भारत अति दारिद्री राष्ट्रांमध्ये गणला जात होता. याचा अर्थ जागतिक लोकसंख्येत भारताचा वाटा १७% होता. तर जागतिक स्थूलराष्ट्रीय उत्पन्नापैकी भारताच्या वाट्याला फक्त २% इतकाच हिस्सा येत होता. याचा अर्थ बहुसंख्य अल्पविकसित राष्ट्रांत दरडोई उत्पन्नाचे प्रमाण खूपच कमी आहे.


**२) दारिद्र्याचे दुष्टचक्र :** अल्पविकसीत अर्थव्यवस्थेत सार्वत्रिक दारिद्र्य मोठ्या प्रमाणावर आढळते. अशा अर्थव्यवस्थेत निरपेक्ष दारिद्र्य सर्वत्र आढळते. निरपेक्ष दारिद्र्य याचा अर्थ केवळ लोकांचे कमी उत्पन्न असणे असा नसून लोकांचे कुपोषण, शारीरिक दौर्बल्य, अपुरे कपडे, अपुरा निवारा, शिक्षणाचा अभाव, हलक्या प्रतिचे राहणीमान हलक्या प्रतीचा म्हणजेच निसत्वयुक्त आहार, दुषीत पिण्याचे पाणी इ. गोष्टीतून हे दारिद्र्य दिसून येते. रॅग्नर नर्क्सेच्या मते, ''देशी दरिद्री आहे कारण देशातील दारिद्र्य होय.'' अशा राष्ट्रात राहणाऱ्या बहुसंख्य लोकांचे उत्पन्न कमी असते, कारण त्यांची उत्पादकता कमी असते. जगातील एकूण लोकसंख्येपैकी २/३ लोकसंख्या अल्पविकसित

राष्ट्रात राहते. पण जगातील एकूण उत्पन्नाच्या फक्त १/३ हिस्साच अशा राष्ट्राला मिळतो, त्यामुळे त्यांना दारिद्र्यावर सवार झालेली राष्ट्रे म्हणूनही ओळखले जाते. अल्पविकसीत अर्थव्यवस्थेत आर्थिक, सामाजीक आणि राजकीय घटकांच्या प्रभावांच्या क्रिया आणि प्रतिक्रियांमुळे अल्प विकसीत अर्थव्यवस्थेला अल्पविकसीत ठेवण्यास कारणीभूत ठरतात. अशा अर्थव्यवस्थेतील अल्प बचत व अल्पगुंतवणूकीमुळे अर्थव्यवस्था अल्पविकसित राहते आणि अविकसीतपणामुळे पुन्हा बचत व गुंतवणूक कमी राहते. अशाप्रकारे दारिद्र्याचे दुष्टचक्र पूर्ण होते. मेयर आणि बाल्डवीन यांनी 'मागणी' आणि 'पुरवठा' या दोन्ही बाजूने फिरणारे दारिद्र्याचे दुष्टचक्र स्पष्ट केले आहे.

**१) पुरवठ्याची बाजू**




**२) मागणीची बाजू**




अल्पविकसित अर्थव्यवस्था अशारितीने दारिद्र्याच्या दृष्टचक्रात गुंतून पडलेल्या असतात की, त्यांना अल्प कालावधीत सहजासहजी हे दुष्टचक्र मोडून बाहेर पडणे शक्य होत नाही. दीर्घकालावधीतच जनतेचे सहकार्य व सरकारचा सहभाग यातून हे दुष्टचक्र मोडून काढता येऊ शकते. आणि जोपर्यंत हे दुष्टचक्र मोडून काढले जात नाही तोपर्यंत अल्पविकसित अर्थव्यवस्था विकासाकडे वाटचाल करू शकत नाही. त्यांच्या दारिद्र्याचे खरे कारण संसाधनाची कमतरता हे नसून त्यांचा अपुरा उपयोग हे आहे.

**३) शेती हाच मुख्य व्यवसाय :** अल्पविकसित अर्थव्यवस्थेतील जवळ जवळ २/३ किंवा त्यापेक्षाही जास्त लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. व त्यांचा मुख्य व्यवसाय शेती हाच आहे. चीन, केनिया, मॅनमार, व्हिएतनाम, भारत, पाकिस्तान, इंडोनेशिया यासारख्या राष्ट्रात ७० ते ७५% लोकसंख्या शेती क्षेत्रावर अवलंबून आहे. या उलट विकसित देश म्हणजेच अमेरिका, कॅनडा, पश्चिम जर्मनी इ. राष्ट्रात जास्तीत जास्त ३ ते ४% लोकसंख्या शेतीवर अवलंबून असते. अविकसीत देशातील शेती हा मुख्य व्यवसाय असला तरी त्यांच्या शेतीची उत्पादकता फारच कमी असते. कारण शेतीत वापरले जाणारे जुनाट तंत्रज्ञान, सरासरी धारण क्षेत्राचे लहान

आकारमान, यामुळे शेतीची प्रति हेक्टरी उत्पादकता खूपच कमी असते. अशा राष्ट्रांमध्ये शेतीतून मुख्यत्वे अन्नधान्य व कच्चा माल यांचेच उत्पादन केले जाते. उदा. श्रीलंका चहा, रबर आणि नारळ उत्पादनात, मलेशिया रबर, टिन, पामतेल, इंडोनेशिया रबर, तेल व टिन उत्पादनात पाकिस्तान कापूस, बांगलादेश जूट, भारत चहा, ब्राझिल कॉफी उत्पादन करतात. कांही अल्प उत्पन्न गटातील राष्ट्रांपैकी बांगलादेश, इथिओपिया, नेपाळ, युगांडा, घाना आणि टांझानिया इ. देशांच्या राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा वाटा ४० पेक्षा जास्त असून उद्योगधंदे व प्रक्रिया उद्योगांचा वाटा २०% पेक्षा कमी आहे.

**४) अर्थव्यवस्थेचे दुहेरी स्वरूप :** बहुसंख्य अल्पविकसित राष्ट्रांची अर्थव्यवस्था दुहेरी स्वरूपाची असते. एक म्हणजे बाजार व्यवस्था व दुसरे म्हणजे निर्वाह व्यवस्था. बाजारव्यवस्था ही अत्यंत प्रगत स्वरूपाची असून तेथे वाहतूक, दळणवळणाची साधने, बाजारपेठा, शैक्षणिक संस्था यांचा विकास झालेला असतो. अशा ठिकाणी औद्योगिक विकासही झालेला असतो. त्यामुळे तेथे प्रगत तंत्रज्ञानाच्या सहाय्याने औद्योगिक उत्पादन केले जाते. उलट निर्वाह व्यवस्था ही अत्यंत मागासलेली, शेतीवर आधारलेली अशी ग्रमीण भागात अस्तित्वात असलेली की ज्या ठिकाणी कोणत्याही सुखसोई उपलब्ध नसतात अशी निर्वाह व्यवस्था ग्रामीण भागात कार्यरत असते. अशा दुहेरी स्वरूपाच्या अर्थव्यवस्थेमुळे अशा अर्थव्यवस्थांना आपला आर्थिक विकास करण्यात अडचण येते.

**५) संसाधनाचा अपुरा विकास :** सर्वच अल्पविकसित राष्ट्रांकडे संसाधनांची दुर्मिळता असतेच असे नाही. त्यापैकी बऱ्याच विकसनशील राष्ट्रांकडे जमीन, खनिजे, पाणी, जंगल आणि शक्ती साधने विपुल प्रमाणात उपलब्ध असतात. उदा. आफ्रिकेत तांबे, कथील, बॉक्साईट आणि सोने यांचे साठे विपुल प्रमाणात आहेत. तसेच आशिया खंडात पेट्रोलियम, लोखंड, बॉक्साईड, मॅंगेनीज, कथील, अभ्रक विपुल प्रमाणात सापडते. तर लॅटिन अमेरिकेत पेट्रोलिअमचे साठे, लोखंड, जस्त तांबे विपुल प्रमाणात सापडते. परंतु अशा राष्ट्रांत भांडवलाची कमतरता असते, बाजारपेठांचा कमी विकास, तांत्रिक ज्ञानाचा अभाव यामुळे हे देश उपलब्ध संसाधनाचा पर्याप्त वापर करू शकत नाहीत. त्यामुळे बरीच संसाधनेअपुरी वापरली जातात. किंवा त्यांचा कोणताही वापर केला जात नाही किंवा दुरुपयोग होतो. त्यामुळे त्याचा अशा राष्ट्रांच्या आर्थिक विकासावर प्रतिकूल परिणाम होतो.

**६) औद्योगिक मागासलेपण :** बहुतेक अल्पविकसित देशाचा औद्योगिक विकास अत्यंत मंद गतीने व विषम प्रमाणात होत असतो. जास्तीत जास्त १५% श्रमिक औद्योगिक क्षेत्रात गुंतलेले असतात.अल्पविकसित राष्ट्रात सुती कापड उद्योग, साखर, खाद्य उत्पादन उद्योग यासारख्या उद्योगांचा मर्यादित प्रमाणात विकास झालेला असतो. भांडवली वस्तू उद्योग कमी प्रमाणात किंवा कांही वेळा कांहीही विकास झालेला नसतो. त्यामुळे अशा राष्ट्रांचा आर्थिक विकास कमी प्रमाणात होतो.

**७) लोकसंख्येचा अतिरिक्त ताण :** बहुतेक अल्पविकसित राष्ट्रात विकसित राष्ट्रांच्या तुलनेने लोकसंख्या वाढ मोठ्याप्रमाणात होत असते. अल्पविकसित राष्ट्रात सरासरी लोकसंख्या वाढीचा दर २.१% तर विकसित देशात तो ०.६% असतो. अल्पविकसित राष्ट्रात जननदर ३० ते ४० दर हजारी असतो. तर मृत्यूदराचे प्रमाण दरहजारी ९ ते १० इतके असते. बहुसंख्य अल्पविकसित राष्ट्रात वाढत्या लोकसंख्येचा ताण दिसून येतो व त्यातून अनेक गुंतागुंतीचे आर्थिक प्रश्न निर्माण होतात अशा राष्ट्रातील दरडोई उत्पन्नाचे प्रमाण कमी असते. कामगारांची कार्यक्षमता

सुद्धा कमी असते, राहत्या घरांची कमतरता असते. उपभोगाचे प्रमाण जास्त असल्याने बचत कमी होते. त्यामुळे भांडवल उभारणी कमी होऊन त्याचा आर्थिक विकास कमी होण्यावर परिणाम घडून येतो. तसेच दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण अधिक राहते. बेरोजगारी व हलक्या प्रतीचे राहणीमान असे दृश्य अल्पविकसित अर्थव्यवस्थेत नेहमीच पहायला मिळते.

**८) विस्तृत बेरोजगारी आणि प्रच्छन्नबेकारी :** अल्पविकसित अर्थव्यवस्थेत अत्यंत वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे श्रमिकांचा पुरवठाही वेगाने वाढतो. ज्यावेगाने लोकसंख्या वाढते त्या वेगाने रोजगारसंधी वाढत नसल्याने बेरोजगारीचा प्रश्न निर्माण होतो. प्रचलित वेतनदरावर काम करण्याची शारीरिक व मानसिक क्षमता असतानाही ज्यांना काम मिळत नाही त्यामुळे त्यांना अनैच्छिकपणे बेकार राहावे लागते. त्यापैकी कांही लोक गरज नसतानाही शेती क्षेत्रात गुंतलेले असतात की, ज्यांची शेती क्षेत्रात सीमांत उत्पादकता शून्य असते अशा श्रमिकाला प्रच्छन्न बेकार असे म्हणतात. यु.एन.ओ. च्या अहवालानुसार भारत, पाकिस्तान आणि आशिया खंडातील कांही अल्प विकसित राष्ट्रात २० ते २५% लोकसंख्या प्रच्छन्न बेकार आढळते. एम.पी. तोडारोच्या मते, तिसऱ्या जगातील उघड बेकार आणि छुपे बेकार (ग्रामीण तसेच शहरी भागातील) एकत्र केले तर जवळ जवळ ३०% तिसऱ्या जगातील लोक वापराविना तसेच पडून असतात. अलिकडच्या एका अभ्यासावरून ग्रामीण तसेच शहरी विभागातील उघड तसेच छुप्या बेकारांचे अल्पविकसित राष्ट्रातील प्रमाण जवळ जवळ ३० ते ३५% इतके असते असे म्हटले आहे.

**९) संघटन कौशल्य तसेच संयोजन कौशल्याचा अभाव :** अल्पविकसित अर्थव्यवस्थेचे हे एक अत्यंत महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. अशा अर्थव्यवस्थेत संघटन कौशल्याच्या विकासाला आवश्यक असणारा अनुभव व तांत्रिक ज्ञान न मिळाल्याने त्याचा विकास होऊ शकत नाही व त्यामुळे आर्थिक विकासावर मर्यादा पडते. तसेच बाजारपेठांचा लहान आकार, भांडवलाची कमतरता, खाजगी संपत्तीचा अभाव, स्वातंत्र्याचा अभाव तसेच पायाभूत सुविधांचा अभाव, धोके व अनिश्चितता, वाहतुक व दळणवळण साधनांचा अभाव, स्वस्त व नियमित विद्युत पुरवठ्याचा अभाव, कच्च्या मालाच्या पुरवठ्याची अडचण, कुशल कामगारांची टंचाई, पुरेसा विकसित भांडवली बाजार आणि नाणेबाजार यासारख्या अडथळ्यांमुळे संयोजन कौशल्यात अडथळे येतात व त्यामुळे आर्थिक विकास कमी होतो.

**१०) विकासासाठी पायाभूत सुविधांची कमतरता :** आर्थिक विकासासाठी आवश्यक असणाऱ्या वाहतुक व दळणवळण सुविधा, शक्ती साधनांची कमतरता असल्याने आर्थिक विकास घडवून आणण्यावर मर्यादा पडते.

**११) भांडवल उभारणीचा व गुंतवणूकीचा कमी वेग :** बहुसंख्य अल्प विकसित देश हे भांडवलाच्या दृष्टीने अत्यंत गरीब असलेले देश आहेत. अशा अर्थव्यवस्थेतील लोकांचे उत्पन्न कमी असल्याने लोकांची बचत कमी होते. बचत कमी असल्याने भांडवल उभारणी कमी होते व भांडवल उभारणी कमी म्हणून गुंतवणूक कमी अशी परिस्थिती अल्पविकसित राष्ट्रात दिसून येते.

**१२) तांत्रिक मागासलेपणा :** अल्पविकसित देशाची तंत्रज्ञानाच्या बाबतची स्थिती मागासलेपणाची दिसून

येते. तो तांत्रिक मागासलेपणा सरासरी खर्चातील वाढीवरून दिसून येतो. तसेच दर मजूरांच्या कमी उत्पादकतेवरून लक्षात येते. त्याच प्रमाणे अकुशल आणि अप्रशिक्षित कामगारांच्या प्राबल्यावरून लक्षात येते. त्यामुळे तांत्रिक मागासलेपण हे त्यांच्या आर्थिक मागासलेपणाचे कारण नसून तो त्याचा परिणामही आहे.

**१३) परकीय व्यापारावर आधारीत अर्थव्यवस्था :** बहुतेक अल्प विकसित अर्थव्यवस्था ह्या परकीय व्यापारावर अवलंबून असतात. अशा राष्ट्रांमधून मुख्यत्वे कच्च्या मालाची निर्यात केली जाते आणि उपभोग्य वस्तू आणि भांडवली वस्तुंची आयात करतात. अलिकडेच जागतिक बँकेने केलेल्या पाहणीस असे दिसून आले आहे की, सरासरी जवळ जवळ ८०% अल्पविकसित राष्ट्रांची निर्यात ही शक्तीसाधने, खनिजे, धातू आणि अन्य प्राथमिक उत्पादनांची असते. अशा निर्यातीतील मालाचा वाटा इथिओपिया ९९%, बर्मा, ९७%, इंडोनेशिया ९६%, अल्जेरिया १००% या प्रमाणे आहे व अशा राष्ट्रांची आयात इंधन विशेषत: पेट्रोल व औद्योगिक बनावटीच्या वस्तू, मशिनरी, परकीय भांडवल, तांत्रिक सहकार्य आणि अन्नधान्य इ. सततच्या वस्तू आयातींमुळे त्यांची आयात क्षमता घटत आहे. तसेच त्यांचा देवघेवीचा असमतोल वाढत आहे. त्यामुळे त्यांचे परकीय कर्जही गेल्या दोन दशकात मोठ्या प्रमाणावर वाढत आहे.

**१४) अंतर्गत व बाह्य कर्जाचा वाढता भार :** अनेक अल्पविकसित राष्ट्रांवर अंतर्गत तसेच बाह्य कर्जाचा भार सतत वाढत आहे. अंतर्गत कर्जावरील व्याज, शासकीय कर्मचाऱ्यांचे पगार, पेन्शन, ग्रॅच्युईटी इ. देणी देण्यासाठी अंतर्गत कर्ज घ्यावे लागते. तर परकीय वस्तुंची सतत वाढत असलेली आयात व त्या तुलनेने त्यांची घटती निर्यात यातून निर्माण होणारे परकीय देणे यामुळे परकीय कर्जात वाढ होते आहे. त्याच बरोबर परकीय कर्जावरील व्याज यामुळेही परकीय कर्जात वाढ होत आहे.

## २.२.३ आधुनिक आर्थिक वृद्धीची वैशिष्ट्ये : (Features of Modern Economic Growth) :

### प्रास्ताविक :

आर्थिक विकास ही प्रक्रिया अविकसित, विकसनशील आणि विकसित अर्थव्यवस्थाशी निगडीत असते. विकसित देशाचा ज्याप्रमाणे विकास झालेला आहे त्याप्रमाणे अविकसित देशाने विकास करण्याची आवश्यकता असते. सर्वसाधारण विकसित देशामध्ये विकास झालेला असतो. अशा वस्तुस्थितीवरून जी वैशिष्ट्ये आढळतात. ती आधुनिक अर्थव्यवस्थेच्या आर्थिक विकासाची वैशिष्ट्ये असतात. सायमन कुझनेटस् यांनी आधुनिक आर्थिक विकासाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत -

**१) प्रति भांडवल उत्पादकता वाढीचा वेग आणि लोकसंख्या :** ज्यावेळी विकसित अर्थव्यवस्थेमध्ये भांडवल गुंतवणूक केली जाते त्यावेळी भांडवलाची सीमांत उत्पादकता ही अधिक असते. त्यामुळे भांडवल गुंतवणूकीपासून मिळणारे नफ्याचे प्रमाण अधिक असते. नफा अधिक झाल्यास भांडवलाची पुनर्गुंतवणूक होते. यातून रोजगार वाढतो - मागणी वाढते - उत्पादन वाढवावे लागते - पुरवठा वाढून पुन्हा भांडवल गुंतवणूक होते. उत्पादन वाढत असताना लोकसंख्येला रोजगार उपलब्ध होतो. बेकारी घटते - मागणी वाढते. राहणीमान सुधारते व

विकासाचा वेग अधिक असतो.

**२) उत्पादन वाढीचा वेग अधिक :** विकसित देशामध्ये भांडवल गुंतवणूक केल्याने रोजगारामध्ये वाढ झालेली असते. त्याप्रमाणात उत्पन्न वाढून मागणी वाढत असते. मागणी पूर्ण करण्यासाठी पुन्हा उत्पादन वाढवावे लागते. यासाठी उत्पादनामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केला जातो. यातून आधुनिक तांत्रिक गुंतवणूक वाढते. उत्पादन वाढीचा वेग अधिक असतो. त्याप्रमाणेच उत्पादनाचा दर्जाही चांगला असतो. परिणामी, उत्पादनाला चांगली किंमत मिळते. निर्यातीस उत्तेजन मिळते. उत्पादन वाढीचा वेग अधिक राहतो.

**३) वाहतूक - दळणवळणामध्ये सुधारणा :** विकसित देशामध्ये वाहतूक आणि दळणवळण क्षेत्रामध्ये सुधारणा झालेली असते. शेतीक्षेत्रातील उत्पादन उद्योग क्षेत्राकडे नेणे. उद्योगातील विविध वस्तूची देवघेव करणे सहजासहजी शक्य होते. बाजारपेठेचे स्वरूप विस्तृत असते. औद्योगिक केंद्रीकरण झालेले असते. उत्पादन घटक अधिक गतीशील असतात. परकिय गुंतवणूकीला चालना दिली जाते. परिणामी, विकासाचा दर अधिक असतो.

**४) शहरीकरण :** आधुनिक आर्थिक विकासाचे शहरीकरण हा घटक महत्त्वाचा असतो. ज्या अर्थव्यवस्थेचे शहरीकरण अधिक झालेले आहे ती अर्थव्यवस्था विकसित समजली जाते. कारखानदारीचे प्रमाण अधिक असते, यांत्रिकीकरण घडून आलेले असते. अधिकचे उत्पादन यंत्राच्या सहाय्याने होत असते. लोकसंख्येचे शहराकडे स्थलांतराचे प्रमाण अधिक असते, विभक्त कुटुंब पद्धत आढळते. जननदराचे प्रमाण कमी असते, उच्च शिक्षणाला प्राधान्य दिले जाते. सर्वसाधारण किंमतपातळी अधिक असते. त्याचप्रमाणे शहरीकरणामुळे निवाऱ्याचा, पिण्याचा पाण्याचा, आरोग्याचा, स्वच्छतेचा असे काही प्रश्नही उद्‌भवतात, यावर मात करून आर्थिक विकासाचा वेग टिकून असतो.

**५) बाह्य विस्तार :** विकसित अर्थव्यवस्थेचे बाह्य स्वरूप हे विस्तारित असते. वहातूक दळणवळण क्षेत्रात क्रांती झालेली असते. वसाहतीवर राजकिय प्रभुत्व असते. काही विकसित देशांना नैसर्गिक साधनांची अनुकूलता लाभलेली असते. या आधारे भांडवल निर्मितीचा वेग वाढवितात. आंतरराष्ट्रीय व्यापाराचे स्वरूप विस्तृत असते. विविध बाह्य बाजारपेठा काबीज केलेल्या असतात. अलीकडे अधिक लोकसंख्या असलेल्या देशात गुंतवणूक करून उद्योग उभारणी करून अधिक फायदा मिळवला जातो. त्यामुळे विकासाची गती अधिक असते.

**६) भांडवल, वस्तू आणि व्यक्तींचा आंतरराष्ट्रीय प्रवाह :** जगातील विविध विकसित देशाने ज्यावेळी नवीन आर्थिक धोरणाचा स्विकार केला तेव्हापासून भांडवलाचा प्रवाह, वस्तूची निर्यात आणि व्यक्तीचे स्थलांतर आणि त्यांचा फायदा त्या संबंधित देशात होऊन आंतरराष्ट्रीय व्यापार विस्तारण्यास मदत झाली. विशेषत: फ्रान्स आणि जर्मनी या देशातील १८७४ ते १९१४ या काळातील सरासरी भांडवलवाढीचा दर ६४% होता. निर्यातीत वाढ होत होती. व्यक्ती संस्थाही गुंतवणूक, व्यवसाय निमित्ताने स्थलांतर करतात. त्यामुळे विकास झपाट्याने झालेला असतो.

वरील वैशिष्ट्ये कमी-अधिक तीव्रतेने विकसित अर्थव्यवस्थेची आढळतात.

## २.२.४ आर्थिक विकासातील प्रमुख अडथळे :
### (Main Obstacles to Economic Growth) :

**प्रास्ताविक :**

आर्थिक विकास ही प्रक्रिया अत्यंत व्यापक आहे. ॲडम स्मिथ, रिकार्डो यांच्यापासून अलीकडील भारतीय अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन या सर्वांनी या संकल्पनेचा अभ्यास केला आहे. तरीही आर्थिक विकास या संकल्पनेची विशिष्ट बिनचूक व्याख्या स्पष्ट करणे कठीण आहे. आर्थिक विकास आणि आर्थिक वृद्धी हे शब्द एकाच अर्थाने वापरले जातात. सर्वसाधारणपणे सर्वमान्य झालेली आर्थिक विकासाची व्याख्या बाल्डविन व मायर यांनी केलेली ठरते, ती पुढीलप्रमाणे -

**बाल्डविन व मायर** यांच्या मते :

''ज्या दीर्घकालीन प्रक्रियेने एखाद्या अर्थव्यवस्थेचे वास्तव राष्ट्रीय उत्पन्न वाढत जाते. त्या प्रक्रियेस आर्थिक विकास म्हणतात.''

आर्थिक विकास ही प्रक्रिया विकसित देशाच्या दृष्टिने फारशी महत्त्वाची नसते कारण तेथे आर्थिक विकास घडून आलेला असतो. भांडवल टंचाई नसते, राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर अधिक असतो. परंतु अविकसित देशाच्या दृष्टिने आर्थिक विकास प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची ठरते. प्रत्येक देशातील आर्थिक, सामाजिक, राजकीय, पर्यावरणीय, स्थिती भिन्न असते त्यामुळे अडथळ्यांचे स्वरूप आणि तीव्रता भिन्न असण्याची शक्यता आढळते. सर्वसाधारणपणे आर्थिक विकासामध्ये पुढील प्रमुख अडथळे येतात.

**दारिद्र्याचे चक्र :**

अविकसित देशात मुळातच दारिद्र्य असते. उत्पन्नाचे प्रमाण अल्प-उपभोगावरील खर्च कमी, अल्प उष्मांकाचा आहार त्याचा आरोग्यावर परिणाम होऊन शारीरिक, मानसिक, कार्यक्षमतेचा दर्जा खालावतो, उत्पादकता कमी-उत्पन्न कमी-मागणी कमी- बचत कमी- गुंतवणूक कमी - भांडवल निर्मिती कमी - भांडवल टंचाई, असे दृष्ट चक्र चाल असते. याप्रमाणेच शिक्षणाचे अल्प प्रमाण असल्याने तांत्रिक कौशल्यांची कमतरता. परिणामी, उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्ती न वापरता पडून राहते किंवा तिचा वापर अयोग्य पद्धतीने होतो. त्यामुळे विकास प्रक्रिया योग्य न झाल्याने विकास मार्गात अडथळे येतात.

**सामाजिक रूढी, परंपरेचे प्रभुत्व :**

अविकसित देशातील सामाजिक व सांस्कृतिक स्थिती विकासास पोषक ठरत नाही तर अडथळा निर्माण करणारी ठरते. अशा देशामध्ये सामाजिक चालीरीती, रूढी, मूल्ये, प्रवृत्ती, यांच्यावर परंपरेचा, धर्माचा अधिक प्रभाव असतो. तेथील समाज हा विविध धर्म, जाती, संस्कृती यामुळे विभागला गेलेला असतो. मुळात उत्पन्नाचे प्रमाण कमी असते अधिकचा हिस्सा हा सोने, घर, जमीन, गाडी, धार्मिक विधी, सण, उत्सव, लग्नकार्य यावर खर्च केला जातो. त्यामुळे बचत कमी, गुंतवणूक कमी त्याचा परिणाम सामाजिक, आर्थिक, राजकिय क्षेत्रावर व व्यक्तीच्या

कार्यक्षमतेवर आणि सर्वांगीण विकासावर होतो. यामुळे कुशल प्रशासनामध्ये अडथळे येतात यातून लाचलुचपत, भ्रष्टाचार वाढतो. या सर्व गोष्टीमुळे आर्थिक विकासात अडथळा येतो.

### अल्प भांडवल-गुंतवणूक :

अविकसित देशातील दारिद्र्याचे मूळ कारणच भांडवलाची टंचाई हे असते. दारिद्र्यामुळे बचत कमी-गुंतवणूक कमी, भांडवल गुंतवणूकीचा वेग कमी हे दारिद्र्याचे कारण व परिणाम ठरते. साक्षरतेचे अल्प प्रमाण, लोकसंख्या अधिक, शेतीवरील लोकांचे अवलंबित्व अधिक, उत्पादनाची पारंपारिक पद्धत त्यामुळे उत्पादन कमी, उत्पन्न कमी-बचत कमी - गुंतवणूक कमी. काही श्रीमंत लोकांकडून होणारी गुंतवणूक अनुत्पादक कारणासाठी होते व अनावश्यक उपभोगासाठी खर्च केला जातो. त्याप्रमाणे बँकिंग सुविधा, भांडवल बाजार, नाणेबाजार यांचा विकास झालेला नसतो. एकूणच या कारणामुळे गुंतवणूकीचा वेग कमी असतो. आर्थिक विकासात अडथळे येतात.

### बाजारपेठांचे स्वरूप :

अविकसित देशातील उत्पादन घटकांचा अपूर्ण वापर त्यातून उत्पादन घटकांच्या प्रगतीशीलतेचा अभाव, तांत्रिक ज्ञानाचा अभाव, बाजारपेठेचे अपूर्ण ज्ञान. उत्पादन घटकांची गतीशीलता असते. यातूनच प्रच्छन्न व अर्धबेकारी आढळते. या विविध कारणांमुळे उत्पादनात वाढ होत नाही. त्यामुळे विशेषीकरणाचा अभाव आढळतो. हे घटक आर्थिक विकासामध्ये अडथळे निर्माण करतात.

### आंतरराष्ट्रीय घटक :

आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टिकोणातून विचार करता काही विशिष्ट घटकांच्यामुळे अविकसित देशांच्या तुलनेत विकसित देशाला अधिक फायदे मिळतात. अविकसित देशांना स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर उत्पादन वाढीस चालना मिळाली. त्यामुळे निर्यातही वाढली. परंतु देशातील इतर क्षेत्राकडे दुर्लक्ष झाले. निर्यातीमध्ये विशिष्ट कच्च्या मालाचाच समावेश आढळतो त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारातून फारसा नफा मिळत नाही. अलीकडे मसाल्याचे पदार्थ, फळे निर्यात होतात. परंतु त्याच्या किंमती कमी, एकूण प्रमाण कमी त्यामुळे विकसित देशांनाच अधिक लाभ मिळतो. परिणामी, अविकसित देशाचा व्यवहारतोल सतत प्रतिकूल राहतो. या कारणामुळे आर्थिक विकासामध्ये अडथळे येतात.

### विदेशी गुंतवणूक :

अविकसित देशाच्या विकास प्रक्रियेवर विदेशी गुंतवणूकीचा प्रतिकूल परिणाम होतो. सर्वसाधारणपणे परकिय गुंतवणूक ही निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तूंच्या उत्पादनामध्येच केली जाते. प्राथमिक वस्तू उत्पादनातील पातळी, उत्पन्न पातळी, प्राथमिक क्षेत्रातील कामगारांचा राहणीमानाचा दर्जा यामध्ये सुधारणा होत नाही. विदेशी गुंतवणूकीमुळे होणारा अधिकचा नफा हा स्वत:च्या देशासाठी वापरला जातो. त्यामुळे अविकसित देशातील बचतीवर प्रतिकूल परिणाम होऊन गुंतणूक घटते. त्याचा परिणाम विदेशी व्यापारावर होतो. परिणामी, विदेशी गुंतवणूकीचा अविकसित देशावर प्रतिकूल परिणामच अधिक होतो. विकास प्रक्रियेत अडथळे निर्माण होतात.

## २.३ सारांश :

जगाची विभागणी अविकसीत, विकसनशील व विकसीत राष्ट्रे अशा तीन विभागात झालेली आहे. ज्या राष्ट्रांनी आपला सर्वांगिण विकास साध्य केला आहे, अशा राष्ट्रांना विकसीत राष्ट्रे तर अविकसित देश म्हणजे शक्य व सुप्त शक्तीचा जे देश वापर करू शकत नाहीत असे देश होय. अविकसित अर्थव्यवस्थेची विविध मूलभूत वैशिष्ट्ये आढळतात. यामधये मुख्यत्वे अतिरिक्त लोकसंख्या, दारिद्र्य, बेरोजगारी, निम्न स्तरावरील राहणीमान, भांडवलाचा अभाव, तंत्रवैज्ञानिक मागासलेपणा यासारखी वैशिष्ट्ये दिसून येतात.

आधुनिक आर्थिक विकासाची प्रक्रिया ही विविधांगी स्वरूपाची असते. यामध्ये उत्पादन वाढीचा अधिक वेग, वाहतूक व दळणवळणातील सुधारणा, शहरीकरण, बाह्य विस्तार या वैशिष्ट्यांचा समावेश होतो.

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत कांही अडथळेही निर्माण होत असतात. यामध्ये दारिद्र्याचे दुष्टचक्र, अल्प-भांडवल गुंतवणूक, सामाजिक रूढी व परंपरा यासारख्या अडथळ्यांचा समावेश होतो.

## २.४ पारिभाषिक शब्द :

**१) अल्पविकसित देश :** शक्य व सुप्त शक्तीचा पर्याप्त वापर न करणारे देश

**२) उत्पादकता :** विशिष्ट क्षेत्राची संभाव्य उत्पादन क्षमता

## २.५ स्वयं अध्ययन प्रश्न :

**खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.**

१. .............. हा उत्पादनाचा घटक आहे.
(अ) भांडवल (ब) बाजार (क) निसर्ग (ड) यापैकी नाही

२. .............. राष्ट्रात शेती क्षेत्रात मोठ्या प्रमाणात छुपी बेकारी असते.
(अ) विकसीत (ब) विकसनशील (क) अल्पविकसीत (ड) यापैकी नाही

३. .............. राष्ट्रात उत्पादनक्षमतेचा पूरेपूर वापर केला जातो.
(अ) विकसीत (ब) विकसनशील (क) मागासलेल्या (ड) यापैकी नाही

४. .............. हा आधुनिक आर्थिक वृद्धीचा महत्त्वपूर्ण घटक आहे.
(अ) शहरीकरण (ब) वाहतूक व दळणवळण (क) तंत्रज्ञान (ड) वरील सर्व

## २.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

१. (अ), २. (क), ३. (अ) ४. (ड)

## २.७ सरावासाठी स्वाध्याय :

**(अ) टीपा लिहा.**

१. विकसीत अर्थव्यवस्था

२.   आधुनिक आर्थिक वृद्धीची वैशिष्ट्ये

३. आर्थिक विकासातील अडथळे

**(ब)   दीर्घोत्तर प्रश्न :**

१.   अविकसीत राष्ट्रांची मूलभूत वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२.   आधुनिक आर्थिक वृद्धीची वैशिष्ट्ये विशद करा.

३.   आर्थिक विकासातील प्रमुख अडथळे स्पष्ट करा.

## २.८   अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :


1) M. L. Jhingan, The Economics of Development and Planning (36th ed.) 2003, Varunda Publicatons Ltd., Delhi.

2) R. C. Agarwal, Economics of Development and Planning (5th Ed.) 2011, Lakshmi Narain Agarwal, Agra.

3) S. K. Misra and V. K. Puri, Economics of Development and Planning , (10th Ed.) 2002, Himalaya Publishing house, Mumbai.

4) M. L. Seth, Macro Economics (21st Ed.) 2001, Lakshmi Narain Agarwal, Agra.


◈◈◈

घटक ३

# आर्थिक वाढ व विकासाचे सिद्धांत

अनुक्रमणिका


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

 ३.२.१ रोस्टोचा आर्थिक वाढीचे टप्पे

 ३.२.२ लेविस यांचा अमर्यादित श्रम पुरवठ्याचा सिद्धांत

 ३.२.३ रोडान यांचा मोठा धक्का सिद्धांत

 ३.२.४ मिर्डालचा प्रतिसारक व विस्तारक परिणामाचा सिद्धांत

३.३ सारांश

३.४ स्वयं अध्ययन प्रश्न

३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ संदर्भ ग्रंथ


## ३.० उद्दिष्ट्ये :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला -

- अविकसित अर्थव्यवस्था म्हणजे काय हे समजून घेता येईल.
- देशाचा आर्थिक विकास एकाच कालखंडात होत नाही हे जाणून घेता येईल.

- आर्थिक विकास घडून येण्याचे कारण तपासून पाहता येईल.
- विकास घडून येण्यासाठी किमान आवश्यक गोष्टी कोणत्या असाव्यात याची माहिती घेता येईल.
- थोडक्यात विकास म्हणजे काय हे जाणून घेता येईल.

## ३.१ प्रास्ताविक :

आपण मागील घटकांमध्ये आर्थिक विकासाचा अर्थ, व्याख्या व संकल्पना समजून घेतल्या. परंतु विकासाच्या संकल्पना अधिक व्यापक असल्याने, अविकसित देशांच्या प्रमुख लक्षणांचा आणि विकास घडविणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे गरजेचे ठरते. आधुनिक विचारवंतांच्या मते देशाचा आर्थिक विकास हा भविष्यकाळात टिकणारा असावा त्याकरिता शाश्वत विकासाची संकल्पना, अर्थ व त्याचे निर्देशक घटक लक्षात घेतले आहेत. या घटकामध्ये आपण वेगवेगळ्या अर्थशास्त्रज्ञांचे आर्थिक विकासाबद्दलचे आपले विचार व अनुभव जाणून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.

ऐतिहासिक दृष्टीकोनातून विकास कोणत्या टप्प्यांनी होतो हे व्यापक आढाव्याच्या आधाराने विकासाची पांच टप्प्यांत मांडणी केली आहे. तर लेविस यांच्या मते अविकसित देशांमध्येच विकास घडवून आणण्याची शक्ती असते. म्हणजेच अविकसित देशामध्ये लोकसंख्या अतिरिक्त असल्याने अल्प वेतनावर उपलब्ध असणाऱ्या श्रमपुरवठ्याचा वापर विकास करण्यासाठी करता येतो. रोडान यांच्या मते देशाचा विकास करावयाचा झाल्यास किमान प्रयत्नांची (गुंतवणूकीची) आवश्यकता असते. तर मिर्डाल यांच्या मते आर्थिक विकासाचा परिणाम म्हणून विकसित भाग अधिक विकसित तर अविकसित प्रदेश अविकसितच राहण्यास मदत होते. त्याचे विकासाचे प्रयत्न यशस्वी होत नाहीत.

## ३.२ विषय विवेचन :

### ३.२.१ रोस्टोच्या आर्थिक वाढीच्या अवस्था :

१९६० मध्ये अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ प्रो. डब्ल्यू. डब्ल्यू. रोस्टो यांनी आर्थिक वाढीच्या अवस्था सिद्धांत मांडला. त्यांनी ऐतिहासिक आढावा घेवून केवळ आर्थिक घटकांवरच लक्ष केंद्रित न करता सामाजिक बदलाचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला आहे. विकास हा प्रमुख पांच अवस्थेतून जातो असे ते मानतात. त्या अवस्था पुढीलप्रमाणे स्पष्ट केल्या आहेत.

**अ) पारंपारिक समाज** (Traditional Society) :

ज्या अवस्थेत समाज प्राथमिक क्षेत्रावर विसंबून असतो व उत्पादन प्रक्रिया न्यूटनपूर्व तत्त्वज्ञानावर आधारित असते अशा समाजाला पारंपारिक समाज म्हणता येईल. या अवस्थेत पुढील वैशिष्ट्ये दिसून येतात.

१) जवळ जवळ ७५ ते ८० टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून असते.

२) शेतजमिनीची मालकी जमिनदारांकडे असते, त्यामुळे समाजावर त्याचे पूर्ण वर्चस्व असते.

३) कुटुंबप्रधान समाजव्यवस्थेमध्ये नाते संबंधांना अधिक महत्त्व प्राप्त झालेले असते.

४) राजकीय व्यवस्था जमिनदार व सरंजामदारांच्या हातात असते. त्याच्या हाताखाली लष्करी अधिकारी असतात.

५) एकूण उत्पन्नातील बराचसा भाग मंदिरे, राजवाडे, समाधी, विवाह किंवा युद्ध साहित्य खरेदी करण्या करिता म्हणजेच अनुत्पादक कार्यासाठी करण्यात येतो.

६) अर्थव्यवस्था गतिशील नसून ती स्थैयिक असते. कोणताही मोठा बदल अर्थव्यवस्थेत घडून येत नाही.

७) पाणी, वाहतूक, श्रम व शेती इ. उपलब्ध साधनांचा वापर कार्यक्षमपणे होत नाही.

८) वैज्ञानिक प्रगतीची इच्छाशक्ती संपुष्टात आलेली असते.

**ब) उड्डाणपूर्व अटींची अवस्था** (Pree Condition for take-off) :

पारंपरिक समाजव्यवस्थेत जेव्हा आर्थिक प्रगतीची भावना वाढीस लागते तेव्हा, या अवस्थेत अर्थव्यवस्थेचा प्रवेश होतो. म्हणून या अवस्थेला संक्रमण अवस्था असेही म्हणता येईल. तसेच सामान्यांना राष्ट्रीय प्रतिष्ठा व सामान्य हित महत्त्वाचे वाटू लागते. देशातील बचत व गुंतवणूक प्रक्रिया वाढविण्यासाठी कुशल संघटकांकडून प्रयत्न केले जातात. व त्यातूनच बॅकांचा विस्तार होण्यास मदत मिळते. थोडक्यात, अर्थव्यवस्थेत आवश्यक विकासाचे वातावरण निर्माण होण्यास मदत होते. रोस्टोंच्या मते अर्थव्यवस्थेत दिर्घकालीन विकास घडवून आणण्यासाठी कांही अटींची पूर्तता अपेक्षित असते ती पुढील काही बदलामुळे घडून येते.

१) नवनवीन प्रदेशांचा शोध लागणे.

२) ज्ञानाचा विस्तार व प्रबोधनात्मक कार्य यांचा विस्तार घडून येणे.

३) आधुनिक राजेशाही व केंद्राभिमुख शासन व्यवस्था.

४) चिकित्सक व विश्लेषण प्रवृत्तींचा उदय होवून धार्मिक श्रद्धा व अंधश्रद्धा यांचा अंत होतो. आणि संशोधन प्रवृत्ती वाढीस लागल्याने तांत्रिक बोध घेण्याची प्रवृत्ती वाढीस लागते.

**क) उड्डाणावस्था** (The Take-off) :

रोस्टोंच्या सिद्धांतातील ही अवस्था सर्वात महत्त्वाची मानली जाते, कारण या अवस्थेत खऱ्या अर्थाने आर्थिक विकासाचे पोषक वातावरण तयार होवून समाजाकडे विकास घडवून आणण्याची इच्छाशक्ती प्रबळ बनते. 'उड्डाणावस्था' मधील 'उड्डाण' हा शब्द विमान शास्त्रातून घेतला आहे. जसे विमानाला अवकाशात झेप घ्यावयाची झाल्यास धावपट्टीवरील किमान वेगाची मर्यादा ओलांडावी लागते. त्याच प्रमाणे आर्थिक विकासासाठी किमान आर्थिक अटी पूर्ण कराव्या लागतात. रोस्टोंच्या मते ही अवस्था म्हणजे एक प्रकारची औद्योगिक क्रांतीच आहे. या अवस्थेसाठी अर्थव्यवस्थेला किमान २० ते ३० वर्षाचा कालावधी अपेक्षित असतो. ही अवस्था प्राप्त करण्याकरीता पुढील गोष्टींची पूर्तता अर्थव्यवस्थेत होणे आवश्यक असते.

१) उत्पादक गुंतवणूकीचे प्रमाण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ५ टक्क्यांवरून १० टक्के वाढवणे कारण दरडोई उत्पन्न वाढीचा दर हा लोकसंख्या वाढीच्या दरापेक्षा अधिक असला पाहिजे, की ज्यामुळे अर्थव्यवस्थेत विकासाची प्रेरणा वाढीस लागेल.

२) प्रमुख पायाभूत उद्योगांचा विकास घडवून आणते. रोस्टोंनी विकासासाठी काही प्रमुख उद्योगांची विभागणी पुढीलप्रमाणे केली आहे.

**अ) प्राथमिक विकास क्षेत्र :** यात कापड उद्योगाचा समावेश केला जाईल.

**ब) परस्पर पुरक विकास क्षेत्र :** कापड उद्योगाच्या विकासामुळे प्रभावित होऊन या क्षेत्राचा विकास होईल. जर रेल्वेचा विकास झाल्यास, लोखंड, पोलाद या सारख्या पूरक उद्योगांचा विकास होईल.

**क) आधारित** (Derived) **विकास क्षेत्र :** या क्षेत्रामध्ये लोकसंख्या वाढीचा परिणाम म्हणून, अन्नधान्य उत्पादन व गृहबांधणी उद्योगांचा समावेश करण्यात आला. परंतु रोस्टोच्या मते वरील उद्योगांच्या विकासाकरिता अर्थव्यवस्थेत पुढील घटक महत्त्वाचे ठरतात.

i) **परिणामकारक मागणीत वाढ :** वरील पायाभूत उद्योगांचा विकास घडवून आणण्याकरिता अर्थव्यवस्थेत परिणामकारक मागणीतील वाढ आवश्यक ठरते. त्याकरिता देशातील वास्तव उत्पादनात वाढ होऊन भांडवली आयातीचे प्रमाण वाढणे आवश्यक ठरते. चलनाची साठेबाजी कमी करून, अर्थव्यवस्थेत चलनपुरवठा वाढवून मागणीत वाढ घडवून आणता येते.

ii) **उत्पादनक्षमतेत वाढ :** दरडोई उत्पादनात वाढ होण्याकरिता देशातील नैसर्गिक साधनांचा शोध व तांत्रिक सुधारणा घडवून आणण्याकरीता मोठ्या प्रमाणात गुंतवणूकीची आवश्यकता असते.

iii) **आर्थिक क्षेत्रात पुरेशी भांडवल गुंतवणूक :** प्रमुख आर्थिक क्षेत्रात सुरुवातीची भांडवल गुंतवणूक पुरेशी झाली पाहिजे.

iv) **सांस्कृतिक रचना प्रोत्साहक व पूरक झाली पाहिजे :** उद्योगांच्या विकासासाठी सांस्कृतिक वातावरण पोषक असल्यास उपलब्ध प्रेरणांचा योग्य वापर शक्य होतो. म्हणजेच भांडवल संचयाचा वेग वाढवण्यासाठी लोकांची बचत प्रवृत्ती वाढावी लागते. जर बचती वाढल्या नाही तर देशामध्ये उद्योगांची उभारणी अडचणीची ठरते. शेतीमध्ये यांत्रिकीकरण घडून आल्यास शेती क्षेत्रामधील लोकसंख्या व उद्योगांचा विकास शक्य होतो. थोडक्यात, आधुनिक क्षेत्रे विकसित करीत असताना आवश्यक प्रेरणा महत्त्वाच्या असतात. त्याकरीता सांस्कृतिक संरचना ही महत्त्वाची ठरू शकते.

**ड) विकासाच्या परिपूर्ण दिशेने वाटचाल** (Drive to Maturity)

रोस्टो यांच्या मते, उड्डाणावस्थेनंतर अर्थव्यवस्था विकासाच्या परिपूर्ण दिशेने वाटचाल करू लागते. या अवस्थेस पूर्णावस्था, स्वयंपूर्ण वाढ किंवा परिपक्व वाढ असेही संबोधले जाते. या अवस्थेत अर्थव्यवस्थेत समाजाकडून नवीन तंत्रज्ञानाचे फायदे घेतले जातात व गुंतवणूकीची पातळी एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या जवळपास १०% इतकी राहते. या अवस्थेत अर्थव्यवस्थेत पुढील महत्त्वाचे बदल अपेक्षित असतात.

**१) श्रमिकांची कुशलता :** कामगारांची कुशलता वाढल्यामुळे ग्रामीण भागाकडून शहरी भागांकडे श्रमिकांचा ओढा वाढतो. शहरीकरणाच्या अनेक समस्यांना तोंड देण्यासाठी कामगार संघटित होऊन ते कामगार संघटना स्थापन करतात. व त्यांच्या वास्तव वेतनात वाढ होते.

**२) संयोजक वर्ग अधिक कार्यक्षम बनतो :** संयोजक वर्ग अधिक धाडसी प्रवृत्ती पेक्षा अधिक सुशिक्षित असल्याने ते कार्यक्षम होऊन उद्योगांचे नियंत्रण करतात.

**३) नवीन बदलाची अपेक्षा :** आधुनिक कारखानदारीतून समाजाला मिळणाऱ्या सर्व सोई व सुविधांची कुतूहलता समाजामध्ये फार काळ टिकत नाही. त्यामुळे समाज मोठ्या व नविन बदलाची वाट पाहतो.

**इ) उच्च उपभोगाचे युग** (Age of High Mass Consumption) :

या अवस्थेला विपूल सेवनाचे युग, सार्वत्रिक उपयोगाचे युग असेही संबोधले जाते. लोकांच्या वास्तव उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने मुलभूत गरजांपेक्षा चैनिच्या वस्तूंच्या उपभोगाकडे लोकांचा कल वाढतो. सामान्यांच्या राहणीमानाच्या दर्जात लक्षणीय वाढ घडून येते, तसेच सामान्यांच्या कल्याणात वाढ घडवून आणावयाची झाल्यास पुढील आर्थिक प्रेरणा महत्त्वाच्या ठरतात.

१) आर्थिक व राजकीय धोरणातून अंतर्गत आर्थिक सामर्थ्यावर भर देऊन आंतरराष्ट्रीय प्रभाव निर्माण केला जावा.

२) वाजवी किंमतीला मोटार गाड्यांचा व विद्युत साहित्याचा पुरवठा मोठ्या प्रमाणात होण्यासाठी संबंधित उद्योगांच्या विकासासाठी पोषक वातावरण तयार करणे व त्यासाठी या अवस्थेत लोकांमध्ये आर्थिक प्रगतीविषयी जाणीव निर्माण होते. म्हणजेच राष्ट्राच्या प्रतिष्ठेसाठी, व्यक्तिगत फायदा मिळवण्यासाठी व भविष्यातील पिढीचे कल्याण साधणे इ. गोष्टींबरोबर आर्थिक प्रगती महत्त्वाची वाटू लागते. कालांतराने शिक्षणाचे महत्त्व वाढून त्याचा प्रसार होतो व त्याचा परिणाम म्हणून अर्थव्यवस्थेत बचतीची सवय लागते व धाडसी संयोजकांचा पुरवठा वाढतो. बँकिंग व्यवस्थांचे जाळे पसरल्याने मुलभूत क्षेत्रामध्ये (वाहतूक, दळणवळण) गुंतवणूकीचे प्रमाण वाढीस लागते. राष्ट्रीय उत्पन्नातील ५% पेक्षा अधिक गुंतवणूक उत्पादक क्षेत्रात होण्यास सुरवात होते, पर्यायाने आयात पर्यायीकरणास चालना मिळते.

प्रा. रोस्टोंच्या मते, उड्डाणपूर्व टप्प्यामध्ये अर्थव्यवस्थेत पुढील महत्त्वाचे आर्थिक बदल घडून येणे आवश्यक असते.

१) देशामध्ये खाजगी संघटकांची संख्या अधिक झाल्यास आर्थिक व सामाजिक क्षेत्रात गुंतवणूकीचे प्रमाण वाढीस लागेल.

२) धाडसी संयोजका बरोबर अर्थव्यवस्थेस वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थांची स्थापना झाली पाहिजे.

३) लोकसंख्या कोणत्या दराने वाढते यापेक्षा गुंतवणूक दरावर अधिक भर द्यावा लागेल.

४) सामाजिक दर्जा हा वैयक्तिक कार्यक्षमतेवर वा प्राधान्यावर ठरला पाहिजे.

५) उद्योग, व्यापार, दळणवळण या क्षेत्राला महत्त्व देवून, शेतीवरील अवलंबित्व कमी केले पाहिजे.

६) व्यापारी बाजारपेठांचा विस्तार होण्यासाठी शेतकऱ्यांनी नविन शेती तंत्रज्ञानाचा स्विकार केला पाहिजे.

७) जनन दरामध्ये घट होणे गरजेचे आहे.

८) समाजातील दैववाद संपुष्टात येवून शारिरीक श्रमाला महत्त्व वाढले पाहिजे.

९) उत्पन्नाचे समानतेने वाटप करण्याकरिता पुरोगामी कर व्यवस्था स्वीकारणे व सामाजिक सुरक्षा कार्यक्रमातून कामगारांच्या कल्याणावर भर देणे.

● **सिद्धांताचे मूल्यमापन :**

रोस्टोनी ऐतिहासिक आधारावर अर्थव्यवस्थेच्या विकास अवस्था स्पष्ट केल्या आहेत. पण भविष्यात विकासाच्या बाबतीत हा सिद्धांत कितपत उपयोगी ठरेल हे सांगणे कठीण असल्याने या सिद्धांतावर पुढीलप्रमाणे टीका झालेल्या दिसून येतात.

१) विकासाच्या नेमक्या पांच अवस्था आढळून येत नाहीत. तसेच विकास प्रक्रियेचे वर्गीकरण करणे देखील अडचणीचे ठरते.

२) उड्डाणासाठी आवश्यक अटी या उड्डाणावस्थेपूर्वीच येतील काय ? असे सांगता येणार नाही.

३) विकासाच्या प्रक्रियेत अर्थव्यवस्था एक अवस्था संपून दुसऱ्या अवस्थेत केव्हा जाते हे सांगता येणे अत्यंत कठिण आहे.

४) उड्डाणावस्था नेहमीच यशस्वी होईल हे सांगता येणार नाही. जसे विमानशास्त्राप्रमाणे विमान अवकाशात झेप घेत असतांना काही अडथळे येण्याची शक्यता असते. त्याचप्रमाणे विकासाच्या मार्गावर विकास साधत असतांना काही अचानक संकटे अर्थव्यवस्थेत येण्याची शक्यता असते.

५) रोस्टो यांनी विकासाच्या प्रक्रियेत काही प्रमुख निवडक औद्योगिक क्षेत्रांचा समावेश केलेला आहे. उदा. कापड, रेल्वे इ. पण इतर पायाभूत उद्योगांकडे दुर्लक्ष केले आहे.

६) टीकाकारांच्या मते उड्डाणपूर्व व उड्डाणअवस्था यामध्ये काटेकोरपणे भेद केलेला नाही.

७) काही देशांच्या बाबतीत शेतीचा विकास हा उड्डाणावस्थेत होतो पण रोस्टोंच्या मते उड्डाणावस्थेचे प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे शेतीवरील अवलंबित्व कमी करणे होय.

८) उच्च उपभोगाचे युग ही अवस्था नेमकी कोणत्या विकासाच्या अवस्थेत घडून येते, हे सांगता येत नाही, कारण कॅनडा व ऑस्ट्रेलिया या देशांनी ही अवस्था परिपूर्णतेकडे वाटचाल या अवस्थेपूर्वीच गठली आहे.

अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ प्रो. डब्ल्यू. डब्ल्यू. रोस्टो यांच्या आर्थिक वाढीच्या अवस्था या विकासाच्या महत्त्वाच्या सिद्धांतावर वरीलप्रमाणे टीका करण्यात आल्या असल्या तरी या सिद्धांताचे महत्त्व कमी होत नाही. या सिद्धांतात सांगितलेली उड्डाणावस्थेची संकल्पना, प्रधान क्षेत्राची कल्पना अविकसित देशांच्या औद्योगिकरणाच्या संदर्भात महत्त्वाची व उपयुक्त आहे.

### ३.२.२ ऑर्थर लेविसचा अमर्याद श्रमपुरवठ्याचा सिद्धांत :

१९५४ मध्ये लेविस यांनी अमर्याद श्रमपुरवठ्याद्वारे आर्थिक विकास (Economic Development with unlimited supply of Labour) हा प्रसिद्ध केला. अमर्याद श्रमपुरवठ्याच्या मदतीने अविकसित देशांना आपला विकास साध्य करता येतो. हे त्यांनी आपल्या सिद्धांतामध्ये स्पष्ट केले. लेविस यांच्या मते अविकसित देशात लोकसंख्या अधिक असल्याने अतिरिक्त श्रमपुरवठ्याचा वापर विकास घडवून आणण्यासाठी करता येतो. लेविसने सांगितलेले आर्थिक विकास प्रक्रियेचे विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

- **द्वि. क्षेत्री अर्थव्यवस्था** (Two-sector Economy) :

लेविस यांच्या मते अविकसित अर्थव्यवस्था ही द्वि-क्षेत्री असते. त्याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे केले आहे.

**१) भांडवली क्षेत्र** (Capitalist Sector) : ज्या क्षेत्रात पुनर्निर्मितीक्षम भांडवली साधनांचा वापर करण्यात येतो त्या क्षेत्राला भांडवली क्षेत्र असे लेविस यांनी म्हटले आहे. कारखाने, खाण उद्योग, मळे इ. क्षेत्रात भांडवलदारांना नफा होतो. नफ्यासाठी उत्पादन केल्याने मजूरांना अधिक मजूरी दिली जाते यामुळे त्यांची उत्पादकता वाढण्यास मदत होते.

**२) निर्वाह क्षेत्र** (Subsistence sector) : या मध्ये शेती क्षेत्राचा समावेश केला जातो. भांडवली क्षेत्राप्रमाणे पुनर्निर्मितीक्षम भांडवली साधनांचा वापर केला जात नाही. तसेच तुलनेने मजुरी कमी असल्याने उत्पादकता अल्प प्रमाणात असते. अशावेळी लेविस यांच्या मते निर्वाह वेतन दरावर काम करण्याऱ्या या मजूरांना भांडवली (औद्योगिक) क्षेत्राकडे स्थलांतरीत केल्यास विकास साध्य करता येतो.

- **गृहिते :**

१) अविकसित देशात लोकसंख्या अतिरिक्त असल्याने निर्वाह वेतन दरावर काम करणाऱ्या श्रमिकांचा पुरवठा अमर्याद असतो.

२) नैसर्गिक साधनांच्या मानाने लोकसंख्या अतिरिक्त असते. व मजूरांची सीमांत उत्पादनक्षमता शून्य असते.

३) निर्वाह क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या श्रमिकांच्या वापराने औद्योगिक क्षेत्रामध्ये निर्वाह वेतनदरावर काम करणाऱ्या कामगारांचा पुरवठा प्रामुख्याने महिला, वाढती लोकसंख्या, व्यापारी इ. घटकापासून होतो.

४) निर्वाह वेतनावर काम करणाऱ्या अकुशल मजूरांना प्रशिक्षण देवून कुशल मजूरांची टंचाई दूर करता येते.

- **श्रमाचा पुरवठा :**

सनातनवाद्यांच्या मते अविकसित देशात भांडवल व नैसर्गिक साधन संपत्तीच्या तुलनेस लोकसंख्या अतिरिक्त असल्याने त्यांची सिमांत उत्पादनक्षमता शून्य अथवा काही वेळा ती उणे असते. औद्योगिक उत्पादनाच्या प्रक्रियेत अकुशल श्रमिक उपयोगी नसतो अशा वेळी लेविस यांच्या मते, या अकुशल कामगारांना प्रशिक्षण देऊन त्यांना कुशल करता येते आणि हा एक तात्पुरता अडथळा (Quise Bottlenick) असतो असे लेविस स्पष्ट करतात.

- **भांडवली क्षेत्रातील आधिक्य :**

लेविस यांच्या मते जीवन जगण्याकरिता आवश्यक असणाऱ्या किमान उत्पन्नावर निर्वाह वेतनदर ठरला जातो. शेती क्षेत्राला लेविस यांनी निर्वाह क्षेत्र असे म्हटले आहे. त्यामुळे श्रमिकांच्या सरासरी उत्पादनावर निर्वाह वेतनदर ठरतो, मात्र औद्योगिक क्षेत्रातील वेतनदर हा निर्वाह वेतन दरापेक्षा अधिक असतो याचे स्पष्टीकरण लेविस पुढीलप्रमाणे देतात.


१) ग्रामीण भाग सोडून शहरी भागाकडे सहजासहजी श्रमिक स्थलांतरीत होत नाहीत, त्यामुळे ते ग्रामीण भागातच राहणे पसंत करतात.

२) शहरी भागामध्ये राहणीमानाचा खर्च अधिक असल्याने औद्योगिक क्षेत्रात त्यांना वेतनदर जास्त द्यावा लागतो.

३) कालांतराने निर्वाह क्षेत्रामध्ये वाढत्या उत्पादनामुळे श्रमिकांना अधिक वेतन द्यावे लागते.

४) कामगारांच्या राहणीमानाचा खर्च वाढल्यामुळे कामगार संघटना उभ्या रहातात व त्यामुळे वेतन वाढीची ते मागणी करतात, त्यामुळे निर्वाह क्षेत्रापेक्षा औद्योगिक क्षेत्रात वेतन दर हा अधिक असतो.

वरील कारणांमुळे औद्योगिक क्षेत्रातील मजूरी दर हा निर्वाह क्षेत्रातील मजूरी दरापेक्षा अधिक असतो व त्यामुळे भांडवली क्षेत्रातील मजूरांची सीमांत उत्पादनक्षमता निर्वाह क्षेत्रातील मजूरांपेक्षा अधिक असते. त्यामुळेच भांडवली क्षेत्रामध्ये भांडवली अधिक्य निर्माण होण्यास मदत होते. या अधिक्यामुळेच औद्योगिक क्षेत्रामध्ये भांडवल संचयाची प्रक्रिया विसंबून असते, मिळणारे भांडवली अधिक्य पुन्हा त्याच क्षेत्रामध्ये गुंतवले जाते. त्यामुळे निर्वाह क्षेत्रातील श्रमिकांना रोजगार संधी उपलब्ध होतात. पण ही प्रक्रिया जेव्हा श्रमपुरवठा खंडित होतो तेव्हाच थांबते. पुढील आकृतीच्या सहाय्याने हे स्पष्ट करता येईल.



वरील आकृतीमध्ये आडव्या अक्षावर (OX) श्रमाचा पुरवठा मोजला आहे. उभ्या अक्षावर (OY) श्रमाची सीमांत उत्पादन क्षमता मोजली आहे. SS म्हणजे निर्वाह उत्पन्नाची पातळी WW म्हणजे भांडवली क्षेत्रातील वेतन दर दर्शवितात.

सुरुवातीस जेव्हा $OX_1$ इतके श्रमिक कामावर घेतले जातात तेव्हा त्या मजुरांकडून $OX_1 P_1 Y_1$ इतके उत्पादन उत्पादित केले जाते. $Y_1 P_1$ हा वक्र उत्पादन शक्यता वक्र असल्याने उत्पादनाची पातळी दर्शवितो. $OX_1 P_1 Y_1$ या उत्पादनासाठी $OX_1 P_1 W$ इतके श्रमिकांना वेतन द्यावे लागते. म्हणजेच $OX_1 P_1 Y_1 - OX_1 P_1 W = Y_1 P_1 W$ इतके भांडवली अधिक्य मिळते. लेविस यांच्या मते भांडवली क्षेत्र हे पुनर्गुंतवणूकीचे असल्याने मिळालेला वाढावा पुन्हा त्याच क्षेत्रामध्ये गुंतवला जातो. त्यामुळे नविन श्रमिकांची मागणी $OX_2$ पर्यंत वाढते. उत्पादन शक्यता वक्र पुन्हा उजवीकडे सरकतो ($Y_2 P_2$) व भांडवली अधिकता हे $Y_2 P_2 W$ इतके होते. हे आधिक्य पुन्हा गुंतविले जाते. त्यामुळे श्रमिकांचा सिमांत उत्पादकता वक्र पुन्हा $Y_2 P_2$ असा उजवीकडे सरकतो. पुन्हा रोजगार व भांडवली अधिक्याची प्रक्रिया वाढीस लागते. ही प्रक्रिया जोपर्यंत अतिरिक्त श्रमपुरवठा संपत नाही तोपर्यंत चालूच राहते.

- **भांडवल संचयाची प्रक्रिया शासन व खाजगी भांडवलदार :**

लेविस यांच्या मते अविकसित अर्थव्यवस्थेत नैसर्गिक साधनांच्या मानाने भांडवल पुरवठा मर्यादित असतो. त्यामुळे अर्थव्यवस्थेतील ४ ते ५ टक्के बचतीतून भांडवल गुंतवणूक करण्यापेक्षा १२ ते १५ टक्के बचतीचे प्रमाण वाढून भांडवल गुंतवणूकीचे प्रमाण वाढवणे हा महत्त्वाचा प्रश्न विकासाच्या बाबतीत असतो. पुरेशा प्रमाणात भांडवल संचय ही विकासाची मूळ प्रेरणा असते. लेविस यांच्या मते अविकसित देशात मोठ्या प्रमाणात विषमता असते. त्यामुळे उच्च उत्पन्न गटातील १० टक्के लोकांना एकूण उत्पन्नाच्या ४० टक्के इतका भाग मिळतो. ह्या वर्गाकडून उत्पन्नाचा अधिक भाग अनुत्पादक कार्यासाठी वापरला जातो. म्हणून अशा परिस्थितीत खाजगी भांडवलदारांकडून आपल्या नफ्यातून भांडवल संचयाची प्रक्रिया पूर्ण करावी लागते.

लेविस यांच्या मते अविकसित अर्थव्यवस्थेत मध्यमवर्गीयांकडून होणाऱ्या बचतीचा विकास कार्यासाठी उपयोग होत नाही. कारण त्यांची बचत राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३ टक्क्यापेक्षा अधिक असत नाही. जी काही बचत होते ती शिक्षण, आजारपण, लग्नकार्य इ. वर खर्च होत असते. अशावेळी खाजगी भांडवलदार गुंतवणूकीच्या दृष्टीने महत्त्वाची भूमिका पार पाडतो. कारण त्याला मिळालेल्या भांडवली अधिक्यावर मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होत असते. पण याही पेक्षा शासनामार्फत भांडवल संचयाचा वेग अधिक असतो. सक्तीच्या कर व्यवस्थेतून सरकार भांडवल जमा करू शकते. अशारितीने भांडवल संचय वेगाने होऊन भांडवली क्षेत्राचा विस्तार होतो.

- **बँक पतनिर्मितीतून भांडवल संचय :**

लेविस यांनी बँकेच्या पतनिर्मितीचा वापर भांडवल संचयासाठी होऊ शकतो असे स्पष्ट केले आहे. अविकसित देशात अमर्यादित व अपुरा वापर झालेली नैसर्गिक साधनसंपत्ती असते. अशावेळी बँकांनी केलेल्या पतनिर्मितीचा वापर भांडवल संचयासाठी होऊ शकतो. या भांडवलाच्या माध्यमातून उत्पादन व रोजगार वाढीस चालना मिळते.

अर्थव्यवस्थेत अपुऱ्या पत पुरवठ्या अभावी भाववाढ निर्माण होते. पण अर्थव्यवस्थेत उपभोग्य वस्तूंचे उत्पादन वाढल्यानंतर वस्तूंच्या किंमती कमी होवू लागतात. यालाच लेविस स्वेच्छेची बचत योजना असे म्हणतात. त्यामुळे कालांतराने नवी गुंतवणूक करण्यासाठी बँक निर्मित पतपुरवठ्याची आवश्यकता राहत नाही.

- **विकास प्रक्रियेचा अंत :**

लेविस यांच्या मते विकासाची प्रक्रिया अशीच कायम राहू शकत नाही. कारण ती खालील कारणाने थांबते.

१) अमर्यादित श्रमपुरवठा संपणे.

२) भांडवली क्षेत्राचा विकास होऊन, शेती क्षेत्रातील श्रमिकांची उत्पादकता वाढून निर्वाह क्षेत्रातील (शेती) वेतन दराची पातळी वाढल्याने औद्योगिक क्षेत्रातील अधिक दराने होणारा श्रमपुरवठा भांडवलदारांना तोट्याचा ठरेल.

३) अन्न धान्याच्या किंमती वाढल्याने भांडवलदारांना वेतनदर वाढवावे लागतात.

४) निर्वाह क्षेत्रामध्ये नविन तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर झाल्याने श्रमिकांची उत्पादकता वाढून त्यांच्या वेतनाचे दर वाढतात व भांडवलदारांचा फायदा कमी होतो.

५) औद्योगिक क्षेत्रामध्ये कामगारांनी भांडवलशाही जीवनशैली स्विकारल्यामुळे कामगार संघटितरित्या अधिक वेतनदाराची मागणी करतात.

लेविस यांच्या मते वरील विवेचन हे अशा अविकसित देशास लागू होते की, ज्या आंतरराष्ट्रीय व्यापाराशी कोणताही संबध नसतो. लेविस यांच्या मते वरील अनेक कारणांपैकी एखाद्या कारणाने, जर विकासाची प्रक्रिया थांबल्यास पुढील दोन पर्याय उपलब्ध असतात.

अ) अधिक प्रमाणात श्रमिकांची आयात करणे. पण श्रमकांची आयात करण्यास अधिक वेतन दर असणाऱ्या देशांचा विरोध असतो.

ब) भांडवलाची मोठ्या प्रमाणात अविकसित देशात आयात झाल्यास त्या देशात आयात निर्यातीपेक्षा अधिक होऊन आंतरराष्ट्रीय व्यवहारशेष प्रतिकूल बनेल.

- **लेविस यांच्या सिद्धांताचे टीकात्मक परीक्षण :**

१) सर्वच अविकसित देशात श्रमाचा अमर्यादित पुरवठा असू शकत नाही.

२) अकुशल श्रमिकांना प्रशिक्षण देऊन त्यांना औद्योगिक क्षेत्रात कामावर घेता येते. या लेविस यांच्या विचारावर टीकाकार टीका करतात, कारण कामगारांचा शिक्षण व प्रशिक्षणाचा फलधारणा कालखंड मोठा असतो.

३) लेविस यांनी अविकसित देशात संयोजक पुरेशा प्रमाणात उपलब्ध असतात. पण, प्रत्यक्षात अविकसित देशात धाडसी व कल्पक संयोजकांचा तुटवडा असतो.

४) टीकाकारांच्या मते भांडवलसंचयाची प्रक्रिया स्वयंप्रेरित नसते.

५) टीकाकाराच्या मते लेविस यांनी आपल्या सिद्धांतामध्ये परिणामकारक मागणीचा कुठेही उल्लेख केलेला नाही.

६) लेविस यांच्या मते, लोकांच्या उत्पन्न सरकार करांच्या मार्गाने गोळा करू शकते. परंतु अविकसित देशात कर व्यवस्था एकांकी व अप्रगत असते.

७) लेविस यांच्या मते, बँक निर्मित पतनिर्मिती मुळे होणारी भाववाढ अल्पकाळात आटोक्यात आणता येते. पण टीकाकारांच्या मते अविकसित देशात रचनात्मक दोषामुळे भाववाढ आटोक्यात आणता येत नाही.

८) लेविस यांच्या मते निर्वाह क्षेत्रातील श्रमिकांचा पुरवठा औद्योगिक क्षेत्राकडे स्थलांतरित करता येतो. पण टीकाकारांच्या मते निर्वाह क्षेत्रातील श्रमिकांमध्ये गतिशिलतेचा अभाव असतो.

लेविस यांच्या अमर्यादित श्रमपुरवठ्याद्वारे आर्थिक विकास या सिद्धांतावर वरीलप्रमाणे टीका होत नसल्या तरी सिद्धांतात लोकसंख्या, भाववाढ व आंतरराष्ट्रीय व्यापार याचे भांडवल संचयाच्या संदर्भात केलेले विवेचन वास्तवाशी मिळते जुळते आहे. म्हणून हा सिद्धांत महत्त्वाचा ठरतो.

### ३.२.३ रोडान यांचा मोठा धक्का सिद्धांत :

प्रा. पॉल. एन्. रोझेन्स्टीन रोडान यांनी Notes on Theory of Big Push या ग्रंथामध्ये हा सिद्धांत १९४३ मध्ये मांडला. मोठा धक्का सिद्धांत, प्रबळ चालना सिद्धांत इत्यादी नावाने हा सिद्धांत ओळखला जातो. बाह्य बचतीच्या संकल्पनेला रोडान यांनी महत्त्व दिले आहे. अविकसित अशा गतिशून्य अर्थव्यवस्थेमध्ये एक प्रकारचे जडत्व आलेले असते ते नष्ट करण्याकरिता व अर्थव्यवस्थेला उत्पादनाच्या दिशेने गतिशील करण्याकरिता तुटक प्रयत्नांपेक्षा एकाच वेळी मोठ्या व व्यापक प्रयत्न किंवा मोठा धक्का गरजेचा असतो. हा विचार १९५० नंतरच्या काळात पुढे येऊ लागला.

आर्थिक विकासाचा प्रयत्न सर्व पातळ्यांवर यशस्वी करून दाखवावयाचा झाल्यास, अर्थव्यवस्थेतील उपलब्ध साधनांचा मोठ्या प्रमाणात वापर होणे आवश्यक असते. जसे, विमानाला अवकाशात झेप घेण्यासाठी किमान वेगाची मर्यादा ओलांडावी लागते. त्याशिवाय ते अवकाशात झेप घेवू शकत नाही. हा विचार प्रामुख्याने मोठ्या प्रमाणातील उत्पादनाच्या बाह्य फायदे (External economics) या संकल्पनेवर आधारीत आहे.

रोझेस्टीन-रोडान यांनी हा सिद्धांत मांडत असताना विकास प्रक्रियेमध्ये बाजारपेठांची व्याप्ती किती महत्त्वाची असते हे स्पष्ट करून दाखवले आहे. रोडान यांनी पुढीलप्रमाणे आर्थिक 'अविभाज्यता' किंवा निर्माण होणारे मोठ्या प्रमाणाचे बाह्य फायदे सांगितले आहेत.

**अ) उत्पादन फलनाच्या क्षेत्रातील अविभाज्यता :**

अर्थव्यवस्थेमध्ये उत्पादन वाढीकरीता सामाजिक व आर्थिक सुविधांमध्ये करण्यात येणारी गुंतवणूक किमानच असावी लागते. उदा. शिक्षण, रेल्वे, रस्ते, वाहतूक, दळणवळण, आरोग्य, गृहनिर्माण अशा सेवा किंवा सुविधा

विशिष्ट प्रमाणात उपलब्ध असाव्या लागतात, त्या अल्प प्रमाणात असतील तर त्याचा गुंतवणूकीच्या वाढीसाठी फायदा होत नाही. तसेच त्या मोठ्या प्रमाणात उपलब्ध केल्याशिवाय अर्थव्यवस्थेतील इतर उद्योगांचा विकास होत नाही. आणि अशा सेवा इतर देशातून आयात करता येत नाहीत. अशा गुंतवणूकीचा फलधारणा कालखंड मोठा असल्यामुळे ती दीर्घकालीन विकासासाठीच उपयुक्त ठरू शकते.

**ब) मागणीची अविभाज्यता :**

अर्थव्यवस्थेतील होणाऱ्या गुंतवणूकीचे निर्णय हे परस्परांवर अवलंबून असतात. फक्त एका वस्तूला गुंतवणूकीमध्ये धोका अधिक असतो, कारण त्या वस्तूच्या उत्पादनास आवश्यक मागणी (बाजारपेठ) असेलच असे नाही, याची खात्री देता येत नाही. हेच विवेचन रोडान यांनी पुढील उदाहरणाने स्पष्ट केले आहे.

रोझेस्टीन रोडान यांनी हे प्रसिद्ध उदाहरण देत असतांना आंतरराष्ट्रीय व्यापार नसणारी एक अर्थव्यवस्था गृहित धरली आहे. त्यांच्या मते या अर्थव्यवस्थेमध्ये निर्वाह क्षेत्रातील ५० छुपे बेकारांना एका चप्पल तयार करणाऱ्या कारखान्यात काम दिल्यास त्यांना त्यांच्या रोजगारातून उत्पन्न मिळेल, हे मिळालेले उत्पन्न त्यांनी तयार केलेल्या चपलावर खर्च केल्यास (चप्पल खरेदीवर) त्या कारखान्यास आवश्यक असणारी मागणी पूर्ण होते. पण प्रत्यक्षात ते सर्व कामगार मिळालेले सर्व उत्पन्न चप्पल खरेदीवर खर्च करूच शकत नाहीत हे सत्य आहे. थोडक्यात या कारखान्याला बाजारपेठ उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे या फक्त एका कारखान्यात होणारी गुंतवणूक धोक्याची ठरू शकते. परंतु समजा ५० छुप्या बेकारांऐवजी ५,००० बेकारांना एका कारखान्याऐवजी १०० कारखान्यात रोजगार दिल्यास आवश्यक असणाऱ्या विविध वस्तूंचे उत्पादन होऊन एका कारखान्यातील कामगार हा दुसऱ्या कारखान्यातील वस्तूचा ग्राहक बनेल. थोडक्यात अनेक ठिकाणी एकाच वेळी गुंतवणूक केल्याने परस्पर पूरक अशी मागणी निर्माण होते. बाजारपेठ उपलब्धतेची भिती रहाणार नाही.

**क) बचतीच्या पुरवठ्यातील अविभाज्यता :**

रोडान यांच्या मते ज्याप्रमाणे जलद विकास होण्यासाठी किमान प्रमाणात भांडवल गुंतवणूकीची आवश्यकता असते त्याचप्रमाणे अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणात बचतीचे प्रमाण वाढणे आवश्यक असते. प्रामुख्याने बचतीचे प्रमाण हे उत्पन्न पातळीवर अवलंबून असल्याने म्हणजेच पुरेशी बचत होण्याकरीता उत्पन्नाची पातळी मोठी असावी लागते. अविकसित देशात अल्प उत्पन्न पातळी असल्याने बचतीचे प्रमाण वाढत नाही. बचतीच्या या वैशिष्ट्यालाच बचतीची अविभाज्यता असे म्हणतात. अविकसित देशामध्ये ज्या भांडवल गुंतवणूकीतून उत्पन्नाचे प्रमाण वाढते त्यातून अधिकाधिक बचतीचे प्रमाण वाढणे गरजेचे असते. पण, प्रत्यक्षात तशी परिस्थिती नसते. म्हणून किमान मोठ्या प्रमाणात आवश्यक बचत होण्याकरिता शासनाच्या हस्तक्षेपाची, मार्गदर्शनाची व मदतीचीही गरज असते.

अशा रीतीने आर्थिक विकासाच्या मार्गातील अडचणी दूर करून विकास साध्य करण्यासाठी एका किमान मोठ्या प्रमाणात (Big push) भांडवल गुंतवणूकीची गरज असते. यासाठी मागणीच्या बाजूने अविभाज्यता, बचतीच्या पुरवठ्याची अविभाज्यता व उत्पादन क्षेत्रातील अविभाज्यता यामुळे विकासाचा वेग वाढीस लागतो.

- **टीकात्मक परिक्षण :**

रोडान यांनी आपला सिद्धांत अधिक वास्तववादी दृष्टिकोनातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. कारण त्यांनी मोठ्या प्रमाणातील गुंतवणूकीचे फायदे, समतोलीत अर्थव्यवस्था, बाजारपेठांची अपूर्णता इ. गोष्टी स्पष्ट केल्या आहेत. तथापी, त्यांच्या सिद्धांतामध्ये पुढील महत्त्वाचे दोष दिसून येतात.

**१) आंतरराष्ट्रीय व्यापार दुर्लक्षीत :** अंतर्गत भांडवल गुंतवणूकीशिवाय, अविकसित देशात आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सहाय्याने गुंतवणूकीचे बहिर्गत फायदे मिळू शकतात. याकडे रोडान यांनी दुर्लक्ष केले आहे.

**२) शेती क्षेत्रातील गुंतवणूकीला कमी महत्त्व :** रोडान यांनी अर्थव्यवस्थेच्या विकासाकरीता औद्योगिक क्षेत्रामध्ये गुंतवणूकीला अधिक महत्त्व देत असतांना शेती व प्राथमिक क्षेत्राला महत्त्व न दिल्याने विकासाच्या प्रक्रियेला गती येणार नाही, असे मत टीकाकारांनी व्यक्त केले आहे.

**३) भाववाढीचे संकट :** रोडान यांच्या मते, अविकसित देशात मोठ्या प्रमाणात भांडवल गुंतवणूकीची आवश्यकता असते. परंतु, या क्षेत्रात होणाऱ्या गुंतवणूकीचा फलधारणा कालखंड प्रदिर्घ असल्यामुळे अर्थव्यवस्थेत मागणीच्या प्रमाणात वस्तूंचा पुरवठा वाढविणे कठिण जाते. त्यामुळे अर्थव्यवस्थेत वस्तूंच्या किंमती वाढू लागतात अशी टीका केली जाते.

**४) अल्प गुंतवणूकीतून अधिक उत्पादन शक्य :** टीकाकारांच्या मते, जगातील अनेक अविकसित देशामध्ये तुलनात्मक दृष्ट्या कमी भांडवल गुंतवणूक करून उत्पादन पातळी वेगाने वाढली आहे. त्यामुळे रोडान यांच्या मोठ्या प्रमाणातील गुंतवणूकीची अट ही परिपूर्ण आहे असे म्हणता येणार नाही.

**५) ऐतिहासिक स्पष्टीकरणाचा अभाव :** रोडान यांनी वर्तमानकालीन परिस्थिती लक्षात घेऊन, विकासाचे विवेचन केले आहे. पण भूतकालीन घटकांचा अभाव दिसून येतो. थोडक्यात, विकासाच्या प्रक्रियेत अनेक घटकांचा समावेश होतो. त्यामुळे हा सिद्धांत अपुरा वाटतो.

**६) इतर घटकांकडे दुर्लक्ष :** देशाच्या विकासाच्या संदर्भात आर्थिक घटकांबरोबर आर्थिकेतर घटकांचा देखील प्रभाव असतो. पण या सिद्धांताने फक्त मोठ्या प्रमाणावर गुंतवणूकीसारख्या आर्थिक घटकांवर लक्ष केंद्रित करून इतर सामाजिक व राजकीय घटकांकडे दुर्लक्ष केले, अशी टीका देखील केली जाते.

अशा रीतीने रोडान यांच्या सिद्धांतावर जरी टीका करण्यात येत असल्या तरी विकासाविषयी अधिक व्यापक विचार मांडले हे नाकारता येणार नाही.

### ३.२.४ मिर्डाल यांचा विस्तारक व प्रतिसारक परिणामांचा सिद्धांत :

- **प्रस्तावना :**

प्रा. गुन्नर मिर्डाल यांनी 'एशियन ड्रामा' हा ग्रंथ प्रसिद्ध केला. विसाव्या शतकाच्या सुरूवातीला अर्थव्यवस्था गतिमान करण्यासाठी आंतरराष्ट्रीय व्यापाराची मदत मोठ्या प्रमाणात झाली. परंतु आधुनिक काळात वाढत्या आंतरराष्ट्रीय व्यापाराची फारशी मदत अविकसित देशांना त्यांच्या विकासाच्या प्रक्रियेमध्ये झालेली दिसून येत नाही. याउलट

वाढता आंतरराष्ट्रीय व्यापार त्यांच्या विकासमार्गात अडथळाच ठरलेला आढळून आला. त्याचे मुख्य कारण म्हणजे अविकसित देशांच्या बाबतीत आंतरराष्ट्रीय व्यापाराचे प्रतिसारक परिणाम (Backwash effects) म्हणजेच प्रतिकूल परिणाम विस्तारक परिणामांपेक्षा (Spread effects) जास्त असतात.

- **मिर्डाल यांचा सिद्धांत :**

प्रा. गुन्नर मिर्डाल यांच्या मते, आर्थिक विकासाच्या प्रक्रियेचा परिणाम म्हणून सर्वात जास्त विकसित असणाऱ्या देशांचा विकास अधिक होतो. पण विकासासाठी सतत प्रयत्न करणाऱ्या अविकसित देशांचा विकास होत नाही. थोडक्यात, प्रगत असणारे देश अधिक प्रगत होतात. तर दरिद्री प्रदेश अधिक दरिद्री रहातात. त्यामुळेच मिर्डाल यांच्या मते जशी आंतरराष्ट्रीय पातळीवर विषमता निर्माण होते त्याच प्रमाणे अंतर्गत पातळीवर देखील विषमता वाढीस लागते. विस्तारक व प्रतिसारक या दोन संकल्पनांचा आधार या सिद्धांतामध्ये मिर्डाल यांनी घेतला आहे. त्यांची व्याख्या पुढीलप्रमाणे केलेली आहे.

**अ) प्रतिसारक परिणाम** (Backwash effects) : एका विशिष्ट प्रदेशातील आर्थिक विकासाचे इतर प्रदेशावर होणारे सर्व प्रतिकूल परिणाम हणजे प्रतिसारक परिणाम होय. हे परिणाम श्रमिकांचे स्थलांतर, भांडवलाचे स्थलांतर व आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या प्रतिकूल परिणामांचा समावेश होतो.

**ब) विस्तारक परिणाम** (Spread effects) : एका प्रदेशातील आर्थिक विकासाचे इतर प्रदेशात पसरणारे सर्व अनुकूल परिणाम म्हणजे विस्तारक परिणाम होय.

मिर्डाल यांच्या मते, अविकसित देशातील प्रादेशिक असमतोल किंवा विषमता विस्तारक परिणामांपेक्षा प्रतिसारक परिणाम अधिक प्रभावी व मोठे असल्यामुळे निर्माण होतात.

- **आंतरविभागीय (प्रादेशिक विषमता) :**

एकाच देशामध्ये विविध विभागात किंवा क्षेत्रात विकासाच्या प्रक्रियेत विषमता मोठ्या प्रमाणात निर्माण होते. कारण मिर्डाल यांनी भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर विषमतेचे विवेचन केले आहे. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत नफा केंद्रित सर्व अर्थिक निर्णय घेतले जात असल्याने, ज्या क्षेत्रात नफा अधिक मिळतो त्याच ठिकाणी गुंतवणूक अधिक होऊन विकास घडून येत असतो. उदा. उद्योग, व्यापार, बँकिंग, विमा, वहातूक, दळणवळण इ. बरोबर शिक्षण, कला, संस्कृती याही गोष्टींचे केंद्रिकरण होते व इतर प्रदेश या सोई सुविधांऐवजी मागासलेलेच रहातात. त्यामुळे प्रादेशिक विषमता वाढतच जाते. याउलट विकसित देशामध्ये प्रादेशिक विषमता कमी असते. अशा परिस्थितीत श्रम, भांडवल व व्यापार यांचे प्रतिसारक परिणाम पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

**१) श्रमिकांचे स्थानांतर :** अधिक प्रगत विभागाकडे कार्यक्षम श्रमिक आकर्षित होतात, म्हणून कामगार स्थलांतरणामुळे संबंधित प्रदेशाची प्रगती होते. जो प्रदेश सोडून कामगार स्थलांतरीत होतात. तो प्रदेश मागासलेलाच राहतो. कारण त्या प्रदेशात फक्त अकार्यक्षम कामगारच शिल्लक रहातो.

**२) भांडवलाचे स्थानांतर :** विकसित प्रदेशामध्ये उत्पन्नाचे प्रमाण अधिक असल्याने एकूण मागणी वाढत असते. त्यामुळे गुंतवणूकीतून फायद्याचे प्रमाण अधिक राहत असल्याने या विकसित प्रदेशाकडे इतर मागासलेल्या

प्रदेशातून भांडवलाचा ओघ सुरू होतो व मूळच्या अप्रगत प्रदेशामध्ये भांडवल उपलब्ध होत नाही. सरकारचे नियंत्रण नसल्याने बँक व्यवस्था हे स्थानांतर घडवून आणते.

**३) व्यापार :** विकसित प्रदेशात जलद विकासाचा परिणाम म्हणून अविकसित प्रदेशाशी असणाऱ्या व्यापाराचे प्रमाण वाढीस लागते. त्यामुळे अविकसित प्रदेशातील प्राथमिक स्वरूपाचे उद्योग बंद पडतात. अविकसित प्रदेशाला आपले लक्ष कच्चा माल व कृषी वस्तूंवर केंद्रित करावे लागते. मागासलेल्या प्रदेशाकडून प्रगत प्रदेशाकडे सर्व संयोजक, भांडवलदार, व्यापारी आकर्षिले जातात. तसेच या दोन प्रदेशातील व्यापाराच्या शर्ती अप्रगत प्रदेशाला प्रतिकूल ठरतात व त्याच बरोबर व्यापाराच्या अटी विकसित प्रदेशाला अनुकूल ठरतात. म्हणजेच विकसित प्रदेशातील उत्पादित वस्तूंच्या किंमती अधिक तर अविकसित प्रदेशातील उत्पादित वस्तूंच्या किंमती कमी असे चित्र निर्माण होते.

**विस्तारक परिणाम :** विस्तारक परिणाम पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील. या सिद्धांतात जेव्हा एखादे क्षेत्र प्रगत होत जाते तेव्हा त्याचा अनुकूल परिणाम इतर भोवतालच्या भागांवर होतो, मिर्डाल यांनी याला विस्तारक परिणाम असे म्हटले आहे.

१) विकासाचा परिणाम म्हणून विकसित प्रदेशातून अविकसित प्रदेशामध्ये उत्पादित झालेला कच्चा माल, अन्नपदार्थ व कृषी उत्पादने यांना मोठ्या प्रमाणात मागणी (बाजारपेठ) उपलब्ध होते. त्यामुळे किंमत वाढीच्या प्रेरणेतून कृषी क्षेत्रात गुंतवणूक वाढते. व तंत्रवैज्ञानिक सुधारणा घडून येतात.

२) विकसित प्रदेशातील वाढत्या मागणीमुळे अविकसित प्रदेशातील भांडवल व श्रम यांच्या अधिक उत्पन्नात वाढ होते. या उत्पन्नातील काही भाग मुळच्या अविकसित प्रदेशात गेल्यास तेथील विकासास आवश्यक ती गुंतवणूक मिळू शकेल.

३) विकसित प्रदेशांच्या विकासाचा परिणाम म्हणून अविकसित प्रदेशातही विकासाबाबतची तीव्र इच्छा निर्माण होते. त्याच बरोबर विकसित प्रदेशातील असणारे तंत्रज्ञान कमी खर्चात अविकसित प्रदेशाला उपलब्ध होते.

मिर्डाल यांच्या मते, विकसितपणा जेवढ्या प्रमाणात अधिक तेवढ्या प्रमाणात प्रतिसारक परिणाम दुर्बल व विस्तारक परिणाम अधिक प्रभावी होतो. म्हणजेच विस्तारक परिणाम अधिक प्रभावी झाल्याने विकसित प्रदेशांचा विकास वेगाने होतो. याउलट अविकसित प्रदेशांमध्ये प्रतिसारक परिणाम अधिक प्रभावी ठरल्याने ते प्रदेश अविकसितच रहातात. अशावेळी शासनाकडून विषमता व प्रादेशिक असमतोल वाढू न देणाऱ्या धोरणांची अंमलबजावणी करावी.

**ब) आंतरराष्ट्रीय पातळीवरील विषमता :**

मिर्डाल यांच्या मते आंतरराष्ट्रीय पातळीवर अविकसित देशाच्या बाबतीत प्रतिसारक परिणाम अधिक तीव्र, प्रतिकूल व घातक असतात असे स्पष्ट केले आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारातून निर्माण होणारी प्रेरणा ही संपन्न राष्ट्रांना अधिक फायद्याच्या तर अविकसित देशाना त्या अधिक तोट्याच्या ठरत असतात. अधिक प्रगत देशामध्ये सामाजिक, आर्थिक व मुलभूत सुविधा आणि औद्योगिक क्षेत्र इ. पूर्णत: विकसित असल्याने तेथील विस्तारक परिणाम अधिक

प्रभावी ठरतात, त्याच बरोबर विकसित देशातून आपले औद्योगिक उत्पादन स्वस्त किंमतीला अविकसित देशाना निर्यात केले जाते. त्यामुळे अविकसित देशातील लघु व कुटिरोद्योग नष्ट होतात. त्यामुळे त्यांना प्राथमिक स्वरूपाच्या उत्पादनावरच अवलंबून रहावे लागते, परंतु अविकसित देशातील निर्यात वस्तूंना विकसित देशांतील मागणी ही उत्पन्न लवचिक व किंमत लवचिक असल्याने अशा वस्तूंच्या किंमतीतील चढउतार अविकसित देशांचे नुकसान करतात. याउलट अविकसित देशातून होणाऱ्या स्वस्त निर्यातीतून विकसित देश मोठ्या प्रमाणात फायदा मिळवितात. तसेच अविकसित देश आपल्या निर्यात उत्पन्नाचा वापर विकासात्मक कार्यासाठी न करता अनुत्पादक कार्यासाठी करताना आढळून येतात.

आंतरराष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या भांडवली हस्तांतरणाचा फायदा अविकसित देशांना होत नाही. कारण विकसित देशातील फायदेशीर गुंतवणूकीच्या संधीचा फायदा घेण्यास भांडवलदार उत्सुक असतात. तेव्हा ते अविकसित देशात आपले भांडवल गुंतवण्यास तयार नसतात. वसाहत वादाच्या काळात राज्यकर्त्यां देशाकडून अविकसित देशामध्ये जे भांडवल गुंतवितात ते स्वत:च्या स्वार्थासाठी म्हणजेच, स्वत:ची स्थिरता वृद्धींगत करण्यासाठी, वहातूक साधनांचा विकास व बंदरांचा विकास करण्याच्या हेतूने गुंतवण्यात आले. तसेच अधिकचे भांडवल, प्राथमिक व निर्यात वस्तूंच्या उत्पादनासाठी वापरले गेले. अविकसित देशांमध्ये सामाजिक व आर्थिक सुविधांचा पुरवठा, उत्पन्नाची पातळी, भाषा व जीवनाची मूल्ये, कायदा व शासन व्यवस्था इ. कारणांमुळे अशा देशातील विस्तारक परिणाम अधिक प्रभावी नसतात. तर याउलट अशा देशात प्रतिसारक परिणाम अधिक प्रभावी ठरतात. त्यामुळे अविकसित देश अधिक मागासले राहण्याची प्रक्रिया बळकट होते.

या सिद्धांतामध्ये आंतरराष्ट्रीय व देशांतर्गत विकास प्रक्रियेवर परिणाम करणाऱ्या घटकांचे विश्लेषण एकत्रितरित्या करण्यात आले आहे. देशाच्या दारिद्र्याचे कारण व परिणाम दारिद्र्यातच असते (Country is poor because it is poor) असे त्यांनी प्रतिपादन केले. थोडक्यात ही परिस्थिती बदलण्यासाठी मोठ्या प्रमाणात शासनाच्या हस्तक्षेपाची आवश्यकता असते. असाच निष्कर्ष या सिद्धांतातून निघतो.

## ३.३ सारांश :

दुसऱ्या महायुद्धानंतर युद्धामध्ये बेचिराख झालेल्या पण स्वातंत्र्य मिळालेल्या देशांनी आपआपल्या देशाची आर्थिक पुनर्रचना घडवून आणण्यासाठी जे प्रयत्न केले त्यातूनच खऱ्या अर्थाने विकासाचे अर्थशास्त्र उदयास आले. अविकसित देशांच्या विकास प्रक्रियेमध्ये अनेक स्वरूपाचे अडथळे निर्माण होत असतात, त्याचा प्राधान्याने विचार करून १९५० नंतर अनेक अर्थशास्त्रज्ञांनी विकसाविषयी आपले विचार मांडले.

डब्ल्यू. डब्ल्यू. रोस्टो यांनी विकास घडून येण्यासाठी अर्थव्यवस्थेला पांच टप्प्यांतून जावे लागते, प्रत्येक टप्प्यांसाठी विविध काळाची गरज असते असे त्यांनी स्पष्ट केले. लेविस यांनी विकासाविषयी आपले मत व्यक्त करतांना, अविकसित राष्ट्रांच्या अतिरिक्त लोकसंख्या या प्रमुख वैशिष्ट्यांचा आधार घेऊन विकास कसा साध्य करता येतो याचे सविस्तर विवेचन केले आहे. शेती क्षेत्रातील स्वस्त श्रमिकांचा वापर औद्योगिक क्षेत्रामध्ये केल्यास विकास प्रक्रिया कशी गतीमान होते हे भांडवली अधिक्याच्या संकल्पनेच्या आधारे स्पष्ट केले आहे. रोझेस्टीन रोडान

यांच्या मते, अविकसित अर्थव्यवस्था ही गतिशून्य असते अथवा वेळी अर्थव्यवस्थेतील मूळचे जडत्व नष्ट करायचे झाल्यास किमान गुंतवणूकीचे प्रयत्न होणे गरजेचे असते. थोडक्यात, विकासासाठी करण्यत येणारे प्रयत्न हे विखुरलेले न राहता ते एकाच वेळी झाल्यास विकासाला चालना मिळते. त्यासाठी त्यांनी तीन प्रकारच्या 'अविभाज्यता' स्पष्ट केल्या. मिर्डाल यांच्या 'Country is poor because it is poor' या प्रसिद्ध विधानातून अविकसित देश अविकसितच व विकसित देश अधिक प्रगत होत जातात. याचे स्पष्टीकरण त्यांनी दिले. त्यासाठी त्यांनी अंतर्गत व आंतरराष्ट्रीय विषमता नष्ट करण्यासाठी ही विस्तारक व 'प्रतिसारक' परिणामांच्या संकल्पनेचा आधार घेतला.

थोडक्यात, विकासाविषयी वरील सिद्धांत विचारांत घेतल्यास आर्थिक विकास हा कोणत्याही एकाच कारणामुळे व विशिष्ट कालावधीत घडून येतो असे म्हणणे चुकीचे ठरते.

## ३.४ स्वयं अध्ययन प्रश्न :

**अ) पुढील विधाने चूक की बरोबर ते लिहा.**

१) 'देश दरिद्री आहे कारण तो दरिद्रीच आहे' हे विधान मिर्डाल यांनी केले आहे.

२) एका प्रदेशातील आर्थिक विकासाचे इतर प्रदेशांवर पसरणारे सर्व अनुकूल परिणाम म्हणजे विस्तारक परिणाम होय.

३) अर्थव्यवस्था गतिमान करण्यासाठी किमान मोठ्या प्रमाणात भांडवल गुंतवणूकीची गरज असते. असे लेविस यांनी मांडले.

४) लेविस यांच्या मते निर्वाह क्षेत्रातील श्रमिकांची उत्पादनक्षमता भांडवली क्षेत्रापेक्षा अधिक असते. त्यामुळे निर्वाह क्षेत्रात भांडवल अधिक निर्माण होते.

५) रोझेस्टीन रोडान यांनी आर्थिक विकासाचे पांच टप्पे असतात असे स्पष्ट केले आहे.

## ३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**उत्तरे :** १) बरोबर

२) बरोबर

३) चूक

४) चूक

५) चूक

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न**

१) रोडान यांचा मोठा धक्का सिद्धांत स्पष्ट करा.

२) लेविस यांच्या सिद्धांताचे टीकात्मक परिक्षण करा.

३) विस्तारक व प्रतिसारक परिणाम स्पष्ट करा.

४) विकासाचे टप्पे सिद्धांत स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा.**

१) रोस्टो यांच्या सिद्धांतातील उड्डाणावस्था.

२) विस्तारक परिणाम.

३) प्रतिसारक परिणाम.

## ३.७ संदर्भ ग्रंथ

1) Lekhi R. K. (2001) : 'The Economics of Development and Planning', Kalyani Publishers - New Delhi.

2) पाटील जे. एफ्. (एप्रिल २०११) : 'वृद्धी व विकासाचे अर्थशास्त्र', फडके प्रकाशन, कोल्हापूर.

3) भोसले व काटे (ऑगष्ट १९९८) : 'विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन', फडके प्रकाशन, कोल्हापूर.

4) पाटील जे. एफ (१९९४-९५) : 'विकास सिद्धांत व आर्थिक नियोजन', फडके प्रकाशन, कोल्हापूर.

◈◈◈

घटक ४

# आर्थिक विकासासाठी साधनसंपत्ती

अनुक्रमणिका

४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ भांडवलनिर्मिती व आर्थिक विकास
४.२.२ मानवी भांडवलनिर्मिती व आर्थिक विकास
४.२.३ संस्थात्मक रचना व आर्थिक विकास
४.२.४ आर्थिक विकासात शासनाची भूमिका

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द

४.५ स्वयं अध्ययन प्रश्न

४.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.७ सरावासाठी स्वाध्याय

४.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ४.० उद्दिष्ट्ये :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास पुढील बाबींचे आकलन होईल.

- भांडवलनिर्मिती व आर्थिक विकासातील संबंध स्पष्ट करता येईल.

- मानवी भांडवल निर्मिती व आर्थिक विकास यातील संबंधाचे आकलन होईल.
- संस्थात्मक रचना व भांडवल निर्मितीतील संबंध समजेल.
- आर्थिक विकासातील शासनाची भूमिका लक्षात येईल.

## ४.१ प्रास्ताविक :

भांडवलनिर्मिती ही कोणत्याही देशाची आवश्यक बाब बनली आहे. विशेषत: अविकसित किंवा विकसनशील देशांचा विकास करावयाचा असेल तर भांडवल अत्यंत महत्त्वाचे असते. प्रो. कुझनेट्सच्या मते, ''भांडवलनिर्माण आर्थिक विकासाची अट आहे.'' जर विकसनशील देशाकडे पुरेसे भांडवल नसेल तर उपलब्ध असणारी नैसर्गिक साधनसामग्री वापरात आणली जात नाही आणि नैसर्गिक साधनसामग्री पूर्णपणे वापरात न आल्यास देशाचा विकास होणे कठीण असते. काही तज्ज्ञांच्या मते, भांडवलाला विकासाची गुरूकिल्ली म्हटले आहे. म्हणून विकासप्रक्रियेत भांडवलाला खूपच महत्त्व प्राप्त झालेले आहे. भांडवल म्हणजे केवळ पैसा नव्हे, प्रो. थॉमस यांच्या मतानुसार, ''नवीन वस्तू व संपत्ती निर्माण करण्यासाठी वापरात आणला जाणारा वैयक्तिक व सामूहिक संपत्तीचा तो भाग होय.'' त्यामध्ये जमीन वगळून सर्व घटकांचा समावेश होतो. लेविस भांडवलाच्या बाबतीत म्हणतात, ''अविकसित देशांना बचत आणि गुंतवणूकीचा दर टिकवून ठेवणे खूपच कठीण काम असू शकत नाही. केवळ त्या देशातील लोकांच्यामध्ये असे करून दाखविण्याची संकल्प शक्ती असायला हवी.''

मायर आणि बाल्डविन यांनीदेखील भांडवलनिर्मितीच्या बाबतीत आपले विचार व्यक्त करताना पुढील प्रकारचे प्रयत्न करणे अत्यावश्यक असल्याचे स्पष्ट केले आहे.

१) बचतीत वाढ करणे गरजेचे आहे. त्यासाठी आंतरिक असणारा उपभोग कमी करावा लागेल.

२) बचती वाढविण्याकरिता करारोपणाचा वापर केला पाहिजे.

३) उपभोगासाठी आयात केल्या जाणाऱ्या वस्तू कमी कराव्या लागतील.

४) भाववाढ आणि तुटीच्या अर्थसंकल्पाद्वारे बचतींना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.

५) प्रत्येक क्षेत्रात असणारी अदृश्य स्वरूपाची बेकारी कमी करण्यात यावी, या बेकारीने उत्पादनात काहीच वाढ होत नाही.

## ४.२ विषय विवेचन :

प्रस्तूत घटकात आपण भांडवलनिर्मिती, मानवी भांडवलनिर्मिती, संस्थात्मक रचना आणि आर्थिक विकास यामधील संबंधाचा अभ्यास करणार आहोत. त्याचबरोबर आर्थिक विकासातील शासनाच्या भूमिकेचाही अभ्यास करणार आहोत.

### ४.२.१ भांडवल निर्मिती आणि आर्थिक विकास :

मनुष्य निर्मित उत्पादनाचा एक घटक म्हणजे भांडवल होय. सर्वच राष्ट्रांच्या आर्थिक विकासाचे इंजिन म्हणून

भांडवलाला ओळखले जाते. अप्रगत, विकसनशील राष्ट्रांना आर्थिक विकास गाठण्यासाठी भांडवलाची अत्यंत आवश्यकता असते. तर प्रगत किंवा विकसीत राष्ट्रांना त्यांच्या विकासाची गती टिकविणे किंवा वाढविण्यासाठी भांडवलाची गरज असते. भूमी आणि श्रम (मनुष्यबळ) हे उत्पादनाचे घटक मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असूनही अविकसित राष्ट्रांचा आर्थिक विकास लवकर साध्य होत नाही. म्हणजेच भांडवलाची कमतरता हा अविकसित राष्ट्रांच्या आर्थिक विकासातील एक मोठा अडसर ठरतो.

सामान्य व्यवहारात भांडवलाचा अर्थ पैसा असाच घेतला जातो. पण अर्थशास्त्रात भांडवल या शब्दाचा अर्थ वैशिष्ट्यपूर्ण आहे. प्रो. थॉमस यांनी भांडवलाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. ''जमीन वगळून भांडवल हा इतर वैयक्तिक व सामाजिक संपत्तीचा असा भाग असतो की जो नवीन संपत्ती निर्माण करण्यासाठी उपयोगात आणला जातो. उदा. उपकरणे, बियाणे, कच्चा माल इ.'' म्हणजेच भांडवल हे निसर्गदत्त नसून मानवनिर्मित असते. मनुष्याने निर्माण केलेला व नवीन अर्थोत्पादनासाठी उपयोगात आणलेला संपत्तीचा भाग म्हणजे भांडवल होय.

- **भांडवल निर्मितीचा अर्थ**

भांडवल निर्मिती म्हणजे देशातील उत्पादन शक्तीचा काही भाग उपभोगासाठी न वापरता उत्पादन साधनाच्या निर्मितीसाठी वापरणे होय. म्हणजेच समाज त्याच्या सर्व चालू उत्पादक कार्यक्रमाच्या गरजा व इच्छा ताबडतोब पूर्ण करीत नाही. पण त्यापैकी काही हिस्सा तो भांडवली वस्तू, हत्यारे, उपकरणे, यंत्रे आणि वाहतूक सुविधा, यंत्रसामग्री यासारख्या विविध वस्तू निर्माण करण्यावर खर्च करतो. ज्यामुळे उत्पादक कार्यक्षमता निर्माण होतात. आणि भांडवली वस्तूंच्या साठ्यात वाढ होऊन भविष्यात उपभोग्य उत्पादनाचा विस्तार करणे शक्य होते. भांडवल निर्मिती ही प्रो. नर्क्सेच्या मते फक्त भौतिक भांडवल संचयाशी संबंधित आहे आणि मानवी भांडवलाकडे दुर्लक्ष केले आहे. प्रो. सिंगरच्या मते, भांडवल निर्मितीमध्ये यंत्रसामग्री, हत्यारे आणि यंत्रे इ. प्रत्यक्ष वस्तू आणि शिक्षणाचा उच्च दर्जा, आरोग्य, शास्त्रीय परंपरा व संशोधन या सारख्या अप्रत्यक्ष वस्तू या दोहोंचा समावेश होतो.

- **भांडवल निर्मितीचे आर्थिक विकासातील महत्त्व :**

प्रो. लेविस यांनी भांडवल निर्मितीला आर्थिक विकासाचा मुख्य घटक मानले आहे. तर प्रो. नर्क्से यांच्या मते अविकसित राष्ट्रे भांडवल निर्मितीच्या सहाय्याने दारिद्र्याची दुष्टचक्रे भेदू शकतात. अशा राष्ट्रात उत्पन्नाची पातळी अत्यंत कमी असल्याने बचत आणि गुंतवणूकीचा दर अत्यंत कमी असतो. तो वाढविणे हाच या राष्ट्रासमोरील खरा प्रश्न असतो. अर्थात बचत गुंतवणूकीच्या दरातील वाढीमुळे भांडवल उपलब्ध होऊन देशाचा विकास वेगाने होतो. भांडवली वस्तूंची कमतरता भांडवलाच्या निर्मितीने दूर करता येते. यंत्रे, यंत्रसामग्री इ. चा पुरवठा वाढतो. उत्पादनाचे प्रमाण विस्तारते, देशातील उपलब्ध नैसर्गिक साधनसामग्रीचा भांडवल निर्मितीमुळे पूर्णपणे वापर करता येतो. थोडक्यात विकसनशील देशांच्या आर्थिक विकासामध्ये भांडवल निर्मितीला महत्त्वाचे स्थान आहे. हे पुढील घटकांवरून स्पष्ट होते.

**१) विकासाचा पाया :** अविकसित राष्ट्रांत प्रारंभिक काळात विकासाच्या मार्गात अनेक अडचणी असतात. अविकसित देशातील प्रमुख व्यवसाय असलेल्या शेतीची उत्पादकता कमी असते, ती वाढविणे आवश्यक

असते. याबरोबर खाणी, उद्योग, मळे यासाठी भांडवली साधनसामग्री जमा करणे गरजेचे असते. मुलभूत सामाजिक गुंतवणूक नाममात्र असते. ती वाढविणे आवश्यक असते. तसेच शाळा, हॉस्पिटल, रेल्वे इ. च्या बांधकामासाठी भांहवलाची गरज असते. म्हणजे आर्थिक विकासाचा पायाच भांडवलाच्या उपलब्धतेवर अवलंबून असतो.

**२) रोजगारात वाढ :** विकसनशील देशांचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे अतिरिक्त लोकसंख्या व वाढती बेकारी होय. शेतीवर अवलंबून असणाऱ्या या अर्थव्यवस्था श्रमिकांना पुरेसा रोजगार पुरवू शकत नाहीत. म्हणून वाढत्या लोकसंख्येला रोजगार देण्यासाठी उद्योग आणि सेवाक्षेत्रांचा विस्तार करावा लागतो. यासाठी प्रचंड भांडवलाची गरज असते. थोडक्यात वाढत्या लोकसंख्येला रोजगार पुरविण्यासाठी भांडवल निर्मितीची गरज असते.

**३) बाजारपेठांचा विकास :** भांडवल निर्मितीमुळे बाजारपेठांचा विस्तार होऊन आर्थिक व सामाजिक वरकड भांडवल निर्माण होते. अप्रगत राष्ट्रात यामुळे बाजारातील अपूर्णता दूर होण्यास मदत होते. दारिद्र्याचे दुष्टचक्र भेदणे शक्य होते. परिणामी बाजारपेठांचा विकास घडून येतो.

**४) स्वयंपूर्णता प्राप्त करणे :** विकसनशील देशांना परकीय मदत घेणे अनेकदा अपरिहार्य असते. अशा प्रकारच्या परकीय कर्जाबरोबर अप्रिय बंधने येतात. आजच्या पिढीसाठी घेतलेल्या कर्जाचा भार भावी पिढ्यांना सहन करावा लागतो. यादृष्टीने देशातच भांडवलाची निर्मिती होणे हिताचे ठरते. भांडवल निर्मितीमुळे देशाला परकीय मदतीची गरज हळूहळू कमी करता येते. परकीय कर्जाचे ओझे कमी करता येते आणि देश स्वयंपूर्ण करता येतो.

**५) आर्थिक कल्याण :** अप्रगत देशातील वाढत्या लोकसंख्येच्या गरजा पूर्ण करण्यासाठी देशात विविध प्रकारच्या उद्योगांची निर्मिती करावी लागते. विविध प्रकारचे उत्पादन करावे लागते. लोकांच्या राहणीमानाचा स्तर उंचविण्यासाठी आणि आर्थिक कल्याणासाठी यांची गरज असते. या सर्वांसाठी भांडवल निर्मितीची गरज असते.

**६) राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करणे :** भांडवल निर्मितीच्या प्रक्रियेतून देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या पातळीत वाढ घडून येते. थोडक्यात भांडवल निर्मिती हा अविकसित राष्ट्रासमोरील कठिण समस्या सोडविण्याचा प्रमुख उपाय आहे.

**७) व्यवहारशेषाची समस्या सोडविणे :** अप्रगत राष्ट्रातून प्रामुख्याने कच्चा माल व शेती उत्पादन अशा प्राथमिक वस्तूंची निर्यात केली जाते. आणि सर्व प्रकारच्या कारखानदारी वस्तू व भांडवली वस्तूंची आयात केली जाते. परिणामी जास्त आयात व कमी निर्यात या वैशिष्ट्यामुळे विकसनशील देशाचा विदेशी व्यापार सातत्याने तूटीचा ठरतो. यावर देशांतर्गत भांडवल निर्मिती हा प्रतिकूल व्यवहारशेषाची समस्या सोडविण्याचा उपाय ठरतो.

**८) भाव वाढीला आळा घालणे :** भांडवल निर्मितीने अप्रगत देशातील अर्थव्यवस्थेवरील भाववाढीचा ताण कमी करता येतो. भांडवल निर्मिती वाढल्यास कृषी उत्पादन व भांडवली वस्तूंच्या किंमतीत वाढ होते. यातून अल्पकाळात अर्थव्यवस्थेवर भाव वाढीचा दबाव वाढतो. मात्र दीर्घकाळात भांडवल निर्मितीच्या दरातील हळूहळू होणारी वाढ भाववाढ नियंत्रित करते व अर्थव्यवस्थेत स्थैर्य निर्माण होते.

**९) तांत्रिक विकास :** देशात निर्माण होणारे भांडवल अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रात गुंतविली जाते. साहजिकच त्यामुळे संशोधनाला प्रोत्साहन मिळते. नवनवीन यंत्राची निर्मिती होते. विविध नव्या प्रकारचे तंत्रज्ञान

विकसित होते. परिणामी शेती, उद्योग, दळणवळण इ. क्षेत्रांच्या उत्पादनात वाढ होते.

अशा रीतीने कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासाला विशेषत: विकसनशील देशाच्या आर्थिक प्रगतीला भांडवल निर्मिती महत्त्वाची असते.

- **भांडवल निर्मितीचे स्त्रोत :**

विकसनशील देशात भांडवलनिर्मितीचे प्रामुख्याने अंतर्गत आणि बहिर्गत असे दोन स्त्रोत आढळतात. विकसनशील देशात भांडवलनिर्मितीसाठी अंतर्गत स्त्रोतांचा वापर हाच महत्त्वाचा ठरतो. परकीय मदतीचे व खाजगी भांडवलाचे स्वरूप विचारात घेता या स्त्रोतांवर भर देणे आवश्यक ठरते.

**अ) अंतर्गत स्त्रोत (देशांतर्गत स्त्रोत) :**

यामध्ये देशात तयार होणाऱ्या उगमांचा समावेश होतो ते पुढीलप्रमाणे -

**१) राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ :** राष्ट्रीय उत्पादनात वाढ घडवून आणणे ही महत्त्वाची पायरी आहे. त्यामुळे लोकांच्या उत्पन्नात वाढ होते. देशातील उपलब्ध तंत्रज्ञानाचा पूर्ण उपयोग करून श्रमिक आणि साधनसामग्रीचा कार्यक्षम वापर केला पाहिजे. यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होईल.

**२) बचतीचा वापर :** देशातील लोकांच्या बचतीचा वापर करून अविकसित देशातील भांडवल निर्मितीची समस्या सोडविता येते. यासाठी सामाजिक शिक्षण आणि प्रचार याद्वारे आवश्यक प्रयत्न केले पाहिजेत. लोकांमध्ये बचतीची सवय निर्माण केली पाहिजे. भविष्यकालीन बाबीसाठी उदा. शिक्षण, विवाह, घर बांधणी इ.साठी बचत आवश्यक आहे. हे त्याच्या मनावर बिंबवले पाहिजे. तसेच लोकांनी केलेली बचत गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केली पाहिजे. अशा रीतीने बचतीला प्रेरणा देवून ती एकत्र करून तिचा वापर भांडवल गुंतवणूकीसाठी केला पाहिजे.

**३) वित्तीय संस्थांची स्थापना :** अप्रगत राष्ट्रात लोकांमध्ये बचतीच्या सोयींचा अभाव असतो. तसेच बचतींसाठी आवश्यक बँकांच्या सोयी पुरेशा प्रमाणात नसतात. परिणामी लोक आपल्याजवळील बचतीचा वापर पैशाचा साठा करणे, सोने-जडजवाहिर विकत घेण्यासाठी करतात. म्हणून अशा देशात छोट्या बचतदारांनी आपला पैसा विश्वासाने ठेवावा. यासाठी वित्तीय संस्थांची स्थापना करण्याची गरज असते.

**४) ग्रामीण बचत :** अप्रगत देशातील ग्रामीण क्षेत्रातील लोकांच्या बचती गोळा करण्याचा कार्यक्रम व योजना आखल्यास भांडवल निर्मितीचे प्रमाण वाढते. यासाठी स्थानिक क्षेत्रातील विकासाला पूरक बचतीच्या योजना सुरू केल्या पाहिजेत. थोडक्यात ग्रामीण बचतीचा स्थानिक विकासाशी संबंध जोडल्यास विकास वेगाने होतो.

**५) वाढता नफा :** प्रो. लेविस यांच्या मते अप्रगत देशात नफ्याच्या दरात वाढ करून बचतीत वाढ घडवून आणता येते. परिणामी भांडवल निर्मिती घडून येते. अर्थव्यवस्थेतील भांडवली क्षेत्रांचा विस्तार करून राष्ट्रीय उत्पन्नातील नफ्याचे प्रमाण वाढविता येते. याशिवाय चलनवाढ नसतानाही संस्थात्मक आणि तंत्रज्ञानात्मक बदलानेही नफा वाढतो. प्रो. डी. आर. गाडगीळ यांच्या मते, वाढत्या नफ्याच्या बचतीने भांडवल निर्मिती झाल्यास

सामाजिक अशांतता निर्माण होते. अशी सामाजिक इष्ट गुंतवणूक उत्पन्न वाढविण्यात अपयशी ठरते. कारण हा नफा मिळविणारा वर्ग सर्वसामान्यांच्या कल्याणाकडे दुर्लक्ष करतो.

**६) तांत्रिक विकास :** प्रगत देशांच्या इतिहासावरून असे सिद्ध हाते की, तांत्रिक विकासामुळे आर्थिक विकास होतो. तथापी, प्रगत राष्ट्राप्रमाणेच अप्रगत राष्ट्रात नवीन तंत्राचा वापर केल्यास अप्रगत देशात बेरोजगारी वाढण्याची शक्यता असते. म्हणून विकसनशील राष्ट्रांनी स्वत:च्या समस्यांचा व परिस्थितीचा अभ्यास करून अशा रीतीने व त्याच प्रमाणात नवीन उत्पादन तंत्राचा वापर करावा, ज्यामुळे श्रमिकांची उत्पादकता तर वाढेलच आणि श्रमिकांमध्ये बेरोजगारीही पसरणार नाही. असे झाल्यास आधुनिक तंत्राच्या उपयोगामुळे उत्पादकता वाढेल व भांडवल निर्मितीचे पोषक असे सुष्ट चक्र सुरू होईल.

**७) सार्वजनिक ऋण :** सरकारला स्वत:चा खर्च पूर्ण करण्यासाठी स्वत: जवळील उत्पन्न अपुरे पडते. तेव्हा सार्वजनिक कर्ज काढले जाते. सरकारद्वारे बाजारात विक्रीसाठी आणलेल्या कर्जरोख्यात लोक आपल्याजवळील पैसा त्यामध्ये गुंतवितात. अनेक महत्त्वाच्या कार्यासाठी सरकारला भांडवल उपलब्ध होते. तथापी, अविकसित देशातील लोकांच्या कमी उत्पन्नामुळे व बचतीमुळे याची व्याप्ती मर्यादित असते. या देशात संघटित चलन व भांडवल बाजारांचा अभाव असतो. सार्वजनिक कर्जाची मोहिम यशस्वी होण्यासाठी प्रचार व सामाजिक शिक्षणाची गरज असते. देशभर बचत बँका, विमा कंपन्या, सुव्यवस्थित हुंडी बाजार इ. संस्थांचे जाळे विकसित केले पाहिजे.

**८) कर :** भांडवल निर्मिती प्रक्रियेवर सरकारच्या कर धोरणाचा प्रभाव पडतो. सरकारचा राजकोषीय धोरणातील कर हे प्रमुख व प्रभावी साधन आहे. कर हे वैयक्तिक उत्पन्न, संपत्ती इत्यादीवर आकारावेत मात्र त्याचा काम, बचत व गुंतवणूक यांच्या इच्छेवर अनिष्ठ परिणाम होता कामा नये याची काळजी घेतली पाहिजे.

**९) किंमतवाढ :** आधुनिक अर्थशास्त्रज्ञ केन्स रॉबर्टसन, रोस्टो इ. नी भाववाढीतून आर्थिक विकास गाठता येतो असे स्पष्ट केले आहे. किंमत पातळीतील मर्यादित वाढीमुळे नफ्याचे प्रमाण वाढून गुंतवणूकीला प्रेरणा मिळते. परंतु अनियंत्रित चलनवाढ अप्रगत देशांना प्रतिकूल ठरते. म्हणून अनेक अर्थतज्ज्ञानी समर्थन केलेले हे साधन विकसनशील राष्ट्रांना फायद्या ऐवजी तोट्याचे ठरण्याची शक्यता अधिक असते.

**१०) छुप्या बेकारीचा (सुप्त) उपयोग :** प्रो. नर्क्सेच्या मते, अतिरिक्त लोकसंख्या असलेल्या अप्रगत राष्ट्रात भांडवल निर्मितीचा महत्त्वाचा स्त्रोत म्हणजे ग्रामीण क्षेत्रातील सुप्त बेकारी होय. अविकसित राष्ट्रात कृषी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर श्रमिक गुंतलेले असतात. त्यांची सीमांत उत्पादकता अनेकदा शून्य किंवा उणे असते. अशा अतिरिक्त श्रमशक्तीला कृषी क्षेत्रातून बाहेर काढून औद्योगिक क्षेत्रात काम दिल्यास भांडवल निर्मिती होऊ शकते.

**११) अस्तित्वातील भांडवलाचा महत्तम वापर :** अप्रगत राष्ट्रात भांडवलाचा तुटवडा असतो. पण या राष्ट्रात भांडवलाचा पूर्णपणे वापर होत नाही. त्यामुळे भांडवलाची उणीव अधिक तीव्रपणे जाणवते. भांडवलाचा अपुरा वापर होण्यास मागणीचा अभाव हे महत्त्वाचे कारण असते. यासाठी उत्पादन देशात किंवा प्रसंगी परदेशात विकण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. एकंदर भांडवलाच्या पडून राहणाऱ्या क्षमतेचा वापर केल्यास भांडवल निर्मितीसाठी

त्याचा अविकसित राष्ट्रांना लाभ होतो.

**१२) सुवर्ण संजय :** अप्रगत राष्ट्रात उत्पन्न पातळी कमी असल्याने बचतीचे प्रमाण कमी असते. शिवाय असलेली बचत मौल्यवान धातू (सोने, चांदी इ.) खरेदी करणे, दागिने करणे, जमीन घेणे इ. कामासाठी वापरली जाते. हा पैसा बाहेर काढण्यासाठी लोकांना गुंतवणूक व विकास याचे महत्त्व पटवून दिले पाहिजे. जनतेकडून सरकारने उच्च व्याजदराने सुवर्ण-बचत-पत्रे काढून सोने जमा करावे. अशा ऐच्छिक बचतीने सुवर्णसाठ्यांचा भांडवल निर्मितीसाठी वापर होतो.

**ब) बाह्य स्रोत** (External Sources)

**१) परकीय खाजगी गुंतवणूक :** अप्रगत देशांत विकासाच्या प्रारंभीच्या काळात परकीय गुंतवणूकीला महत्त्व असते. परकीय खाजगी गुंतवणूकीबरोबर नवीन तंत्रज्ञान येते. त्यामुळे अप्रगत देशांच्या विकासाला, भांडवल निर्मितीला हातभार लागतो.

**२) विदेशी मदत :** विदेशी खाजगी गुंतवणूकीशिवाय परकीय भांडवल मदतीच्या स्वरूपात येऊ शकते. अशा प्रकारची विदेशी मदत दोन देशांची सरकारे परस्पर करारांद्वारे सुरू करू शकतात. अलिकडील काळात आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध आंतरराष्ट्रीय संस्था सुरू झाल्या आहेत. या संस्थामुळे विकसनशील देशांना विविध कार्यासाठी बरीच मदत होत आहे.

**३) आयातीवरील बंधने :** देशात होणाऱ्या उपभोग्य वस्तूंच्या आयातीवर बंधने घालून वाचलेले विदेशी चलन देशांतर्गत भांडवल निर्मितीसाठी वापरता येते. यातूनही भांडवल निर्मिती घडून आणता येते. तथापी, आयातीवर बंधने घालून वाचविलेले भांडवल देशात चैनीच्या व विलासी वस्तूंच्या निर्मितीसाठी वापरले जाणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे.

**४) अनुकूल व्यापार अटी :** जेव्हा अप्रगत राष्ट्रांना व्यापारशर्ती अनुकूल असतील तेव्हा अशा देशांना मोठ्या प्रमाणात भांडवली वस्तू आयात करता येतील. अनुकूल व्यापारशर्तीचा फायदा घेण्यासाठी या देशांनी निर्याती पासून मिळालेल्या उत्पन्नातून देशांर्गत बचत वाढवली पाहिजे. व ती उत्पादक स्वरूपाच्या गुंतवणूकीत गुंतविली पाहिजे.

अशा रीतीने आर्थिक विकासासाठी भांडवल निर्मिती हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे.

## ४.२.२ मानवी भांडवलनिर्मिती आणि आर्थिक विकास :

**(Human Capital Formation and Economic Development) :**

**प्रास्ताविक :**

आधुनिक काळात मानवी भांडवल निर्मितीला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. याचा अर्थ वस्तूच्या व सेवांच्या उत्पादन प्रक्रियेत उपयोगी पडणारी श्रमिकांची गुणवत्ता, काम करण्याची कुवत व शक्ती होय. मानवी भांडवलाकडे दोन दृष्टिकोणातून पाहता येते. एक म्हणजे वैयक्तिक दृष्टिकोणातून व दुसरे म्हणजे सामाजिक

दृष्टिकोणातून. श्रमिकाचे कौशल्य वाढविण्यासाठी केलेली गुंतवणूक अशी गुंतवणूक विकसित अर्थव्यवस्थेमध्ये केलेली असते त्यामुळे अर्थव्यवस्थेची कार्यक्षमता आणि उत्पादकता वाढून अर्थव्यवस्थेचे यांत्रिकीकरण शक्य होते व विकासास चालना मिळते.

उदा. एखाद्या विकसित देशात एखाद्या कॉलेजमध्ये एक कारकून प्रवेश प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांचे मार्क, त्याची फी, फी भरली की नाही व इतर माहितीचे व्यवहार घरच्या पत्यावर इंटरनेटच्या सहाय्याने करू शकतो. परंतु याच कामासाठी भारतासारख्या विकसनशील देशात अनेक कामगार काम करीत असतात. यावरून मानवी भांडवल कौशल्यवाढीमध्ये महत्त्वाचे असते हे स्पष्ट होते.

**मानवी भांडवल आणि आर्थिक विकास :**

या संदर्भात जपानसारख्या देशाचे उत्तम उदाहरण घेता येते. दुसऱ्या महायुद्धामध्ये जपान जवळ-जवळ पूर्ण उद्‌ध्वस्त झाला होता. पराभवामुळे आपल्या सर्व वसाहती गमवाव्या लागल्या होत्या. छोटे कारखाने, बंदरे, रेल्वे स्टेशन इ. सर्व उद्‌ध्वस्त झाले होते. जपानची जवळ-जवळ संपूर्ण तरुण पिढी नष्ट झाली होती. असे असूनही जपानने पुढील चार दशकामध्ये नेत्रदिपक व अविश्वसनीय अशी आर्थिक प्रगती करून जगासमोर एक आदर्श निर्माण केला आहे. या संदर्भात विशेष महत्त्वाचे म्हणजे जपान जवळ-जवळ ९९% पेट्रोल, ६६% लाकूड, ९८% कच्चे लोखंड आणि १००% अल्युमिनियम आयात करतो. इतके मोठे आयातीचे प्रमाण असूनही आर्थिक प्रगतीमुळे जपानने जर्मनीला कॅमेरे, स्वित्झर्लंडला घड्याळे, फ्रान्सला सायकली, इंग्लंडला मोटार सायकली आणि अमेरिकेला मोटारी व इलेक्ट्रॉनिक्स या उद्योगांना मागे टाकले आहे. लाकूड आयात करुनही जहाजबांधणीमध्ये जपानचा जगात पहिला क्रमांक आहे. अशा प्रकारच्या आश्चर्यकारक प्रगतीमध्ये मानवी भांडवल म्हणजेच जपानी माणसाची बुद्धीमत्ता आहे. त्यामुळे सुशिक्षित, निश्चयी, कष्टाळू, प्रशिक्षित देशाभिमानी आणि आर्थिक प्रगतीच्या बाबतीत आपला देश जगात सर्वप्रथम आला पाहिजे, या महत्त्वकांक्षेने झपाटलेले मानवी भांडवल आहे. यावरून मानवी भांडवलाचे आर्थिक विकासामधील महत्त्व स्पष्ट होते.

**मानवी भांडवल आणि भारत :**

भारताच्या दृष्टिने विचार करता स्वातंत्र्योत्तर काळात नियोजनाद्वारे आर्थिक विकासाचे उद्दिष्ट निश्चित करून पंचवार्षिक योजनांची अंमलबजावणी होत आहे. परंतु वस्तुस्थितीमध्ये फारसी सुधारणा आढळत नाही. आजही प्रादेशिक असमतोल आहे. अनेक खेड्यात पिण्याचे स्वच्छ पाणी मिळत नाही. शौचालयाचा अभाव आहे, स्वच्छतेचा अभाव आहे, निरक्षरता आढळते, आरोग्य सुविधांचा अभाव आहे अशा वस्तुस्थितीमुळे रोजगार कमी, उत्पन्न कमी, राहणीमानामध्ये सुधारणा नाही. आर्थिक कल्याण साधले जात नाही. यामुळे मानवी भांडवलाचा विकास ही संकल्पनाच बाजूला फेकली जाते. प्रचंड मनुष्यबळ आणि नैसर्गिक साधनसामग्री असूनही भारत अजूनही विकसनशील देशात गणला जात आहे.

**मानवी भांडवलाची गरज :**

अविकसित देशात मानवी भांडवलाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. अशा देशामध्ये मानवी भांडवलाची

गुंतवणूक पुढील तीन प्रकारे आवश्यक असते -

**१) आरोग्य सेवा :** आरोग्य सेवा सर्व देशांच्या दृष्टिने महत्त्वाच्या आहेत. विकसित देशात आरोग्य सुविधावर गुंतवणूक झालेली असते. तेथे आरोग्यसुविधा पुरेशा असतात. दरडोई उत्पन्नाचे प्रमाण अधिक असल्याने आरोग्य उच्च दर्जाचे असते. परंतु अविकसित देशामध्ये दरडोई उत्पन्न कमी, राहणीमान खालावलेले, अशा देशात आरोग्य सेवामध्ये गुंतवणूक करणे आवश्यक असते. त्यामुळे लोकांचे आरोग्य सुधारून शारीरिक आणि बौद्धिक कार्यक्षमतेत सुधारणा होते आणि मानवी भांडवल निर्मितीस चालना मिळते.

**२) पौष्टिक अन्नधान्य :** पौष्टिक अन्नधान्यामध्ये जनतेने व शासनाने गुंतवणूक करणे महत्त्वाचे असते. पौष्टिक अन्नधान्यातून आवश्यक उष्मांक मिळाल्यास बौद्धिक आणि शारीरिक कार्यक्षमतेत सुधारणा होईल. आरोग्य संपन्नता वाढण्यास मदत होईल. यातून सर्वांगीण विकासास चालना मिळते. विकसित देशामध्ये पौष्टिक अन्नधान्यावरील गुंतवणूकीस प्राधान्य दिले जाते. परंतु अविकिसत देशामध्ये याकडे दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे अशा देशातील गुंतवणूक वाढली पाहिजे. यातून मानवी भांडवल वाढीस चालना दिली पाहिजे.

**३) शिक्षण :** शिक्षण हा घटक विकासास अत्यंत आवश्यक आहे. शिक्षणावरील गुंतवणूकीमुळे गुणात्मक परिणाम घडून येतात. आधुनिक तांत्रिक समस्या सुटण्यास मदत होते. त्यामुळे मानवी भांडवल निर्मिती होते. या गुंतवणूकीमध्ये प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंतचे शिक्षण, औद्योगिक प्रशिक्षण, श्रमबाजारासंबंधीचे ज्ञान, श्रमिकांचे स्थलांतर इत्यादी. त्याचप्रमाणे परंपरावादी विचारांचा ऱ्हास होवून आधुनिक विचारप्रणाली, वैज्ञानिक दृष्टिकोणास प्राधान्य दिले जाते. नव-नवीन संशोधनाला प्रधान्य दिले जाते. अविकसित देशात शैक्षणिक गुंतवणूक आणि मानवी भांडवल निर्मिती महत्त्वाची असते.

असे असले तरी अविकसित देशात मानवी भांडवल निर्मितीत पुढील काही अडथळे येतात -

**१) वाढती लोकसंख्या :** अविकसित देशातील वाढत्या लोकसंख्येमुळे आरोग्य सेवा, पौष्टिक अन्नधान्य, शिक्षण, इतर सेवा यावर अधिक ताण पडतो. त्याचा परिणाम श्रमिकांचे आरोग्य, कार्यक्षमता, कौशल्य यावर होतो व मानवी भांडवल निर्मितीमध्ये अडथळा येतो.

**२) उपलब्ध साधनांचा अपुरा वापर :** अविकसित देशात मुळातच भांडवलाची टंचाई असल्याने नैसर्गिकरित्या जी साधनंसपत्ती उपलब्ध आहे तिचा पुरेपूर वापर करता येत नाही. परिणामी, मानवी भांडवल वाढीस चालना मिळत नाही.

**३) वित्तीय साधनांचा अकार्यक्षमतेने वापर :** भारतासारख्या अधिक लोकसंख्या असणाऱ्या देशात उपलब्ध मर्यादित वित्तीय साधनसामग्री मोठ्या प्रमाणात अकार्यक्षमपणे वापरली जाण्यारी शक्यता असते. परिणामी, आरोग्य सेवा, पौष्टिक अन्नधान्य पुरवठा, शिक्षण यावर तेथील वाढत्या लोकसंख्येमुळे प्रतिडोई खर्च कमी होत असल्याने मानवी भांडवल निर्मितीत अडथळा येतो.

**४) बुद्धिजीवी वर्गाचा विकसित देशाकडे ओढा :** भारतातील श्रीमंत वर्गातील मुले देशात उच्च शिक्षण

घेतल्यानंतर अमेरिका, कॅनडा अशा विकसित देशात उच्च नोकऱ्या मिळवून तेथेच स्थायिक होतात किंवा निवृत्तीनंतर आपल्या मायदेशी परत येतात. त्यांच्या शिक्षणावर कुटुंबाचा, शासनाचा अधिक खर्च होतो. परंतु त्यांच्याकडून मिळणाऱ्या सेवा भारतातील समाजाला मिळत नाहीत. मानवी भांडवल निर्मितीमध्ये अडथळे येतात.

**५) भांडवल निर्मिती कार्याचे स्वरूप :** भारताच्या दृष्टिने विचार करता वाढत्या लोकसंख्येमुळे बेकारीचे, अर्धबेकारीचे प्रमाण अधिक, निरक्षरतेचे प्रमाण अधिक, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, राहण्याचा प्रश्न अशा वस्तुस्थितीमुळे जनतेला गरजेनुसार अन्न, वस्त्र, निवारा आणि शिक्षण यांचा पुरवठा करून मानवी भांडवल निर्मिती करण्याच्या कार्याचे स्वरूप प्रचंड आहे. त्याप्रमाणात वित्तीय साधनसामग्री मर्यादित असल्याने मानवी भांडवल निर्मितीस अडथळे येतात.

अशा प्रकारच्या अडचणींवर मात करण्यासाठी पुढील मार्गांचा अवलंब केला जातो-

**१) लोकसंख्या नियंत्रित करणे :** विकसनशील अर्थव्यवस्थेतील लोकसंख्या वाढीचा वेग कमी करणे फार गरजेचे आहे. त्यामुळे उपलब्ध साधनसामग्री कमी श्रमिकावर खर्च केली जाईल आणि कामगारावरील खर्च वाढेल. अशा वाढत्या गुंतवणूकीमुळे मानवी भांडवल निर्मितीचा वेग वाढेल व आर्थिक विकास गतीमान होईल.

**२) श्रमशक्तीचे नियोजन :** भविष्यकालीन विकास दराच्या दृष्टिने नियोजन काळामध्ये तज्ज्ञ व्यक्तींच्या गरजेचा अभ्यास करून विविध क्षेत्रासाठी पुरवठा करता येईल अशा दृष्टिने शिक्षण आणि आधुनिक तांत्रिक ज्ञानाच्या क्षेत्रामध्ये नियोजन केल्यास व त्याची अंमलबजावणी केल्यास मानवी भांडवल निर्मितीत वाढ होईल.

**३) तांत्रिक सुधारणा :** अविकसित देशाने आधुनिक तांत्रिक ज्ञानाचा वापर केल्यास साधनसामग्रीचा पर्याप्त वापर होऊन उत्पादनात वाढ करता येते. यादृष्टिने शास्त्रीय, तांत्रिक व औद्योगिक क्षेत्रातील सुधारणांचा लाभ घेता येतो व मानवी भांडवल निर्मितीत वाढ होते.

**४) वित्तीय संस्थामध्ये वाढ :** अविकसित देशातील विकासाची प्रक्रिया गतीमान करण्यासाठी विविध तंत्राची आवश्यकता असते. त्यांचा सतत पुरवठा करण्यासाठी शैक्षणीक संस्था, संशोधन संस्था, वित्तीय संस्थांची स्थापना करणे याकडे शासनाने आणि खाजगी व्यक्तींनी लक्ष दिले पाहिजे. यातून मानवी भांडवल निर्मिती होऊन विकास प्रक्रियेस गती प्राप्ती होईल.

अशा उपाययोजनांची अंमलबजावणी प्रत्येक अविकसित देशातील वस्तुस्थितीवर कमी-अधिक प्रकर्षाने करण्यावर भर देणे गरजेचे आहे.

## ४.२.३ संस्थात्मक रचना आणि आर्थिक विकास :

**प्रास्ताविक :**

विकसनशील अर्थव्यवस्थेच्या दृष्टिने संस्थात्मक रचना आणि आर्थिक विकास यांचे महत्त्व अधिक आहे. भारतामध्ये संस्थात्मक रचनेकडे आर्थिक विकासाच्या दृष्टिकोणातून २० व्या शतकाच्या सुरवातीपासून लक्ष दिले

गेले. भारतासारख्या शेतीप्रधान अर्थव्यवस्थेची प्रगती होण्यासाठी संस्थात्मक पतपुरवठ्याला महत्त्व आहे. त्यामुळे अर्थव्यवस्थेतील जी प्रमुख क्षेत्रे उदाहरणार्थ शेती, उद्योग, वहातूक, दळणवळण, शिक्षण, आरोग्य, बँकिंग, इन्शूरन्स इत्यादी क्षेत्रे कार्यरत आहेत. अशा सर्व क्षेत्रांचा समतोल विकास साधण्यासाठी संस्थात्मक रचना महत्त्वाची ठरते. भारतातील शेतीसाठी पुरेसा भांडवल पुरवण्याचा प्रश्न महत्वाचा असल्याने एक संस्थात्मक मार्ग योग्य नसल्याने काही काळ बहुसंख्यात्मक मार्ग स्विकारला गेला. याही मार्गामध्ये काही अडथळे आल्याने संस्थात्मक रचनेमध्ये गुणात्मक पतपुरवठा करणाऱ्या संस्थांची रचना आर्थिक विकासात महत्त्वाची ठरते.

❊ सर्वसाधारणपणे अल्पमुदतीचे कार्य देणाऱ्या प्राथमिक सहकारी संस्था कार्यरत असतात.

❊ जिल्हा पातळीवरील अल्प मुदतीचे व मध्यम मुदतीचे कर्ज देणाऱ्या मध्यवर्ती सहकारी पतसंस्था किंवा बँका कार्यरत असतात.

❊ राज्य पातळीवरील राज्य सहकारी बँक म्हणजेच शिखर बँक.

अशा प्रकारे सहकारी पतसंस्थांची त्रिस्तरीय रचना असते. या संस्थाकडून अल्प मुदतीची कर्जे दिली जातात आणि प्रसंगी मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा केला जातो. याचा उपयोग छोट्या उद्योगांना, हस्तकलेच्या उद्योगांना, शेतीस पूरक उद्योगांना भांडवल उपलब्ध होते आणि त्याच्या सहाय्याने उत्पादन वाढीस मदत होवून आर्थिक विकास साध्य होत असतो.

याशिवाय दीर्घमुदतीचा कर्जपुरवठा हा पुढील संस्थाकडून होत असतो.

❊ प्राथमिक सहकारी भूविकास बँका.

❊ मध्यवर्ती सहकारी भूविकास बँका.

प्राथमिक भूविकास बँका या त्या-त्या राज्यातील मध्यवर्ती भूविकास बँकेशी संलग्न असतात. या शेती विकासासाठी दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा करतात.

जिल्हा मध्यवर्ती बँक तिच्याशी संलग्न असणाऱ्या प्राथमिक सहकारी पतसंस्थाच्या मार्फत गरजू व्यक्ती कर्जपुरवठा करत असतात.

राज्य सहकारी बँका-त्रिस्तरीय सहकारी वित्तपुरवठ्याच्या व्यूहरचनेनुसार कार्य करतात. रिझर्व्ह बँक राज्य सहकारी बँकेमार्फत शेती क्षेत्रात कर्ज पुरवठा करते. त्यामुळे शिखर बँक या भूमिकेतून राज्य सहकारी बँकेला आर्थिक विकासामध्ये महत्त्वाचे स्थान आहे.

**भूविकास बँक :**

दीर्घ काळात शेती विकासासाठी विशिष्ट प्रकारची विशेषत्वाने कार्य करणारी वित्तीय संस्था असावी या उद्देशाने भूविकास बँकेची स्थापना केली गेली. या बँकेकडून जमिनीच्या तारणावर ५ ते २० वर्षे मुदतीपर्यंत दीर्घकाळासाठी कर्ज दिले जाते. १९५०-५२ मध्ये भूविकास बँकाची संख्या २८६ होती. १९८५ अखेर त्यांची संख्या १८३० पर्यंत वाढली व १९५०-५१ मध्ये राज्य भूविकास बँकांची संख्या ५ होती १९८५ अखेर यांची

संख्या १९ पर्यंत वाढली. या संस्थांनी दिलेल्या एकूण कर्जापैकी ६०% कर्ज छोट्या सिंचन प्रकल्पासाठी दिले आहे व त्यानंतर शेतीच्या यांत्रिकीकरणासाठी कर्जपुरवठा केला जातो.

याप्रमाणे शेती विकासातून ग्रामीण विकास व ग्रामीण विकासातून आथ्कि विकासाच्या दृष्टिकोणातून या संस्था कार्यरत असतात.

**व्यापारी बँका व वित्तपुरवठा :**

१९६९ ला प्रमुख मोठ्या १४ बँकांचे राष्ट्रीयकरण केले. त्यानंतर ६ व्यापारी बँकांचे राष्ट्रीयकरण केले गेले. अशा एकूण २० राष्ट्रीयकृत बँका एकूण कर्जपुरवठ्यापैकी ६०% कर्ज पुरवठा करतात किंवा बँक व्यवसायामध्ये कार्यरत आहेत. त्यामुळे आर्थिक विकासास मदत होते.

**रिझर्व्ह बँक आणि नाबार्ड :**

देशाची मध्यवर्ती बँक या भूमिकेतून शेती, उद्योग, व्यापार यासाठी अल्प, मध्यम व दीर्घ मुदतीच्या कर्जपुरवठ्यास प्राधान्य दिल्याने संबंधित क्षेत्रातील विकासास चालना मिळाली. कालांतराने रिझर्व्ह बँकेच्या कार्याची व्याप्ती वाढल्याने १९८२ मध्ये नाबार्ड या संस्थेची स्थापना केली गेली आणि रिझर्व्ह बँकेची सर्व कामे या बँकेकडे सोपविण्यात आली. या संस्थेमार्फत शेती, लघूउद्योग, कुटीरोद्योग, हस्तोद्योग यांना गरजेनुसार कर्जपुरवठा केला जातो. त्यामुळे आर्थिक विकास कार्यात नाबार्डला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय विकास प्राधिकरणातून स्विकारलेल्या प्रकल्पासाठी नाबार्डला वित्तीय मदत दिली जाते. याबरोबरच अमेरिका, इंग्लंड, जर्मनी, स्वित्झर्लंड यांच्याकडून नाबार्डला १३३ कोटी रुपयांचा पतपुरवठा करण्यात आला. याआधारे, नाबार्डकडून राज्य सहकारी बँका आणि क्षेत्रिय ग्रामीण बँकांना कर्जपुरवठा केला जावू शकतो.

गोरवाला समितीने पतपुरवठ्याची पाहणी केल्यानंतर असा अहवाल सादर केला की, गरजेपेक्षा अधिक कर्जपुरवठा काही क्षेत्रात होतो हे टाळले पाहिजे आणि विकासात्मक कार्यासाठी कर्जपुरवठा झाला पाहिजे अशी शिफारस केली.

याचबरोबर आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रत्येक देशांच्या विकास कार्यास सहकार्य करणाऱ्या काही संस्था महत्त्वाचे कार्य करत आहेत. यामध्ये आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक. आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना यांचेही कार्य महत्त्वाचे ठरते.

एकूण आर्थिक विकासामध्ये संस्थात्मक भूमिका महत्त्वाची ठरते, अशा रचनेनुसार कार्य करत असताना विकासात काही अडथळे येतात. यामध्ये कायदेशीर व प्रशासकीय समस्या, रचनेसंबंधी समस्या, खर्च व नफा संबंधी समस्या अशा समस्येवर उपाययोजना करून दोष नाहिसे केले जातात. त्यामुळे विकास संस्थात्मक रचनेला अनन्यसाधारण महत्व आहे.

**४.२.४ आर्थिक विकासात सरकारची भूमिका :**

कोणत्याही अर्थव्यवस्थेचे प्रारंभिक स्वरूप व्यक्तिवादी होते. त्यातील अडचणीमुळे समूहवाद उदयास आला आणि समूहवादाचे रूपांतर भांडवल-वादामध्ये हळूवार पद्धतीने झाले. पुढे भांडवलवादाचेही दोष समोर आले. हे

दोष दूर करण्यासाठी सरकारी हस्तक्षेपाची गरज निर्माण झाली. सरकारी हस्तक्षेप आणि नियंत्रणाने आर्थिक नियोजनाला जन्म दिला. अलिकडे जगातील बहुतेक सर्वच राष्ट्रात आर्थिक नियोजनाचा स्विकार केलेला दिसून येतो. म्हणजेच सरकारी हस्तक्षेपातून राष्ट्राचा विकास साध्य करता येतो हे सर्वसामान्य झाले आहे.या पार्श्वभूमीवर सरकारची भूमिका पुढीलप्रमाणे अभ्यासता येईल.

**१) संस्थात्मक रचनेत बदल :** अविकसित देशातील संस्थात्मक रचनेवर धर्म आणि सांस्कृतिक भिन्नता या घटकांचा प्रभाव असतो. जातीव्यवस्था, एकत्र कुटुंब पद्धती, सामाजिक दृष्टीकोन, मूल्यपद्धती, परंपरा इ.ची घट्ट पकड असते. यात सुधारणा घडवून आर्थिक विकास गाठण्यासाठी सरकार महत्त्वाची भूमिका पार पाडते. आर्थिक विकासाबरोबर देशात विविध मार्गाने नवनवीन संधी निर्माण होतात. नवीन वस्तूंची निर्मिती होऊ लागते. प्रचलित वस्तूंचा खर्च कमी करणे, नवीन रस्ते, जलमार्ग, दळणवळण विषयक प्रगती व व्यापारविषयक प्रगती घडून येते. युद्ध किंवा भाववाढ यामुळे मागणीत वाढ होते, परदेशी पर्यटकांची संख्या वाढते, गुंतवणूक आणि व्यापाराच्या संधी वाढतात, यामुळे संस्थात्मक संरचनेत सुधारणा घडून येतात. सरकारच्या पुढाकाराने सामाजिक सुधारणांना चालना मिळते. जमिनीचा वापर आणि शिक्षणाच्या क्षेत्रात बदल घडून येतात. कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित केल्याने आर्थिक वाढीला चालना मिळते.

**२) संघटनात्मक बदल :** संघटनात्मक बदल हा आर्थिक विकासातील आणखी एक महत्त्वाचा घटक आहे. यामध्ये देशातील बाजारपेठेच्या आकारात वाढ घडवून आणणे आणि श्रमबाजाराचे संघटन करणे यांचा समावेश होतो. अविकसित देशात केवळ सरकार पुढाकार घेवून हे घडवून आणते. कृषी आणि औद्योगिक क्षेत्रात वाढ घडवून आणण्यासाठी सरकार विविध वित्तीय संस्थांचे संघटन व विकास घडवून आणते. उदा. सहकारी बँका, भूतारण बँक, औद्योगिक बँका, वित्त आणि गुंतवणूक महामंडळ इ. श्रम बाजाराच्या विकासासाठी कामगार संघटनांची उभारणी करण्यास सरकार मदत करते, ज्यामुळे कामाचे तास, वेतनाचे दर, यंत्रसामग्रीची स्थापना, श्रम तंट्याचे निवारण तसेच सामाजिक सुरक्षिततेच्या योजना इत्यादीची सोय होते. कामगार आणि मालक वर्ग यांच्यातील कार्यात्मक संबंधाची निश्चिती करणे सोपे जाते. परिणामत: श्रमिकांची कार्यक्षमता सुधारण्यास मदत होऊन उत्पादनवाढ आणि उत्पादनखर्चात घट घडून येण्यास मदत होते.

अप्रगत देशात श्रमिकांची गतिशिलता कमी असते. बहुतेक श्रमिक ग्रामीण भाागतच राहतात. शेतीमध्ये मोठ्या प्रमाणावर छुपी बेरोजगारी असते. ग्रामीण भागातील श्रमिकांना रोजगार संधीच्या माहितीचा अभाव असतो. तर सरकार ग्रामीण भागात रोजगार विषयक माहिती केंद्र व शहरी भागात रोजगार विनिमय केंद्राची उभारणी करते. ज्यामुळे ग्रामीण श्रमिकांची गतीशिलता वाढते. ग्रामीण भागातून शहरात होणाऱ्या श्रमिकांच्या स्थलांतरामुळे नागरीकरणाच्या समस्या निर्माण होतात. त्या सोडविण्यासाठी सरकारला पुढाकार घ्यावा लागतो. शहरीकरणामुळे निवास, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, वीज पुरवठा, झोपडपट्टी, वाहतूक व दळणवळण इ. समस्या निर्माण होतात. यासाठी गृहनिर्माण संस्थाची निर्मिती, शाळा, कॉलेजेस, दवाखाने, नागरी वाहतूक सेवा, पिण्याच्या पाण्याची सोय, वीज पुरवठा इत्यादी सोयी सरकार पुरविते. यामुळे देशात संघटनात्मक बदल घडून येतात. व आर्थिक विकास होतो.

**३) सामाजिक आणि आर्थिक वरकड सोई :** अविकसीत देशात सामाजिक व आर्थिक वरकड सोयींची

पूर्तता सरकार करते. राष्ट्राच्या भविष्यकालीन विकासासाठी रेल्वे, रस्ते, वाहतूक, दळणवळण, गॅस, विद्युत आणि पाणीपुरवठा इत्यादी मुलभूत सेवांची गरज असते. या सेवांच्या पूर्ततेसाठी खूप मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतवणूकीची गरज असते. ती देशातील खाजगी उद्योजकांच्या कुवतीपेक्षा अधिक असते. इतकेच नव्हे तर त्या क्षेत्रातील गुंतवणूक तुलनेत धोकादायक असते. तसेच त्याचा फलधारणा कालावधी जास्त असणारा असतो. त्यामुळे अशाप्रकारच्या वरकड सोयींची निर्मिती करण्याची जबाबदारी सरकार पार पाडते.

सामाजिक व आर्थिक वरकड सोयी निर्माण करण्यासाठी सरकार नियोजनपूर्वक योजना बनविते. या सोयी देतांना प्राधान्यक्रम ठरविले जातात. जर पाणीपुरवठ्याची सोय अत्यावश्यक असेल तर त्याच्या पूर्ततेसाठी नदीवरील मोठ्या जलसंधारण प्रकल्पाऐवजी लघु पाटबंधारे प्रकल्प उभे केले जातात. सरकार जलसंधारण प्रकल्पांसाठी नियोजन करते व गुंतवणूकीसाठी पैसा पुरविते. भारतासारख्या खंडप्राय देशांत रेल्वे, विमान आणि दळणवळण सेवा सरकारी मालकीच्या व सरकारकडून नियंत्रित केल्या जातात.

**४) कृषीविकास :** अप्रगत देशात शेती हा प्रमुख व्यवसाय असतो. राष्ट्रीय उत्पन्नात शेती क्षेत्राचा निम्म्याहून अधिक वाटा असतो. तरीसुद्धा कृषीला स्थित्यंतराची अवस्था असते. राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा शेतीक्षेत्रात गुंतलेल्या लोकांशी तुलना करता खूपच कमी असतो. उदा. भारतातील जवळपास ७०% लोक शेतीक्षेत्रात काम करतात. पण प्रत्यक्षात राष्ट्रीय उत्पन्नात ५०% पेक्षा कमी हिस्सा या क्षेत्रातून मिळतो. याची मुलभूत कारणे म्हणजे शेतीची अल्प उत्पादकता, अल्पधारण क्षेत्र, जमिनीचे विभाजन व तुकडीकरण, खंडाचे अधिक दर, कर्जबाजारीपणा अपुरा पतपुरवठा, पाणी पुरवठ्याच्या अपुऱ्या सोयी, पावसावरील अवलंबित्व, उत्पादनाच्या अयोग्य पद्धतीचा वापर आणि शेतीवरील अतिरिक्त लोकांचा भार इत्यादी होय.

अप्रगत देशातील बहुसंख्य शेतकरी गरीब, निरक्षर व अज्ञानी असतात. ते असंघटित असतात. अनेक परंपरेचा पगडा त्यांच्या जगण्यावर दिसून येतो. कृषी विकासासाठी त्यांना पुरेशा प्रेरणा मिळत नाहीत. अशावेळी भू-सुधारणा व कृषी विकासाचे नियोजन करण्याची जबाबदारी सरकारवर पडते. अर्थात कृषीविकासाच्या नियोजनाचे यश कृषी उत्पादकतेतील वाढीवर अवलंबून असते. वाढीव कृषी उत्पादनाची आवश्यकता उद्योगांना कच्चा माल पुरविणे, अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्णता प्राप्त करणे, देशांतर्गत किंमती पातळीत स्थैर्य प्रस्थापित करणे, देशातील वापरात असलेली व न वापरली गेलेली मानवी साधन सामग्री कार्यक्षमपणे वापरणे इत्यादीसाठी आवश्यक असतो. थोडक्यात अप्रगत राष्ट्रात कृषीविकासासाठी सरकारची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते.

**औद्योगिक विकास :** देशातील औद्यागिकरणास मदत करणे हे एक महत्त्वपूर्ण कार्य सरकार पार पाडते. अप्रगत देशात नैसर्गिक संसाधने अविकसित किंवा अल्पविकसित असतात. विशेषत: ज्या देशावर परकीयांचे नियंत्रण होते अशा देशातील नैसर्गिक संसाधनांचे परकीयांकडून निर्दयीपणे शोषण करण्यात आले. त्यामुळे परकीय खाजगी उद्योगांकडे नैसर्गिक संसाधने वापरणेस देणे देशहिताच्या दृष्टीने धोकादायक ठरते.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर अशा देशातील खाणी व मळे इत्यादीचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. देशातील नैसर्गिक संसाधनांचे सर्वेक्षण करून त्यांच्या शोषणविरोधी व विकासासाठी योग्य योजना आखण्यात याव्यात. संसाधनांचा

अधिक फायदेशीर उपयोग करून घेणाऱ्या उद्योगांची उभारणी करावी. अप्रगत देशातील खाजगी क्षेत्रातील लोक प्राथमिक गरजा भागविणाऱ्या वस्तूंच्या उत्पादनात गुंतलेले असतात. परंतु आर्थिक विकासाचा प्रवेग वाढविण्यासाठी मुलभूत उद्योगांची निर्मिती होणे आवश्यक असते. उदा. लोह व पोलाद, अवजड उद्योग, अभियांत्रिकी, रसायने, खते, यंत्राचे सूटे भाग निर्मिती इत्यादींची आवश्यकता असते. अशा उद्योगांना प्रचंड भांडवल लागते. शिवाय त्याचा फलधारणा कालावधी खूप मोठा असतो. खाजगी क्षेत्रातील उद्योग यामुळे अशा क्षेत्रात येण्यास उत्सुक नसतात. म्हणून अशा उद्योगांची निर्मिती करण्याची जबाबदारी सरकार पार पाडते.

**६) मौद्रिक व राजकोषीय धोरण :** सरकार देशाच्या विकासासाठी पोषक मौद्रिक व राजकोषीय धोरण स्विकारते. अप्रगत राष्ट्रातील सामाजिक, संस्थात्मक आणि आर्थिक क्षेत्रातील अडथळे दूर करण्यासाठी योग्य मौद्रिक व राजकोषीय धोरणाचा अवलंब केला जातो. देशाच्या मध्यवर्ती बँकेच्या सहाय्याने सरकार मौद्रिक धोरणाची आखणी व अंमलबजावणी करते. ज्यामुळे बाजारातील पतपैशाच्या पुरवठ्यावर नियंत्रण प्रस्थापित करता येते. परिणामी भाववाढीवर नियंत्रण मिळविणे व राष्ट्राच्या व्यवहार तोलात संतूलन प्रस्थापित करणे शक्य होते.

अप्रगत देशात सरकारकडून राजकोषीय धोरणाचा वापर करून विकासाबरोबर निर्माण झालेल्या उत्पन्न आणि संपत्तीतील विषमता कमी करण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे अंतर्गत बाजारपेठा विस्तारतात, अनावश्यक आयात कमी होते. बचत आणि गुंतवणूकीचे एकूण आकारमान वाढते. इत्यादी सर्वांसाठी सरकारकडून कर व अंदाजपत्रक नीती आणि सार्वजनिक कर्जधोरण इत्यादी साधनांचा वापर केला जतो.

**७) विदेशी व्यापारात वाढ :** अविकसित राष्ट्रे ही विदेशी व्यापारावर आधारली असतात. तथापी, या देशांच्या विदेशी व्यापारांचा आकार आणि मूल्य विचारात घेता तो खूपच लहान असतो. ही राष्ट्रे सामान्यत: प्राथमिक वस्तूंची निर्यात मोठ्या प्रमाणावर करतात. उदा. कच्ची खनिजे, कृषी उत्पादन इत्यादी तर औद्योगिक उपभोग्य वस्तू व भांडवली वस्तूंची आयात करतात. अप्रगत राष्ट्रातून केल्या जाणाऱ्या निर्यात वस्तूपेक्षा आयात वस्तू अधिक महाग असतात. परिणामी आयात मूल्य निर्यात मूल्यापेक्षा अधिक होऊन व्यवहार शेष प्रतिकूल बनतो. व्यवहारशेषातील असमतोलाचा प्रश्न केवळ सरकारच सोडवू शकते.

थोडक्यात अविकसित राष्ट्रांचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी आणि विकसित राष्ट्रात आर्थिक वाढ घडवून आणण्यासाठी सरकारला महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागते. अलिकडील काळात समाजवादी अर्थव्यवस्थेबरोबरच भांडवलशाही अर्थव्यवस्थेतही सरकार आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका पार पाडते आहे.

## ४.३ सारांश :

कोणत्याही राष्ट्राच्या आर्थिक विकासासाठी साधनसंपत्ती ही अत्यावश्यक असते. साधनसंपत्तीमध्ये भौतिक भांडवल व मानवी भांडवल यांचा प्रामुख्याने समावेश होतो. हे भांडवल गुणात्मक असणे आवश्यक असते. त्यादृष्टीने आर्थिक विकासासाठी भांडवलनिर्मिती ही अत्यंत महत्त्वाची ठरते. भविष्यकाळात उपाभोग्य वस्तूंचे उत्पादन अधिक वाढविण्यासाठी वर्तमान काळात समाजाकडे सध्या उपलब्ध असलेल्या साधनसामग्रीपैकी काही भागाचा वापर

भांडवली वस्तू वाढीसाठी करण्याची प्रक्रिया म्हणजे भांडवलनिर्मिती होय. भांडवलामध्ये विविध प्रकारची यंत्रसामग्री, तसेच उच्च शिक्षण, आरोग्य व संशोधन या बाबींचादेखील समावेश होतो.

भांडवल निर्मितीच्या प्रक्रियेत सरकार हा अत्यंत महत्त्वाचा संस्थात्मक घटक असतो. सरकारची विविध क्षेत्राविषयीची धोरणे व सहभाग हा भांडवल निर्मितीवर परिणाम करणारा घटक असतो. आर्थिक विकासाला दिशा देण्याचे काम शासन करीत असते.

## ४.४ पारिभाषिक शब्द :

**१) भांडवलनिर्मिती :** देशातील उत्पादन शक्तीचा काही भाग उपभोगासाठी न वापरता उत्पादन साधनाच्या निर्मितीसाठी वापरणे.

**२) अंतर्गत स्त्रोत :** देशांतर्गत मार्ग

**३) बहिर्गत स्त्रोत :** बहिर्गत मार्ग

**४) चलनूल्य :** पैशाचे मूल्य

## ४.५ स्वयं अध्ययन प्रश्न :

**खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.**

१. मनुष्यनिर्मित उत्पादनाचा एक घटक म्हणजे .............. होय.
(अ) भांडवल (ब) वनस्पती (क) हवा (ड) पाणी

२. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत .............. ची गरज असते.
(अ) साधनसामग्री (ब) सरकारी हस्तक्षेप (क) भांडवल (ड) वरील सर्व

३. .............. राष्ट्रात भांडवलनिर्मितीचा दर अल्प असतो.
(अ) विकसित (ब) अल्पविकसित (क) आशियातील (ड) यापैकी नाही

४. भांडवलनिर्मितीसाठी .............. ची आवश्यकता असते.
(अ) उत्पादन (ब) बचत (क) तंत्रज्ञान (ड) वरील सर्व

## ४.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

१. (अ), २. (ड), ३. (ब) ४. (ड)

## ४.७ सरावासाठी स्वाध्याय :

**(अ) टीपा लिहा.**

१. भांडवलनिर्मिती
२. आर्थिक विकास
३. मानवी भांडवल

**(ब) दीर्घोत्तरी प्रश्न :**

१. भांडवलनिर्मिती व आर्थिक विकासातील संबंध स्पष्ट करा.
२. मानवी भांडवलनिर्मिती व आर्थिक विकास यातील संबंध विशद करा.
३. आर्थिक विकासातील शासनाची भूमिका स्पष्ट करा.
४. संस्थात्मक रचना व आर्थिक विकास यातील संबंध स्पष्ट करा.

## ४.८ संदर्भ ग्रंथ :


1) Misra & Puri (2010) Growth & Development

2) Thingan M.C. (2005) The Economics of Development and Planning (Vrinda Publication)

3) श्रीधर देशपांडे, विनायक देशपांडे ''भारतीय अर्थव्यवस्था (संक्रमण आणि विकास)

4) श्रीधर देशपांडे, कविमंडण ''भारतीय अर्थव्यवस्था (संक्रमण आणि विकास)

## घटक १

# आर्थिक नियोजनाची ओळख

अनुक्रमणिका


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

  १.२.१ आर्थिक नियोजनाचा अर्थ आणि गरज
  १.२.२ आर्थिक नियोजनाचे प्रकार
  १.२.३ नियोजनाच्या यशस्वीतेसाठी आवश्यक अटी

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द

१.५ स्वयं अध्ययन प्रश्न

१.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.७ क्षेत्रीय कार्य

१.८ अधिक वाचनासाठी संदर्भ


### १.० उद्दिष्ट्ये

आर्थिक नियोजनांची ओळख या घटकाचा अभ्यास केल्यामुळे आपणास पुढील बाबी साध्य होतील.

- आर्थिक नियोजनाचे स्वरूप लक्षात येईल.
- आर्थिक नियोजनाचा अर्थ, व्याख्या, गरज व प्रकार समजावून घेता येईल.
- भारतातील आर्थिक नियोजन थोडक्यात समजून घेता येईल.

## १.१ प्रस्ताविक :

नियोजन हा आजच्या युगाचा मूलमंत्र आहे. सध्याच्या काळात विविध आर्थिक समस्या सोडविण्यासाठी नियोजन हा एक रामबाण उपाय समजला जातो. पहिल्या महायुद्धानंतर सोव्हिएत रशिटाने १९२८ पासून आर्थिक नियोजनाचा स्वीकार करून अल्पावधीत आपली आर्थिक प्रगती घडवून आणली. त्याने जगातील राष्ट्रे प्रभावित झाली. समाजवादी राष्ट्रामध्ये असणाऱ्या आर्थिक नियोजनासारखे नियोजन भांडवलशाही राष्ट्रामध्ये नसले तरी विशिष्ट उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अति प्रगत अशा भांडवलशाही राष्ट्रामध्ये सुद्धा सध्या सहकार आर्थिक व्यवहारावर नियंत्रणे लढते हे नाकारता येत नाही.

नियोजनाची संकल्पना फार जुनी ओ. प्लेटोने २४०० वर्षापूर्वीच त्याची स्पष्टपणे मांडणी केली होती.

आर्थिक काळात आर्थिक नियोजन या संकल्पनेने अर्थशास्त्रज्ञांचे, राज्यकर्त्यांचे व सर्वसामान्य लोकांचे लक्ष वेधून घेतले आहे. आर्थिक नियोजन हे आर्थिक समस्या सोडविण्याचे महत्त्वाचे साधन समजले जाते. त्यामुळे नियोजन हे आर्थिक धोरणांचे महत्त्वाचे अंग, एक प्रभावी उपाय म्हणून सर्वच देशात मान्यता पावले आहे. आर्थिक विकासाचे स्वप्न साकार करण्यासाठी आर्थिक नियोजन हे एक प्रभावी साधन आहे. वेगवेगळ्या अर्थव्यवस्थामध्ये नियोजनाचे स्वरूप, व्याप्ती, उद्दिष्टे व त्याची अंमलबजावणी यात फरक असू शकतो. हॉबीन्सनच्या मते, नियोजनाचा अवलंबू नेहमीच केला जातो. नियोजनाचा अवलंब करावा किंवा नाही हा महत्त्वाचा प्रश्न नसून त्यातील कोणत्या प्रकारचा स्वीकार करावा एवढाच प्रश्न असतो. ("We have always planned and the question is not whether to plan or not to plan, but choose between different types of plan" - Robbins)

दारिद्र्य निर्मूलन ह अविकसित राष्ट्रासमोली सर्वात मोठा प्रश्न आहे. संपूर्ण समाजाचा सक्रिय सहभाग प्राप्त करून विशिष्ट कालखंडात सर्वसामान्यांच्या आर्थिक जीवनात लक्षणीय सुधारणा घडवितो व त्यासाठी जलद आर्थिक विकास प्रक्रिया सुरू करून ती सातत्याने गतिमान ठेवणे हा सध्या शासनाचा मूलभूत कार्याचा एक महत्त्वाचा घटक झाला आहे.

अल्पविकसित व विकसनशील राष्ट्रांच्या समस्या सोडविण्यासाठी अनेक बाजूंनी प्रयत्न होणे आवश्यक असते. एका क्षेत्रातील प्रगतीसाठी इतर क्षेत्रामध्ये प्रगती होणेही आवश्यक असते. उदा. शेती विकासासाठी आधुनिक यंत्र-तंत्राचा वापर करावयाचा असल्यास विकसित औद्योगिक क्षेत्र, हवे, वाढीस संघटनशक्ती हवी, शिक्षण प्रसार हवा. विविध क्षेत्रातील ही परस्पर संबद्धता हे विकसनशील अर्थव्यवस्थेचे ठळक वैशिष्ट्य होय.

याशिवाय, विकसनशील अर्थव्यवस्था ही द्विविध स्वरूपाची (Dual economy) असते. निर्यात उत्पादन क्षेत्र विकसित असते तर अन्य मोठा भाग मागासलेला असतो. निर्यात क्षेत्रातील नफा परदेशी जातो. विकासाच्या प्रेरणा दुर्बल असतात व अर्थव्यवस्था एका निष्क्रीय बिंदूवर (dead centre) अडकलेली असते. म्हणून विकासाची प्रक्रिया सुरू होणेच केवळ पुरेसे नाही, तर तिचा किमान वेग कायम राहणेही आवश्यक असते. व हे काम सरकारवरच सोपविणे जास्त योग्य ठरते.

आधुनिक काळात अर्थव्यवस्थांचे वर्गीकरण भांडवलाशाही (capitalist) व समाजवादी अर्थव्यवस्था (Social-

ist economics) असे करण्यात येते. भांडवलशाहीमध्ये, संरक्षण, वाहतूक इ. महत्त्वाचे घटक सहकार चालविते. इतर क्षेत्रे खाजगी संघटकल्याणी मुक्त असतात.

समाजवादी अर्थव्यवस्थांची वाढ ही विसाव्या शतकातील घटना आहे. समाजवादी अर्थव्यवस्थेत समाजाचे हित व उद्दिष्ट नजरेसमोर ठेऊन सहकाराचा हस्तक्षेप मोठ्या प्रमाणात होतो. अशा अर्थव्यवस्थेत किल्पाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आर्थिक नियोजन (Economic planning) हे प्रमुख साधन असते. समाजवादात नियोजनाचे अस्तित्व इतके आवश्यक झाले आहे की, समाजवादाचे एक नवीन रूप म्हणूनच नियोजनाचा उल्लेख केला जातो.

विशेषतः दुसऱ्या महायुद्धानंतर समाजवाद व नियोजनाचा जास्त प्रत्यय झाला. कमी जास्त प्रमाणात प्रत्येक अर्थव्यवस्था नियोजनाचा अवलंब करते. स्थैर्य, पुनर्रचना व पूर्ण रोजगारासाठी अर्थव्यवस्थेच्या अनियंत्रित कार्यपद्धतीत शासकीय हस्तक्षेप करण्यास मान्यता मिळाली आहे. रशियन नियोजन व भांडवलशाही देशातील शासकीय हस्तदोषाचे धोरण यांच्या यशामुळे आर्थिक विकासासाठी केंद्रीय नियोजन हा विचार आपोआप महत्त्वाचा ठरला आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतर अनेक आशिया आफ्रिकन व दक्षिण अमेरिकन राष्ट्रे स्वतंत्र झाली. तिथे वाढते दारिद्र्य, वेगाने वाढणारी लोकसंख्या, छुपी बेकारी, मागास शेती व औद्योगिकरणाचा अभाव यासारख्या अेनक समस्या होत्या. त्या सोडविण्यासाठी आवश्यक तो सैद्धांतिक व अनुभवजन्य असा मार्ग आर्थिक नियोजनाच्या माध्यमातून अनेक समस्या होत्या. त्या सोडविण्यासाठी आवश्यक तो सैद्धांतिक व अनुभवजन्य असा मार्ग आर्थिक नियोजनाच्या माध्यमातून अनेक देशांना उपलब्ध झाला आहे.

दारिद्र्य निर्मूलन, बेकारीचे उच्चाटन जलद औद्योगिकीकरण, शेती विकास, समतोलीत प्रादेशिक विकास, आर्थिक समता, लष्करी समस्यांची वाढ, आर्थिक स्थैर्य व सर्वसामान्यांच्या राहणीमानात जलद वाढ ही आर्थिक नियोजनाची प्रमुख उद्दिष्टे ठरली.

## १.२ विषय विवेचन :

सदरच्या घटकात आर्थिक नियोजन, अर्थ, व्याख्या, प्रकार, गरज व मित्र अर्थव्यवस्थेतील आर्थिक नियोजन यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

### १.२.१ आर्थिक नियोजनाचा अर्थ :

नियोजनाच्या आवश्यकतेबद्दल अर्थशास्त्रज्ञानाचे मतैक्य आहे. परंतु त्यांच्या अर्थाबद्दल व स्वरूपाविषयी फार मोठे मतभेद आहेत. नियोजनांची संकल्पना स्पष्ट करताना त्यांच्या अत्यंत व्यापक अर्थापासून अत्यंत संकुचित अर्थापर्यंत अनेक अर्थ सांगितले जातात.

वेगवेगळ्या देशामध्ये निरनिराळ्या प्रकारचे आर्थिक नियोजन अवलंबिले जाते असले तरी त्याच्या अर्थाबाबत अर्थतज्ञामध्ये एकमत आढळत नाही.

व्यापक अर्थाने सर्व प्रकारचा सहकारी हस्तदोष म्हणजे नियोजन असे मानणे हेही बरोबर नाही. कारण हा अर्थ

स्वीकारल्यास, सरकारची मवाळ नीतीसुद्धा नियोजन होईल व इंग्लंड, अमेरिका अशा मुक्त अर्थव्यवस्था नियोजित अर्थव्यवस्था होतील. भांडवलशाहीमध्ये सुद्धा महत्त्वाच्या क्षेत्रातील खाजगी प्रेरनांना वाव दिला तरी सरकारला सामान्य दिशा दिग्दर्शन करावेच लागते. कंमतीचा सामान्य सर (Price level) स्थिर ठेवण्यासाठी सरकारला उपाय योजावे लागतात. याचा अर्थ असा नव्हे की, मुक्त अर्थव्यवस्थांनाही नियोजन अर्थ व्यवस्था म्हणता येईल. उलट, बाल्डवीनने म्हटल्याप्रमाणे मुक्त अर्थव्यवस्था व नियोजन यात दोन ध्रुवाइतके आंतर आहे.

मायत्मित्सच्या (Mises) मते, समाजवाद व नियोजन या दोहोमध्ये फरक केल्यास ती केवळ बौद्धिक दिशाभूल होईल. त्यांच्या मते, 'समाजवाद व नियोजन यांची मूलभूत तत्त्वे समान आहेत. वरील विचारही स्वीकारता येत नाही.

एफ . हायेक (F. A. Hayek) यांच्या मते, संकुचित अर्थाने मर्यादित समाजवाद व मर्यादित नियोजन करणे शक्य आहे. अनेकदा नियोजनतंत्र असेही वापरले जाऊ शकते. की ज्या उद्दिष्टांचा समाजवादाच्या नैतिक उद्दिष्टांशी कांहीही संबंध नाही. मॉरीस डॉब, हॉटे यांचेही असेच मत आहे. तात्पर्य, समाजवाद व नियोजन हे समान नव्हते. नियोजनाला भांडवलशाहीपेक्षा समाजवाद अधिक जवळचा असेल एवढेच.

नियोजनात सार्वजनिक क्षेत्रासाठी व खाजगी क्षेत्रासाठी कांही लक्ष्ये ठणवून दिली जातात. भांडवलशाही देशात कांही वेळा असे धोरण आढळले जाते. यावेळी सरकारकडून संपूर्ण अर्थव्यवस्थेचा विचार केला जात नाही. म्हणून याला क्षेत्रीय नियोजन असे म्हणता येईल.

तसेच मध्यवर्ती नियोजन मंडळाकडून संपूर्ण अर्थव्यवस्थेसाठी काही लक्ष्ये निश्चित केली जातात. विविध शाखासाठी साधनसामग्रीचे वितरण केले जाते व ठराविक कालावधीत ही लक्ष्ये पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो. भारतात असे नियोजन अवलंबिले आहे.

आणखी असे की, सरकार पूर्व नियोजन उद्दिष्टे ठरविते व ती पूर्ण करण्याची जबाबदारी खाजगी उपक्रमावर सोपविली जाते. यामध्ये सरकारी निर्बंध व नियंत्रणाचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. (लेविस यांनी 'The Principles of Ecnomic Planning' या पुस्तकात नियोजन ह्या संकल्पनेचा अर्थ सहा प्रकारे स्पष्ट केला आहे.)

## आर्थिक नियोजनाची व्याख्या :

नियोजनाच्या विविध व्याख्या पाहण्यापूर्वी एकत्र मुद्देसूद व्याख्या करण्यामध्ये पुढीलप्रमाणे अडचणी येतात.

**१) संख्यात्मक** (Institutional) : आर्तिक संख्यांची संरचना व साधन साम्रगीची मालकी कोणाकडे आहे. याबाबत वेगवेगळ्या देशात भिन्नता आढळून येते. रशीयामध्ये सर्वच साधनसामग्री सरकारच्या मालकीची व संपूर्ण अर्थव्यवहारांचे नियंणि नियोजन मंडळामार्फत शासनाकडून होते. तर पश्चिम जर्मनीमध्ये बहुतांश सर्व उत्पादन सामग्री खाजगी मालकीची असते व तेथे नियोजनाचा अवलंब किमान होतो. फ्रान्स, इंग्लंडमध्ये खाजगी आर्थिक निर्णयाना योग्य दिशा देण्यासाठी नियोजन वापरले जाते. याउलट भारतासारख्या अनेक देशांनी संमिश्र अर्थव्यवस्था स्विकारली जाते.

देशातील उत्पादन साधनांच्या मालकीनुसार नियोजनाच्या स्वरूपात व आशयात फरक पडतो. थोडक्यात भांडवलशाही, समाजवाद व साम्यवाद ह्या अर्थव्यवस्थांमध्ये नियोजनाचा अवलंब ज्या पद्धतीने व ज्या प्रमाणात केला जातो. त्यामुळे नियोजनाचा अर्थ व व्याख्या याबद्दल मतभेद निर्माण हाते.

**२) विकासाची पातळी** (Developmental level) : दरडोई उत्पन्न व गुंतवणूक-उत्पन्न प्रमाण यावरून विविध देशांचे विकसित, अर्थविकसित व विकसनशील असे वर्गीकरण केले जाते. विकासाच्या पातळीवरील या फरकामुळे नियोजनाच्या प्रक्रियेत व उद्दिष्टांत फरक दिसून येतात.

उत्पन्न पातळी अतिशय कमी असलेल्या अविकसित देशात प्रारंभी रस्ते, वीज, पाणी, वाहतूक, दळणवळण यामध्ये गुंतवणूकीला प्राधान्य दिले जाईल. तर विकासाच्या वरच्या पातळीवर असलेल्या देशामध्ये मूलभूत उद्योगधंदे, कुटुंबनियोजन याला प्राधान्य मिळेल. विकसित देशात गुंतवणूकीला विशेष महत्त्व नसते तर उपभोगपातळी वाढवणेव तांत्रिक प्रगती यावर भर दिला जातो.

**३) साहित्य व व्यवहार :** विविध देशामध्ये नियोजनाचे उद्दिष्ट, तंत्र, पद्धती, व्याप्ती तांत्रिक काढल्य व ज्ञान इत्यादीमध्ये फरक पडल्यामुळे नियाजेनाच्या प्रकारामध्ये फरक पडतो. याशिवाय नियोजनाची संकल्पना ही बौद्धिक व व्यावहारिक पातळीवर अलिकडेच अस्तित्वात आलेली कल्पना आहे.

मार्क्सचे बहुतेक लिखाण भांडवलशाहीतील विसंगती दर्शविण्यामध्येच खर्ची पडते. १९१७ च्या राज्यक्रांतीनंतर रशियामध्ये नियोजनाचा अवलंब केला. त्यानंतर एफ. ए. हायेक यांनी ''गुलामगिरीकडचा रस्ता'' अशा शब्दात नियोजनावर टीका केली. त्यानंतर मात्र साधारणत: १९३० पासून शास्त्रीय नियोजनाची चर्चा सुरू झाली.

व्यवहारात नियोजनाचा अवलंब करण्यात येऊन सुमारे ८० वर्षे झाली. रशियामध्ये १९२९ पासून तर अनेक देशांनी दुसऱ्या महायुद्धानंतर नियोजन अवलंबिले. समाजवादी देशानी १९४५ नंतर तट समाजवादाचा स्वीकार न केल्याने राष्ट्रीय १९५० पासून नियोजन स्विकारल्याचे दिसते. नियोजन हे आर्थिक धोरणाचा एक भाग म्हणून स्वीकारल्यानंतर अल्पकाळात नियोजनाच्या विविध देशात अवलंबिलेल्या आढळतात.

- **आर्थिक नियोजनाच्या व्याख्या :**

१) मिसेस बार्बल वूटन, ''आर्थिक नियोजन ही पद्धत आहे जेथे एक वेगळी प्रणाली किंवा व्यवस्था आणण्याच्या उद्देशाने बाजारयंत्रणेत जाणीवपूर्वक बदल केले जातात. त्या बदलांच्या अभावी स्वयंपूर्ण कृतिद्वारे ही प्रणाली वेगळीच निश्चित झाली असते.

२) प्रो. हर्मन लेव्ही, ''मागणी व पुरवठ्यातील संतुलन स्वप्रेरित अदृश्य व नियंणिबाहेरील अशा घटकाद्वारे साध्य होऊ देण्यऐवजी उत्पादन किंवा विभाजन अथवा दोन्हींने जाणीव व विचारपूर्वक नियंत्रण करून संतुलन साध्य होऊ देणे म्हणजे आर्थिक नियोजन होय.''

३) डॉ. डाल्टन, ''व्यापक अर्थाने नियोजन म्हणजे पूर्व निश्चित उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी आर्थिक क्रियाना देशातील संसाधनावर ताबा असणाऱ्या व्यक्तींनी मुद्दाम दिशा देणे होय.''

४) प्रो. लॉबिन्स, ''कल्याणकारी राज्याचे उद्दिष्ट साध्य करण्याचे एक साधन म्हणजे आर्थिक नियोजन.''

५) डिकीन्सन, ''संपूर्ण अर्थव्यवस्थेचा सर्वव्यापारी पाहणीच्या आधारावर विविध प्रश्नाबाबत प्रमुख निर्णय (प्रस्थापित सत्तेने जाणीवपूर्वक) घेणे म्हणजे आर्थिक नियोजन.''

६) प्रा. हायेक, ''मध्यवर्ती सत्तेने अर्थव्यवस्थेतील उत्पादन प्रक्रियेला दिशा देणे.''

७) डॉ. हॅरिस, ''नियोजन म्हणजे उत्पन्न तसेच मूल्याच्या संदर्भात अधिकाऱ्याद्वारे निश्चित केलेल्या उद्दिष्टासाठी साधनाचे वितरण करणे होय.''

८) एफ. झ्वीग (Zwieg) , ''नियोजन हे शहरांचे सार्वजनिक कामांचे किंवा राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेच्या वेगवेगळ्या विभागांचे फक्त नसते, तर ते संपूर्ण अर्थव्यवस्थेचे असते.''

९) ऑस्कर लॉज, ''समाजासमोरील आर्थिक नियमांची वागणूक व समाजाच्या आर्थिक प्रगतीची दिशा मानवी इच्छेनुसार ठरविणे म्हणजे नियोजन होय.''

१०) भारतीय नियोजन मंडळ, ''निश्चित केलेल्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी देशातील साधनसामग्रीची जुळवाजुळव करून महत्तम सामाजिक हिताच्या दृष्टीने त्यांचा वापर करण्यासाठी स्वीकारण्यात आलेला मार्ग म्हणजे आर्थिक नियोजन होय.

वरील व्याख्याच्या आधारे आपणास असे म्हणता येईल की, कल्याणकारी राज्याचे अंतिम उद्दिष्ट साध्य करताना संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या आर्थिक विकासाची निश्चित काळात हमी देणारी देशातील लेक व सामाजिकदृष्ट्या जबाबदार सत्ता यामधील सतत चालणारा सहकारी प्रयत्न म्हणजे आर्थिक नियोजन.

या व्याख्येमध्ये, इतराशी दुर्लक्षलेल्या परंतु अतिशय महत्त्वाच्या अशा गोष्टीचा उल्लेख केलेला आहे. ती म्हणजे लोकांचे सहकार्य लोकांचे खऱ्या अर्थाने सहकार्य असल्याशिवाय नियोजन काय पण कोणतेही धोरण यशस्वी होऊ शकत नाही. काळाच्या विशिष्ट मर्यादेचे आर्थिक विकास व कल्याणकारी राज्याच्या स्थापनेचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी शासनसंख्या व लोक या दोहोंच्या सहकार्याने आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत सातत्य ठेवणे आवश्यक आहे.

वरील विवेचनावरून नियोजनाचे स्वरूप, लक्षणे किंवा वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) नियोजन हे जाणीवपूर्वक विशिष्ट हेतूने ठराविक उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी केलेले असते.

२) आर्थिक नियोजनाची कार्यवाही करण्यासाठी एक मध्यवर्ती सत्ता / शासनसंस्था असते. ती विविध आर्थिक हितसंबंधामध्ये समन्वय साधते.

३) नियोजन यंत्रणेला देशातील मर्यादित साधनसंपत्तीची पूर्ण माहिती असावी लागते. जास्तीत जास्त समाजहित साध्य होईल अशा पद्धतीने उपलब्ध दुर्मिळ साधनसामुग्रीचे विविध उपयोग पर्याप्त वाटप करावे लागते.

४) नियोजन प्रक्रियेत निवडीला महत्त्व असून महत्तम कल्याण साधनांच्या दृष्टीने आर्थिक व्यवहाराची निवड केली जाते.

५) आर्थिक नियोजनामध्ये संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांचा समावेश केलेला असतो.

६) व्यक्तिगत उत्पादनसंख्या व प्रादेशिक योजना तसेच देशातील सर्व उद्योगधंदे समन्वय साधावा लागतो.

७) नियोजनात कोणत्या साधनाचा वापर कोणत्या वस्तू उत्पादनासाठी करावयाचा, उत्पादन कोणी, कोठे, किती व कोणत्या पद्धतीने करावयाचे इत्यादी बाबी निश्चित केल्या असतात.

८) उत्पादनाबरोबरच उत्पादनाचे वापरही कोणामध्ये, कसे करावयचे हे नियोजनात ठणविले जाते.

९) उत्पादन व विभाजन यावर नियंत्रण ठेऊन मागणी पुरवण्याचा समतोल निमाण करावा लागतो. विशिष्ट कालावधीत महत्तम सामाजिक हित साधावयाचे असते.

१०) नियोजनात योजनेची आखणी व अंमलबजावणी करणे हे काम सरकारला करावे लागते. तरीही नियोजनाच्या यशस्वीतेसाठी लोकांचा सहभाग अपेक्षित असतो. तसेच नियोजन आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत सातत्य राहणे महत्त्वाचे असते.

सामान्यत: नियोजन अर्थव्यवस्थेचे नियंत्रणे आणि निर्बंध हे खास वैशिष्ट्य असते. निश्चित उद्दिष्टे ठराविक काळात साध्य करण्यासाठी नियोजनकाराना संपूर्ण अर्थव्यवस्थेची कल्पना असणे आवश्यक असते. नैसर्गिक साधनसामग्री, राष्ट्रीय उत्पन्न, पूर्ण रोजगार इत्यादींची माहिती तसेच आर्थिक प्रयत्नांवर त्यांचे नियंत्रण असावे लागते. नियोजनात काही उद्दिष्टे (Objectives) व लक्ष्ये (Target) वटवावी लागतात. शिवाय ती वास्तव असावी लागतात. उदा. दारिद्र्य निर्मूलन, लोकांचे राहणीमान वाढ अशी उद्दिष्ट्ये आणि अन्नधान्य उत्पादन पातळी वाढ, दरडोई उत्पन्न वाढ अशी लक्ष्ये ठरविली जातात. नियोजनाच्या यशस्वितेसाठी उपभोकत्याच्या सार्वभौमत्वावर मर्यादा पडतात. किंमती नियंत्रित होतात. उद्योग व्यवसायांच्या केंद्रीकरणावर नियंत्रण घातले जाते. अविकसित भागांचा विकास होण्यासाठी औद्योगिक विकेंद्रीकरणावर भर दिला जातो.

नियोजित अर्थव्यवस्थेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे सार्वजनिक क्षेत्राचे वाढते महत्त्व लोखंड, पोलाद, कोळस, विद्युत, पाणीपुरवठा इत्यादी अवजड व मूलभूत उद्योगांचा विकास सार्वजनिक क्षेत्रात करावा लागतो. कारण यामध्ये प्रचंड गुंतवणूक, की नफा व अधिक अनिश्चितता असलेने खाजगी उद्योजक येत नाहीत. परंतु आर्थिक विकासाला गती देण्यासाठी त्यांची नितांत आवश्यकता असलेने सहकारला त्यामध्ये पुढाकार घ्यावा लागतो.

तसेच मक्तेदारी नियंत्रण, सार्वजनिक सेवांची उपलब्धता, आर्थिक विषमता, घट, रोजगार वाढ, आर्थिक स्थैर्य, व्यापारचक्रांचे नियंत्रण, साधनसामग्रीचा पर्याप्त वापर इत्यादी हेतू नियोजनाद्वारे साध्य करण्याचा प्रयत्न केला जातो. अर्थातच नियोजनाच्या यशस्वितेसाठी लोकांचे स्वयंस्फूर्त सहकार्य आवश्यक असते.

## आर्थिक नियोजनाची गरज :

विकसनशील अर्थव्यवस्थेचा विकासाच्या मार्गात अनेकविध अडथळे असतात. पण विकासासाठी मार्ग कोणता निवडावा याबाबत मतभेद दिसून येतात. त्यामुळेच नियोजनाची गरज स्पष्ट करावी लागते.

भांडवलशाही अर्थव्यवस्थामध्ये नियोजन जवळवास नसतेच. बाजारयंत्रणेचा (Market mechanism) घटकांना तेथे पूर्ण वाव असतो. तेथे मुक्त अर्थव्यवस्थेचे तत्त्व प्रभावी असून सहकारी हस्तदोष अत्यंत महत्त्वाच्या व थोड्या क्षेत्रापुरतेच मर्यादित असते. भांडवलशाहीमुळे अर्थव्यवस्थेमध्ये असलेले दोष दूर करण्यासाठी साधन म्हणून नियोजनाकडे पाहिले जाते. केवळ सैद्धांतिक नव्हे तर व्यावहारीक दृष्टीनेही नियोजनतंत्र यशस्वी ठरले आहे. नवीन स्वतंत्र झालेल्या अनेक देशांनी नियोजन तंत्र अवलंबिले व ते विकासाच्या मार्गावर आहेत. हे तंत्र पूर्ण निर्दोष नाही तरीसुद्धा विकसनशील देशात नियोजनाला पर्याय नाही असेच म्हणावे लागते. ही अपरिहार्यता पुढील मुद्याद्वारे स्पष्ट करता येईल.

**१) मुक्त अर्थव्यवस्तेचे दोष दूर करणे :** मुक्त अर्थव्यवस्थेत बाजारयंत्रणा प्रभावी असते. उत्पादन वाटणी इत्यादी क्षेत्रात आवश्यक ती दिशा दिली जाऊ शकत नाही. व्यापारचक्रांचा (Trade cycle) प्रभाव मुख्यत: मुक्त अर्थव्यवस्थेतच जास्त दिसतो. अर्थव्यवस्थेचे भवितव्य तेजीमंदीच्या चक्राबरोबर दोलामान राहते. १९२९-३४ च्या जागतिक मंदीने (Great depression) ब्रिटन, अमेरिका इत्यादी प्रगत भांडवलशाही राष्ट्रे अडचणीत सापडतील. याच काळात मात्र साम्यवादी देशात नियोजनामुळे विशेष प्रतिकूल परिणाम झाले नाहीत. कार्यक्षमता व समता या दोन्ही दृष्टीनी बाजार यंत्रणेवर मर्याता पडतात. म्हणूनच आर्थिक नियोजनाची गरज भासते. तसेच आर्थिक मागासलेपणा घालवण्यासाठी तिसऱ्या जागतीक राष्ट्रांना नियोजन आवश्यक वाटते. केवळ बाजारपेठेवर अवलंबून राहून बेकारीची समस्या सोडविणे विकसनशील राष्ट्रांना कठीन बनत आहे. त्यामुळे नियोजनाचा आधार घ्यावा लागतो. श्री. डी. आर. गाडगीळ यांच्या मते, ‘आर्थिक विकासासाठी नियोजन म्हणजे नियोजन मंडळाकडून आर्थिक व्यवहाराचे नियंत्रण किंवा त्यांना दिशादर्शन देणे होय. बाजारयंत्रणा सुधारून समर्थ बनविणे. सार्वत्रिक बेकारी व छुपी बेकारी नष्ट करणे, उद्योगाबरोबर शेती विकास करणे आणि दारिद्र्य निर्मूलन यासाठी विकसनशील देशामध्ये आर्थिक नियोजनाचा अवलंब करावा लागतो.

**२) गरजेनुसार उत्पादन व किंमत स्थैर्य :** भांडवलशाहीत उत्पादनविषयक निर्णय खाजगी संघटक स्वतंत्रपणे घेतात. जास्तीत जास्त नफा प्राप्ती हेच एकमेव उद्दिष्ट असते. परिणामी अनेक उत्पादक तेच उत्पादन करतील व मागणीपेक्षा पुरवठा वाढून किंमती घसरतील याउलट एखादी वस्तू समाजाच्या दृष्टीने महत्त्वाची असूनही फायदा कमी असलेने उत्पादन कमी होईल व किंमती वाढतील. थोडक्यात खाजगी संघटकांच्या नफा हेतूमुळे उत्पादन व किंमतीमध्ये वाढ होत राहिल व त्याचा प्रतिकूल परिणाम अर्थव्यवस्थेवर झाल्याशिवाय राहणार नाही.

नियोजीत अर्थव्यवस्थेत मात्र ही वाढ (उच्चावचने) नियंत्रणाद्वारे, प्रयत्नपूर्वक टाळली जातात. विशिष्ट वस्तूंचे उत्पादन नफ्यापेक्षा तिची गरज विचारात घेऊन केले जाते. त्यामुळे मागणी-पुरवठ्यात अवाजवी तफावत राहत नाही. दोन्ही घटक संतुलीत राहून किंमत पातळीत स्थैर्य निर्माण हाते. यादृष्टीने नियोजनाची गरज आहे. अनावश्यक उच्चावचने टाळण्यासाठी सध्या भांडवलशाही देशात सुद्धा सहकारी हस्तदोष वाढला आहे.

**३) नैसर्गिक संसाधनांचा उचित वापर :** अनियोजित अर्थव्यवस्थेत संघटक बरेचदा नफा प्राप्तीसाठी नैसर्गिक संपत्तीचा गैरवापर करतात. दुर्मिळ खनिज द्रव्ये निर्यात केली जातात. विकासाच्या प्राथमिक अवस्थेत ती विशेष आवश्यक नसली तरी नंतर त्यांची तीव्र गरज भासते. अशावेळी जादा दराने आयात करावी लागते. यासाठी द्रव्यांच्या साठ्याचा विकास व वापर याबाबत योजनाबद्ध कार्यक्रम हवा. यादृष्टीने नियोजन महत्त्वपूर्ण ठरते.

**४) दूरदृष्टीचा वापर :** खाजगी संघटकामध्ये सहसा दूरदृष्टीचा अभाव आढळतो. त्यांचे अल्पकालीन व्यक्तिगत स्वार्थाचे निर्णय दीर्घकाळात संपूर्ण अर्थव्यवस्थेसाठी मारक ठरू शकतात. उदा. अल्पकालीन लाभ राहून भूमीमध्ये पिक प्रकार घेतले जातात. . मात्र भूमीची उत्पादकता टिकविण्यासाठी पिकपालट (Rotation of Crops) केला जात नाही. परिणामी उत्पादकता व उत्पादन दोन्हीही कमी होते. इतर घटकाबाबतही खरे आहे. नियोजनामध्ये घटकांचा योग्य वापर होऊ शकतो.

**५) समान संधी :** नियोजीत अर्थव्यवस्थेत विकासाचे कार्य सोपविलेली सत्ता सर्वांना पुरेशा प्रेरणा व संधी उपलब्ध करून देते. त्यामुळे प्रत्येकाला प्रगतीची संधी मिळते. याउलट श्रमिक मालक संबंधात श्रमिकाना प्रगतीची संधी मिळण्याची आशा नसते. श्रमातून हेणाऱ्या उत्पादनाचा फायदा सतत भांडवलदाराना मिळतो.

**६) आर्थिक समता :** श्रमिकांच्या श्रमावर श्रीमंत झालेले भांडवलदार अधिकच श्रीमंत होतात. तर गरीब श्रमिकांची परिस्थिती जास्तच खालावत जाते. वस्तूत: उत्पादनात श्रमिकांचा हिस्सा जास्त असतो. परंतू तो त्यांना मिळत नाही. यासाठी नियोजनाची गरज भास्ते.

प्रो. गुनार मिर्डालच्या मते. ''विकसित अर्थव्यवस्थेत आर्थिक विषमता कमी आढळते. तर, अविकसित अर्थव्यवस्थेत ती जास्त असते. या वस्तूस्थितीचा संबंध नियाजनापेक्षा विकसाच्या अवस्थेशी (Stage of economic development) जोडणे जास्त योग्य होईल.

**७) सामाजीक लाभ :** नैसर्गिक साधनसंपत्ती ही सामाजिक संपत्ती असते. आर्थिक समतेच्या दृष्टीने तिचा लाभ सर्वांन मिळायला हवा. नियोजित अर्थव्यवस्थेमध्ये मध्यवर्ती सत्तेच्या निर्णायक भूमिकेमुळे हा लाभ संपूर्ण समाजाला मिळू शकतो. उदा. जेव्हा खाजगी बसेस खाजगी मालकीच्या होत्या तेव्हा प्रवासांची गैरसोय होतीच. शिवाय आर्थिक फायदा खाजगी मालकांनाच होत होता. मात्र राज्य परिवहनाच्या बसेस सुरू झाल्यानंतर प्रवाशांची सोयही झाली व मिळणारा लाभ सरकारला आणि पर्यायाने लोकांना मिळू लागला.

नियोजनामुळे आर्थिक विकास होत असताना त्यात सातत्य राहण्याचीही शक्यता जास्त असते. नियोजन ही आजच्या काळात मुख्यत: विकसनशील देशांची गरज झाली आहे. नियोजनामुळेच आर्थिक विकास जलद गतीने होऊ शकतो. भांडवलशाही देशातही नियोजनाचा अवलंब मर्यादित प्रमाणात होतोच. अमेरिकेतील टेनेसी व्हॅली प्रोजेक्ट हे उदाहरण देता येईल. थोडक्यता पूर्णपणे अनियोजित अर्थव्यवस्ता आज कोणतीच नाही. फक्त नियोजनाच्या व्याप्तीत काय तो फरक आहे.

नियोजीत अर्थव्यवस्थेचेही दोन प्रकार होतात. साम्यवाद राष्ट्रामध्ये नियोजन अतिव्यापक असते. तर लोकशाही समाजवादामध्ये नियोजनाची व्याप्ती कमी असते. भांडवलशाही समाजवादामध्ये यांच्या तंत्राचा सुवर्णमध्य लोकशाही

समाजवादात साधला जातो. भारतीय अर्थव्यवस्था हे या पद्धतीचे उदाहरण होय.

साम्यवादी अर्थव्यवस्थेमध्ये मध्यवर्ती सत्तेचे अतिशय कडक नियंत्रण असते. म्हणूनच चीन व भारत जवळपास एकाच वेळी विकास मार्गावर निघाले. परंतु चीन आज प्रबळ जागतीक शक्ती मानली जाते. चीनचे आर्थिक तुटकपणाचे धोरण (Policy of Economic isolation) स्विकारलेशिवाय नियोजनाच्या वैशिष्ट्यपूर्ण तंत्रामुळे भांडवलनिर्मिती सारख्या महत्त्वाच्या अटी लवकर पूर्ण झाल्या.

खरेतर आर्थिक विकास हा सर्वांगीण विकासाचा केवळ एक भाग आहे. साम्यवादी नियोजन तंत्राने आर्थिक विकास वेगाने होतो. परंतु ते परिपूर्ण नसते. राष्ट्रातील व्यक्तीचा सर्वांगीण विकास म्हणजे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक दृष्टीनेही प्रगत होणे होय.

वाजवीकरण आणि नियोजन (Rationalization and Planning) या संकल्पनात बरेच साम्य आहे. दोहोमध्येही हस्तदोष अभिप्रेत आहे. प्रो. इ. ए. जी. रॉबीन्सनच्या मते, वाजवीकरण म्हणजे एखाद्या धंद्याच्या कारभारात, तो हस्तदोष विरहीत असताना त्याचे जे स्वरूप असेल ते बदलून नवीन स्वरूप आणणे व महत्तम उत्पादनाचे फायदे मिळवून देणे यासाठी केलेला हस्तदोष होय. हा हस्तदोष केवळ त्या धंद्यापुरताच मर्यादित असतो. वाजवीकरणाद्वारे त्या धंद्यात उपलब्ध असलेल्या साधनामध्ये उचित एकसुत्रीकरण (Coordination) आणले जाते. जेव्हा संपूर्ण अर्थव्यवस्थेतील उपलब्ध संसाधनामध्ये एकसुत्रीकरण आणण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला जातो. तेव्हा ते नियोजन असते. म्हणजेच नियोजनाची कल्पना अधिक व्यापक आहे.

केवळ व्याप्तीचाच फरक असेल तर अर्थव्यवस्तेच्या विविध क्षेत्रामध्ये वाजवीकरण का करू नये हा प्रश्न उपस्थित होतो. मात्र त्यामध्ये अडचण अशी की, अनेक धंद्याचा संबंध येतो तेव्हा विविध धंद्यात तयार केलेल्या योजना समान रितीने कार्यान्वीत होतीलच असे नाही. जरी त्यांचे उद्दिष्ट समान असले तरी एकसुत्रीपणाच्या अभावी त्यांच्यात विरोधच निर्माण होईल. नियोजन तंत्राने हा विरोध कमी करून विविध योजनामध्ये समन्वय साधून संपूर्ण अर्थव्यवस्थेचा विकास साध्य होऊ शकतो.

### १.२.२ आर्थिक नियोजनाचे प्रकार :

प्रा. हॉबिन्स यांनी आपल्या Economic Planning and International order या पुस्तकात विवेचन केल्याप्रमाणे आज जगातील सर्वच राष्ट्रापुढे नियोजन असावे की, असू नये हा प्रश्न राहिला नसून कोणत्या प्रकारचे नियोजन असावे एवढाच निवडीचा प्रश्न आहे. आर्थिक विकासासाठी नियोजन आवश्यक आहे हे बहुतेक राष्ट्रांनी मान्य केले आहे. सध्या कल्याणकारी राज्यात आर्थिक क्षेत्रात हस्तदोष हा अनिवार्य समजला जातो.

नियोजनासंबंधीच्या सैद्धांतिक विवेचनात नियोजनाच्या विविध प्रकारांची चर्चा केलेली दिसते. विकासाच्या मार्गातील विविध अडथळे दूर करण्यासाठी आर्थिक नियोजनाचा अवलंब केला जातो. नियोजनाचा एखादा विशिष्ट प्रकार सर्व देशात स्वीकारला जाणे शक्य नाही. नियोजनाचा कालखंड, भौगोलिक क्षेत्र, नियोजनाची उद्दिष्टे, नियोजनाची यंत्रणा, नियोजनाचे तंत्र व पद्धती इत्यादीमुळे नियोजनाचे विविध प्रकारात वर्गीकरण केले जाते. नियोजनाचा एखादा विशिष्ट प्रकार सर्वच देशात स्वीकारला जाणे शक्य नाही. एवढेच नव्हे तर एखाद्या अर्थव्यवस्थेत विशिष्ट प्रकारचाच

अवलंब केला आहे असे दर्शविणे अवघड होते. उदा. भारतीय अर्थव्यवस्थेतील नियोजनाचा उल्लेख लोकशाही नियोजन, मिश्र अर्थव्यवस्तेतील नियोजन, रचनात्मक नियोजन असा करता येईल.

आर्थिक नियोजनाचे प्रकार पुढीलप्रमाणे -

**१) आदेशात्मक व उत्तेजनाद्वारे नियोजन** (Planning by Direction and Inducement) :

प्रा. लेविसच्या मते, नियोजित अर्थव्यवस्थेत नैसर्गिक साधनसामग्री व मानवी संपत्ती नियोजन आयोगाने ठरवून दिलेल्या अग्रक्रमानुसार निरनिराळ्या उत्पादनक्षेत्राकडे वळविण्याच्या दोन पद्धती म्हणजे आदेशाद्वारे व उत्तेजनाद्वारे नियोजन होय.''

**अ) आदेशाद्वारे नियोजन :** या नियोजनात सरकारी नियंत्रणे बहुधा कडक, व्यापक व मोठ्या प्रमाणात असतात. हे पूर्णत: केंद्रिभूत नियोजन असून संपूर्ण अर्थव्यवस्थेवर व सर्व उत्पादन साधनावर मध्यवर्ती सत्तेची मालकी व सर्वकष नियंत्रण असते. राष्ट्राच्या गरजा लक्षात घेऊन विशेष अग्रक्रमाने अशा उत्पादन साधनांचा नियोजन मंडळ वापर करते. पूर्ण मालकी असलेने उत्पादनाला योग्य दिशा देणे सरकारला शक्य होते. रशियातील आर्थिक नियोजन हे यांचे चांगले उदाहरण होय.

मध्यवर्ती सत्ता नियोजनाचे सर्व कार्यक्रम ठरविते व सक्तीने त्यांची कार्यवाही केली जाते. शेती उद्योग, वाहतूक, दळणवळण, चलन व बँकींग इत्यादी सर्व क्षेत्रावर सरकारचे नियंत्रण असते. त्यामुळे समाजाला आवश्यक असणाऱ्या वस्तू व सेवांचे उत्पादन करणे व त्यांचे प्रमाण ठरविणे शक्य होते. डॉ. ऑस्कर लंजे, यांच्या मते या पद्धतीत मध्यवर्ती सरकारला मोठी सत्ता मिळते व ठरविलेली उद्दिष्टे सहजतेने पूर्ण करता येतात.

प्रा. अलक घोष यांच्यामते, भारतातील पहिल्या तीन पंचवार्षिक योजनांच्या काळात आर्थिक नियोजन बऱ्याच प्रमाणात आदेशात्मक स्वरूपाचे होते. परंतू भारतात लोकशाही असल्याने कोणत्याही बाबतीत अतिरेकी सक्ती झाली नाही.

- **आदेशात्मक नियोजनाचे प्रमुख दोष :**

१) या नियोजनात सत्तेच्या केंद्रीकरणास व नोकरशाहीला मोठा वाव मिळतो.

२) सक्तीच्या नियंत्रणामुळे उपभोकत्यांच्या सार्वभौमत्वावर अनेक मर्यादा येतात. प्रा. हायेक यांनी, 'Road to Serfdom' या पुस्तकात असे मत मांडले आहे की, 'आदेशात्मक नियोजनात व्यक्तीजीवनाच्या सर्व क्षेत्रावर नियंत्रण येते, हा एका अर्थाने गुलामगिरीचा मार्गच मानावा लागेल.

३) अर्थव्यवस्था ही गुंतागुंतीची असल्याने आदेशात्मक नियोजन हे नेहमी असमाधानकारक असते. एखाद्या वस्तूचे उत्पादनवाढीचे निर्णय घेताना त्यासाठी सुटे भाग करण्याचाही निर्णय घ्यावा लागतो. उत्पादन उद्दिष्टे ठरविणे व त्यात परिस्थितीनुसार बदल करणे अत्यंत कठीण असते. प्रा. लेविसच्या मते या नियोजनात काही वस्तूंचे उत्पादन गरजेपेक्षा जास्त तर काही वस्तूंची टंचाई निर्माण होते.

४) आदेशात्मक नियोजन बहुधा ताठर/अलवचिक असते. नियोजनात ठरलेल्या कार्यक्रमात गरजेनुसार बदल करता येत नाही.

५) प्रो. लेविसच्याम ते, या नियोजनात प्रमाणित उत्पादनास फार महत्त्व दिले जाते. त्यामुळे उत्पादनात विविधता येत नाही, समाधानात वाढ होत नाही व आंतरराष्ट्रीय व्यापारातही अडथळे येतात.

६) हे नियोजन अत्यंत महागडे / खर्चिक असते. संख्या शास्त्रज्ञ, अर्थतज्ञ, कुशल व प्रशिक्षित कामगार वर्ग तसेच सर्व्हेक्षणे व आकडेवारी जमविण्यासाठी व त्यांच्या विश्लेणासाठी प्रचंड पैसा खर्च करावा लागतो.

७) सर्व कारभार सरकारच्या हाती केंद्रित झाल्याने खोटी आकडेवारी व अहवाल देऊन लोकांची फसवणूक होण्याची / केली जाण्याची शक्यता असते.

८) नियोजनाच्या कोणत्याही पातळीत किंचित जरी चूक झाली तरी तिचे दुष्परिणाम संपूर्ण अर्थव्यवस्थेला भोगावे लागतात.

प्रो. लेविसच्या मते, मध्यवर्ती सवेचे नियंत्रण अधिक होईल तसे ती यंत्रणा गुंतवणूकीची होते व कार्यक्षम नियंत्रण ठेवणे कठीण बनते. असे अनेक दोष आढळले तरी रशियाचा अनुभव लक्षात (काही काळापुरता) घेता आर्थिक विकासाला दर वाढविण्यासाठी आदेशात्मक नियोजन हे अत्यंत परिणामकारक तंत्र आहे हे मान्य करावे लागेल.

**ब) प्रेरित किंवा उत्तेजनाद्वारे नियोजन** (Planning by inducemnet) :

उत्तेजनाद्वारे नियोजन हे लोकशाही नियोजन आहे. यात शक्ती नसते पण लोकांचे मन वळविले जाते. उत्पादन, उपभोग व व्यवसाय-धंदा निवडीचे स्वातंत्र्य लोकांना असते. नियोजनाची अपेक्षित उद्दिष्टे साध्य करण्यासाठी उत्पादकांना व उपभोकत्यांना आर्थिक व बिगर आर्थिक प्रेरणा दिल्या जातात.

स्पर्धात्मक बाजारयंत्रणा (किंमत यंत्रणा) अधिक कार्यवाहीत आणली जाते. आवश्यक त्या वस्तू उत्पादनात उत्पादकाला मदतही दिली जाते. एखाद्या वस्तूंची टंचाई वाढत असेल तर सरकार तिची किंमत नियंत्रत करते. शिवाय तिचे वापर नियंत्रित पद्धतीद्वारे (Rationing) केले जाऊ शकते. भांडवल निर्मिती वाढीसाठी सरकार मोठी गुंतवणूक करेल किंवा खाजगी गुंतवणूकीस प्रातेसाहन दिले जाईल. नियोजन योग्य आर्थिक व कर धोरण आखून गुंतवणूक प्रेरणावाढ व उपभोग मर्यादाही निर्माण केली जाऊ शकेल.

अनेक तज्ञांच्या मते, व्यक्तिस्वातंत्र्यावर फार मर्यादा न आणता प्रेरित नियोजनाद्वारे आदेशात्मक नियोजनाइतकी उद्दिष्टे साध्य करता येतात. मात्र प्रेरित नियोजनात पुढील काही दोष आढळतात. त्यामुळे हे नियोजन आदेशात्मक नियोजनाइतके परिणामकारक व यशस्वी होऊ शकत नाही.

- **प्रेरित नियोजनाचे दोष / उणिवा / समस्या :**

१) उत्पादकानी व उपभोकत्यांनी ज्या पद्धतीने वागावे अशी शासनाची अपेक्षा असते व त्यासाठी ज्या आर्थिक प्रेरणा दिल्या जातात त्या गरजेच्या मानाने नेहमीच अपुरे पडतात. परिणामत: नियोजनाची उद्दिष्टे योग्य प्रकारे व योग्य प्रमाणात साध्य केली जात नाहीत.

२) बाजारयंत्रणेच्या वापरामुळे काही वेळा मागणी पुरवठा असमतोल होऊन काही वस्तूंची टंचाई तर कांही वस्तूंचे अतिरिक्त उत्पादन अशी अवस्था होते. यावेळी आवश्यक वस्तूंची टंचाई होऊन त्याबाबत किंमत नियंत्रण व नियंत्रित वाटप पद्धतीचा वापर शासन करते ही दोन्हीही आदेशात्मक नियोजनाची लक्षणे आहेत. परिणामत: प्रेरित नियोजनाचे रुपांतर क्रमश: आदेशात्मक नियोजनामध्ये होऊ लागते.

३) आर्थिक व वित्तीय उपाययोजना ही भांडवल निर्मितीच दर वाढविण्यास अपुरी पडते. अविकसित राष्ट्रांत लोकांचे उत्पन्न व बचत कमी असल्यामुळे भांडवलनिमितीच्या गटात वाढ करता येत नाही. कित्येकदा लोक आपली बचत अनुत्पादक कारणासाठी खर्च करतात. अशा परिस्थितीत आदेशात्मक नियोजन अधिक परिणामकारक व यशस्वी होते.

एखाद्या देशाने या दोहोपैकी कोणत्या नियोजनाचा स्वीकार करावा हे त्या देशातील शासन संस्थेच्या पद्धतीवर अवलंबून राहील. समाजवादी / साम्यवादी देशात आदेशात्मक नियोजन योग्य व शक्य होईल. याउलट भांडवलशाही देशात प्रेरित नियोजनाचा वापर सोयीस्कर व आवश्यक ठरेल.

वस्तूत: नियोजनाच्या या दोन पद्धती पूर्णत: स्पर्धक (विरोधी) आहेत असे नाही. तर ती परस्परपरक अशी दोन तंत्रे आहेत. अविकसित देशात त्या दोहोंचा कमी अधिक प्रमाणात वापर करणे फायदेशीर व व्यवहार्य ठरते. आर्थिक विकासासाठी एकटे शासन अपुरे पडते म्हणूनच शासनाच्या सर्वसाधारण नियंत्रण व मार्गदर्शनाखाली खाजगी क्षेत्राचाही वापर करणे आवश्यक ठरते. मिश्र अर्थव्यवस्थेत दोन्ही पद्धतींचा योग्य त्या प्रमाणात वापर करणे हे जलद आर्थिक विकासास आवश्यक ठरते. भारताने गरजेनुसार या दोहोंचा वापर केला आहे.

**२) वित्तीय नियोजन व भौतिव नियोजन** (Financial planning and Physical Planning) :

भौतिक आणि वित्तीय नियोजन हे एकाच प्रक्रियेचे दोन पैलू आहेत. ही दोन तंत्रे परस्पर पर्यायी नसून कोणत्याही योजनेत भौतिक व वित्तीय बाजू विचारात घ्याव्या लागतात.

**अ) भौतिक किंवा वस्तूनिष्ट, वास्तव नियोजन :** देशातील श्रमशक्ती, जमिन, यंत्रसामग्री, खनिजे ही साधनसामग्री किती आहे व तिचा गुणवत्ता कार्यक्षमता कशा प्रकारची आहे याचा विचार करून विविध क्षेत्रात ठरविलेली भौतिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी केलेली योजना म्हणजे भौतिक नियोजन होय.

भारतीय नियोजनकारांच्या मते, उत्पन्न व रोजगारवाढीसाठी होत असलेल्या विकास-प्रयत्नांचे परिणाम उत्पादनांच्या घटकांची विभागणी वस्तूंचे उत्पादन या रुपाने मांडण्याचा प्रयत्न म्हणजे भौतिक नियोजन होय (दुसरी योजना)

भौतिक नियाजनात पुढील निर्णयांचा समावेश होतो. i) शेती, उद्योग व अन्य क्षेत्रा वस्तू व सेवांचे किती उत्पादन करणे आवश्यक आहे ? ii) प्रत्येक उत्पादनासाठी आवश्यक तो कच्चा माल, श्रम यंत्रे इत्यादी घटक किती लागतील ? iii) हे आवश्यक घटक कशा रितीने उलब्ध होणार आहेत हे निर्णय वस्तूंच्या रूपात घ्यायचे असतात. शिवाय त्याचा अल्पकालीन, दिर्घकालीन उद्दिष्टांची पार्श्वभूमी असते. यामुळे रोजगारपातळी किती वाढेल, उत्पादनात किती भर पडेल, गुंतवणूक पातळी कशी राहील वगैरे घटकांचा विचार करावा लागतो.

शेती, उद्योग, राजगार, उत्पन्न, उपभोग, गुंतवणूक अशा सर्व क्षेत्रासाठी भौतिक प्रमाण (hysical quantities) ठरविली जातात. अर्थातच या विविध उद्दिष्टांत परस्पर समतोल साधने आवश्यक असते. प्रा. मॉरिस डॉब यांच्या मते, भौतिक नियोज नम्हणजे अर्थव्यवस्थेतील प्रमुख वस्तुंच्या उत्पादनाचा व वाटपाचा एकत्रित आराखडाच असतो. रशियामध्ये सर्व क्षेत्रासंबंधी अद्यावत आकडेवारी उपलब्ध असल्यामुळे रशियाला भौतिक नियोजन शक्य होते.

विकसनशील देशात भौतिक नियोजनाबाबत पुढील अडचणी / मर्यादा पडतात.

i) **योग्य माहितीचा अभाव :** विकसनशील देशात उपलब्ध साधन-सामग्री बद्दल योग्य माहिती व आकडेवारी मिळणे कठीण असते. माहिती अपूर्ण व चुकीची असेल तर सर्व अंदाज चुकीचे ठरून नियोजन अयशस्वी होते.

ii) **अनिश्चित संघटकांचा परिणाम :** विकसनशील देशात तांत्रिक प्रगती कमी असते. त्यामुळे भौतिक उद्दिष्टे साध्य करण्यात अडचणी येतात. निसर्गाच्या अवकृपेमुळे शेती उत्पादन कमी होणे, वीज तुटवड्यामुळे औद्योगिक उत्पादन घटणे, मर्यादित वाहतूक क्षमता इत्यादी घटक अडचणीचे ठरतात.

iii) भौतिक नियोजनात विविध क्षेत्रामध्ये समतोल साधणे आवश्यक असते. परंतु विविध नैसर्गिक तांत्रिक व रचनात्मक अडचणीमुळे ते किचकट ठरते.

iv) भौतिक उद्दिष्टामध्ये कमतरता निर्माण झाल्यास भाववाढ होते. अशी भाववाढ ही विकास प्रक्रियेला मारक ठरते.

v) भौतिक नियोजनाला वित्तीय नियोजनाची योग्य जोड नसल्यास नियोजनाची यशस्वीता धोक्यात येते.

थोडक्यात, भौतिक नियोजन व वित्तीय नियोजन या दोहोंचा योग्य मेळ घालणे आवश्यक असते.

**ब) वित्तीय नियोजन :**

''नियोजनाची उद्दिष्टे पैशातील खर्चाच्या स्वरूपात मांडली जातात. तेव्हा त्याला वित्तीय नियोजन म्हणतात.'' वित्तीय म्हणजे भांडवल हे आर्थिक नियोजनाचे महत्त्वाचे साधन होय. भांडवल भरपूर प्रमाणात उपलब्ध असले तर नियोजनाची भौतिक लक्ष्ये साध्य करणे शक्य होते. अशा प्रकारच्या नियोजनात पैशाच्या स्वरूपात उत्पादन, विभाजन, उत्पादनाची लक्ष्ये, गुंतवणूक इत्यादी बाबी लक्षात घेतल्या जातात. भौतिक साधनात साधनसामग्रीचे नियोजन करतात तर त्याने पैशात रूपांतर केल्यास त्याला वित्तीय नियोजन म्हणतात.

विविध वस्तूकरिता असणारी मागणी व वस्तूंचा पुरवठा या दोहोत समतोल राखणे हे वित्तीय नियोजनाचे तत्त्व होय. वस्तूंच्या मागणी पुरवठ्यातील असमतोल दूर करण्यासाठी व उत्पादन खर्च आणि नफा यांचे मापन करण्यासाठी वित्तीय नियोजन आवश्यक ठरते. त्यासाठी किंमतीमध्ये फार मोठे बदल होऊ न देता देशातील साधन-सामग्रीचा पर्यायाने वापर करणे आवश्यक असते. म्हणूनच योजना आखताना देशातील बचत, उत्पन्न, उपभोग, गुंतवणूक,

उत्पादन, व्यापार वगैरे संबंधीची आकडेवारी एकत्र केली जाते आणि आकडेवारीच्या परिभाषेत योजनेची मांडणी केली जाते. थोडक्यात, वित्तीय नियोजनात मागणी व पुरवठा यांचा समन्वय साधून व भाववाढ रोखून आर्थिक स्थिरता निर्माण करणारा विचार केला जातो.

वित्तीय योजनावर पुढील काही मर्यादा पडतात.

i) भांडवली साधनांचे वाटप करांच्या साधनातून झाल्यास त्याचा समाजाच्या बचतीवर प्रतिकूल परिणाम होईल.

ii) विकसनशील देशात पैशाचा वापर करणारे क्षेत्र व पैसा न वापरणारे क्षेत्र वस्तूविनिमय (Non monestied sector) अशी दोन आर्थिक क्षेत्रे असतात. अशा द्विदल आर्थिक रचनेत कमी अधिक प्रमाणात असमतोल निर्माण होत असतो. परिणामत: भौतिक उद्दिष्टांचे योग्य नियोजन करणे व ते पूर्ण करणे अवघड होते. एका बाजूस वस्तूचा तुटवडा व दुसऱ्या बाजूस भाववाढ हे महत्त्वाचे दोन अडथळे उद्‌भवतात.

iii) वस्तूंचा पुरवठा वाढविण्यासाठी आयात करणे अपरिहार्य ठरते. परंतु त्याचा परिणाम म्हणून देशाचा परकीय व्यापारतोल प्रतिकूल बनतो. विकसनशील राष्ट्रात अधिच तो प्रतिकूल असतो त्यात आणखी भर पडते.

iv) वित्तीय नियोजन एखाद्या विशिष्ट क्षेत्रापुरते अधिक यशस्वी होते. परंतु विकसनशील देशात संपूर्ण अर्थव्यवस्थेसाठी ते राबविणे अनेक कारणांनी अडचणीचे ठरते. पं. जवाहरलाल नेहरू, प्रा. महालनोबीस इत्यादींनी भौतिक नियोजन हे मनुष्यबळ, भौतिक वस्तू आणि साधने इत्यादीच्या संदर्भत असले पाहिजे असे मत मांडले. या दोन्ही पद्धतीतील फरक पुढीलप्रमाणे -

| | **भौतिक (वास्तव) नियोजन** | | **वित्तीय नियोजन** |
|---|---|---|---|
| १) | सर्व कार्यक्रम अंदाज, उद्दिष्ट साधने यांचा भौतिक वस्तूंमध्ये विचार केला जातो. | १) | सर्व कार्यक्रम उद्दिष्टे, साधने यांचा विचार वित्तीय (मौद्रीक) मात्रामध्ये केला जातो. |
| २) | भौतिक नियोजनाचे स्वत: अधिक निश्चित असते. ते अधिक शिस्तबद्ध व नियमित असते. त्याचे यशही अधिक खात्रीशीर असते. | २) | वित्तीय नियोजनात काहीशी अनिश्चितता असते. |
| ३) | भौतिक नियोजन अधिक केंद्रीत व कडक असते. त्यांचा वापर साम्यवादी देशात केला जातो. | ३) | वित्तीय नियोजन सोपे, सुलभ व सोयीस्कर असते. याचा अवलंब लोकशाही व मिश्र अर्थव्यवस्थेमध्ये केला जातो. |

**३) दीर्घकालीन नियोजन व अल्पकालीन नियोजन** (Long-term planning and short-term planning)

**अ) दीर्घकालीन नियोजन :** दूरदृष्टी नियोजनात परिप्रेश नियोजन, साम्यकदर्शी नियोजन असे म्हणतात. यामध्ये सामान्यत: २०-२५ वर्षांचा कालावधी डोळ्यासमोर ठेऊन योजना तयार केली जाते. भारतीय नियोजन मंडळाच्या मते, दिर्घकालीन नियोजन म्हणजे दीर्घ काळात केल्या जाणाऱ्या विकासाचा तो एक निळा नकाशा होय. यामध्ये कित्येकदा प्रत्येक वर्षासाठी योजना आखून दीर्घकालीन उद्दिष्टे पूर्ण केली जातात. अर्थव्यवस्थेत वारंवार बदल होत असतात. दीर्घकालीन योजना तयार करताना हे पहावे लागते. त्यामुळे दिर्घकलीन योजना एक वार्षिक, पंचवार्षिक, सहावार्षिक इत्यादीमध्ये विभागली जाते. मात्र एकूण आवृत्तीबंधात (ढोबळ चौकटीत) काही बदल होत नाही.

दूरदृष्टी नियोजनाचा हेतू हा अल्पकालीन नियोजनासाठी पार्श्वभूमी तयार करणे हा असतो आणि त्याद्वारे अल्पकालीन नियोजनाची योग्य रितीने कार्यवाही होऊ शकते. लोकसंख्यावाढ, उत्पन्नवाढ, संशोधन पर्यायी वस्तू इत्यादी घटकांचा विचार दिर्घकालीन नियोजनाचा विचार करता येतो.

भारताच्या तिसऱ्या योजनेत दूरदृष्टीने १५ वर्षासाठी अन्नधान्य स्वयंपूर्णता, स्वावलंबन व स्वयंघोषित विकास प्राप्त करण्याचे ठरविले. चौथ्या योजनेतही ते तसेच चालू ठेवले प्रथम दिर्घकालीन नियोजनाची कल्पना १९२०-२९ मध्ये रशियामध्ये वापरली.

**ब) अल्पकालीन योजना :** वार्षिक, अर्धवार्षिक, त्रैवार्षिक, मासिक स्वरूपाच्या अल्पकालीन योजना असतात. अल्प व मध्यमकालीन योजनांची पार्श्वभूमी दिर्घकालीन योजनामुळे उपलब्ध होते. त्या पार्श्वभूमीवर केलेले नियोजन हे विशिष्ट दिशेने होते. अल्पकालीन योजनाची कृती आणि कार्यवाहीचे व यशापयशाचे मूल्यमापन करण्यासाठी दिर्घकालीन नियोजन आवश्यक ठरते.

**४) रचनात्मक आणि कार्यात्म नियोजन** (Structural and functional planning ) :

**अ) रचनात्मक नियोजन :** आर्थिक नियोजनाचा स्वीकार करण्यापूर्वी अर्थव्यवस्थेची विशिष्ट रचना रूढ झालेली असते. काही उद्दष्टपूर्तीसाठी अगोदरच्या रचनेत मूलभूत बदल होणे किंवा रचनाच बदलणे अभिप्रेत असेल तर त्याला रचनात्मक नियोजन असे म्हणतात. यात कालबाह्य वाटणारी रचना बदलताना काही प्रमाणात जुन्या रचनेचा विध्वंस होणे अपरिहार्य ठरते. रशियामध्ये समाजवादी उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी जमिनदारी, खाजगी मालमत्ता इत्यादी जुने हितसंबंध गट व संस्था नष्ट करून सामुदायिक शेती, उध्योगांचे राष्ट्रीयीकरण, उतपदन साधनाची सामाजिक मालकी वगैरे मूलभूत बदल घडवून आणावे लागले. भारतामध्येही स्वातंत्र्योत्तर काळात पूर्वीची भांडवलशाही रचना पूर्णपणे बदलली नाही. तरी उद्योग व महत्त्वाच्या क्षेत्रांचे राष्ट्रीयीकरण हे बदल रचनात्मक होय.

**ब) कार्यात्मक नियोजन :** अर्थव्यवस्थेच्या रचनेच्या चौकटीतच हळूहळू बदल केले जातात. या बदलामुळे पूर्वीची रचना अधिक कार्यक्षमतेचे उपयोगात आणता येते. इंग्लंड व फ्रान्स मध्ये भांडवलशाहीला धक्का न लावता नियोजनाचा वापर केला गेला.

अर्थव्यवस्तेची विकासाची कोणती पातळी आहे यावरच या दोहोंपैकी कोणते नियोजन स्वीकारावे हे अवलंबून असते. विकसित अर्थव्यवस्था सदृढ पायावर उभी असल्याने (भांडवलशाही किंवा समाजवाद) तेथे कार्यात्मक नियोजन तंत्र जास्त यशस्वी वाटते.

**५) केंद्रित आणि विकेंद्रदित नियोजन** (Centralised and Discentralised Planning)

आर्थिक नियोजन यंत्रणेच्या स्वरूपानुसार हे दोन प्रकार पडतात.

**अ) केंद्रीत नियोजन :** या नियोजन प्रकारात अर्थव्यवस्थेतील महत्त्वाचे सर्व निर्णय केंद्रिय सत्ता घेते. उत्पादन, गुंतवणू, मूल्यप्रक्रिया वेतनदर प्रकल्पनिवड इत्यादी संबंधित सर्व निर्णय केंद्रे घेते व ते सर्वावर बंधनकारक, आदेशात्मक असतात.

**वैशिष्ट्ये :**

i) **निर्णय प्रक्रिया :** मध्यवर्ती सत्ता संबंधित घटकाशी व संस्थांशी चर्चा/विचार विनिमय करून निर्णय घेते. कारण या संस्थाच निर्णयाची अंमलबजावणी करणार असतात. या संस्था बदलही सुचवू शकतात. तसेच व्यापक अर्थाने राष्ट्रीय संदर्भात विचार झाल्याने राष्ट्रीय हिताची हानी होत नाही.

ii) **वस्तुनिष्ठता :** केंद्रिय सत्तेला देशाच्या एकूण परिस्थितीचे ज्ञान असते. विशेषत: कार्याच्या संदर्भात संसाधने किती उपलब्ध आहेत व त्याबाबत देशाचे लक्ष्य काय आहे याचा तुलनात्मक विचार केला जातो. त्यमुळे वस्तू व उत्पादनाच्या घटकाच्या मूल्यनिर्धारणात ही पार्श्वभूमी उपयोगी पडून त्या अनुषंगाने घेतलेले निर्णय वस्तूनिष्ठ ठरतात.

**ब) विकेंद्रीत नियोजन :** विकेंद्रित नियोजनात जरी राष्ट्रीय स्वरूपाची योजना असली तरी विविध विभागाना त्या चौकटीत आपल्या स्वतंत्र योजना असून राबविण्याचे अधिकार दिलेले असतात.

**६) लोकशाही आणि हुकूमशाही नियोजन** (Democratic and Totalitarian Planning) :

लोकशाही व हुकूमशाही या दोन परस्परविरोधी राज्य व्यवस्था आहेत.

**अ) हुकूमशाही नियोजन :** हुकूमशाहीमध्ये नियोजन हे पूर्णपणे केंद्रित किंवा निर्देशित असते.

**स्वरूप :** हुकूमशाहीत सर्व आर्थिक व राजकीय सत्ता एका व्यक्तीच्या किंवा पदाच्या हाती केंद्रित झालेली असते. ही अधिसत्ता देशात सर्वश्रेष्ठ असते. योजना आखणे, लक्ष्य (targets) ठरविणे उत्पादन साधनांची विभागणी, क्षेत्रीय प्राधान्य, योजना राबविणे अशा सर्व बाबतीत या सत्तेचे निर्णय अंतिम असतात. त्याला आव्हान देता येत नाही. तसेच कोणत्याही पातळीवर लोकांचा सहभाग नसतो.

- **मूल्यमापन :**

i) **यश :** नियोजनाचे हे तंत्र अतिशय कार्यक्षम असते. या पद्धतीत पूर्ण केंद्रीकरण, नियंत्रण, लोकमताचा अनादर इत्यादी दोष असले तरी किमान कालावधीत अर्थ व्यवस्था स्वयंपूर्ण करणे, विकसित करणे हा हेतू असतो व

तो साध्य होतो. उदा. १९४९ च्या क्रांतीनंतर चीनमध्ये साम्यवादी पक्षाच्या हुकूमशाहीने चिनला विकसित केले.

ii) **जबर किंमत :** देशाच्या जलद आर्थिक विकासाबात वाद असू शकत नाही पण त्यासाठी दडपशाही, क्रौर्य अतिरेकी नियंत्रण, नागरिकांना गुलामासारखी वागणूक या गोष्टींचे समर्थ होऊ शकत नाही.

ज्या देशात शासनप्रणाली म्हणून लोकशाही स्वीकारली आहे. तेथील आर्थिक नियोजनाला लोकशाही नियोजन असे म्हणतात. येथे योजनेच्या प्रत्येक अवस्थेत लोकांचा सहभाग असतो. जबरदस्ती नसते.

आवश्यक वस्तू-सेवांचे राष्ट्रीयीकरण हे लोकशाही नियोजानचे वैशिष्टे होय. याद्वारे नियोजनाच्या समाजवादी पैलूकडे लक्षय पुरवले जाते. उदा. भारतात स्वातंत्र्यात्तर काळात भूमि या नैसर्गिक साधनाचे थोड्या हातात केंद्रीकरण होऊ नये म्हणन जमिनदारी नष्ट केली. पण जमिनदारांना नुकसानभरपाई दिली. सारांश, लोकशाही नियोजन हे समाजवादी मार्ग व भांडवलशाही मार्ग यातील सुवर्णमध्ये आहे.

**मूल्यमापन :** तत्त्वत: लोकशाही नियोजन हे आदर्श होय. कारण त्यात सामाजिक कल्याणाबरोबरच स्वातंत्र्यासारख्या मूलभूत व शाश्वत मूल्यांचे रक्षण होते. लोकशाहीमध्ये कायदे मजुंरीसाठी चर्चा होणे, विलंब होणे अपरिहार्य असने, चाणाक्ष लोक त्याचा गैरफायदा घेतात. उदा. भारतातील भूमि सुधारणा, जमीनदारानी आपली जमीन अनेक नातलगांच्या नांवे केली शिवाय त्यांना नुकसान भरपाईही मिळाली.

हुकूमशाही नियोजानत देशाचे गंभीर प्रश्न जलद करतात पण शाश्वत मूल्यांचा बळी जातो. उलट लोकशाही नियोजनात मूल्यांचा आदर ठेवला जातो. पण प्रश्नांची उकल लवकर होत नाही. म्हणून अविकसित देशासाठी नियंत्रित लोकशाही नियोजन योग्य ठरते.

**७) गतिशील व स्थितीशिल नियोजन** (Rolling and fixed plans) :

प्रो. मिर्डालनी, अविकसित राष्ट्रासाठी गतीशील योजनाचा पुरस्कार केला. भारताने १९६२ च्या चीन आक्रमणानंतर त्याचा वापर केला.

ज्या नियोजित पद्धतीमध्ये, नियोजन स्वरूप उद्दिष्ट इत्यादी मध्ये बदल करता येतो ते गतीशिल नियोजन होय.

स्थिर किंवा स्थितीशील नियोजनात योजना काळात नियोजन पद्धतीत वगैरे बदल करता येत नाहीत. योजना सुरू होण्यापूर्वीच त्यात दुरुस्त्या करता येतात. म्हणूनच हीला अलवचिक नियोजन म्हणात. जगातील बहुतेक राष्ट्रांनी गतीशील नियोजनाचाच अवलंब केलेला आहे.

**८) लवचिक नियोजन आणि ताठर नियोजन** (Flexible planning and Rigid Planning) :

**अ) लवचिक नियोजन :** उद्दिष्टे उत्पादन व उत्पादन साधने यामध्ये जुळवणी, फेर जुळवणीची शक्यता असल्यास ते लवचिक नियोजन होते हे नियोजन गतिशील असते. नवीन प्रवृत्ती अनुभवास येतात. बदलत्या परिस्थितीनुसार नियोजनात सुधारणा करता येतात. वारंवार उजळणी करून योजना अद्यावत बनवता येते.

**ब) ताठर नियोजन :** राष्ट्रीय कोणत्याही परिस्थितीमध्ये उद्दिष्ट बदलता येत नाहीत हे नियोजन जगात कुठेतरी क्वचितच आढळते.

**९) सार्वत्रिक नियोजन व अंशात्मक नियोजन** (Overall Planning and Partial Planning) :

शेती, उद्योग, वाहतूक, दळणवळण यापैकी एखाद्या किंवा एकाच घटकाच्या, एकाच अंगाने नियोजन म्हणजे अंशत: नियोजन होय. उदा. शेतीमध्ये फक्त पिकांची लागवड (Crop Planning) किंवा औद्योगिक क्षेत्रात फक्त दगडी कोळसा पुरवठ्याचे नियोजन इत्यादी.

सार्वत्रिक किंवा सर्वसामान्य नियोजनामध्ये अर्थव्यवस्थेतील सर्व क्षेत्रांचा व घटकांचा विचार केला जातो. अर्थव्यवस्थेतील सर्वच साधनसामग्रीचा आढावा घेऊन नियोजन आराखडा तयार केला जातो. परिणामी सर्व मान्य नियोजन अधिक यशस्वी व कार्यक्षम ठरते.

**१०) कायमचे नियोजन व तात्पुरते नियोजन** (Peramanent Planning & Emergeycy Planning)

**अ) कायमचे नियोजन :** तत्त्व व व्यवहार म्हणून आर्थिक नियोजनाचा कायम स्वरूपाचा स्विकार केला जातो. तेव्हा त्याला कायमचे नियोजन म्हटले जाते. ते विशिष्ट सामाजिक व आर्थिक तत्त्वज्ञानावर आधारीत असते. त्यांची व्याप्ती मोठी व दृष्टी दिर्घकालीन असते. भारताने अनेक आर्थिक राजकीय संकटे आली तरीही देशाने नियोजनाचा त्याग केलेला नाही.

**ब) तात्पुरते नियोजन :** हे अल्पकालीन असून विशिष्ट आर्थिक परिस्थिती किंवा समस्या हाताळण्यासाठी स्वीकारले जाते. उदा. दुष्काळ, युद्ध, प्रचंड भाववाढ, मंदी इत्यादी.

**११) प्रादेशिक नियोजन, राष्ट्रीय नियोजन व आंतरराष्ट्रीय नियोजन** (Regional, National and International Planning) :

नियोजनाची भौगोलिक व्याप्ती लक्षात घेऊन या तीन प्रकारचे वर्गीकरण केले जाते.

**अ) प्रादेशिक नियोजन :** राष्ट्रीय नियोजनाचा एक भाग म्हणून प्रादेशिक नियोजनाची गरज भासते. सध्या या नियोजनाला महत्त्व प्राप्त झाले आहे. यांचे दोन प्रकार पडतात.

i) देश मोठा असल्यास विशिष्ट प्रदेशापुरती योजना आखून राबवली जाते.

ii) एखादा भाग मागासलेला असेल, विशिष्ट नैसर्गिक सामग्री विपूल असेल किंवा औद्योगिक भिन्नता असेल तर त्या भागासाठी केवळ संबंधित वेगळी योजना केली जाते. देशाच्या निरनिराळ्या प्रदेशात असलेले भेद, असंतुलने किंवा विषमता दूर करण्याचा प्रादेशिक नियोजन हा एक मार्ग आहे.

**ब) राष्ट्रीय नियोजन :** संपूर्ण राष्ट्रासाठी अंमलात आणलेले आर्थिक नियोजन म्हणजे राष्ट्रीय नियोजन होय. राष्ट्राची भौगोलिक सीमा हे नियोजनाचे क्षेत्र असते. महत्त्वाची बाब म्हणजे लोकांच्या राष्ट्रीय भावनांना किंवा देशभरातील आवाहन करून किंवा केंद्रिय नियंत्रणामुळे आदेश देऊनही विविध कार्य करून घेता येतात. स्थिर व समर्थ शासन व्यवस्था असल्यास संपूर्ण अर्थव्यस्थेवर कार्यक्षम व परिणामकारक नियंत्रण असू शकते.

राष्ट्रीय नियोजनामध्ये देश स्वयंपूर्ण बनविणे अभिप्रेत असल्याने ती अर्थव्यवस्था नियंत्रित व अलिप्त होणे अपरिहार्य आहे. अशा अलिप्ततेमुळे अनेक वस्तूंचे उत्पादन फारसे परवडणारे नसले तरी देशातच केले जाते व मर्यादित संसाधनांचा अपव्यय संभवतो.

**क) आंतरराष्ट्रीय नियोजन :** जागतिक पातळीवर नियोजनाचा विचार झाला तर त्याला आंतरराष्ट्रीय नियेजन म्हटले जाते. दोन किंवा अधिक देश नियोजनासाठी एक भौगोलिक क्षेत्र मानून विशिष्ट उद्दिष्ट पूर्तीसाठी संयुक्त नियोजन करतात. अशावेळी आंतरराष्ट्रीय क्षेत्रात एक नवीन आर्थिक व राजकीय घटक तयार होतो. उदा. इंजिप्त, सिरिया व इराक यांचे 'New United Arab Republic.'

या नियोजनाचा मुख्य उद्देश हा राष्ट्रा-राष्ट्रातील आर्थिक तनाव कमी करून, युद्धांचे प्रसंग टाळून उपलब्ध साधनसामग्रीचा अधिक कार्यक्षम वापर करणे हा असतो. उदा. युरोपीय सामायिक बाजारपेठ (EMC - European Common Market) बेल्जियम, फ्रान्स, जर्मनी, इटली, न्यूझबर्ग, नेदरलँडस् या ६ देशांचा हा आर्थिक सामुदाय आहे. तसेच जागतिक अन्य व शेती संघटना (FAO - Food and Agricultural Organisation) वगैरे.

## १.२.३ नियोजनाच्या यशस्वीतेसाठी आवश्यक अटी :

१९५१ पासून ते आजतागायत आपण नियोजनाचा अवलंब देशाचा विकास करण्यासाठी करीत आलो आहोत; पण तरी देखील देशाचा आवश्यक त्या प्रमाणात विकास झाल्याचे दिसून येत नाही. म्हणून या नियोजनामध्ये काही बाबतीत बदल होणे गरजेचे असते. नियोजन यशस्वी होण्यासाठी काही अटी पूर्ण करणे गरजेचे असते. या अटी पूर्ण झाल्यास काही प्रमाणात विकासात भर पडणार आहे.

### १) दारिद्र्य निर्मूलन :

अविकसित देशाने विकासाची प्रक्रिया चालू असताना सर्वप्रथम दारिद्र्य कमी करणे गरजेचे असते. म्हणजेच दारिद्र्य निर्मूलन होणे. विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असते. दारिद्र्य निर्मुलनासाठी जागतिक पातळीवरील आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) आशियाई विकास बँक (ADB) जागतिक बँक अशा आंतरराष्ट्रीय संघटना प्रयत्नशील असल्याचे दिसून येते; पण आजही आपण विचार केल्यास दारिद्र्य फारसे कमी झाले नसल्याचे दिसून येते. म्हणून या देशांनी दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठी ठोस पावले उचलावीत.

### २) शिक्षणाचा प्रसार :

देशाचा विकास साध्य करण्यासाठी किंवा विकासाला गती प्राप्त करण्यासाठी शिक्षणाची गरज असते. शिक्षणामुळे समतोल आर्थिक विकास प्राप्त होतो. लोकांच्या ज्ञानात व कौशल्यात शिक्षणाच्या प्रसारामुळे वाढ होते. त्यामुळे रोजगाराच्या संधी वाढण्यास मदत होते. रोजगाराच्या संधी वाढत गेल्यास देशाचा विकास खूपच जलद गतीने होतो. म्हणून पहिली ते चौथीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात आलेले आहे.

### ३) पर्यावरणाचे संतुलन :

आर्थिक विकास साध्य करताना पर्यावरणाचे संतुलन राखणे अत्यंत महत्त्वाचे असते. समाजाला स्वच्छ हवा,

पाणी इत्यादींची गरज असते आणि हे कायमस्वरूपी मिळविण्याच्या दृष्टीने पर्यावरणाचे संतुलन राखणे खूप महत्त्वाचे आहे. त्यासाठी देशात उपलब्ध असणाऱ्या नैसर्गिक साधनसामग्रीचा वापर मर्यादित किंवा काटकसर पद्धतीने करायला हवा आहे. या साधन सामग्रीचा वापर झाल्यास तिची पूनर्स्थापना करावी किंवा पुनर्स्थापना करण्यासाठी प्रयत्न करावा आणि पर्यावरणाचा समतोल राखावा. वायुप्रदुषण, जलप्रदुषण व इतर अनेक प्रदुषण होण्याचे कारणे किंवा कारक घटक यावर नियंत्रण ठेवावे व पर्यावरण संतुलनात ठेवून देशाचा आर्थिक विकास साध्य करावा.

**४) मृत्युदरात व जननदरात घट :**

अविकसित देशात मृत्युदरावर व जननदरावर नियंत्रण राखणे महत्त्वाचे असते. मृत्युदर म्हणजे एक हजार स्त्री-पुरुषांच्या पाठीमागे मरण पावणाऱ्या लोकांची संख्या म्हणजे मृत्युदर व एक हजार स्त्री-पुरुषांच्या पाठीमागे जन्म घेणाऱ्या बालकांची संख्या म्हणजे जननदर होय. या दोन्ही दरावर नियंत्रण राखल्यास आर्थिक विकास साध्य होण्यास मदत होते.

**५) स्त्रियांचे सबलीकरण :**

भारतीय संस्कृती ही पुरुषप्रधान संस्कृती आहे. आजही स्त्रियांना समाजामध्ये दुय्यम स्थान आहे; परंतु आर्थिक विकासात स्त्रिया पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करताना दिसतात. एका विचारवंताच्या मते, जर स्त्रियांना विकासप्रक्रियेत सामावून घेतले नाही तर देशाची आर्धी श्रमशक्ती पडून राहते. म्हणून स्त्रियांना विकास प्रक्रियेत सामावून घेणे अत्यंत महत्त्वाचे असते. त्यांचे सबलीकरण करणे महत्त्वाचे असते.

अशा प्रकारे नियोजनाच्या यशस्वीतेसाठी वरील काही महत्त्वाच्या अटी पूर्ण करणे आवश्यक ठरते. या अटी पूर्ण केल्यास विकासाचा वेग वाढत जातो.

## १.३ सारांश :

सध्याच्या युगाचा नियोजन हाच मूलमंत्र आहे. आर्थिक नियोजानद्वारे राष्ट्रासमोरील आर्थिक, सामाजिक समस्या सोडविणे शक्य होते. नियोजनाचा अलवंब करावा की नाही हा महत्त्वाचा प्रश्न नसून त्यातील कोणत्या प्रकारचा स्वीकार करावा हेच महत्त्वाचे आहे.

मिश्र अर्थव्यवस्थेमध्ये भांडवलशाही व समाजवाद यांच्यातील गुण एकत्रित केले जातात तर दोष दूर करून आर्थिक नियोजनाच्या माध्यमातून देशाचा विकास साधला जातो.

## १.४ पारिभाषिक शब्द :

**भौतिक** - वास्तव

**मुक्त** - स्वतंत्र

## १.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :

**वस्तूनिष्ठ प्रश्न. (योग्य पर्याय निवडा)**

१) नियोजनाची संकल्पना सर्वप्रथम .............. यांनी मांडली असे म्हटले जाते.

अ) प्लेटो ब) रुसो क) म. गांधी ड) यापैकी नाही.

२) ............... नियोजनात सहकारी नियंत्रणे, कडक, व्यापक व मोठ्या प्रमाणात असतात.

अ) लोकशाही, ब) आर्थिक क) आदेशात्मक ड) यापैकी नाही.

३) आदेशात्मक नियोजनात ................ सत्ता नियोजनाचे सर्व कार्यक्रम ठरविते.

अ) व्यक्तीची ब) समाजाची क) मध्यवर्ती ड) यापैकी नाही

४) भौतिक नियोजनालाच ............. नियोजन म्हणतात.

अ) प्रादेशिक ब) राष्ट्रीय क) वास्तव ड) यापैकी नाही.

५) ............... नियोजन हे लोकशाही नियोजन आहे.

अ) प्रेरित ब) वास्तव क) भौतिक ड) यापैकी नाही

**ब) वस्तूनिष्ठ प्रश्न (विधाने चूक की बरोबर सांगा)**

१) प्रेरित नियोजनात सर्व निर्णय सत्ता सहकाराकडे असते.

२) वित्तीय नियाजनातील उद्दिष्टे पैशाच्या स्वरूपात मांडली जातात.

३) दूरदृष्टी नियोजनास सम्यकदर्शी नियोजन म्हणतात.

४) लोकशाही नियोजन व हुकूमशाही नियोजन या दोन परस्पर विरोधी राज्यव्यवस्था आहे.

५) मिश्र अर्थव्यवस्थेत आर्थिक नियोजनामध्ये भांडवलशाही व समाजवाद यांचा मेळ साधला जातो.

## १.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**अ) वस्तूनिष्ठ प्रश्नांची उत्तरे. (योग्य पर्याय निवडा)**

१) अ २) क ३) क ४) क ५) अ

**ब) वस्तूनिष्ठ प्रश्नांची उत्तरे (चूक की बरोबर)**

१) चूक २) बरोबर ३) बरोबर ४) बरोबर ५) बरोबर

## १.७ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) दिर्घोत्तरी प्रश्न.**

१) आर्थिक नियोजन म्हणजे काय ? आर्थिक नियोजनाचे प्रकार सांगा.

२) आर्थिक नियोजनाचा अर्थ व व्याख्या स्पष्ट करा.

३) आर्थिक नियोजनाची उद्दिष्टे स्पष्ट करा.

४) भौतिक नियोजन व वित्तीय नियोजन म्हणजे काय ? हे सांगून या दोहोतील फरक स्पष्ट करा.

**ब) लघुत्तरी प्रश्न.**

१) गतीशील व स्थितीशील नियोजन.

२) आर्थिक नियोजन.

३) आर्थिक नियोजनाची गरज.

४) आर्थिक नियोजनाचे प्रकार

## १.८ क्षेत्रीय कार्य :

१) भारतातील आर्थिक नियोजनाची पार्श्वभूमी सद्यस्थिती यांचा अभ्यास करा.

२) आपल्या जिल्ह्यातील प्रादेशिक नियोजनाची उद्दिष्टे, कार्य, महत्त्व व यश यांचा अभ्यास करा.

## १.९ संदर्भ ग्रंथ :


1) भोसले के. एम. आणि काटे के.बी., ''आर्थिक विकास व नियोजन'', फडके प्रकाशन, कोल्हापूर.

2) Jhingan, M. L. : (2007), "The Economics of Development and Planning" 39th Revised and Enlarged Edition, Published by, Vrinda Publications (P), Ltd., B-5, Ashish Complex.

3) Kavimandam, Vijay : (1990), "Economics of Development and planning" Fourth Edition. Published by Shri. Shantadurga Niwas, Navi Ramdas Peth, Nagapur - 440010.

4) Lekhi, R. K. : (2010), "The Economics of Development and Planning", Fourtenth Revised Edition, Published by Kalyani Publishers, B-1/1292, Rajinder Nagar, Ludhiana - 141008.

5) Mishra, S. K. and Puri V. K. : (1989), "Development and Planning (Theory and Practice) Fourth Revised Edition, Published by Himalaya Publishing House. (Bombay - Nagpur - Delhi), Ramdoot Dr. Bhalerao Marg, Girgaon, Bombay - 400 004.

6) पाटील जे. एफ. आणि ताम्हणकर, पी. जे. : (१९८०) ''आर्थिक विकास व नियोजन भाग -२,' 'आर्थिक नियोजन' प्रकाशक कुलकर्णी, ए. ए., कॉन्टीन्टेल प्रकाशन, विजयनगर, पूणे - ३०.

7) Seth M. L. : (1969), "Theory and practice of Economic planning" Fourth Edition (Throughly Received and Enlarged) Published by S. Chand and Co., Ram Nagar, New Delhi - 55)

8) वाळके व्ही. जी. रायखेलकर ए. आर. (१९७८). ''आर्थिक विकास व नियोजनाची मूलतत्त्वे'' प्रकाशक-अनिल मेहता, अजब पुस्तकालय, कोल्हापूर - ४१६ ००२.

◈◈◈

## घटक २

# आर्थिक नियोजनातील समस्या

अनुक्रमणिका

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ आदान-प्रदान विश्लेषण : अर्थ आणि उपयोग

२.२.२ भांडवल-उत्पादन गुणोत्तर : अर्थ आणि महत्त्व

२.२.३ उत्पादन तंत्राची निवड : भांडवल प्रधाव श्रमप्रधान

२.२.४ प्रकल्प मूल्यमापन : अर्थ आणि महत्त्व

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द

२.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

२.६ सरावासाठी प्रश्न

२.७ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.८ क्षेत्रीय कार्य

२.९ सरावासाठी स्वाध्याय

### २.० उद्दिष्ट्ये :

प्रस्तुत घटकाच्या अध्ययनाद्वारे पुढील उद्दिष्ट्ये साध्य होतील.

- 'आदान-प्रदान विश्लेषण' संकल्पनेचा अर्थ आणि त्याचे विकास नियोजनामधील महत्त्व समजण्यास मदत होईल.
- 'भांडवल-उत्पादन गुणोत्तर' या संकल्पनेचा अर्थ आणि तिचे विकास नियोजानतील महत्त्व समजण्यास मदत होईल.

- आर्थिक नियोजनाच्या कार्यवाही दरम्यान उत्पादन-तंत्र निवडीची निर्माण होणारी समस्या समजावून घेता येईल तसेच उत्पादन-तंत्र निवडीचे प्रमुख दोन प्रकार व त्यांची उपयुक्तता समजावून घेता येतील.
- नियोजनातील प्रकल्पांची खर्च-लाभ दृष्टीकोनातून उफयुक्तता समजावून घेण्यासाठी वापरली जाणारी 'प्रकल्प मूल्यमापन' संकल्पना समजण्यास मदत होईल.

## २.१ प्रस्तावना :

बाजारयंत्रणेवर आधारित भांडवलशाहीच्या कार्यप्रणालीद्वारे निर्माण होणाऱ्या बेकारी, गरीबी, आर्थिक विषमता, प्रादेशिक असमतोल व इतर आर्थिक, सामाजिक संमस्यांचे निराकरण करून जलद आणि समतोल आर्थिक विकासासाठी 'आर्थिक नियोजन' हे एक उपयुक्त साधन मानले जाते. जगातील बहुतांश विकसनशील आणि विकसित राष्ट्रे आर्थिक नियोजनाद्वारे आर्थिक विकास तसेच आर्थिक वृद्धीचा उच्चतर दर गाठण्याकरिता प्रयत्नशील असल्याचे दिसून येतात. सर्वसाधारणपणे सर्वच प्रकारच्या अर्थव्यवस्थांमध्ये आर्थिक नियोजनाची भूमिका व त्याची कार्यपद्धती समजावून घेणे क्रमप्राप्त ठरते. विशेषत: आर्थिक नियोजनादवारे आर्थिक विकास ही व्यूहरचना यशस्वी ठरण्याकरिता देशातील नागरिकांना विकास नियोजनाची संक्लपना, त्यांचे प्रकार, नियोजनाची उपयुक्तता आणि नियोजनाच्या कार्यवाही दरम्यान विचारात घ्यावी लागणारी काही आर्थिक विश्लेण तंत्रे, त्यांच्या वापरातील समस्या यांचे शास्त्रशुद्ध, सविस्तर व अभ्यासपूर्ण आकलन असणे आवश्यक मानले जाते. कारण त्याद्वारे आर्थिक नियोजनांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना व कार्यक्रमांची यशस्वीरित्या अंमलबजावणी करता येणे शक्य होते.

## २.२ विषय विवेचन :

घटक क्र. १ मध्ये आपण आर्थिक नियोजनाची संक्लपना समजावून घेण्याकरिता तिचा अर्थ, व्याख्या व आवश्यकता तसेच नियोजनाचे प्रकार यांचा अभ्यास केला आहे. तसेच संमिश्र अर्थव्यवस्थेतील आर्थिक नियोजनांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध विकासात्मक कार्यक्रमांची आखणी करताना, गुंतवणूक विषयक व इतर संदर्भातील बाबींचा आढावा घ्यावा लागतो. प्रस्तुत घटक क्र. २ मध्ये विकास नियोजन कार्यक्रम निर्धारित करताना काही आर्थिक विश्लेषण तंत्रे आणि त्यांच्या वापरा दरम्यान निर्माण होणाऱ्या समस्यांचा आढावा घेण्यात आला आहे. त्यामध्ये 'आदान-प्रदान' विश्लेषण संकल्पना अर्थ त्याची उपयुक्तता, भांडवल-उत्पादन गुणोत्तर, उत्पादन तंत्राची निवड, तसेच प्रकल्प. मूल्यमापन : अर्थ आणि महत्त्व इ. घटकांचा विचार केला आहे.

### २.२.१ आदान-प्रदान विश्लेषण : अर्थ आणि उपयोग (Input-output Analysis : Meaning and Uses)

- **प्रस्तावना :**

आर्थिक नियोजनाद्वारे आर्थिक विकासाची प्रक्रिया गतिमान करण्याकरिता अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांमध्ये उपलब्ध साधनसामग्रीचा वापर करून उत्पादन (उत्पन्न) निर्मितीचे उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न केला जातो. तेव्हा नियोजनबद्ध विकास कार्यक्रमांतर्गत प्रत्येक क्षेत्रात वापरावी लागणारी साधनसामग्री आणि त्याद्वारे निर्माण होणारे उत्पादन यांचा आढावा घ्यावा लागतो. एका क्षेत्रामध्ये केल्या जाणाऱ्या साधनसामग्रीच्या गुंतवणूकीतून निर्मिती

उत्पादनातील काही वस्तु, सेवा इतर क्षेत्रांकडून गुंतवणूकीकरिता साधनसामग्रीच्या स्वरूपात उपयोगात आणल्या जात असतात. अशा परिस्थितीत क्षेत्रा-क्षेत्रांमधील साधनसामग्रीच्या वापराबाबतची परस्परांवरील अवलंबित्वाची स्थिती आणि त्यातून अस्तित्त्वात येणारी अर्थव्यवस्थेतील मागणी पुरवठ्याच्या घटकांमधील सर्वसाधारण समतोल अवस्था यांचा आर्थिक नियोजन अंमलबजावणी दरम्यान अभ्यास उपयुक्त मानला जातो. आर्थिक नियोजनाद्वारे शेती, उध्योग आणि इतर क्षेत्रांमधील भांडवली व इतर साधनसामग्रीच्या वाटपाबाबतचे निर्णय घेण्यासाठी तसेच या क्षेत्रांमधील भांडवली व इतर साधनसामग्रीच्या वाटपाबाबतचे निर्णय घेण्यासाठी तसेच या क्षेत्रांमधील संसाधनांच्या वापराबाबतचे परस्परावलंबित्व जाणून घेण्यासाठी काही विश्लेषण तंत्रे उपयुक्त ठरतात. आदान-प्रदान विश्लेषण (Input-output Analysis) हे असेच एक तंत्र असून ते वेसिली डब्ल्यु लिऑनटिफ यांनी 'The structure of American Economy (1951) या ग्रंथामध्ये मांडले आहे. गतिमान अर्थव्यवस्थेत उत्पादक क्षेत्रांमध्ये साधनसामग्रीच्या गुंतवणूकीत घडून येणारे बदल तसेच साधनसामग्रीबाबतची त्यांची परस्परावलंबित्वाची स्थिती अर्थव्यवस्थेच्या सर्वसाधारण समतोल पातळी दरम्यान कशा रितीने कार्यरत असते ? याचे विश्लेषण करण्यासाठी आदान-प्रदान विश्लेषण तंत्र उपयुक्त मानले जाते.

- **संकल्पना स्पष्टीकरण :**

आदान-प्रदान विश्लेषण 'आंतर उद्योग विश्लेषण' (Inter-industry analysis) किंवा 'आदान-प्रदान तक्ता' (Input-output table) म्हणून देखील ओळखले जाते. या विश्लेषणात आदान व प्रदान या संल्पना कोणत्या अर्थाने वापरण्यात येतात ? ते प्रथम समजावून घेणे उपयुक्त ठरते. आदानाकरिता इंग्रजीत 'Input' आणि प्रदानाकरिता 'Output' या शब्दांचा वापर करण्यात येतो. कोणत्याही क्षेत्राचे (उद्योगाने) उत्पादन कार्य हाती घेण्याच्या उद्देशाने खरेदी केलेली साधनसामग्री म्हणजे आदान किंवा आदाने होय. उत्पादन कार्याकरिता इतर क्षेत्रांकडून खरेदी करून उपयोगात आणलेली साधनसामग्री (वस्तू, सेवा, कच्चामाल, उत्पादन घटक इ.) आदान/आदाने या संकल्पनेतून व्यक्त होते. आदाने संबंधित क्षेत्राचा साधनसामग्री खरेदीवरील पैशातील खर्च व्यक्त करतात. प्रदान म्हणजेच Output म्हणजे एखाद्या क्षेत्राने (जसे शेती, उद्योग) आदानांच्या स्वरूपात वापरलेल्या साधनसामग्रीद्वारे निर्माण केलेले उत्पादन होय. हे उत्पादन विक्री हेतूने निर्माण केलेले असते. म्हणून प्रदान किंवा प्रदाने संबंधित क्षेत्राची जमा/मिळकत (Revenue) दर्शवितात. (An input is 'something with is bought for the enterprise, while an output is something which is sold by it. An input is obtained but an output is produced : J. R. Hicks)

थोडक्यात, कोणत्याही क्षेत्राने (उद्योगाने) उत्पादन घेण्यासाठी वापरलेल्या साधनसाम्रगीस (resources) आदान/आदाने असे म्हणतात. जसे वस्तू, सेवा, कच्चा माल, भांडवल, श्रम इत्यादीचा वापर करून निर्माण केलेल्या वस्तूंना, सेवांना प्रदान/प्रदाने म्हणतात. प्रदान हे आदानांचे फल असते.

आदान-प्रदान विश्लेषणाची व्याख्या करताना विल्यम जे बॅमोल यांनी असे म्हटले आहे की, ''सर्वसाधारण समतोल स्थितीत असणाऱ्या अर्थव्यवस्थेमधील अनुभवजन्य उत्पादन विषयक बाबीचा कार्याचा आढावा घेण्याच्या प्रयत्नाशी निगडीत असणारी संकल्पना म्हणजे आदान-प्रदान विश्लेषण होय.'' (Input-output Analysis is

the name given to the attempt to take account of general equilibrium phenomena in the empirical analysis of Production : Willam J. Baumol)

- **आदान-प्रदान तक्ता विश्लेषण :**

लिऑनटिफ यांनी 'आदान-प्रदान विश्लेषण स्पष्ट करण्यासाठी एका तक्त्याचा उपयोग केला आहे. त्यात सर्वसाधारण समतोल स्थितीत असणाऱ्या अर्थव्यवस्थेतील प्रत्येक क्षेत्राची आदानांकरिता असलेली मागणी आणि त्या क्षेत्राकडून निर्माण केलेल्या प्रदानांचा इतर क्षेत्रांकडून आदानांच्या स्वरूपात करण्यात येणारा वापर तसेच त्याकरिताची कुटुंबसंस्थेकडून अंतिम उपयोगासाठी असलेली मागणी यांचे विश्लेषण मांडले आहे. एखाद्या विशिष्ट वर्षात सर्वसाधारण समतोलातील अर्थव्यवस्थेमधील वेगवेगळ्या क्षेत्रांची आदानांसाठी असणारी मागणी, त्यांच्याकडून निर्माण झालेली प्रदाने तसेच त्या प्रदानांचा अंतिम उपभोगासाठी घडून येणारा उपयोग यांचे आदान-प्रदान विश्लेषण मांडता येते आणि अर्थव्यवस्थेतील क्षेत्रांचे आदान-प्रदान विषयक परस्परांवरील अवलंबित्व यांचे विश्लेषण एका तक्त्यात मांडता येते. हा तक्ता कसा असतो ? त्याचे एका उदाहरणाच्या सहाय्याने स्पष्टीकरण करता येते. सर्वसाधारण समतोल स्थितीतील अर्थव्यवस्थेत तीनच क्षेत्रे कार्यरत असतात, असे गृहित मानून हा तक्ता मांडला आहे. त्यात शेती क्षेत्र, उद्योग क्षेत्र आणि तिसरे अंतिम उपभोगाकरिता वस्तू व सेवांची मागणी करणारे कुटुंबक्षेत्र निवडले आहे. शेती, उद्योग व कुटुंब क्षेत्राकडून खरेदी केले जाणारी आदाने आडव्या ओळींमध्ये दर्शविलेली आहेत आणि या तीन क्षेत्रांकडून विक्री हेतूने निर्माण केलेली प्रदाने उभ्या स्तंभाद्वारे दर्शविली आहेत.

हा आदान प्रदान तक्ता, तक्ता क्र. २.१ मध्ये पुढीलप्रमाणे मांडता येतो.

**तक्ता क्र. २.१ : आदान प्रदान तक्ता**

**आदानांची खरेदी करणारी क्षेत्रे.** (किंमत कोटी रुपयात)

| | **क्षेत्रे** | **शेती क्षेत्राकडून वापरली जाणारी आदाने** | **उद्योग क्षेत्राकडून वापरली जाणारी आदाने** | **कु.क्षेत्राकडून वापरली जाणारी आदाने (कुटुंब क्षेत्र)** | **एकूण उत्पादन विक्री उत्पन्न** |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| प्रदाने | शेती क्षेत्र | ५० | १५० | १०० | ३०० |
| निर्माण | उद्योग क्षेत्रे | १०० | २५० | १५० | ५०० |
| करणारी | मुल्यवृद्धी* | १५० | १०० | ०० | २५० |
| क्षेत्रे | एकूण आदाने (एकूण उत्पादन खर्च) | ३०० | ५०० | २५० | १०५० |

* मुल्यवृद्धी द्वारे उत्पादन घटकांचे मोबदले दर्शविले आहेत.

- **तक्ता स्पष्टीकरण :**

तक्ता क्र. २.१ मध्ये पहिल्या आडव्या ओळीत शेती क्षेत्राकडून एका वर्षात एकूण ३०० कोटी रुपये किंमतीची प्रदाने (उत्पादन / उत्पन्न) निर्माण केली जातात असे दर्शविले आहे. त्यापैकी १०० कोटी रुपये किंमतीची प्रदाने कुटुंब संस्थेकडून प्रत्यक्षपणे उपभोगाकरिता वापरली जातात. उर्वरित प्रदानांपैकी ५० कोटी रुपये किंमतीची प्रदाने शेती क्षेत्राकडून तर १५० कोटी रुपये किंमतीची प्रदाने उद्योग क्षेत्राकडून 'आदाने' म्हणून वापरली जातात. तसेच दुसऱ्या आडव्या ओळीद्वारे असे व्यक्त होते की, उद्योग क्षेत्राकडून एका वर्षात एकूण ५०० कोटी रुपये किंमतीची प्रदाने निर्माण केली जातात. त्यापैकी १५० कोटी रुपये किंमतीची प्रदाने कुटुंब क्षेत्राकडून अंतिम उपभोगाकरिता (मागणी) वापरली जातात. उर्वरित प्रदानांपैकी १०० कोटी रुपये किंमतीची प्रदाने शेती क्षेत्राकडून व २५० कोटी रुपये किंमतीची प्रदाने उद्योग क्षेत्राकडून 'आदाने' म्हणून वापरली जातात.

उभ्या ओळींमधील स्तंभ क्र. ३ मध्ये असे दर्शविले आहे की, शेती क्षेत्राकडून एकूण ३०० कोटी रुपये किंमतीची आदाने उत्पादनाकरिता वापरली जातात. त्यातील ५० कोटी रुपये किंमतीची शेती क्षेत्राने स्वत: निर्माण केलेली प्रदाने, १०० कोटी रुपयांची उद्योग क्षेत्राने निर्माण प्रदान आणि शेती क्षेत्राने वापरलेल्या उत्पादन घटकांचे दिलेले मोबदले १५० कोटी रुपये किंमतीचे आहेत. याचा अर्थ, शेती क्षेत्र ३०० कोटी रुपये किंमतीची प्रदाने निर्माण करण्यासाठी ३०० कोटी रुपयांची आदाने वापरते. तसेच उभ्या ओळीतील स्तंभ क्र. ४ मधील आकडेवारी असे स्पष्ट करते की, उद्योग क्षेत्राकडून एकूण ५०० कोटी रुपये किंमतीची आदाने वापरली जातात. त्यापैकी १५० कोटी रुपये किंमतीची आदाने शेती क्षेत्राकडून खरेदी केलेली असतात. २५० कोटी रुपये किंमतीची आदाने उद्योग क्षेत्राची स्वत:ची आणि १०० कोटी रुपये उत्पादन घटकांचे मोबदले स्वरूपात वापरलेली असतात. उभ्या स्तंभ क्र. ५ मधील आकडेवारी असे स्पष्ट करते की, अर्थव्यवस्थेतील एकूण प्रदानांपैकी कुटुंब क्षेत्राकडून व सरकारकडून अंतिम उपभोगाकरिता २५० कोटी रुपयांची आदाने वापरली जातात. प्रत्येक क्षेत्राकडून वापरली जाणारी आदाने आणि निर्माण करण्यात येणारी प्रदाने यांच्यात समानता प्रस्थापित होऊन एकूण अर्थव्यवस्थेत सर्वसाधारण समतोल साधला जातो.

आदान-प्रदान तक्त्याद्वारे अ) अर्थव्यवस्थेची कार्यपद्धती व साधनसामग्रीचा एका क्षेत्राकडून दुसऱ्या क्षेत्राकडे सुरू राहणारा प्रवाह आणि ब) अर्थव्यवस्थेतील क्षेत्रनिहाय अंतर्गत स्थैर्य आणि क्षेत्रा-क्षेत्रांमधील संबंधाद्वारे बाह्य स्थिरता कशा रितीने निर्माण होते, याचे स्पष्टीकरण मिळते.

- **गृहिते** (Assumptions) : आदान-प्रदान विश्लेषण पुढील गृहितांवर आधारित आहे.

    १) अर्थव्यवस्थेचे दोन क्षेत्रांमध्ये विभाजन झालेले असते.

    २) प्रत्येक क्षेत्राकडून केवळ एकाच प्रकारचे व एकजिनसी उत्पादन घेतले जाते.

    ३) कोणत्याही दोन क्षेत्रांद्वारे संयुक्तपणे उत्पादन घेतले जात नाही.

    ४) उत्पादनाचे तंत्र स्थिर असते व उत्पादनाबाबत प्रतिफलाचा दर स्थिर असतो.

५) किंमत पातळी, उपभोक्त्याची मागणी व उत्पादनाबाबत प्रतिफलाचा दर स्थिर असतो.

६) उत्पादन क्षेत्रात बाह्यबचती व बाह्य बेबचती निर्माण होत नाहीत.

- **विकास नियोजनातील उपयोग** (Uses in Development planning) :

विकास नियोजनाच्या कार्यवाही दरम्यान स्थितीशिल प्रतिपादनातील साधनसामग्रीच्या प्रवाह गुणांक (Flow coefficients) तसेच गतिशील अर्थव्यवस्थेतील भांडवल गुणांक (Capital Coefficient) यांच्यातील मुलभूत संबधाबाबतची कार्यप्रणाली ज्ञात असणे आवश्यक असते. आदान-प्रदान तक्त्याद्वारे नियोजनकारांना विविध उत्पादन क्षेत्रांमधील आदान-प्रदान विषयक आंतर संबंध व आंतर अवलंबित्व (inter dependancy) आणि एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील रचनात्मक संबंध याबाबतच्या स्थितीचे आकलन होण्यास मदत होते. याच माहितीचा आधार घेऊन व उपयोग करून नियोजनमंडळास एका क्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या आदानांचा इतर क्षेत्रांना होणारा लाभ व त्या क्षेत्रांवरील परिणाम समजतात. त्यामुळे संपूर्ण अर्थव्यवस्थेकरिता राबविण्यात येणाऱ्या नियोजनबद्ध विकासासाठीची गुंतवणूक विषयक व्युहरचना करणे सुलभ होते.

नियोजनबद्धरित्या घडून आणावयाच्या आर्थिक विकास प्रक्रियेत आर्थिक विकासाच्या वाढत्या दराबरोबर विविध क्षेत्रांची भांडवली साधनसामग्रीसाठीची मागणी वाढत जाते. त्या मागणीत बदल होतात. अशा परिस्थितीत अर्थव्यवस्थेतील भांडवलाची उपलब्धता, त्याचा वापर आणि क्षेत्रा-क्षेत्रांमधील आदान-प्रदानाचा प्रवाह यांचे योग्यरित्या नियोजन करण्यासाठी व विकास प्रक्रिया गतिमान करण्यासाठी आदान-प्रदान विश्लेषण मार्गदर्शक ठरते.

डॉ. अलोक घोष यांच्या मते अर्थव्यवस्थेतील विशिष्ट मुलभूत परिस्थिती व नियोजित कार्यक्रमांचा कालखंड गृहित मानल्यास आदान-प्रदान प्रवाह गुणांक व भांडवल गुणांक यांचे जास्तीत जास्त अचूक मापन करण्यासाठी आदान-प्रदान विश्लेषण उपयुकत ठरते. आणि याबरोबर अंतिम उपभोगासाठीची मागणी विषयक आकडेवारी उपलब्ध झाल्यास नियोजनकारांना अर्थव्यवस्थेतील विविध उत्पादक क्षेत्रांमधील 'पर्याप्त उत्पादनपातळी किती असते ? त्याचे मापन करता येते.

एकूणच विकास नियोजनामधील कार्यक्रमांची कार्यक्षमपणे तसेच यशस्वीरित्या आखणी व अंमलबजावणी होण्याकरिता आदान-प्रदान तक्ता विश्लेषण पुढील बाबतीत उपयुक्त ठरते.

- अर्थव्यवस्थेतील व्यक्तीगत उत्पादन उद्योग संस्थांना उत्पादन विषयक अंदाज तयार करण्यासाठी हे विश्लेषण उपयुक्त ठरते.
- नियोजानत समाविष्ट प्रकल्पांमधून उत्पादनवाढीच अपेक्षित पातळी गाठण्यासाठी भांडवली साधन सामग्रीची जमवाजमव करण्याबाबतच्या नियोजनासंदर्भात हे विश्लेषण मार्गदर्शक ठरते.
- नियोजनाद्वारे पूर्ण करावयाच्या प्रकल्पांकरिता प्रशिक्षित व कुशल श्रमिकांची आवश्यकता, त्यांना द्यावी लागणारे मोबदले इ. बाबीविषयीचे अंदाज तयार करता येतात.
- अर्थव्यवस्थेतील उत्पादन पातळीत वाढ घडवून आणण्यासाठी देशांतर्गत आदानांची उपलब्धता आणि प्रत्यक्ष

आवश्यकता यांचा आढावा घेऊन विदेशातून किती भांडवली साधनसामग्रीची आयात करणे गरजेचे आहे ? याबाबत नियोजनकारांना हा तक्ता मार्गदर्शक ठरतो.

अजित के दासगुप्त यांच्या मते गतिमान आदान प्रदान तक्ता विषयक विश्लेषणाद्वारे प्रदानांचा बदलता समतोल (Moving output equilibrium) ओळखणे व शोधणे शक्य होते. एखाद्या प्राधान्यक्रम निश्चित क्षेत्रातील आर्थिक सुधारणांकरिता नेमकी किती भांडवली साधनसामग्री गुंतवणूक विषयक गरज आहे ? आणि ती इतर क्षेत्रांद्वारे कशी पूर्ण होणार आहे ? याबाबतचे अनुमान काढण्याकरिता नियोजनकारांना हा तक्ता उपयुक्त मानला जातो.

**२.२.२ भांडवल उत्पादन गुणोत्तर : अर्थ आणि महत्त्व** (Capital-Output Ratio : Meaning and Importance) :

- **प्रस्तावना :**

आर्थिक नियोजनाद्वारे आर्थिक विकास साध्य करण्याकरिता विविध प्रकल्पांमध्ये, क्षेत्रांमध्ये सार्वजनिक तसेच खाजगी क्षेत्रांकडून भांडवली गुंतवणूक केली जात असते. तेव्हा अशा भांडवली गुंतवणुकीद्वारे उत्पादनात किती भर पडणार आहे ? हे समजावून घेणे आवश्यक असते. त्यामुळे अपेक्षित उत्पादन अथवा उत्पन्न वाढीचा दर साध्य करण्याकरिता अर्थव्यवस्थेत किती भांडवल गुंतवणूक करणे गरजेचे आहे ? त्याबाबत नियोजन करता येते. विशेषत: विकसनशील राष्ट्रांमधील भांडवलाची टंचाई लक्षात घेता, अशा देशांना उपलब्ध भांडवली गुंतवणूकीपासून उत्पादनाच्या स्वरूपात अधिकादिक परतावा मिळविण्याचे प्रयत्न करावे लागतात. यादृष्टीकोनातून आर्थिक नियोजनाच्या माध्यमातून नियोजनांची, कार्यक्रमांची आखणी करताना त्यातील 'भांडवल-उत्पादन प्रमाण/गुणोत्तर' या संकल्पनेचा परिचय करून घ्यावा लागतो. विकास नियोजनांतर्गत करण्यात येणाऱ्या भांडवली गुंतवणूकीमुळे उत्पादनात होणाऱ्या वाढीचे मापन करण्याशी भांडवल-उत्पादन गुणोत्तर संकल्पना संबंधित असून, उत्पादक क्षेत्र निहाय हे गुणोत्तर भिन्न-भिन्न असू शकते. तसेच काही अनुभवजन्य संशोधनात्मक अभ्यासातून, दिर्घ काळात भांडवल-उत्पादन गुणोत्तर एका विशिष्ट रितीने बदलत जाते, असे निष्कर्ष मिळालेले आहेत.

- **भांडवल-उत्पादन गुणोत्तर म्हणजे काय ?**

भांडवल-उत्पादन गुणोत्तर या संकल्पनेस भांडवल-उत्पादन प्रमाण किंवा भांडवल-उत्पादन सहगुणांक असे देखील म्हणतात. भांडवल-उत्पादन गुणोत्तराच्या संकल्पना सर्व प्रथम प्रा. हॅरोड व प्रा. डोमर यांनी व्यापारचक्रांच्या विश्लेषणासाठी व नंतर विकास प्रतिमानाचे विश्लेषण करण्यासाठी मांडली. तसेच विकसित अर्थव्यवस्थांमधील भांडवल-उत्पादन गुणोत्तराचा अनुजन्य अभ्यास कोलिन क्लार्क, सायमन क्रुझनेटस आणि लायबेनूस्टाईन यांनी केला आहे. आर्थिक नियोजनातील गुंतवणूक विषयक निर्णय घेण्यासाठी या संकल्पनेचा उपयोग सहजपणे व शास्त्रशुद्धरित्या करता येत असल्याने तिचा अर्थ समजावून घेणे आवश्यक मानले जाते.

प्रा. जॉर्ज रोझेन (George Rosen) यांच्या मते भांडवल-उत्पादन गुणोत्तर म्हणजे विशिष्ट कालखंडात अर्थव्यवस्थेतील अथवा एखाद्या उद्योगातील भांडवल गुंतवणूक व त्यापासून मिळणारे उत्पादन याच्यातील आंतरसंबंध होय.

The Capital output ratio may be defined as the relationship between the investment in a economy or industry and the output of that economy or industry in a given particular period : George Rosen.

आर्थिक नियोजनाच्या माध्यमातून सुरू करण्यात येणाऱ्या प्रकल्पांमधून निर्धारित उत्पादन वाढीचे उद्दिष्ट साध्य करावयाचे असते. त्याकरिता किती भांडवल गुंतवणूक करावी लागेल, ते ज्ञात असणे आवश्यक असते. भांडवल-उत्पादन गुणोत्तर संकल्पनेच्या सहाय्याने याचे उत्तर शोधता येते. म्हणून ''एका विशिष्ट प्रमाणात उत्पादनात किंवा उत्पन्नात वाढ घडवून आणण्यासाठी किती भांडवल गुंतवणूक करणे गरजेचे आहे, ते व्यक्त करण्याचे साधन म्हणजे 'भांडवल-उत्पादन गुणोत्तर' होय, अशी त्याची व्याख्या करतायेते. उदाहरणार्थ, अर्थव्यवस्थेत अथवा एखाद्या क्षेत्रात १ कोटी रुपये किंमतीची उत्पादन वाढ घडवून आणण्याकरिता, एकूण ५ कोटी रुपये किंमतीची भांडवल गुंतवणूक करावी लागणार असल्यास, तेथील भांडवल उत्पादन गुणोत्तर ५:१ इतके आहे, असे म्हटले जाते. अर्थव्यवस्थेतील वेगवेगळ्या क्षेत्रांमधील अथवा प्रकल्पांमधील भांडवल-उत्पादन गुणोत्तर भिन्न-भिन्न असू शकते. तरी देखील एकूण अर्थव्यवस्थेसाठी भांडवल-उत्पादन गुणोत्तर मोजणे शक्य असते.

- **भांडवल-उत्पादन गुणोत्तर प्रकार :**

कोणत्याही क्षेत्रामधील अथवा उद्योग, प्रकल्पांमधील भांडवल-उत्पादन गुणोत्तराचे मापन करण्याकरिता पुढील दोन प्रकार वापरता येतात.

- **सरासरी भांडवल-उत्पादन गुणोत्तर** (Average Capital - Output Ratio) :

प्रो. जेराल्ड मेयर यांनी सरासरी भांडवल-उत्पादन गुणोत्तर संकल्पनेची व्याख्या केली आहे. यांच्या मते, सरासरी भांडवल-उत्पादन गुणोत्तर म्हणजे विशिष्ट कालावधीतील अर्थव्यवस्थेतील एकूण भांडवल गुंतवणूक अथवा भांडवली साठा आणि त्याद्वारे निर्माण होणारे वार्षिक उत्पादन अथवा उत्पन्न याचे गुणोत्तर होय. थोडक्यात, एखाद्या अर्थव्यवस्थेतील एका वर्षाच्या कालावधीमधील एकूण भांडवल संचयास, त्याद्वारे निर्माण होणाऱ्या एकूण उत्पादनाने अथवा उत्पन्नाने भागले असता, सरासरी भांडवल-उत्पादन गुणोत्तर समजते. सरासरी भांडवल-उत्पादन गुणोत्तराचे मापन करण्यासाठी पुढील समीकरणाचा उपयोग करता येतो.

$$\text{सरासरी भांडवल-उत्पादन गुणोत्तर} = \frac{\text{अर्थव्यवस्थेतील उपलब्ध भांडवलसंचय}}{\text{एकूण वार्षिक उत्पन्न (उत्पादन)}}$$

उदाहरणार्थ, एखाद्या अर्थव्यवस्थेतील एका वर्षाच्या कालावधीमधील एकूण उपलब्ध तसेच वापरात असलेले भांडवल १०० कोटी रुपये किंमतीचे असेल, आणि त्याद्वारे अर्थव्यवस्थेतून निर्माण होणाऱ्या एकूण उत्पादनाचे मुल्य २० कोटी रुपये असल्यास सरासरी भांडवल-उत्पादन गुणोत्तर १०० ह्न २० = ५ इतके म्हणजेच ५:१ आहे, असे म्हटले जाते.

- **सीमांत भांडवल-उत्पादन गुणोत्तर** (Marginal Capital-Output Ratio)

प्रा. जेराल्ड मेयर यांच्या मते, एकूण भांडवल संचयासाठ्यातील निव्वळ बदलांचे, एकूण उत्पादन अथवा उत्पन्नातील निव्वळ वाढीशी असणारे गुणोत्तर म्हणजे सीमांत भांडवल-गुणोत्तर होय. एखाद्या अर्थव्यवस्थेतील भांडवली गुंतवणूकीतील निव्वळ बदलास, त्याद्वारे निर्मित निव्वळ उत्पादन अथवा उत्पन्नातील बदलाने भागल्यास सीमांत भांडवल-उत्पादन गुणोत्तर मिळते. भांडवली गुंतवणूकीमधील निव्वळ वाढ अथवा घटीचा एकूण उत्पादनपातळीत निव्वळ वाढ अथवा घट घडून येण्यावरील परिणामांचे मापन करण्याकरिता सीमांत भांडवल-उत्पादन गुणोत्तर प्रकार उपयुक्त ठरतो. सीमांत भांडवल-उत्पादन गुणोत्तराचे मापन करण्यासाठी पुढील समीकरणाचा उपयोग करतात.

$$\text{सीमांत भांडवल-उत्पादन गुणोत्तर} = \frac{\text{भांडवली गुंतवणूकीतील निव्वळ बदल.}}{\text{राष्ट्रीय उत्पादनातील / उत्पन्नातील निव्वळ बदल}}$$

समजा, आर्तिक नियोजनाद्वारे सुरू करण्यात येणाऱ्या एखाद्या प्रकल्पात (उद्योगास) सुरुवातीस १०० कोटी रुपयांची भांडवली गुंतवणूक करण्यात आलेली असेल, आणि नंतर त्यात ५० कोटी रुपयांची भांडवली गुंतवणूक वाढविली असल्यास त्याचा परिणाम म्हणून उत्पन्नाची (उत्पादनाची) पातळी ५० कोटी रुपयांवरून ६० कोटी रुपयांपर्यंत वाढली असल्यास, निव्वळ उत्पन्न (उत्पादन) पातळीत १० कोटी रुपयांनी वाढ झाली आहे. तेव्हा ५० कोटी रुपयांच्या निव्वळ भांडवली गुंतवणूकीतील वाढीमुळे उत्पन्न (उत्पादन) पातळीत निव्वळ १० कोटी रुपयांची भर पडली. म्हणून ५० ह्व १० = ५ इतके म्हणजे ५:१ एवढे सीमांत भांडवल-उत्पादन गुणोत्तर येते.

सीमांत भांडवल-उत्पादन गुणोत्तराच्या प्रकाराचा उपयोग मुख्यत्वे करून राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर निश्चित करण्यासाठी केला जातो. अर्थव्यवस्थेतील शेती, उद्योग, वाहतूक व दळणवळण इ. क्षेत्रांमधील उत्पादन वाढीचा निर्धारित दर साध्य करण्याकरिता किती प्रमाणात नव्याने भांडवली गुंतवणूक करणे आवश्यक असते, ते सीमांत भांडवल उत्पादन गुणोत्तराद्वारे निश्चित करता येते.

- **भांडवल-उत्पादन गुणोत्तर बदल प्रवृत्ती आणि स्वरूप** (Trends in Capital output Ratio and It's nature) :

विकसनशील आणि विकसित अर्थव्यवस्थांमधील भांडवल-उत्पादन गुणोत्तराचा अनुभवजन्य संशोधनात्मक अभ्यास करण्यात आला आहे. कोलिन क्लार्क, सायमन कुझनेटस् आणि एच लायबेन्स्टाईन यांनी विकसित अर्थव्यवस्थांमधील भांडवल-उत्पादन गुणोत्तर विषयक आकडेवारीचा अभ्यास करून असा निष्कर्ष काढला आहे की, काही कालावधीपर्यंत सुरूवातीस भांडवल-उत्पादन गुणोत्तर वाढत जाते. त्यानंतरच्या कालखंडात भांडवल-उत्पादन गुणोत्तर घटत जाते आणि दिर्घकाळात भांडवल-उत्पादन गुणोत्तरात स्थिरता येत जाण्याची प्रवृत्ती आढळते. अनेक राष्ट्रांमधील अभ्यासावरून असे निष्पन्न झाल्याचे आढळून येते की, सरासरी भांडवल उत्पादन गुणोत्तर ३:१ ते ४:१ या दरम्यान असते. अर्थव्यवस्थेमधील मंदी आर्थिक वृद्धी, कालखंडादरम्यान भांडवल-उत्पादन गुणोत्तर ४:१

पातळीपेक्षा अधिक असते, असे आकडेवारीवर आधारित अभ्यासामधून निष्पन्न झाल्याचे आढळून आले आहे. थोडक्यात आर्थिक विकास प्रक्रियेच्या सुरूवातीच्या कालखंडात भांडवल-उत्पादन गुणोत्तर जास्त असते. नंतर ते घटत जाते.

- **भांडवल-उत्पादन गुणोत्तरावर परिणाम करणारे घटक** (Factors Determining Capital-output Ratio) :

भांडवल-उत्पादन गुणोत्तराचे आकारमान ठरविणारे आणि त्यात बदल घडवून आणणाऱ्या घटकांचा अभ्यास विकास नियोजनातील प्रकल्प अथवा कामांसाठी आवश्यक भांडवलाचे नियोजन करण्याकरिता मार्गदर्शक ठरतो. भांडवल-उत्पादन गुणोत्तराच्या आकारमानावर अनेक घटकांचा प्रभाव पडत असतो. त्यामध्ये देशातील नैसर्गिक साधनसामग्रीची उपलब्धतात व तिची गुणवत्ता, लोकसंख्येचे आकारमान व तिच्या वाढीचा दर, भांडवलाची उपलब्धता, तांत्रिक विकासाची पातळी, बँकिंग क्षेत्रातील व्याजदर पातळी, गुंतवणूकीची रचना, भांडवली साधनांच्या वापरातील कार्यक्षमता, भांडवलाची उत्पादकता, मागणीचे स्वरूप, सरकारचे रोजगार निर्मिती विषयक धोरण आणि इतर बाबींचा समावेश असतो. अलिकडील काळातील जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमूळे आंतरराष्ट्रीय व्यापारातील स्थित्यंतरांचा देखील देशातील भांडवल-उत्पादन गुणोत्तरावर परिणाम घडून येत असल्याचे आढळून आले आहे.

भांडवलाचा काटकसरीने व कार्यक्षमपणे वापर घडून येत असल्यास व भांडवल वापरादरम्यान होणाऱ्या सर्व प्रकारच्या गळती (भ्रष्टाचार) व उणीवा टाळण्यास भांडवल-उत्पादन गुणोत्तराचे आकारमान किमान पातळीवर आणणे शक्य होऊ शकते.

- **संकल्पनेचे महत्त्व** (Importance)

आर्थिक विकासाकरिता आर्थिक नियोजनाचा आराखडा तयार करण्याच्या दरम्यान नियोजनकारांना भांडवल-उत्पादन गुणोत्तराची संकल्पना अनेक संदर्भात मार्गदर्शक ठरते. प्रा. हॅरोड आणि डशेमर यांनी त्यांच्या आर्थिक वृद्धीचे प्रतिमान मांडताना भांडवल-उत्पादन गुणोत्तराच्या संकल्पनेचा उपयोग केला आहे. विशेषत: भांडवलाची टंचाई असलेल्या मागासलेल्या व विकसनशील अर्थव्यवस्थांमध्ये आर्थिक नियोजन अंतर्गत पूर्ण करावयाच्या विविध प्रकल्पांकरिता भांडवली साधनसामग्रीचे वाटप कसे करावे ? याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी ही संकल्पना उपयुक्त ठरते. आर्थिक नियोजनाद्वारे गाठावयाची निर्धारित उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी भांडवल-उत्पादन गुणोत्तर संकल्पना पुढील प्रकारची महत्त्वाची भूमिका पार पाडते.

**१) आर्थिक विकास दर निश्चित करणे :** आर्थिक नियोजनाद्वारे राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांमुळे अर्थव्यवस्था भविष्यात केणत्या दराने विकास साधणार आहे, ते योजनांमध्ये नमूद केलेले असते. अर्थव्यवस्थेतील प्रचलित भांडवल-उत्पादन गुणोत्तर आणि उपलब्ध भांडवल विचारात घेता, अर्थव्यवस्थेचा आर्थिक विकासाचा दर किती राहू शकतो, ते समजण्यास मदत होते. त्याआधारे नियोजनकारांना भविष्यात साध्य करता येऊ शकणारा आर्थिक विकासाचा दर निश्चित करून घोषित करण्यासाठी ही संकल्पना मार्गदर्शक ठरते.

**२) भांडवलाची विभागणी आणि गतिशीलता विषयक नियोजन करणे :** विकसनशील तसेच विकसित

राष्ट्रांमध्ये गुंतवणूकीच्या गरजांच्या मानाने भांडवलाची टंचाई कमतरता असते. अशा परिस्थितीत उपलब्ध भांडवली साधनसामग्रीचे विविध क्षेत्रांमध्ये उत्पादकतेस प्राधान्य देणारे वाटप घडवून आणण्यासाठी व भांडवलाची गतिशीलता वाढविण्यासाठी नियोजन करावे लागते. भांडवल-उत्पादन गुणोत्तर संकल्पनेचा आधार घेऊन विविध क्षेत्रांमधील भांडवली साधनसामग्री वाटपाबाबत नियोजनकारांना अधिक अचूक निर्णय घेणे शक्य होते. ज्या क्षेत्रांमध्ये कमी गुंतवणूक करून अधिक प्रमाणात उत्पादन अथवा उत्पन्न वाढण्याची प्रवृत्ती आढळून येते, अशा क्षेत्रांमध्ये भांडवल गुंतवणूक वाढविण्यास प्राधान्य दिले जाते.

**३) भंडवली साधनसामग्रीची उभारणी करणे :** आर्थिक नियोजनाद्वारे विकास योजनांची अंमलबजावणी करताना आवश्यक भांडवली साधनसामग्रीची जुळवाजुळव करण्यासाठी भांडवल-उत्पादन गुणोत्तर संकल्पना उपयुक्त ठरते. अपेक्षित आर्थिक विकासाचा दर साध्य करण्यासाठी त्या वषार्चया दरम्यान किती भांडवल गुंतवणूकीची गरज आहे ? ते प्रचलित भांडवल-उत्पादन गुणोत्तराच्या आधारे निश्चित करता येते आणि त्यानुसार नियोजनकारांना भांडवलाची जुळवाजुळव अथवा जमवाजमव करण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न करणे शक्य होते. उपलब्ध भांडवल गुंतवणूक क्षमता आणि आवश्यक भांडवली गुतंवणूक पातळी यामधील तफावत (तूट) विचारात घेऊन, ती कोणत्या मार्गांनी / साधनांद्वारे भरून काढता येणे शक्य आहे ? याविषयी निर्णय घेण्यासाठी भांडवल-उत्पादन गुणोत्तर संकल्पना नियोजनकारांना उपयुक्त ठरते.

**४) विदेशी भांडवल प्रवेश विषयक धोरणात्मक निर्णय घेणे :** सर्वसाधारणपणे सर्वच विकसनशील राष्ट्रांमध्ये जलद आर्थिक विकासाचे उद्दिष्ट्य गाठण्याकरिता आवश्यक असणाऱ्या भांडवलांची, गरजेच्या मानाने उपलब्धता कमी असते. देशांतर्गत भांडवल निर्मितीचा दर, भांडवलाच्या एकूण मागणीशी तुलना करता कमी असतो. देशांतर्गत अर्थव्यवस्थेतील भांडवलाची कमतरता भरून काढण्यासाठी विदेशी भांडवलाचा वापर करण्याचा एक पर्याय उपलब्ध असतो. असे विदेशी भांडवल आकर्षित करण्यासाठीचे धोरणात्मक निर्णय घेताना, देशांतर्गत भांडवल -उत्पादन गुणोत्तराचे आकारमान विचारात घ्यावे लागते. देशांतर्गत भांडवल-उत्पादन गुणोत्तरांचे आकारमान कमी असल्यास विदेशी गुंतवणूकदारांना आकर्षित करणे सुलभ जाते. म्हणून विदेशी भांडवल प्रवेशविषयक धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी भांडवल-उत्पादन गुणोत्तर संकल्पना मार्गदर्शक ठरते.

एकूणच, आर्थिक नियोजनाद्वारे विकासात्मक नियोजन कार्यक्रमांची आखणी तसेच अंमलबजावणी करताना, भांडवल-उत्पादन गुणोत्तर संकल्पनेशी निगडीत काही समस्या उपस्थित होतात. त्याचा अचूकपणे वेध घेऊन त्यांचे निराकरण करण्यासाठी नियोजनकारांना प्रयत्न करावे लागतात. उपलब्ध भांडवल, भांडवल संचय वाढविण्यास उपयुक्त साधनांची गतिशीलता व कार्यक्षमता वाढविणे आणि भांडवलाचा अधिकाधिक कार्यक्षमपणे वापर घडवून आणण्यासाठी करावयाचे नियोजन भांडवल-उत्पादन गुणोत्तराद्वारे अधिक सूलभ होते, असे मानले जाते.

### २.२.३ उत्पादन-तंत्राची निवड (The choice of Techniques) :

- **प्रस्तावना** (Introduction)

आर्थिक नियोजनाच्या कार्यवाहीकरिता व त्यातून पूर्ण करावयाच्या कामांबाबत नियोजन यंत्रणेस अनेक बाबतीत

निर्णय घ्यावे लागतात. आणि असे निर्णय घेताना काही समस्या निर्माण होत असतात. त्यापैकीची निर्णय विषयक एक समस्या म्हणजे संबंधित कामे प्रकल्पांच्या पूर्ततेकरिता कोणत्या उत्पादनतंत्राची निवड करावी ही असते. विशेषत: अविकसित, विकसनशील अर्थव्यवस्थेमध्ये नियोजनबद्ध कामांच्या पूर्ततेकरिता आवश्यक असणाऱ्या भांडवलाची टंचाई (Scarcity) असते, तर त्याचवेळी श्रमपुरवठा विपुल प्रमाणात (abundant) उपलब्ध असते. अशा पार्श्वभूमीवर नियोजित कामांकरिता, उत्पादन कार्यासाठी श्रमाचा आणि भांडवलाचा किती प्रमाणात वापर घडवून आणावयाचा ? याविषयी समस्या उद्‌भवते. यास आर्थिक नियोजनातील 'उत्पादन-तंत्राच्या निवडीची समस्या' असे म्हणतात. उत्पादन कार्यासाठी श्रम आणि भांडवल या उत्पादन घटकांच्या संयोगाचे प्रमाण कसे निश्चित करावयाचे? या विषयीचा निर्णय नियोजनकारांना घ्यावा लागतो. त्यातून उत्पादन-तंत्र निवडीबाबत अ) श्रमप्रधान उत्पादन तंत्राची निवड अथवा ब) भांडवलप्रधान उत्पादन तंत्राची निवड असे दोन पर्याय समोर येतता. प्रस्तुत उपघटकात आपण या दोन्ही उत्पादनतंत्र निवडीच्या प्रश्नांचा, त्याचा अर्थ आणि त्यांची गुण-दोषात्मक उपयुक्तता याबाबत स्पष्टीकरण समजावून घेणार  आहोत.

● **उत्पादन-तंत्र निवड समस्या : अर्थ आणि व्याख्या :**

आर्थिक नियोजनाद्वारे सुरू करावयाच्या उत्पादक कामांकरिता, प्रकल्पांकरिता श्रम तसेच भांडवल या दोन उत्पादक घटकांचा एकत्रितपणे वापर घडवून आणावा लागतो. तेव्हा कोणत्याही उत्पादक कामांच्या निमित्ताने त्यांच्या वापराचे प्रमाण निश्चित करण्याच्या दृष्टीकोनाशी संबंधित संकल्पना म्हणजे उत्पादन-तंत्राच्या निवडीची समस्या होय. नियोजित उत्पादक कामांकरिता भांडवलाच्या एककांबरोबर (Units) श्रमाच्या किती एककांचा संयोग (Combination) घडवून आणला जातो ? त्यावरून उत्पादन-तंत्राचे अ) श्रमप्रधान उत्पादन तंत्र आणि ब) भांडवल प्रधान उत्पादन तंत्र असे दोन पर्याय अथवा प्रकार उपलब्ध हातोत. यातील कोणत्याही तंत्राची निवड करावी? याविषयी निर्माण होणारी समस्या 'उत्पादन-तंत्र निवडीची समस्या म्हणून ओळखली जाते. विशेषत: श्रमाचा विपूल प्रमाणात पुरवठा आणि त्यामानाने भाठडवलाचा अत्यल्प, अपूरा पुरवठा करणाऱ्या अर्थव्यव्थांमधील आर्थिक नियोजन अंतर्गत निर्धारित उत्पादक कार्याच्या प्रतिपूर्ती दरम्यान उत्पादन-तंत्र निवड विषयक समस्या नियोजनकारांसमोर द्वदांत्मक स्वरूपात उपस्थित होता.

कोणत्याही प्रकल्पाच्या उभारणीसाठी तसेच त्यातील उत्पादन प्रक्रिया कार्यान्वीत करण्यासाठी श्रम आणि भांडवल या दोन उत्पादन घटकांच्या वापर करण्याशी संबंधित निर्णय घेण्याबाबत उद्‌भवणारी समस्या म्हणजे उत्पादन-तंत्र निवडीची समस्या होय. ''अपेक्षित उत्पादन प्राप्त करण्याकरिता गृहित परिस्थितीत श्रम-प्रधान की भाठडवल-प्रधान उत्पादन-तंत्र निवडावे ? असा निर्माण होणारा प्रश्न म्हणजे उत्पादन-तंत्र निवडीचा प्रश्न होय'' अशी त्याची व्याख्या केली जाते. प्रा. अे. के. सेन "Choice of Techniques" या ग्रंथात असे म्हणतात की, नियोजित विकास कार्यक्रमांतर्गत समाविष्ट प्रकल्प, उत्पादक कार्यासाठी निवडण्यात येणारे उत्पादन-तंत्र, आर्थिक विकासाची निर्धारित व्यूहरचना आणि अर्थव्यवस्थेतील विविध उत्पादक-घटकांची उपलब्धता विषयक स्थितीशी निगडीत असते. उत्पादन घटकांची उपलब्धतेच्या आधारे उत्पादन-तंत्र निवडीचे निर्णय घेतले जातात. विशिष्ट उत्पादन-तंत्र निवडीतून उत्पादनाचा खर्च किमान पातळीवर ठेऊन उत्पादनाच्या प्रमाणात वाढ घडवून आणण्याचे प्रयत्न अपेक्षित असतात.

● **श्रम प्रधान उत्पादन-तंत्र** (Labour Intensive Technique of Production) :

विकास नियोजनातील प्रकल्प उभारणीकरिता तसेच उत्पादन कार्य हाती घेताना ज्या दोन प्रमुख उत्पादन-तंत्राचा उपयोग करता येतो, त्यातील एक उत्पादनतंत्र म्हणजे श्रमप्रधान उत्पादन तंत्र होय. ज्या अर्थव्यवस्थेत श्रमशक्तीचा मुबलक पुरवठा आणि भांडवलाची त्यामानाने टंचाईची स्थिती असते. अशा अर्थव्यवस्थेतील आर्थिक विकासाच्या कार्यक्रमांकरिता श्रमप्रधान उत्पादन तंत्राच्या वापराचे समर्थन केले जाते. अविकसित, विकसनशील देशांमधील बेकारीचा प्रश्न विचारात घेऊन प्रा. नर्क्से, लेविस, मेयर या अर्थतज्ज्ञांनी श्रमप्रधान उत्पादन तंत्राची निवड करण्याचे समर्थन केले आहे. श्रमप्रधान उत्पादन तंत्राची संकल्पना स्पष्ट करण्यासाठी त्याच्या पुढील व्याख्या विचारात घ्याव्या लागतात.

**प्रा. रेड्डावे** (Prof. Reddaway) **यांची व्याख्या :** ज्या उत्पादन तंत्रात कमी भांडवलाच्या जोडीस मोठ्या प्रमाणात श्रम वापरले जातात, त्या उत्पादनतंत्रास श्रमप्रधान उत्पादनतंत्र म्हणता येईल. (Labour intensive of production is one in which a large amount of labour is combined with a small amount of capital (Prof. Reddaway, The Development of the Indian Economy)


**प्रा. एच. मिंट** (Prof. H. Myint) **यांची व्याख्या :** ज्या उत्पादनतंत्रात भांडवलाच्या प्रतिएककामागे अधिक श्रमिकांचा वापर करण्यात येतो. त्यास श्रमप्रधान उत्पादनतंत्र असे म्हणतात. (Labour intensive method of production is one in which a large quantity of labour is utilised with a given unit of capital : prof M. Myint)

श्रमप्रधान उत्पादन तंत्राच्या व्याख्याच्या आधारे या प्रकारच्या उत्पादन तंत्राचे स्पष्टीकरण करता येते. श्रमप्रधान उत्पादन तंत्रानुसार कोणत्याही उत्पादक कार्यासाठी वापरण्यात येणाऱ्या भांडवलाच्या नगांशी तुलना करता श्रमिकांच्या नगांचा (Units) अधिक प्रमाणात वापर केला जातो. या तंत्रात श्रमाच्या एककांच्या मानाने भांडवलाच्या एककांचा कमी प्रमाणात वापर करण्यात येतो म्हणून त्यास 'भांडवलाची बचत करणारे उत्पादन तंत्र असे देखील म्हणतात. श्रमप्रधान उत्पादन तंत्र वापरून देखील विकास नियोजनातील प्रकल्प, कामांमधून अधिक जास्तीत-जास्त उत्पादनाच्या मात्रा/नग साध्य करता येतात.

● **श्रमप्रधान उत्पादन-तंत्र आकृती व स्पष्टीकरण :**

श्रमप्रधान उत्पादन-तंत्राचा उपयोग करून उत्पादन वाढ घडवून आणता येते. त्याचे आकृतीद्वारे स्पष्टीकरण करता येते. त्याकरिता समउत्पादन वक्र विश्लेषणाचा (तंत्राचा) उपयोग केला जातो. आकृती क्र. २.२ मध्ये सम उत्पादनवक्र (isoquant curve) तंत्राच्या आधारे श्रमप्रधान उत्पादन-तंत्राचा वापर करून उत्पादनात कशारितीने वाढ घडवून आणणे शक्य असते ? ते दर्शविले आहे.

**आकृती क्र. २.२ : श्रमप्रधान उत्पादन-तंत्र**




**श्रमिकांचे नग (श्रमाच्या मात्रा/ उत्पादन) मात्रा**

आकृतीत कक$^{१}$ आणि कक$^{२}$ हे दोन किंमतरेषा उत्पादनाकरिता उपयोगात आणल्या जाणाऱ्या भांडवलाचे श्रम आणि श्रमिकांचे नग (मात्रा-५) दर्शवितात. सड आणि स$^{१}$ ड$^{१}$ हे दोन समउत्पादक वक्र आहेत. कक$^{१}$ आणि कक$^{२}$ या दोन किंमत रेषाद्वारे उत्पादनाकरिता प्रत्येक अवस्थेत भांडवल व श्रम यांचे विशिष्ट प्रमाण निवडून घेण्यात येणारे उत्पादन दाखविले आहे. या दोन किंमत रेषा सड आणि स$^{१}$ड$^{१}$ हे दोन समउत्पादन वक्र अनुक्रमे ड$^{२}$ आणि ड$^{३}$ याठिकाणी स्पर्श करून जातात. ड$^{२}$ बिंदूमधून असे व्यक्त होते की, उत्पादनाकरीता अ क इतक्या भांडवलाच्या मात्र (एकक) आणि त्याच्या जोडीस अक$^{१}$ इतक्या श्रमिकांच्या मात्रा (एकक) उपयोगात आणले जाते. तेव्हा मिळणारे उत्पादन ‘अक्ष’ इतके असते. श्रमप्रधान उत्पादन-तंत्र उपयोगात आणताना भांडवलाचे ‘अक’ नग स्थिर ठेवून श्रमाचे नग (मात्रा) क$^{१}$ पासून क$^{२}$ पर्यंत वाढविले जातात. तेव्हा कक$^{२}$ हा भांडवल व श्रमिक यांचे नवीन प्रमाण दर्शविणारी किंमत रेषा काढली आहे. या वक्रास नवीन (स ड या समउत्पादन वक्राच्या उजवीकडील) स$^{१}$ ड$^{१}$ हा समउत्पादन वक्र ड$^{३}$ या बिंदूत स्पर्श करून जातो. ड$^{३}$ या बिंदूतून उत्पादन अक्षावर (अक्ष अक्ष) लंब टाकला असता उत्पादन अश्र$^{१}$ इतके होते असे दिसून येते. म्हणजेच भांडवल वापराच्या मात्रा स्थिर ठेऊन श्रमिकांच्या मात्रांचा वापर वाढविल्याने उत्पादनात श्र पासून श्र$^{१}$ पर्यंत वाढ घडवून आणणे शक्य होते. असे आकृतीमधून स्पष्ट होते.

- **श्रमप्रधान उत्पादन-तंत्राचे लाभ / समर्थन :**

नियोजनबद्ध विकास कार्यक्रमांच्या अंमलबजावणीकरिता श्रमप्रधान उत्पादन-तंत्राचे लाभांचे आणि या तंत्रांचे समर्थन अनेक अर्थशास्त्रज्ञांनी केले आहे. त्यात प्रामुख्याने प्रा. नर्क्से यांचा उल्लेख केला जातो. प्रा. नर्क्से यांनी

स्पष्टपणे असे म्हटले आहे की, विपुल प्रमाणात श्रम पुरवठा उपलब्ध असणाऱ्या अविकसित/विकसनशील देशांनी, विकसित देशांप्रमाणे भांडवलप्रधान उत्पादन तंत्राचा वापर न करता श्रमप्रधान उत्पादन तंत्राचाच उपयोग करावा अशा देशांनी भांडवल प्रधान उत्पादन तंत्र वापरण्यास परानगी देखील देऊ नये.

श्रमप्रधान उत्पादन तंत्राच्या उपभोगाचे लाभ लक्षात घेऊन त्याचे पुढीलप्रमाणे समर्थन केले आहे.

**१) रोजगार संधी निर्माण करणे :** अविकसित/विकसनशील देशांमध्ये भरपूर प्रमाणात श्रमशक्तीचा पुरवठा उपलब्ध असतो. त्यामुळे अशा देशांमध्ये अनेक प्रकारची बेकारी आढळून येते. लोकसंख्येतील वाढीबरोबर ती वाढत जात असते. बेकारीची समस्या सोडविण्यासाठी अशा राष्ट्रांनी श्रमप्रधान उत्पादन-तंत्रांची निवड करणे आवश्यक असते. भाठडवलाच्या मानाने श्रमशक्ती विपुल प्रमाणात असल्याने श्रमस्वस्त असतात. त्यामुळे उत्पादक कार्याकरिता भांडवल प्रधान तंत्राऐवजी श्रमप्रधान उत्पादन-तंत्राचा उफयोग करून रोजगार निर्मिती करता येते.

**२) भांडवल टंचाईच्या स्थितीतून मार्ग काढणे :** अविकसित तसेच विकसनशील राष्ट्रांमध्ये भांडवलाच्या टंचाईची स्थिती असते. श्रमप्रधान उत्पादन पद्धतीचा वापर केल्यास दुर्मिळ असलेल्या भांडवलाचा उपयोग अधिक महत्त्वाच्या उध्योगांमध्ये करता येतो. कमी महत्त्वाच्या उद्योगात श्रमाचा वापर करण्यास प्राधान्य दिल्याने भांडवलाची बचत करता येते. विशेषत: उपभोग्य वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या क्षत्रांमध्ये श्रमप्रधान उत्पादन तंत्र वापरण्यास प्राधान्य दिल्यास भांडवलाच्या टंचाईच्या स्थितीतून मार्ग काढणे शक्य होते. म्हणून श्रमप्रधान उत्पादन तंत्राद्वारे भांडवलाची बचत करणे शक्य होते.

**३) उत्पादन खर्च कमी :** श्रमशक्तीचा भरपूर प्रमाणात पुरवठा असणाऱ्या विकसनशील देशांमध्ये श्रमाचा कमी मोबदले देऊन वापर करणे शक्य अनसते. त्यामानाने भांडवलाची टंचाई असल्याने भांडवलाची किंमत जास्त असते. अशा परिस्थितीत श्रमप्रधान उत्पादन पद्धतीच्या वापरामुळे वस्तू सेवांच्या उत्पादन खर्चात बचत करता येते. विशेषत: ज्या क्षेत्रांमध्ये महागडे तंत्रज्ञान व भांडवलास पर्याय म्हणून श्रमशक्तीचा वापर शक्य असतो, तिथे श्रमशक्तीचा अधिक प्रमाणात वापर करून उत्पादन खर्चात बचत करता येते.

**४) उत्पन्नाचे अधिक समप्रमाणात वाटप :** अविकसित तसेच विकसनशील देशांमध्ये उत्पन्न वाटणीतील विषमतेमुळे गरीबीची समस्या असते. गरीबी कमी करण्यासाठी गरीबांना रोजगार संधी उपलब्ध करून देणे आवश्यक असते. म्हणजेच गरीबी निर्मुलन व रोजगार संधीच्या निर्मितीद्वारे उत्पादनाचे अधिक समप्रमाणात वाटप घडवून आणता येते. यासाठी उत्पादनाच्या कार्यासाठी श्रमशक्तीचा अधिकाधिक उपयोग घडवून आणावा लागतो. श्रमप्रधान उत्पादनतंत्राद्वारे हे शक्य होते. म्हणून आर्थिक विषमतेची समस्या सोडविण्यासाठी श्रमप्रधान उत्पादन-तंत्राचे समर्थन केले जाते.

**५) उपभोग्य वस्तू उत्पादन व उपभोगात वाढ :** अविकसित, विकसनशील देशांमध्ये बहुतांश लोकांची उपभोग पातळी कमी असते. त्यास उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनातील कमतरता आणि लोकांची अल्प खरेदीशक्ती हे घटक जबाबदार असतात. या परिस्थितीमधून मार्ग काढण्यासाठी श्रमप्रधान उत्पादन-तंत्राचा उपयोग उपयुक्त समजला जातो. श्रमप्रधान उत्पादन-तंत्र वापराद्वारे उपभोग्य वस्तूंचे उत्पादन वाढविता येते. श्रमशक्तीचा वापर वाढल्याने त्यांची

उत्पादन पातळी सुधारून त्यांच्या खरेदीशक्तीत वाढ होते. त्यामुळे श्रमप्रधान उत्पादनतंत्राद्वारे अर्थव्यवस्थेत उपभोग्य वस्तू-सेवांच्या उत्पादनात वाढ घडवून आणून लोकांची उपभोग पातळी सुधारण्यास मदत होते. याकरिता श्रमप्रधान उत्पादन-तंत्राचे समर्थन केले जाते.

**६) भांडवलाच्या आयातीवरील अवलंबित्व कमी :** विकसनशील देशांमध्ये मागणीच्या मानाने भांडवलाचा तुटवडा (Scarcity) असते. अशा परिस्थितीत भांडवल प्रधान उत्पादन-तंत्राचा आग्रह धरल्यास भांडवलाची आयात करावी लागते. विदेश भांडवलाच्या आयातीवर विसंबून राहावे लागते. विदेशी भांडवलाच्या आगमनाकरिता अनेक अटींचे पालन करण्याची बंधने स्वीकारावी लागतात. त्याचे अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम संभवतात. असा अनेक विकसनशील राष्ट्रांचा अनुभव देखील आहे. या पार्श्वभूमीवर भाठडवलप्रधान उत्पादन पद्धती ऐवजी श्रमप्रधान उत्पादन पद्धतीचा उपयोग समर्थनीय ठरता. श्रमप्रधान उत्पादन-तंत्रामध्ये स्वदेशातील श्रमशक्तीच्या वापरास प्राधान्य देऊन उत्पादन कार्य सुरू ठेवता येत असल्याने विदेशी भांडवलाच्या आयातीवरील अवलंबित्व टाळता येते.

**७) ग्रामीण अर्थव्यवस्थेचे बळकटीकरण / मजबूतीकरण :** विकसनशील देशांमध्ये ग्रामीण व शहरी अर्थव्यवस्थांमध्ये फार मोठी तफावत आढळून येते. ग्रामीण अर्थव्यवस्थेत एका बाजूला श्रमाचा वापर करण्यासारखी खूप साधनसामग्री व वापरलेल्या स्थितीत असते. तर दुसऱ्या बाजूला बेरोजगार श्रमशक्तीचा भरपूर पुरवठा उपलब्ध असतो. या दोहोंचा वापर घडवून आणल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासास चालना मिळू शकते. हे घडवून आणण्यासाठी तिथे श्रमप्रधान उत्पादन-तंत्र वापरणे आवश्यक समजले जाते. कृषी, रस्ते, मूलभूत सुधारणा इ. क्षेत्रांमध्ये श्रमशक्तीस रोजगार संधी उपलब्ध करून दिल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थेचे बळकटीकरण, मजबुतीकरण शक्य होते. याकरिता ग्रामीण विभागाच्या विकासाकरिता श्रमप्रधान उत्पादनतंत्र अधिक उपयुक्त ठरते. असे त्याचे समर्थन करता येते.

याबरोबरच श्रमप्रधान उत्पादन-तंत्रामुळे भाववाढीचे नियंत्रण, उद्योगांचे विकेंद्रीकरण, लघुउद्योगांना चालना, आर्थिक व सामाजिक सुधारणांवर भर देण्याचे उद्देश साध्य करण्याकरिता श्रमप्रधान उत्पादन तंत्राचा वापर उपयुक्त समजला जातो.

- **भांडवलप्रधान उत्पादन-तंत्र** (Capital Intensive Technique of Production) :

अविकसित, विकसनशील अर्थव्यवस्थांमधील श्रमशक्तीचा मुबलक पुरवठा आणि भांडवलाची कमतरता या गृहित परिस्थितीच्या आधारे तिथे श्रमप्रधान उत्पादन-तंत्र निवडीचे समर्थन केले जाते. परंतु श्रमप्रधान उत्पादन पद्धतीद्वारे आर्थिक विकासाचा जलद दर साध्य करण्याबाबत काही मर्यादा येतात. म्हणून अशा अर्थव्यवस्थांमध्ये विकास नियोजन अंतर्गत काही प्रकल्प/कामांकरिता भांडवल प्रधान उत्पादन तंत्राची निवड करणे उपयुक्त ठरते. गॅलेनूसन आणि लायबेन्स्टाईन (Galenson and Leibenstein) यांच्या मते, स्थूलमानाने मागासलेल्या अर्थव्यवस्थांमध्ये आर्थिक विकासाची प्रक्रिया अधिक गतिमान करण्यासाठी, उत्पन्न वाढीत सात्य टिकवून ठेवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग अनिवार्य असतो. म्हणजेच अशा देशांमध्ये भांडवल प्रधान उत्पादन-तंत्राचा अवलंब करावा लागतो.

- **व्याख्या आणि अर्थ** (Definition and meaning)

'भांडवलप्रधान उत्पादन-तंत्र' संकल्पनेचा अर्थ समजावून घेण्यासाठी तिच्या काही व्याख्यांचा आढावा घ्यावा लागतो. प्रा. मिंट यांनी भांडवल प्रधान उत्पादन तंत्रांची व्याख्या करताना असे म्हटले आहे की, उत्पादनाच्या प्रती एककामागे किंवा प्रति-श्रमिकामागे भांडवलाचे प्रमाण श्रमप्रधान उत्पादन-तंत्रापेक्षा, भांडवल प्रधान उत्पादन तंत्रात अधिक असते. उत्पादन कार्यासाठी भांडवल व श्रमिकांच्या मात्रांचा संयोग घडवून आणताना प्रति श्रमिकापाठीमागे अधिक भांडवलाच्या मात्रांचा उपयोग केला जात असल्यास त्यास भांडवल प्रधान उत्पादन-तंत्र असे म्हणतात. भांडवलप्रधान उत्पादनतंत्र, श्रमप्रधान उत्पादन तंत्राच्या निवडीस असणाऱ्या एक अत्यावश्यक पण सुरुवातीच्या टप्प्यात अधिक खर्चिक वाटणारा पर्याय समजण्यात येतो.


विशेषत: श्रमशक्तीचा पुरवठा मर्यादित असताना आणि भांडवली साधनसाम्रगीची विपुलता असताना उत्पादक प्रकल्प उभारणी करित भांडवलप्रधान उत्पादन-तंत्र वापरणे अधिक संयुक्तिक ठरते. अलिकडील कालखंडात विकसित राष्ट्रांप्रमाणे अविकसित तसेच विकसनशील राष्ट्रांकडून देखील भांडवल प्रधान उत्पादनतंत्राचा काही प्रकल्प उभारणीसाठी वापर केला जातो.

- **भांडवलप्रधान उत्पादन तंत्र : आकृती व स्पष्टीकरण :**

भांडवल प्रधान उत्पादन-तंत्रात श्रमशक्तीची कमी प्रमाणात तर भांडवलाचा अधिक प्रमाणात वापर केला जातो. श्रमशक्तीच्या मात्रांचा वापर स्थिर ठेऊन, त्यांच्या जोडीस भांडवलाच्या मात्रांचा अधिक प्रमाणात वापर करून उच्च उत्पादनपातळी गाठता येते. असे हे तंत्र सुचित करते. भांडवलप्रधान उत्पादन-तंत्राचे समर्थन करण्यासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या आकृतीद्वारेत यांचे स्पष्टीकरण करता येते.

भांडवलप्रधान उत्पादन तंत्राचे स्पष्टीकरण आकृती क्र. २.३ द्वारे समजावून घेता येते.

**आकृती क्र. २.३ : भांडवलप्रधान उत्पादन तंत्र**



आकृतीत कभ आणि कभ१ हे दोन वक्र भांडवल व श्रम या दोन उत्पादन घटकांच्या वापराचे प्रमाण दर्शवितात. त्यांना किंमत रेषा असे म्हणतात. कभ किंमत रेषेच्या मानाने कभ१ किंमत रेषा असे व्यक्त करतो की, श्रमिकांच्या नगांचा वापर स्थिर होऊन भांडवलाच्यानगांचे प्रमाण वाढवून उत्पादन कार्य सुरू केले जाते. सड आणि सड१ हे दोन सम उत्पादन वक्र असून ते कभ आणि कभ१ या किंमत रेषांना अनुक्रमे ड२ आणि ड३ या ठिकाणी स्पर्श करून जातात. त्यातून कभ आणि कभ१ या वक्रावरील भांडवल व श्रमिकांचा उत्पादन कार्यासाठी विशिष्ट प्रमाणात होणारा वापर आणि सड आणि सड१ या समउत्पादन वक्राद्वारे तिथे उत्पादन विषयक समतोल साधलेले ड२ आणि ड३ हे निर्माण झालेले बिंदू आहेत. याचा अर्थ असा होतो की, अक इतके श्रमिकांचे नग आणि अभ इतके भांडवलाचे नग वापरून होणाऱ्या उत्पादनापेक्षा अक इतके श्रमिकांचे नग स्थिर ठेऊन भांडवलाचे भ ते भ१ पर्यंत नग उत्पादनास वापरल्यास उत्पादनात ड२ पासून ड३ पर्यंत वाढ घडवून आणता येते. म्हणजेच भांडवल प्रधान तंत्रात श्रमिकांच्या मात्रांचा वापर कायम (स्थिर) ठेऊन, त्याच्या जोडीस भांडवलाच्या मात्रांचा (quantity) वापर वाढविल्यास अधिक प्रमाणात उत्पादन घेता येणे शक्य होते. भांडवल प्रधान उत्पादन-तंत्रात काही वेळा श्रमिकांच्या मात्रांचा वापर पूर्वीपेक्षा कमी करून आणि भांडवल प्रधान उत्पादन-तंत्रात काही वेळा श्रमिकांच्या मात्रांचा वापर पूर्वीपेक्षा कमी करून आणि भांडवलाचा वापर घडवून उच्चतर उत्पादन पातळी साध्य करता येते.

- **भांडवल प्रधान उत्पादन-तंत्राचे लाभ (समर्थन) :**

विकास नियोजनातील प्रकल्प उभारणी आणि त्यातून उत्पादन कार्य सुरू करण्याकरिता उत्पादनतंत्र निवडीची समस्या उद्भवते. तेव्हा भांडवल प्रधान उत्पादन-तंत्राची निवड कशी लाभदायक असते ? त्याचे समर्थन केले जाते. प्रा. लायबेन्स्टाईन, प्रा. पॉल बॅरान, प्रा. हर्शमन आणि प्रा. मॉरिस डॉब या अर्थतज्ञांनी भांडवलप्रधान उत्पादन-तंत्रांचे समर्थन करणारे काही युक्तीवाद भांडले आहेत. या अर्थतज्ज्ञांच्या मते, विकसनशील तसेच विकसित देशांनी भांडवलप्रधान उत्पादन-तंत्र वापरल्यास त्यांना पुढीलप्रमाणे लाभ साध्य करता येतात.

**१) आर्थिक विकासाचा जलद दर साध्य करता येतो :** भांडवल प्रधान उत्पादन-तंत्राचा अवलंब करून देशांना आर्थिक विकासाचा जलद दर (rapid growth rate) साध्य करणे शक्य होते. श्रमाच्या तुलनेत भांडवली साधनसामग्रीचा अधिक प्रमाणात वापर केल्याने उत्पादनात जलद गतीने वाढ घडून येते. उत्पादनवाढीतून संयोजकांना मिळणारा नफा पुन्हा गुंतवणूकीकरिता वापरला जातो. त्यामुळे दिर्घकाळात श्रमावरील वेतनखर्च कमी राहतो. या प्रक्रियेमधून भांडवलाचा अधिकाधिक वापर शक्य होऊन उत्पादनाच्या दरात वाढ घडवून आणणे शक्य होते. म्हणून आर्थिक विकासाच्या जलद दर साध्य करण्याकरिता भांडवलप्रधान उत्पादन पद्धतीचे समर्थन केले जाते. भारतीय आर्थिक नियोजनांतर्गत आर्थिक विकासाच्या योजनांद्वारे या युक्तिवादाची सत्यता अनुभवास आलेली आहे.

**२) उत्पादनाच्या दर्जात सुधारणा घडवून आणता येते :** भांडवलप्रधान उत्पादन-तंत्राद्वारे वस्तू तसेच सेवांच्या उत्पादनाच्या दर्जात सुधारणा घडून आणता येतात. भांडवली साधनसाम्रगीच्या उपयोगात सुधारित तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराचा समावेश असतो. तसेच नव-नवीन यंत्रसामग्रीच्या वापराचा समावेश असतो. यांच्या वापरामुळे चांगल्या प्रतिच्या वस्तू, सेवांची निर्मिती शक्य होते. एकतर भांडवल प्रधान उत्पादन पद्धतीमुळे उत्पादनात वाढ घडून येते. आणि दुसऱ्या बाजूने उत्पादनाचा दर्जा चांगला असतो. त्यामुळे ग्राहकांना चांगल्या

प्रतीच्या वस्तू कमी किंमतीस पुरवणे शक्य होते. म्हणून भांडवल प्रधान उत्पादन-तंत्राचे समर्थन केले जाते.

**३) उत्पादन खर्चात घट होते :** श्रमाच्या तुलनेत भांडवलाचा अधिक प्रमाणात वापर केल्याने दिर्घकाळात वस्तू-सेवांच्या उत्पादनात तर वाढ होत जातेच. पण पुढे-पुढे वस्तू-सेवांचा उत्पान खर्च देखील घटत जातो. एकदा भांडवली साधनसामग्री व आधुनिक यंत्रसामग्री, तंत्रज्ञान वापरण्यास सुरूवात केली की, त्याचा अनेक वर्षे सातत्याने गुणवत्तापूर्णरित्या वापर केला जातो. श्रमाच्या बाबतीत असे बहुधा घडून येत नाही. भांडवली साधनांद्वारे मोठा प्रमाणशत तसेच सातत्यपूर्ण उत्पादन प्राप्त होत असल्याने उत्पादनाचा सरासरी खर्च कमी होऊ लागतो. तिथे अनेक प्रकारच्या अंतर्गत व बाह्य बचती अनुभवास येऊ लागतात. म्हणून भांडवल प्रधान उत्पादन-तंत्र निवडीद्वारे उत्पादन खर्चात घट घडून येण्याचा लाभ घेता येतो. उदा. माहिती तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर झाल्यानेच भारतात अलिकडील कालखंडात ग्राहकांना भ्रमणध्वनी सेवा (Mobile Services) कमी किंमतीत उपलब्ध झाल्याचे दिसून येत आहे.

**४) श्रमिकांच्या उत्पादकतेत वाढ होते :** अलिकडील काळातील उत्पादन कार्याकरिता भांडवल प्रधान उत्पादन पद्धतीच्या वापरामुळे श्रमिकांची उत्पादकता वाढण्यास मदत झालेली आहे. प्रा. हर्शमन यांच्यामते श्रमाच्या बरोबरीने उच्चप्रतीचे तंत्रज्ञान, यंत्रसामग्री उत्पादन कार्याकरिता वापरल्याने श्रमिकांची उत्पादकता वाढविता येते. कारण भांडवलप्रधान उत्पादन पद्धती श्रमिकांची कुशलता व कार्यक्षमता वाढविण्यास मदत करते. विशेषत: काही प्रकारच्या उत्पादक कार्यासाठी भांडवलाचा वापर अनिवार्य असल्यास व तिथे श्रमशक्तीच्या वापराची फारशी गरज नसल्यास किंवा श्रमाबरोबर भांडवलाचा वापर अनिवार्य असल्यास तिथे भांडवलप्रदान उत्पादन पद्धतीचेच समर्थन करणे संयुक्तीक ठरते.

**५) श्रमप्रधान उत्पादन पद्धती परिणामांची पूर्तता करणे :** श्रमप्रधान उत्पादन तंत्रामुळे ग्रामीण भागात छुपी बेकारीची समस्या निर्माण होऊन ग्रामीण बेरोजगार शहरांकडे स्थलांतरीत होतात. शहरातील लोकसंख्या त्याद्वारे वाढते. शहरी लोकसंख्येच्या पाणी, रस्ते, शिक्षण, आरोग्य सारख्या सेवांची पुर्तता करण्याकरिता भांडवली गुंतवणूकीची आवश्यकता निर्माण होते. म्हणजेच श्रमप्रधान उत्पादन पद्धतीचा अवलंब केल्यामूळे अर्थव्यवस्थेत निर्माण होणऱ्या परिणामांचे निराकरण करण्यासाठी नंतरच्या टप्प्यात भांडवलप्रधान उत्पादन-तंत्राच्या उपयोगाची व वापराची गरज भासते. प्रा. पॉल बॅरान यांनी या संदर्भातील विश्लेण मांडून भांडवलप्रधान उत्पादन पद्धतीचे समर्थन केले आहे. त्यांच्यामते अविकसित, विकसनशील देशांनी उलपब्ध मर्यादित भांडवलाचा वापर श्रमप्रधान उत्पादन कार्याकरिता न वापरता तो थेट भांडवलप्रधान उत्पादन कार्यासाठी वापररे अशा देशांकरिता अधिक फायदेशीर ठरते.

**६) तांत्रिक विकास प्रेरणा निर्माण होतात :** विकसनशील देश त्याचंयाकडील सुमार दर्जाचे तंत्रज्ञानाचा श्रमप्रधान उत्पादन कार्यासाठी वापरत असतात. त्यामुळे सुधारित तंत्रज्ञान वापरण्यासाठी भांडवलाचा जास्तीत जास्त वापर करण्याकडे दुलक्ष होते. त्यामुळे आर्थिक विकासाचा वेग मंदावतो. या पार्श्वभूमीवर विकसनशील राष्ट्रांनी सुरूवातीपासूनच भांडवल प्रधान तंत्र अंगिकारण्यास सुधारित तंत्रज्ञानाचा, यंत्रसामग्रीचा उपयोग करण्याची वृत्ती, व इच्छा शक्ती बळकट होते. म्हणून अर्थव्यवस्थेत भांडवल प्रधान तंत्र वापरल्यास नव-नवीन सुधारित तंत्रज्ञान वापरण्याची

नियोजनकारांची प्रवृत्ती बळावते. प्रा. पॉल बॅरान यांनी म्हणूनच भांडवलप्रधान उत्पादन तंत्र वापरण्याचे समर्थन केले आहे.

**७) सामाजिक व आर्थिक सेवांची कार्यक्षमपणे प्रतिपूर्ति होते :** सभाजाच्या सामाजिक तसेच आर्थिक विकासाच्या वाटचालीत नियमित वीजपुरवठा, पेयजल पुरवठा, रस्ते, रेल्वे वाहतूक व दळणवळण तसेच आरोग्य, निवारा, शिक्षण विषकय सेवा-सुविधांकरिताची मागणी जलद गतीने वाढत जाते. श्रमप्रधान उत्पादनतंत्राचा अवलंब केल्यास या सामाजिक व आर्थिक सेवांची परिकारकरित्या प्रतिपूर्ति होण्यावर मर्यादा येतात. याकरिता भांडवलप्रधान उत्पादन पद्धतीद्वारे किंमती यंत्रसामग्री आणि आधुनिक सुधारित तंत्रज्ञान यांचा वापर करूनच समाजाच्या सामाजिक व आर्थिक गरजांची प्रतिपूर्ति करणे आवश्यक असते. म्हणून भांडवल प्रधान उत्पादन तंत्राचे समर्थन करण्यात येते.

**८) विस्तारक परिणामांचा लाभ घेता येतो :** श्रमप्रधान उत्पादन-तंत्रापेक्षा भांडवलप्रधान उत्पादन-तंत्राचे अर्थव्यवस्थेवरील विस्तारक परिणाम अधिक व्यापक व प्रभावी असतात. विस्तारक परिणामांमुळे अर्थव्यवस्थेत अनेक घटक आपोआप कार्यरत होऊन आर्थिक विकासाची गतिमानता वाढवितात. उदाहरणार्थ भांडवलप्रधान उत्पादन तंत्राद्वारे शेतीकरितांचे खत कारखाने वाढले की, शेतकऱ्यांना खतांची पूरेशा प्रमाणात उपलब्धता होते. शेतकरी खतांचा वापर करून शेतमाल उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न करतात. हा विस्तारक परिणाम असतो. मोठ्या अवजड उद्योगांची उभारणी, वीजप्रकल्प, धरणांची कामे याकरिता भांडवल प्रधान उत्पादन-तंत्र वापरल्याने त्यापासून निर्माण होणाऱ्या विस्तारक परिणामांची अर्थव्यवस्थेस लाभ मिळतात. विस्तारक परिणाम संकल्पना गुन्नार मिर्डाल यांची आहे. थोडक्यात विस्तारक परिणामांचे लाभ साध्य करण्याकरिता भांडवल प्रधान उत्पादन तंत्राचे समर्थन केले जाते.

भांडवल प्रधान उत्पादनतंत्राचे अशा रितीने समर्थन केले जात असले तरी विकसनशील अर्थव्यवस्थांमध्ये या तंत्राच्या वापराबाबत काही मर्यादा व समस्या देखील उद्भवतात. म्हणून विकसनशील देशांनी, सरसकट सर्व प्रकारच्या प्रकल्पांकरिता भांडवल प्रधान उत्पादन-तंत्र वापरणे त्यांच्या दृष्टीकोनातून हितावह ठरत नाही. भांडवलाची उपलब्धता, तंत्रज्ञान वापरण्यासाठीची पर्यावरणीय स्थिती, श्रमशक्ती पुरवठ्याचे आकारमान, रोजगार निर्मितीची गरज इ. बाबी विचारात घेऊन उत्पादनतंत्र निवडक विषयक निर्णय घेणे हितावह, फायदेशीर ठरते.

● **सारांश :**

विकास नियोजन अंतर्गत योजनांची आखणी तसेच अंमलबजावणी करताना नियोजन मंडळाने कोण-कोणत्या तांत्रिक बाबींचा सुक्ष्मपणे अभ्यास केलेला असणे, आवश्यक असते, त्यांचा विकास नियोजन विषयक दृष्टीकोनात विचार करण्यात येतो. विकसनशील तसेच विकसित देशांमधील नियाजेन यंत्रणेकडून आदान-प्रदान तक्ता, भांडवल-उत्पादन गुणोत्तर, प्रकल्प मुल्यमापन विषयक खर्च-लाभ विश्लेषण तंत्र आणि उत्पादन-तंत्र निवड याविषयीचे पुरेपूर आकलन करून घेतलेले असल्यास, नियोजनबद्ध विकास कामांमधील प्रकल्प निवड व उपलब्ध साधनसामग्रीचा वापर याविषयी जास्तीत-जास्त अचूक (Precision) व शास्त्रीय निकषांच्या आधारे निर्णय घेतले जाऊ शकतात.

विकास नियोजनाविषयक वर उल्लेखलेल्या दृष्टीकोनांच्या अधीन राहून योजनांची आकारणी व अंमलबजावणी होत असल्यास नियोजनांतर्गत निर्धारित केलेली अशक्यप्राय वाटणारी उद्दिष्ट्ये देखील साध्य केली जाऊ शकतात.

### २.२.४ प्रकल्प मुल्यमापन : अर्थ आणि महत्त्व (Project Evaluation : Meaning and Importance)

**प्रस्तावना :**

आर्थिक नियोजनाद्वारे आर्थिक विकासाची निर्धारित उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी विकास योजनांची (Development plans) आखणी व अंमलबजावणी केली जात असते. तेव्हा विविध क्षेत्रांसाठी प्रकल्प तयार केले जात असतात. अशा प्रकलपांवर सरकारी तिजोरीतून पैसे खर्च केले जातात. या खर्चामधून पूर्ण होणाऱ्या प्रकल्पांचा अपेक्षित लाभ (Benefit) देशातील नागरिकांना किती व कसा मिळणार आहे ? त्याचे पूर्व अनुमान काढणे आवश्यक असते. नियोजन अंतर्गत केल्या जाणाऱ्या गुंतवणूकीचे, खर्चाचे (cost) आणि त्यातून निर्माण होणाऱ्या सर्व संभाव्य लाभांचे अचूक मोजमाप केल्याने, नियोजनकारांना, नियोजित प्रकल्पांबाबत संशक्त व परिणामकारक निर्णय घेण्यास मदत होते. नियोजन विषयक सशक्त (efficient) निर्णय प्रक्रियेसाठीचे एक उपयुक्त साधन म्हणून 'प्रकल्प मुल्यमापन विषयक विश्लेषण' संकल्पनेकडे पाहिले जाते. म्हणून पाठीमागील दोन ते तीन दशकांपासून विकास नियोजनाच्या कार्यक्रमांकरिता प्रकल्प मूल्यमापन विश्लेषण निकष (criterion) लावला जात आहे. प्रकल्प मुल्यमापन विश्लेणात प्रामुख्याने प्रकल्पांवरील खर्च आणि त्यापासूनचे फायदे यांचे जास्तीत-जास्त शास्त्रीयपणे विश्लेषण मांडलेले असते. म्हणून प्रकल्प मुल्यमापन 'विश्लेषणास' खर्च-लाभ विश्लेषण (Cost-Benefit Analysis) म्हणून देखील संबोधले जाते.

- **व्याख्या : अर्थ :**

विकास नियोजनाच्या माध्यमातून सुरू करण्यात येणाऱ्या प्रकल्पांचे सर्व संभाव्य यश आणि अपयशाचे मूल्यांकन करून त्यात आवश्यक त्या सुधारणा घडवून आणण्याबाबत शिफारस करण्याच्या कार्याशी निगडीत असलेली प्रकल्प मुल्यमापन संकल्पना विकास नियोजनाचा अविभाज्य घटक मानला जातो. प्रकल्प मुल्यमापन संकल्पनेची सर्व समावेशक व्याख्या करणे अवघड असले तरी काही संशोधनात्मक अभ्यासांमध्ये त्याची व्याख्या करण्याचे प्रयत्न झाले आहेत.

- **हायन, रॉईट आणि होपकिन्स यांच्या व्याख्या :**

नियोजनाच्या प्रक्रियेअंतर्गत सुरू करण्यात येणाऱ्या अथवा सुरू केलेल्या कोणत्याही प्रकल्पांची पुढील वरच्या दिशेने होणारी चक्राकार वाटचाल, तसेच त्या प्रकल्पाबाबतच्या सामाजिक कृतीचा निकाल (Results of Social Actions) या विषयीची वस्तुस्थिती शोधण्याच्या कार्यप्रणालीशी निगडीत संकल्पना म्हणजे प्रकल्प मुल्यमापन होय. प्रकल्प मुल्यमापन हे प्रकल्पाच्या अनुशंगाने उपस्थित होणाऱ्या व एकमेकांशी संबंधित असलेल्या अनेक घटकांच्या परिणामांच्या अवलोकनार्थ सुज्ञपणे केलेल्या कृतीचा पद्धतीशीररित्या घेतलेला आढावा असतो.

("Project evaluation refers to the procedures of fact finding about results o fplanned social action, which in turn move the spiral of planning over upward. It is the proper

mothodological accompinement of rational action" : Hyman, Wright and Hopkins)

मिश्रा आणि पुरी यांनी 'Development and Planning : Theory and Practice" या ग्रंथात प्रकल्प मुल्यमापनास (evaluation) 'प्रकल्प मुल्यांकन' (Project Appraisal) असे देखील संबोधले आहे. त्याच्या मते, ''नियोजन अंतर्गत केल्या जाणाऱ्या सार्वजनिक गुंतवणूकीचे प्रमाणित दृष्टकोनानुसार (Standard approach) विश्लेषण करण्यासाठी उपयोगात आणले जाणारे तंत्र म्हणजे प्रकल्प मुल्यमापन होय. सार्वजनिक क्षेत्राद्वारे केल्या जाणाऱ्या गुंतवणूक विषयक विश्लेषणात प्रकल्पाचा आर्थिक खर्च आणि त्यातून निर्माण होणाऱ्या आर्थिक, सामाजिक लाभांचे मुल्यांकन करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पद्धतीस प्रकल्प मुल्यमापन असे म्हणतात. प्रकल्प मुल्यमापन हे खर्च-लाभ विश्लेषण तंत्राचा वापर करून प्रकल्पाचे मुल्यांकन करण्याच्या कार्याशी निगडीत असते.

अे. आर. प्रेस्ट व आर. तुर्वे (A. R. Prest and R. Turvey) यांनी 'Cost -Benefit Analysis' या लेखात असे म्हटले आहे की, विकास नियोजनामधील सार्वजनिक गुंतवणूकीद्वारे सुरू करावयाच्या वेगवेगळ्या प्रकल्पांचे सामाजिक दृष्टीकोनातून मुल्यांकन हेतूने खर्च-लाभ तत्त्वाच्या आधारे विश्लेषण म्हणजे 'प्रकल्प मूल्यमापन' होय.

थोडक्यात नियाजेन अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांचे राष्ट्रीय दृष्टीकोनातून महत्त्व व उपयुक्तता यांचे मुल्यमापन करण्याकरिता खर्च-लाभ विश्लेणाच्या पद्धतीचा उपयोग केला जातो. प्रकल्पांबाबतचे खर्च-लाभ विश्लेषण हे प्रकल्प मुल्यमापनाचे शास्त्रीय व उपयुक्त साधन मानले जाते. योजना तयार करताना, प्रकल्पांची निवड करण्याकरिता, नियोजन मंडळास साधनसामग्री व भांडवली गुंतवणूक विषयक पर्याप्ततेची कसोटी साध्य करण्याकरिता प्रकल्प मुल्यमापन मार्गदर्शक ठरते.

- **प्रकल्प मुल्यमापन पद्धती :**

प्रकल्प मुल्यमापन म्हणजेच प्रकल्पविषयक 'खर्च-लाभ विश्लेषण' प्रक्रिया पार पाडताना, ते कार्य एका विशिष्ट चाकोरीबद्धरित्या पार पाडावे लागते. प्रकल्प मुल्यमापनाचे स्पष्टीकरण व अर्थ समजावून घेण्यासाठी प्रकल्प मुल्यमापन पद्धतीचा अभ्यास उपयुक्त ठरतो. या दृष्टीकोनातून हे कार्य पुढील घटकांशी व त्याच्या विश्लेषणाशी संबंधित असते.

१) प्रत्येक प्रकल्पाच्या तांत्रिक व आर्थिक गुणवैशिष्ट्यांचा आढावा घेणे.

२) प्रकल्पांचा अर्थव्यवस्थेवरील परिणाम शोधणे. हा परिणाम प्रकल्प उभारणी आणि प्रकल्पांच्या प्रत्यक्ष कार्यवाही दरम्यानचा असतो. प्रकल्पांवरील गुंतवणूक पूर्ण झाल्यानंतर त्यावरील एकूण खर्च आणि निर्मित लाभ शोधणे व त्यांच्या मापनाच्या पद्धती निश्चित करणे.

३) प्रकल्पांचे अर्थव्यवस्थेवरील अनुकूल व प्रतिकूल परिणाम असे वर्गीकरण करून, प्रल्पांमधून निर्माण लाभांचे सवलत/सुट दर (Discount rate) या स्वरूपात विश्लेषण मांडणे.

४) प्रकल्प निवडीचे निकष (criterion) निश्चित करणे आणि अंमल बजावणी दरम्यान येणाऱ्या अडथळ्यांचा शोध घेणे.

● **प्रकल्प मुल्यमापन : संक्षिप्त इतिहास** (A capsul History of Project Evaluation) :

प्रकल्प मुल्यमापन हे विकास नियोजनात वापरण्यात येणाऱ्या एक महत्त्वाचे तंत्र असुन त्याचा अलिकडील काळातील नियोजन प्रक्रिया तसेच कार्यवाहीमध्ये वाढत्या प्रमाणात उपयोग केला जात आहे. सार्वजनिक क्षेत्राद्वारे केल्या जाणाऱ्या गुंतवणूकीचे विश्लेषण करण्यासाठी एक 'प्रामाणिक दृष्टीकोन' (Standard Approach) म्हणून विकास नियोजनात त्याचा वापर केला जातो. अमेरिकेतील जागतिक महामंदीवरील उपाययोजनांकरीता सुरू करण्यात आलेल्या 'नवीन आर्थिक सुधारणांच्या कार्यक्रम अंमलबजावणी (New Deal Policy) दरम्यान 'खर्च-लाभ विश्लेषण' (प्रत्यक्षातील त्यावेळचे नाव लाभ-खर्च विश्लेषण) या स्वरूपात प्रथम त्याचा उपयोग करण्यात आला. १९५८ मध्ये लॅटिन अमेरिकेत स्थापन करण्यात आलेल्या संयुक्त राष्ट्र आयोगाने (United Nations Organisation) प्रकल्प मुल्यमापन संकल्पनेबाबत पहिला पद्धतशीर अभ्यास पूर्ण केला. त्यानंतर हे तंत्र संयुक्त राष्ट्राच्या आर्थिक सहकार्य आणि विकासासाठीचे संघटन (United Nations Organisation for Economic Co-operation and Development) आणि औद्योगिक विकास संघटन (United Nations Industrial Development organisation) या संस्थांनी विकसित करण्यामध्ये मोलाची कामगिरी पार पाडली आहे. तेव्हापासून या पद्धतीचा/तंत्राचा अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळींवरील संस्थांकडून उपयोग केला जात असून या पद्धतीचा जास्तीत-जास्त सुधारित शास्त्रोक्त आणि अचूकरित्या (Precision) वापर करणयचे प्रयत्न केले जात आहेत. भारतीय आर्थिक नियोजन प्रक्रियेत १९५८ मध्ये प्रा. डी. आर. गाडगीळ यांनी देशातील निवडक ६ प्रकल्पांचा यापद्धतीने प्रथम अभ्यास केला.

● **प्रकल्प मुल्यमापन : तयारीतील टप्पे आणि सादरीकरण** (Project Evaluation : Stages and Presentation) :

विकास नियोजनाद्वारे अर्थव्यवस्थेत शेती, उद्योग, बांधकाम, दळणवळण इत्यादी क्षेत्रांशी संबंधित प्रकल्पांची उभारणी केली जात असत. अशा प्रकल्पांवर सार्वजनिक क्षेत्राद्वारे मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होणार असते. नियोजनकारांना या प्रकल्पावर करावा लागणारा विविध स्वरूपातील खर्च (प्रकल्प उभारणी खर्च) आणि त्यापासून संबंधित क्षेत्रांना/अर्थव्यवस्थेस मिळणारे लाभ, यांची स्पष्ट कल्पना येण्यासाठी, त्याचा ताळेबंद दृष्टीपथात येण्यासाठी प्रकल्पांचे मुल्यमापनात्मक विश्लेषण करावे लागते. त्याकरिता अशा प्रकल्पांचा मुल्यांकन अहवाल (Project Apraisal Report) तयार करण्यात येतो. हे कार्य बरेच गुंतागुंतीचे व किचकट स्वरूपाचे असते. त्याकरिता तंत्रज्ञ, अभियंते संख्याशास्त्रज्ञ आणि अर्थतज्ज्ञांच्या सेवांचा संभाव्य खर्च व प्रकल्पांपासून निर्माण होणारे सर्व संभाव्य लाभ याबाबतची पूर्ण सुसध्यता (Pre-Feasibility) याचा अभ्यास करावा लागतो. हा अभ्यास प्रकल्पांची व्यापक उद्दिष्ट्ये आणि प्रकल्पांबाबतचे विविध पर्याय यांची नेमकेपणाने मांडणी करणारा असतो. म्हणून प्रकल्प अहवाल हा प्रकल्पांबाबतचा शक्यता/संभाव्यता अहवाल (Project Feasiblity Report) म्हणून देखील संबोधला जातो. प्रकल्प मुल्यमापनाची प्रक्रिया प्रकल्प अहवालाद्वारे सुरू होते. आणि मग पुढे खालील सर्व घटकांच्या अभ्यासाचे सादरणीकरण त्यात समाविष्ट असते. त्यालाच प्रकल्प मुल्यमापन अहवालाचे टप्पे असे देखील म्हणतात. अर्थात सर्व प्रकल्पांचे मुल्यांकन अहवाल एकसारखेच असतात असे नाही. तर प्रकल्पांच्या प्रकार व स्वरूपानुसार त्यात थोडीफार तफावत/वेगवेगळेपणा असु शकतो.

- **निर्देश अटी** (Terms of Reference) :

प्रकल्प मूल्यमापन अहवालातील हा पहिला टप्पा असुन त्यास प्रकल्पांच्या मूल्यमापनाच्या 'संदर्भ शर्ती' असे देखील म्हणतात. प्रकल्प मूल्यमापनातील या टप्प्यात पूर्व सुसाध्यता अभ्यासाच्या आधारावर मांडण्यात येणऱ्या बाबींचा समावेश असतो. तो प्रकल्प मुल्यांकन  गटास मार्गदर्शक म्हणून उपयोगी ठरतो. निर्देशअटींमध्ये संबंधित पकल्प मूल्यमापनातील कोणत्या पूर्व सुसाध्यता अहवालाच्या आधारे बाबींवर भर देण्यात यावा याविषयी मार्गदर्शक सुचना नमूद केलेल्या असतात. त्यात प्रकल्पाची व्याख्या, प्रकल्प उभारणीची उद्दिष्ट्ये, प्रकल्प अहवाल तयार करण्याची उद्दिष्ट्ये व प्रकल्पाची ढोबळ रूपरेषा (Outline of project) या बाबींचा समावेश असतो.

- **स्थापत्यशास्त्रीय अभ्यास** (Engineering study)

स्थापत्यशास्त्रीय दृष्टीकोनातून प्रकल्पाचा अभ्यास करणे हा प्रकल्प मुल्यमापनातील एक टप्पा असतो. स्थापत्यशास्त्रीय दृष्टीकोनातील प्रकल्पाच्या अभ्यासाद्वारे प्रकल्पाची तांत्रिक सुसाध्यता निश्चित करण्यास मदत होते. प्रकल्पाची भौतिक बाबतची गुणवैशिष्ट्ये स्थापत्यशास्त्रीय अभ्यासाद्वारे शोधली जाऊन मांडली जातात. प्रकल्पाचा आराखडा, बांधकामाचे स्वरूप त्याचे आकारमान, त्यातून उत्पादित वस्तू / सेवांचे तांत्रिक स्वरूप, प्रकल्प उभारणीचा कालखंड इ. घटकांचे या विभागात/टप्प्यात विश्लेण मांडलेले असते.

- **वित्तीय अभ्यास** (Financial Study) :

या विभागत / टप्प्यात प्रकल्प उभारणीच्या कामास येणाऱ्या उत्पादन खर्चाचे अंदाज करण्यात  आलेले असतात. प्रकल्प उभारणीस येणाऱ्या खर्चाची चालू बाजारभावाने किंमत निश्चित करून, त्याचे जमा खर्चाच्या स्वरपूात हिशोब मांडलेले असतात. प्रकल्पाच्या वित्तीय अभ्यासाद्वारे प्रकल्पाकरिता किती खर्च येणार आहे ? ते पैशाच्या स्वरूपात (Monetary value) स्पष्ट केलेले असते.

- **खर्च-लाभ विश्लेषण** (Cost-Benefit Analysis) :

प्रकल्प मुल्यमापन कायातील सर्वात महत्त्वाचे स्पष्टीकरणात्मक विश्लेषण करण्याचा टप्पा म्हणून प्रकल्पाच्या 'खर्च-लाभ विश्लेषण' कार्याकडे पाहिले जाते. यामध्ये प्रकल्पाचे आर्थिक खर्च आणि प्रकल्पापासून निर्माण होणाऱ्या सर्व संभाव्य लाभांचे मुल्यांकन तसेच त्याविषयीचे पर्याय यांचे विश्लेषण समाविष्ट असते. प्रकल्पाच्या या विभाागत खर्च, लाभ आणि त्याचे अर्थव्यवस्थेवरील सर्व संभाव्य परिणाम अधोरेखित केलेले असातत. प्रकल्प उभारीस मान्यता, मंजूरी देणे का आवश्यक आहे किंवा नाही याबाबतचे विश्लेषण, समर्थन प्रकल्पाच्या या विभागात मांडण्यात आलेले असते.

- **प्रकल्पाची अंमलबजावणी** (Implementation of Project) :

प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर त्याच्याशी संबंधित प्रशासनास कोणत्या बाबींची प्रतिपूर्ती करावी लागणार आहे? त्याचे या भागात सादरीकरण केलेले असते. प्रकल्प सुरू करण्यासाठी आवश्यक साधनसामग्रीची मागणी यात नमूद करण्यात आलेली असते. तसेच काही ठिकाणी प्रकल्पांच्या अनुशंगाने उपस्थित होणाऱ्या सामाजिक व पर्यावरणीय घटकांचे परिक्षण या भागात नमूद करण्यात आलेले असते. एकूणच प्रकल्प उभारणी

दरम्यानच्या काळातील साधनसामग्रीच्या मागणी व त्यांच्या वापराची अनुसुची (schedule) या टप्प्यात नमूद केलेले असते.

- **शिफारशी** (Recommendation) :

प्रकल्प मुल्यांकन प्रक्रियेतील हा शेवटचा टप्पा समजला जातो. या टप्प्यात प्रकल्पाचा संक्षिप्तपणे घोषवारा (summary) देत असताना, प्रकल्पाच्या समर्थनार्थ अतवाविरोधातील सुचना तसेच शिफारसी नमूद करण्यात येतात. प्रकल्पाबाबत अंतिम निर्णय घेण्यासाठी प्रकल्पाचा हा विभाग निर्णायक मार्गदर्शक समजला जातो. प्रकल्प उभारणीची आर्थिक, सामाजिक तसेच राष्ट्रीय आवश्यकता आणि त्याचे अनुकूल-प्रतिकूल परिणाम ठळकपणे या विभाागत मांडण्यात आलेले असतात.

नियोजनाच्याद्वारे सुरू करावयाच्या प्रकल्पांबाबत वर नमूद करण्यात आलेल्या सर्व प्रक्रियांची प्रकल्प मूल्यमापन अहवालात सविस्तरपणे चर्चा करण्यात आलेली असते. प्रकल्पांचे अशारितीने मुल्यांकन करून ते नियोजनमंडळास सादर करण्यात येते. ते नियोजनमंडळाने मान्य केल्यानंतर प्रकल्प उभारणीस मान्यता दिली जाते. आणि विकास नियोजनाद्वारे असे प्रकल्प उभारण्यास सुरूवात केली जाते.

- **विकास नियोजनातील महत्त्व** (Importance in Development Planning) :

आर्थिक नियोजनाद्वारे आर्थिक विकास धोरणाची निर्धारित उद्दिष्टे साध्य करण्याकरिता अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांमध्ये सार्वजनिक गुंतवणूकीद्वारे निरनिराळे प्रकल्प सुरू करण्यात येतात. अशा प्रकल्पांवर शासनाच्या तिजोरीतील महसुल खर्च करण्यात येतो. आणि तो पैसा जनतेचा असतो. तेव्हा प्रकल्पांवर केल्या जाणाऱ्या खर्चातून सामाजिक, आर्थिक विकासाची तसेच राष्ट्रीय हिताची कामे, नागरिकांच्या गरजा यांची प्रतिपूर्ति व्हावी अशी त्या प्रकल्पांपासूनची अपेक्षा असते. हा हेतू साध्य होण्यासाठी नियोजनातील प्रत्येक प्रकल्पाचे सर्व-लाभ दृष्टिकोनातून मुल्यांकन करणे आवश्यक समजले जाते. नियोजनांतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांबाबत सशक्त निर्णय प्रक्रियेचे कार्य यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी प्रकल्प मुल्यमापन हे एक प्रभावी साधन/तंत्र मानले जाते. प्रत्येक योजनाकाळात राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी, त्याचे मुल्यांकन निर्णायक उपयुक्त ठरते. प्रकल्प मुल्यमापन विश्लेषण पद्धतींच्या काही मर्यादा गृहित धरून देखील, प्रकल्पांचे मुल्यमापन जास्तीत-जास्त काळजीपूर्वक व अचूकरित्या झाल्यास, निर्धारित प्रकल्पांपासूनचे लाभ वृद्धिंगत करता येऊ शकतात. एकूणच नियोजनाच्या यशस्वी व कार्यक्षम कार्यवाहीत प्रकल्प मुल्यमापन पुढीलप्रमाणे महत्त्वाची भूमिका पार पाडते.

**१) प्रकल्पांचा तुलनात्मक अभ्यास करता येतो :** आर्थिक नियोजनातील निश्चित केलेली उद्दिष्टे गाठण्यासाठी अनेक प्रकारचे प्रकल्प कार्यान्वित करावे लागतात. एखाद्या उद्दिष्टाची पूर्तता करण्यासाठी एकमेकांना पर्याय ठरू शकणारे काही प्रकल्प असू शकतात. उदा. देशातील ऊर्जेची गरज पूर्ण करण्यासाठी पाण्यापासून वीज निर्मिती करणारे, कोळशापासून वीज निर्मिती करणारे, सुर्यापासून वीज निर्मिती करणारे प्रकल्प सुरू करण्याचे पर्याय उपलब्ध असतात. यापैकी कोणता पर्याय स्वीकारणे अधिक किफायतशीर ठरू शकते ? याविषयीचा निर्णय घेण्यासाठी या प्रकल्पांचा तुलनात्मक अभ्यास करावा लागतो. असा अभ्यास प्रकल्प मुल्यमापन विश्लेषण तंत्राचा उपयोग करून करता येतो. प्रकल्पांच्या तुलनात्मक अभ्यासासाठी प्रकल्प मुल्यमापन उपयुक्त ठरते.

**२) प्रकल्पांवरील गुंतवणूक खर्चाचे पूर्वानुमान निश्चित करता येते :** कोणताही एखादा खाजगी अथवा सार्वजनिक उपक्रमांतर्गत सुरू करावयाचा प्रकल्प पूर्णत्वाला जाण्यासाठी त्यावर वेगवेगळ्या स्वरूपाचा गुंतवणूक खर्च करावा लागतो. प्रकल्पांकरिता जमिन संपादन, बांधकाम, मशनरी, तंत्रज्ञान, कच्चा माल तसेच श्रमशक्ती इ. चा वापर करावा लागतो. त्यासाठी प्रत्येक बाबीवर कराव्या लागणाऱ्या सर्व संभाव्य खर्चाचे स्वरूप, तसेच प्रकल्पावरील एकूण खर्च यांचे अनुमान, अंदाज नियाजेनमंडळास तयार करावे लागतात. कोणत्याही निवडलेल्या प्रकल्पाच्या प्रारंभापासून ते त्याचे काम पूर्णत्वास जाण्यापर्यंतच्या दरम्यान त्यावर एकूण किती भांडवली गुंतवणूक खर्च करावा लागेल याची तपशिलवार माहिती मिळाल्यास नियोजनकारांना संबंधित प्रकल्पाकरिता भांडवल गुंतणूक विषयक नियोजन करता येते. प्रकल्प मुल्यमापनासाठी वापरण्यात येणाऱ्या खर्च-लाभ विश्लेषणाचा नियाजेनकारांना याबाबतीत मार्गदर्शक उपयोग होतो.

**३) बिगर-किफायदशीर प्रकल्पांची ओळख होते :** विकास नियोजनाच्या माध्यमातून नागरिकांच्या, समाजाच्या गरजांची प्रतिपूर्ति व्हावी अणि प्रकल्प राष्ट्रीय हित साधणारे असावेत अशी प्रकल्प सुरू करताना नियोजनकारांची भूमिका असते. अनेकवेळा समाजातील काही वर्गाच्या अतिआग्रही मागणीची पूर्तता करण्यासाठी, राजकीय हितसंबंध साधण्यासाठी काही प्रकल्पांचा नियोजनात समावेश करण्याचा राज्यकर्ते आग्रह धरतात. अशा प्रकल्पांवर करावा लागणारा खर्च व त्याचे निव्वळ तसेच समग्र लाभ यांचा प्रकल्प मुल्यमापन अतिअल्प, जेमतेम असल्याचे निष्पन्न झाल्यास, ते प्रकल्प राष्ट्रीय दृष्टीकोनातून बिगर किफायतशीर आहेत, अशी त्यांची ओळख (identification) नियोजनमंडळास पटवून देता येते. प्रकल्प मूल्यमापनामुळे बिगर-किफायतशीर प्रकल्प ओळखणे शक्य होते.

**४) प्रकल्पांचे दुष्परिणाम अधोरेखित करता येतात :** प्रकल्प मूल्यमापन विश्लेषणामध्ये प्रकल्पांचे लाभ निर्धारित करून त्याचे चलनीय स्वरूपातील प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष लाभ व दुष्परिणाम यांचे मापन केले जाते. प्रकल्प उभारणीकरिता वापरावी लागणारी साधनसामग्री, नैसर्गिक साधनसंपत्ती, त्यामुळे तिचा होणारा ऱ्हास, निर्माण होणारे पर्यावरणीय प्रश्न इत्यादीचा प्रकल्प मूल्यमापनात तज्ज्ञ अभ्यासकांकडून आढावा घेतला जातो. प्रकल्पांपासून निर्मित लाभांप्रमाणेच त्याचे तोटे, दुष्परिणाम निदर्शनास आले जातात. त्यमुळे नियोजनातील प्रकल्पांचा सर्व बाजुंनी अभ्यास होतो. आणि प्रकल्पांच्या अंमलबजावणीमुळे हमखास उद्भवणारे प्रश्न अथवा त्याचे संभाव्य तोटे यांचे पूर्व अंदाज समजल्याने नियोजनकारांना प्रकल्प निवडीबाबत निर्णय घेणे सुलभ हाते. प्रकल्पांची फेररचना, त्याच्यातील तपशिल याबाबत सुधारणा करण्याची संधी प्रकल्प मूल्यमापनाद्वारे प्राप्त होते. राष्ट्रीय चिरंतन विकास उद्दिष्ट अबाधित ठेवण्यासाठी प्रकल्प मूल्यमापनातील खर्च-लाभ विश्लेषण निर्णायक महत्त्वाची भूमिका पार पाडते.

**५) प्रकल्प-देखरेख कार्यक्षमता विषयक महत्त्व** (Project : Efficient Monetaring) : प्रकल्प मुल्यमापन विषयक विश्लषण, प्रकल्पांच्या उभारणी व कार्यवाही दरम्यानच्या काळात नियोजनकारांना समुद्रातील दिपस्तंभाप्रमाणे दिशादर्शकाचे कार्य करते. प्रकल्प उभारणीच्या काळात त्यावर होत जाणारा खर्च आणि प्रत्यक्षात त्यासाठीच वित्तीय, भौतिक तरतूद यांची स्थिती नियोजनकारांना प्रकल्प मुल्यमापनाद्वारे वेळोवेळी समजण्यास मदत होते. त्यामुळे प्रकल्पांसाठीच्या निधीचा वापर करताना कोणती काळजी घेतली पाहिजे, ते नियोजनकारांना समजण्यास

मदत होते. अनावश्यक, चूकीच्या पद्धतीने होणारा खर्च टाळण्याबाबतचे नियोजन करता येते. प्रकल्पांची देखरेख करण्यासाठी, त्यात कार्यक्षमता निर्माण करण्यासाठी प्रकल्प मूल्यमापन नियोजनकारांना उपयुक्त ठरते.

एकूणच विकास नियोजनाच्या वाटचालीत कार्यक्षज्ञता व गतिमानता आकारण्याकरिता प्रकल्प मूल्यमापन विश्लेषण महत्त्वाची भूमिका पार पाडते. नियोजित विकासाच्या आवाढव्य आराखड्यात सुसूत्रता आणण्यामध्ये मूल्यमापनाचे प्रोत्साहन मिळते. नियोजित प्रकल्पांची निर्धारित अपेक्षित दिशाभूल वाटचाल, त्याचे परिणाम आणि त्यांची वेळोवेळची प्रत्यक्षातील स्थितीची कल्पना व पुढील वाटचालीचे नियोजन याकरिता प्रकल्पांचे मूल्यमापन महत्त्वाचे मानले जाते.

## २.३ सारांश :

आर्थिक नियोजनाद्वारे जलद आर्थिक विकासाचे उद्दिष्ट साध्य करता येत असले तरी त्याचा आराखडा तयार करण्यापासून ते त्याची अंमलबजावणी करण्यापर्यंतच्या टप्प्यांमध्ये अनेक बाबींचा अंतर्भाव होत असतो. आदान-प्रदान विश्लेषण, भांडवल-उत्पादन गुणोत्तर, उत्पादन तंत्राची निवड आणि प्रकल्प मुल्यमापन याबाबत निर्माण होणाऱ्या समस्यांची नियोजनकारांची राष्ट्रीय स्वरूपातील विश्लेषण जाणून घेतलेली असावी लागतात. विकास नियोजन विषयक कार्यक्रमांची आखणी, निवड करताना, विकास नियोजन विषयक समस्यांचा पूरेसा परिचय असला तरच योजनाची अपेक्षित उद्दिष्ट्ये गाठणे शक्य होते.

## २.४ पारिभाषिक शब्द :

- **प्रवाह गुणांक** (Flow Coefficients) : स्थितीशील आर्थिक विश्लेषण पद्धतीत एका क्षेत्रातील आदाने व प्रदाने आणि क्षेत्रांमधील आदाने-प्रदाने यांच्यातील संबंध (relationship) दर्शविण्याकरिता वापरली जाणारी संकलपना. एका क्षेत्रात वापरलेल्या आदानांमुळे निर्माण होणाऱ्या प्रदानांचा प्रवाह, इतर क्षेत्रांकडून आदाने या स्वरुपात किती प्रमाणात वापरला जातो, त्याचे मापन करण्यासाठी ही संकल्पना वापरता येते.

- **भांडवल गुणांक** (Capital Coefficients) : गतिशील आर्थिक विश्लेषणात भांडवलाची रचना प्रदानांच्या आकारमानातील बदलांबरोबर बदलत जाते. त्याचे विशिष्ट दिलेल्या कालखंडात मापन करण्याकरिता या संकल्पनेचा वापर केला जातो.

- **भांडवल** (Capital) उत्पादन कार्याच्या हेतूने वापरण्यात येणाऱ्या यंत्रे व इतर साधन सामग्रीचे पैशातील मुल्य, भांडवल हे मानवाकडून निर्माण केले जाते व मानवी प्रयत्नांद्वारे त्यात वाढ घडवून आणता येते. उत्पादनाद्वारे निर्मित उत्पादक साधने म्हणजे भांडवल होय.

- **नियोजन व्यूहरचना** (Planning strategy) : व्यूहरचनेस 'डावपेच' असे देखील म्हणात. नियोजनाची व्यूहरचना म्हणजे काही विशिष्ट उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी प्रकल्पांचा जाणिवपूर्वक करण्यात येणारा आराखडा, जसे बेकारी कमी करण्यासाठी श्रमप्रधान उत्पादन तंत्र वापरले की, बेकारी कमी होत जाऊन त्यातून दारिद्र्य कमी होण्यास मदत होते.

- **विस्तारक परिणाम** (Spread Effects) : कोणत्याही एखाद्या क्षेत्रात आर्थिक अथवा सामाजिक सुधारणांच्या कार्यक्रमामुळे इतर क्षेत्रांमध्ये घडून येणारे अनुकूल, चांगले परिणाम म्हणजे विस्तारक परिणाम होय. ही संकल्पना गुन्नार मिर्डाल यांनी विकास सिद्धांतात मांडली आहे.

- **सम उत्पादन वक्र** (Isoquant Curve) : उत्पादनविषयक समतोल स्थितीचे विश्लेषण करण्यासाठी वापरण्यात येणारे भूमितीय तंत्र, कोणत्याही दोन उत्पादन घटकांच्या वापराचे प्रमाण कमी-अधिक केले तरी एकूण उत्पादन पातळी स्थिर असणाऱ्या समतोल स्थितीचे स्पष्टीकरण समउत्पादन वक्राच्या आधारे करता येते.

## २.५ स्वयं अध्यनासाठी प्रश्न :

### (अ) पुढील दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

१) विकसित अर्थव्यवस्थांमधील भांडवल-उत्पादन गुणोत्तराची अनुभवजन्य आकडेवारी ............ यांनी संकलित केली आहे.

अ) लायबेन्स्टाईन ब) सायमन क्रुझनेटस् क) पॉल बॅरान ड) गुन्नार मिर्डाल

२) विशिष्ट काळातील उपलब्ध एकूण भांडवल संचय आणि त्याच काळातील एकूण उत्पादन यांच्या गुणोत्तरास ............ म्हणतात.

अ) सरासरी भांडवल-उत्पादन गुणोत्तर ब) सीमांत भांडवल-उत्पादन गुणोत्तर

क) स्थीर भांडवल-उत्पादन गुणोत्तर ड) यापैकी नाही.

३) आदान-प्रदान विश्लेषण तंत्राचा शोध सर्वप्रथम ............ यांनी लावला.

अ) आर्थर लेविस ब) प्रा. हर्शमन

क) डब्ल्यू. डब्ल्यू. लिऑनटिप ड) पॉल बॅरान

४) प्रकल्प मुल्यमापन विषयक खर्च-लाभ विश्लेषण पद्धतीचा वापर सर्वप्रथम ............ या देशशत करण्यात आला.

अ) भारत ब) इंग्लंड क) जपान ड) अमेरिका

५) भारतात ............ यांनी सर्वप्रथम प्रकल्पमुल्यमापन पद्धतीचा नियोजनातील प्रकल्पांचे मूल्यमापन पद्धतीचा अवलंब केला.

अ) महालनोबिस ब) प्रा. राज

क) डी.आर. गाडगीळ ड) डॉ. रामनारायण

६) प्रकल्पांच्या तुलनात्मक अभ्यासाकरिता ............ चा अभ्यास उपयुक्त मानला जातो.

अ) आदान-प्रदान विश्लेण    ब) प्रकल्प मुल्यमापन

क) उत्पादन-तंत्र निवड    ड) यापैकी नाही.

७) भांडवल प्रधान उत्पादन-तंत्रात ............ स्थिर ठेऊन भांडवलाचा अधिक प्रमाणात वापर केलेला असतो.

अ) श्रमिकांची संख्या    ब) भांडवलाची संख्या    क) विदेशी भांडवल    ड) यापैकी नाही

८) विकसनशील देशांकरिता श्रमप्रधान उत्पादन-तंत्राचे ............ यांनी समर्थन केले आहे.

अ) लिऑनटिफ    ब) प्रा. नर्क्से    क) लायबेनूस्टाईन    ड) गॅलेनूसन

९) आर्थिक विकासाचा जलद दर साध्य करण्यासाठी ............ उत्पादन तंत्र अधिक उपयुक्त समजले जाते.

अ) भांडवल प्रधान    ब) श्रमप्रधान    क) स्थिर उत्पादन प्रमाण    ड) अ आणि ब

१०) विस्तारक परिणामांचा लाभ घेण्याकरिता ............ उत्पादन तंत्र वापरण्याचे समर्थन केले जाते.

अ) श्रमप्रधान    ब) भांडवलप्रधान    क) मध्यममार्गी    ड) अ आणि क

**(ब) पुढील विधाने चूक की बरोबर आहेत ते सांगा.**

१) आदान-प्रदान विश्लेषणाकरिता समउत्पादन तंत्र विश्लेषण उपयोगात आणले जाते.

२) श्रमप्रधान उत्पादन-तंत्राद्वारे विकसनशील देशांमधील बेकारीची समस्या सोडविण्यास मदत होते.

३) प्रा. पॉल बॅरान यांनी भांडवल प्रधान उत्पादन तंत्राचे समर्थन केले नाही.

४) खर्च-लाभ विश्लेषणाचा भांडवल-उत्पादन गुणोत्तर मापनाकरिता उपयोग केला जातो.

५) प्रकल्प अहवालामध्ये प्रकल्पांच्या पूर्व सुसाध्यता अहवालाचा समावेश असतो.

६) विस्तारीत परिणाम संकल्पना गुन्नार मिर्डाल यांनी सर्वप्रथम मांडली आहे.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय :

**(अ) दिर्घोत्तरी प्रश्न.**

१) भांडवल-उत्पादन गुणोत्तर म्हणजे काय ? भांडवल-उत्पादन गुणोत्तराचे नियोजनातील महत्त्व स्पष्ट करा.

२) आदान-प्रदान विश्लेषण तंत्राची व्याख्या आणि त्याचे कोष्टक स्पष्ट करा.

३) उत्पादन-तंत्र निवड समस्या म्हणजे काय ? श्रमप्रधान उत्पादन तंत्राचे समर्थन करा.

४) प्रकल्प मुल्यमापन म्हणजे काय ? प्रकल्प मुल्यमापन अहवालातील टप्पे स्पष्ट करा.

५) भांडवलप्रधान उत्पादन-तंत्राची व्याख्या करून त्याचे समर्थनार्थ युक्तीवाद मांडा.

**(ब) टीपा लिहा.**

१) भांडवल-उत्पादन गुणोत्तर संकल्पनेचे महत्त्व.

२) सरासरी आणि सीमांत भांडवल उत्पादन गुणोत्तर

३) भांडवलप्रधान उत्पादन-तंत्राचे लाभ

४) आदान-प्रदान विश्लेषण तक्ता

५) प्रकल्प मुल्यमापनातील टप्पे.

## २.७ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **(अ)** | १) अ | २) अ | ३) क | ४) ड | ५) क | |
| | ६) ब | ७) अ | ८) ब | ९) अ | १०) ब | |
| **(ब)** | १) चूक | २) बरोबर | ३) चूक | ४) चूक | ५) बरोबर | ६) बरोबर |

## २.८ क्षेत्रीय कार्य :

१) तुमच्या गावात / शहरात सुरू असणाऱ्या खाजगी-सार्वजनिक क्षेत्रातील उत्पादन-तंत्र निवड विषयक स्थितीचा तुलनात्मक आढावा घ्या.

२) तुमच्या गावात/शहरात सुरू असणाऱ्या खाजगी-सार्वजनिक क्षेत्रातील उत्पादन-तंत्र निवड विषयक स्थतीचा तुलनात्मक आढावा घ्या.

## २.९ अधिक वाचनाकरीता संदर्भ :


१) Mishra and Purei : Development and Planning : Theory and Practice

२) M. L. Jhingam : Economic Development and Planning

३) Bengmin Higgins : Economic Development

४) डॉ. ज. फा. पाटील, पी. जे. ताम्हणकर : विकास व नियोजनाचे अर्थशास्त्र.

५) काटे, भोसले : आर्थिक विकास आणि नियोजनाचे अर्थशास्त्र.

६) वाळके, रायखेलकर : आर्थिक विकास व आर्थिक नियोजनाची मुलतत्त्वे.


⟐⟐⟐

घटक ३

# भारतातील आर्थिक नियोजन - भाग १

अनुक्रमणिका


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

 ३.२.१ नियोजन
 ३.२.२ नियोजन प्रक्रिया
 ३.२.३ नियोजन मंडळ आणि राष्ट्रीय विकास परिषदेची भूमिका
 ३.२.४ निती आयोग

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द

३.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

३.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.७ सरावासाठी स्वाध्याय

३.८ संदर्भ ग्रंथ


## ३.० उद्दिष्टे (Objectives)

या घटकांच्या अभ्यासानंतर आपणास-

- भारतीय नियोजनासाठी झालेले प्रयत्न समजावून घेता येतील.
- भारतीय नियोजनाच्या प्रकियेतील विविध टप्पे समजावून घेता येतील.
- नियोजन मंडळाची भूमिका आणि राष्ट्रीय विकास परिषदेची भूमिका समजावून घेता येईल.
- समतोल क्षेत्रीय विकासाची गरज समजावून घेता येईल.

## ३.१ प्रास्ताविक- ( Introduction)

घटक क्र. २ मध्ये आपण विकासात्मक नियोजनाच्या समस्या समजून घेण्यासाठी आदान-प्रदान विश्लेषण अर्थ व त्याचा नियोजन प्रक्रियेतील उपयोग विकसनशील देशातील असलेला भांडवल तुटवडा लक्षात घेता अल्पशा भांडवल गुंतवणूकीतून अधिकाधिक परतावा मिळण्यासाठी प्रयत्न करावा लागतो. त्यासाठी भांडवल उत्पादन गुणोत्तर संकल्पना लक्षात घेतली. अर्थव्यवस्थेत विकासाच्या कोणत्या अवस्थेत श्रमप्रधान तंत्रज्ञान व भांडवल प्रधान तंत्रज्ञान निवडावे हा एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो. त्याची सविस्तर चर्चा केली आणि शेवटी प्रकल्प मूल्यमापन याचा अर्थ व महत्त्व इ. गोष्टी जाणून घेतल्या. प्रस्तुत घटक क्र. ३ मध्ये भारतातील नियोजन प्रक्रिया प्रत्यक्षात कशी राबवली जाते व नियोजनाला बळकटी येण्यासाठी नियोजन मंडळ व विकास परिषदेची भूमिका काय व शेवटी देशामध्ये समतोल क्षेत्रीय विकासाची गरज का वाटते इ. बाबींची सविस्तर चर्चा करणार आहोत.

## ३.२ विषय विवेचन :

### ३.२.१ नियोजन :

आर्थिक नियोजन ही संकल्पना भारतासारख्या देशाला अगदी पूर्णपणे नविन नाही. ब्रिटीश राजवटीत सुद्धा आर्थिक नियोजनासंदर्भात विचार करण्यात आला होता. प्रथम आर्थिक नियोजनाच्या संदर्भामध्ये भारतातील नियोजित अर्थव्यवस्था हा ग्रंथ सर एम्. विश्वेश्वरय्या यांनी १९३४ मध्ये प्रकाशित केला. या मंडळाने १९४९ मध्ये आपला अहवाल सादर केला. पं. जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने राष्ट्रीय नियोजन मंडळाची स्थापना केली.

देशाची साधनसामग्री संघटीत करून तिचा जास्तीत जास्त उपयोग करून घेऊन योजलेली सामाजिक उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी आखण्यात आलेली पद्धती म्हणजे आर्थिक नियोजन होय.' भारतीय नियोजन मंडळ भारतामध्ये १९५० च्या पूर्वीच्या कालखंडामध्ये इतरही विविध योजनांची आखणी करण्यात आली. त्यापुढीलप्रमाणे

**अ) मुंबई योजना :**

जानेवारी १९४४ मध्ये जी योजना तयार करण्यात आली तीला मुंबई योजना म्हणून ओळखले जाते. ही योजना मुंबई मधील प्रसिध्द आठ उद्योगपतींनी तयार केली होती. याला टाटा बिर्ला योजना असेही म्हटले जाते. ही योजना १५ वर्षासाठी तयार करण्यात आली होती त्यासाठी १०,००० कोटी रूपये खर्च करण्यात येणार होते. या योजनेमध्ये दरडोई उत्पन्न दुप्पट, राष्ट्रीय उत्पन्न तिप्पट करण्याचे उद्दीष्ट होते. याशिवाय १९४४ च्या आकडेवारीच्या तुलनेत पंधरा वर्षात शेती उत्पादन १३० टक्के, औद्योगिक उत्पादन ५०० टक्के, आणि सेवा क्षेत्राचे २०० टक्के वाढविण्याची योजना तयार करण्यात आली होती.

**ब) जनता योजना :**

श्री. एम. रॉय यांनी या योजनेची आखणी केली होती. ही योजना १० वर्षांसाठी तयार करण्यात आली होती.

या योजनेसाठी १५,००० कोटी रूपये खर्च करण्याचे उद्दिष्ट होते. या योजनेमध्ये शेतीचा विकास, उपभोग्य वस्तूंचे उत्पादन व शेतीचे राष्ट्रीयीकरण यावर विशेष भर देण्यात आला होता.

**क) गांधी योजना :**

म. गांधी यांच्या तत्वज्ञानावर आधारित ही योजना तयार करण्यात आली होती. वर्धा कॉमर्स कॉलेजचे प्राचार्य एस. अग्रवाल यांनी १९४४ मध्ये छोटीशी योजना तयार केली होती. या योजनेचा अंदाजे खर्च ३५०० कोटी रूपये एवढा होता. विकेंद्रीत स्वयंपूर्ण शेती विकास त्याचबरोबर कुटीर उद्योगांचा विकास यावर भर देण्याचे उद्दिष्ट होते. ही मूलत: कल्पनावादी योजना होती. ज्यामध्ये मूलभूत व अवजड उद्योगांच्या विकासाकडे दूर्लक्ष करण्यात आले होते.

**ड. युध्दानंतरची पुनर्बांधणी योजना :**

भारतातील ब्रिटीश सरकारने सर अर्धेशिर दलाल यांच्या अध्यक्षतेखाली १९४४ 'नियोजन विभागाची' (Planning Department) स्थापना केली.या विभागाने दुसऱ्या महायुध्दाच्या काळात अल्पकालीन व दिर्घकालीन विविध योजना तयार केल्या. १९४६ मध्ये त्या अंमलात आणण्यासाठी नियोजन सल्लागार मंडळाने सरकारकडे आग्रह धरला.

**इ) कोलंबो योजना :**

मार्च १९५० मध्ये भारतीय सरकारने पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली नियोजन मंडळाची (Planning Commission) स्थापना केली. या मंडळाने सहा वर्षाची कोलंबो योजना तयार केली. या योजनेमध्ये दक्षिण व दक्षिणपूर्व आशियामधील लोकांचे रहाणीमान उंचावण्यासाठी अन्नधान्य उत्पादन, औद्योगिक कच्चामालाचे उत्पादन व अंतिम वस्तूंचे उत्पादन वाढविणे इ. उद्दीष्टे होती. ही योजना १,३३९ कोटी रूपयाची होती. ही रक्कम १९५०-५१ च्या विकास प्रकल्पावर खर्च करण्याचेही सूचविण्यात आले.

**फ) नियोजन मंडळ व योजना** (Planning Commission And The Plans)

मार्च १९५० मध्ये भारत सरकारने भारताचे त्यावेळचे पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन मंडळाची (Planning Commission) स्थापना केली. देशातील साधनसंपत्तीच्या अधिक परिणामकारक व समतोल वापरासंदर्भात योजना आखण्यासाठी या मंडळाची स्थापना करण्यात आली होती. नियोजन मंडळाने जुलै १९५१ मध्ये पहिल्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा प्रसिध्द केला. सन १९५१ पासून आतापर्यंत देशात एकूण अकरा पंचवार्षिक योजना (२००७-१२) पूर्ण झाल्या असून सध्या बारावी पंचवार्षिक योजना (२०१२-१७) सुरवात होणार आहे व२०१७ मध्ये ती पूर्ण होईल. वृध्दी, विकास', रोजगार, स्वयंनिर्भरता आणि सामाजिक न्याय ही उद्दिष्टये पंचवार्षिक योजनासाठी मार्गदर्शक तत्वे म्हणून स्वीकारण्यात आली.

**३.२.२ नियोजनाची प्रक्रिया** (Process of Planning) **:**

भारताच्या आर्थिक नियोजनाचे काम नियोजन मंडळावर सोपविलेले असते. आराखडा तयार करणे व त्याची

अंमलबजावणी आणि मूल्यमापन करण्याची जबाबदारी नियोजन मंडळ पार पाडते.या शिवाय कालांतराने विकेंद्रीकरण आणि लोक सहभाग या टप्प्यांचा समावेश त्यात करण्यात आला आहे. त्याची सविस्तर चर्चा खालील प्रमाणे-

**१. पहिला टप्पा :** नियोजनाच्या पहिल्या टप्प्यामध्ये दोन-तीन वर्ष आधीच योजनेच्या संदर्भामध्ये चर्चा सुरू होते. नियोजन मंडळ देशाच्या सद्य:स्थितीचे सखोल मूल्यमापन करते आाणि देशातील प्रगतीला अडथळा आणणाऱ्या सामाजिक, आर्थिक व संस्थात्मक उणीवा असतील तर त्या काढून टाकण्या संदर्भात सविस्तर अशा सूचना करते. हा नियोजन आहवाला नंतर केंद्रीय मंत्रीमंडळ व 'राष्ट्रीय विकास परिषद' (National Development Council) यांच्याकडे मूल्यमापनासाठी व मान्यतेसाठी सादर केला जातो. या भागामध्ये 'राष्ट्रीय विकास परिषद' अहवालातील बाबीवर विचारविनिमय करते व नियोजन मंडळाने पुढील पंचवार्षिक योजनेत गृहीत वाढीचा दर, उद्दिष्ट्ये वकोणत्या बाबीवर विशेष भर द्यावयाचा या विषयी सूचना करते.

**२. दुसरा टप्पा :** दुसरा टप्पा पंचवार्षिक योजनेमधील भौतिक घटकांच्या 'मसूदा निवेदन पत्रिकेचा' पाया तयार करणाऱ्या विविध प्रकारच्या अभ्यासाच्या आयोजनावर अवलंबून असतो. यासाठी नियोजन मंडळ विविध अभ्यास गटांची (Working Groups) नियुक्ती करते. त्यामध्ये विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व संबंधित केंद्रीय मंत्रालयातील अधिकाऱ्यांचा समावेश असतो. प्रत्येक अभ्यास गट विशिष्ट विभागाशी किंवा आर्थिक क्षेत्राशी संबधित असतो. १९६५ मध्ये नियोजन मंडळाने वित्तीय साधने, शेती, सिंचन, उर्जा, लोखंड, इंधन,सामान्य शिक्षण, तांत्रिक शिक्षण, शास्त्रीय संशोधन, आरोग्य व कुटुंब नियोजन, गृहनिर्माण, ग्रामीण नियोजन, मागासवर्गियांचे कल्याण, इ. चा अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र अभ्यास गट स्थापण्यात आले. यातील आर्थिक गट हा अंतर्गत व बाह्य तसेच सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील वित्तीय साधनासंबधीच्या अभ्यासासाठी होता. प्रत्येक अभ्यास गट त्या विशिष्ट क्षेत्राच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेऊन त्यातील कमतरतांच्या नोंदी करते. अभ्यास गट त्यांच्या कार्याला केंद्रपासून सुरूवात करते. केंद्र शासनाचे कार्य सुरू असतानाच राज्य सरकारने सुध्दा स्वत:चे अभ्यास गट सल्ला देण्यासाठी नियुक्त करावे असे अपेक्षित असते. अभ्यास गटाचे मुख्य उद्दिष्ट हे असते की, ते प्रत्येक राज्याच्या विकासाचे चित्र तयार करण्याचा प्रयत्न करते. अभ्यास गटांतर्गत नियोजन मंडळ प्रमुख विषय तज्ज्ञ, कर्मचारी यांच्या याद्या तयार करते.हे तज्ज्ञ मुख्यत्वे अशासकीय असतात. आपापल्या क्षेत्रासंबधी विस्तृत धोरण व योजनेच्या रचनेच्या दृष्टीने सल्ला देतात.

अभ्यास गटाच्या अहवालावर विविध अभ्यास गटांच्या सुचनेनुसार नियोजन मंडळ मसुदा परिपत्रिकेचा आराखडा तयार करते. हीच मसुदा निवेदन पत्रिका म्हणून ओळखली जाते. या निवेदन पत्रिकेत योजनेचा पुढचा आकार ठरतो. ही मसुदा निवेदन पत्रिका केंद्रीय मंत्रीमंडळात सादर केली जाते. त्यानंतर त्यावर सविस्तर चर्चा करण्यात येते. ही सर्व कागदपत्रे राष्ट्रीय विकास परिषदेकडे जाण्यापूर्वी नियोजनाच्या पुढील टप्प्यातील योजनेची तयारी केली जाते. त्याला मसुदा आराखडा (Draft Outline) असे म्हटले जाते.

**३) तिसरा टप्पा :** तिसऱ्या टप्प्यात मसुदा निवेदन पत्रिकेपेक्षा मसुदा आराखडा अधिक सविस्तरपणे तयार केला जातो. विविध क्षेत्रातील समस्यांना तोंड देण्यासाठी तपशीलवार योजना दिलेल्या असतात, आणि याद्वारे प्रामुख्याने प्रमुख धोरणे, उद्दिष्ट्ये स्वीकारायची दिशा निश्चित केली जाते. मसुदा आराखडा नियोजन मंडळाकडून

तयार करण्यात येऊन विविध मंत्रालये व राज्य सरकार यांच्याकडे चर्चेसाठी पाठविला जातो. हा आराखडा राष्ट्रीय विकास परिषदेकडे सादर करण्यापूर्वी केंद्रीय मंत्रीमंडळाकडून स्वीकारला जातो. राष्ट्रीय विकास परिषदेच्या मान्यतेनंतर विस्तृत चर्चेसाठी सामान्य नागरिक, विविध राजकिय पक्ष, सामाजिक, आर्थिक संघटना यांची मते आजमावण्यासाठी मसुदा आराखडा जाहीररित्या प्रसिध्द केला जातो. आणि सर्व क्षेत्रातील मते मागविली जातात. दोन्ही मंत्रीमंडळामध्ये यावर चर्चा केली जाते. लोकसभेतील समित्यांमार्फतही त्यावर महत्त्वाची चर्चा केली जाते.

**४) चौथा टप्पा :** चौथ्या टप्प्यामध्ये संपूर्ण देशामधून मसूदा आराखड्यावर चर्चा होत असतानाच नियोजन मंडळ केंद्रीय मंत्रीमंडळासोबत प्रत्येक राज्याच्या संदर्भात चर्चा करते. संपूर्ण देशातील उपलब्ध वित्तीय साधने आणि नियोजित वाढीव साधने व तपशीलवार विकास योजना विषयी चर्चा होते. परंतु शेवटी प्रत्येक राज्यात विशेष तज्ज्ञांशी व राज्याच्या मुख्यमंत्र्याशी विचार विनिमय करून अंतिम निर्णय नियोजन मंडळाच्या व राज्यांच्या समन्वयातून घेतले जातात. राज्याच्या आकारानुसार व रचनेनुसार प्रत्येक राज्याची योजना असते त्यानुसार प्रमुख लक्ष व कार्यक्रम पूर्णत्वास नेण्याची हमी देणे बंधनकारक असते. केंद्राकडून मिळालेले सहाय्य व प्रत्येक राज्यांचा वाटा यांच्या परस्पर सहमतीने त्याला प्राधान्यक्रम दिला जातो.

**५) पाचवा टप्पा :** या टप्प्यामध्ये नियोजन मंडळ राज्यसरकार बरोबर केलेल्या सखोल चर्चेनंतर विविध संघटीत संस्थाची व विविध अभ्यास गटांची स्थापना करते. त्यांच्या शिफारशी व योजना या संदर्भात नियोजन मंडळ राज्यसरकारशी अधिक सविस्तर चर्चा करते आणि नवीन मसुदा निवेदन पत्रिका तयार करते. ज्यामध्ये योजनेच्या सर्व वैशिष्ट्यांचा समावेश असतो. त्यामध्ये धोरणांच्या दिशेवर अधिक भर देणे व ज्या मुद्यांची विस्तृत चर्चा करण्याची गरज असते. ती चर्चा करून ही निवेदन पत्रिका केंद्रीय मंत्रीमंडळ व राष्ट्रीय विकास परिषद यांना सादर केली जाते.

**६) सहावा टप्पा :** सहाव्या टप्प्यामध्ये राष्ट्रीय विकास परिषदेकडून घेतलेल्या निर्णयाच्या आधारे नियोजन मंडळ पंचवार्षिक योजनेचा अंतिम अहवाल तयार करते. त्यामध्ये उद्दीष्टे, प्रकल्प, विविध योजना याबाबत सविस्तर आराखडा असतो. या आराखड्यावर पुन्हा केंद्रीय व राज्य सरकारे आपली मते मांडतात आणि शेवटी मंत्रीमंडळ व राष्ट्रीय विकास परिषद यांच्याकडे मान्यतेसाठी पाठविले जाते. राष्ट्रीय विकास परिषदेच्या मान्यतेनंतर हा अहवाल पंतप्रधानांच्या मार्फत संसदेत सादर करण्यात येऊन नंतर तो प्रसिध्द केला जातो. संसदेच्या दोन्ही सभागृहात कित्येक दिवस चर्चा होऊन योजनेस सभागृहाची मान्यता मिळते आणि या योजनेच्या अंमलबजावणीसाठी व त्यातील उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी संपूर्ण देशाला अवाहन करण्यात येते.

अशा प्रकारे देशाची पंचवार्षिक योजना विविध टप्प्यामधून अंतिम आकार घेत असते.

### ३.३.३ नियोजन मंडळाची व राष्ट्रीय विकास मंडळाची भूमिका -

(Role of Planning Commission and Role of National Development Council)

आरंभीच्या अर्थव्यवस्थेचे नियोजन साध्य करण्याचा सर्वोच्च अधिकार राज्याला असतो. भारतात १९३० मध्ये ब्रिटीश राजवटीत वसाहत सरकारने औपचारीकपणे प्रथम नियोजन मंडळ स्थापन केले. त्याच समकाळात

१९४४ मध्ये हिंदूस्थान सरकारने 'नियोजन व विकास मंडळाची'(Planning and Development Board) स्थापना केली. या मंडळाने आपला अहवाल १९४६ मध्ये सादर केला. काही खाजगी उद्योजकांनी व अर्थतज्ज्ञांनी मिळून १९४४ पर्यंत कमीत कमी तीन योजना विकसित केल्या.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर औपचारिक नमुना योजना स्वीकारण्याबाबत आणि नियोजन मंडळ स्थापनेच्या बाबतचा अहवाल प्रत्यक्ष पंतप्रधानांना सादर करण्यात आला. त्यानुसार १५ मार्च १९५० मध्ये त्यावेळचे विद्यमान पंतप्रधान कै. जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन मंडळाची स्थापना करण्यात आली. याचा अर्थ नियोजन मंडळाची निर्मिती अत्यंत औपचारिक झालेली असून त्याला कायद्याचा आधार नव्हता. एवढेच नव्हे तर नियोजन मंडळ नियोजना संदर्भात सल्ला देऊ शकते. पण अंतिम निर्णय सरकारकडे रहातो.

- **नियोजन मंडळाची रचना :**

नियोजन मंडळाची जी स्थायी स्वरूपाची रचना आहे, त्यामध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष, चार पूर्णकालिन सभासद, कार्यवाहक व उपकार्यवाहक असे आठ सभासद असतात. भारताचे पंतप्रधान नियोजन मंडळाचे पदसिध्द अध्यक्ष असतात. इतर सात सभासद हे केंद्रीय मंत्री, अर्थतज्ज्ञ, सरकारचे मुलकी अधिकारी इत्यादीमधून घेतले जातात. या स्थायी सभासदांव्यतिरीक्त अंशकालीन सभासद व अर्थतज्ज्ञांचे मंडळ गरजेनुसार घेतले जाते. या नियुक्त्यीविषयी कोणतेही खास नियम नाहीत. देशातील लोकांचे रहाणीमान जलदगतीने उंचावण्यास हातभार लावण्यासाठी, राष्ट्रीय संसाधनांचा कार्यक्षमपणे विकास करण्यासाठी, उत्पादनात वाढ आणि सर्वांच्यासाठी रोजगारसंधी उपलब्ध करून देण्यासाठी व योजनेची आखणी करण्यासाठी सरकारने नियोजन मंडळाची स्थापना केली आहे.

भारताच्या आर्थिक विकासासाठी नियोजनाची आखणी करीत असताना खालील भूमिका पार पाडावी लागते-

१. देशातील सर्व उपलब्ध संसाधनांचे मूल्यमापन करून अपुऱ्या संसाधनामध्ये वाढ, संसाधनांचा अधिकाधिक परिणामकारक व समतोल वापर या सर्वांना प्राधान्य देऊन योजना तयार करण्याची जबाबदारी नियोजन मंडळाची असते.

२. नियोजन मंडळ भारताची मुख्य धोरणे ठरविणारी समिती असून, ती राष्ट्रीय विकास परिषदेच्या (National Development Council) मार्गदर्शना खाली कार्य करीत असते.

३. देशाच्या पंचवार्षिक योजना, वार्षिक योजना, राज्यसरकारच्या योजना आखण्यासाठी मार्गदर्शन करण्याचे काम नियोजन मंडळ करते. याशिवाय योजना कार्यक्रम, प्रकल्पांचे परिक्षण सुध्दा करते.

४. मानवी व आर्थिक विकासातील गुंतागुंतीच्या भागांसाठी नियोजन मंडळ सामुहिक विकास योजना तयार करण्याची भूमिका पार पाडते.

५. सामाजिक क्षेत्राकडून समन्वयात्मक व एकात्मिक योजनांची मागणी केली जाते. जसे आरोग्य, पिण्याचे पाणी, ग्रामीण उर्जेची गरज, साक्षरता, पर्यावरण संरक्षण इत्यादी समन्वयात्मक योजना लोकांसाठी

महत्त्वपूर्ण आहेत.

६. नियोजनावर केल्या जाणाऱ्या खर्चातील वाढीकडे पहाण्यापेक्षा आस्तित्वातील संसाधनांचे विभाजन व त्यांचा कार्यक्षमतेने वापर होऊन उत्पादनात वृध्दी होते का याकडे पाहण्याचा नियोजन मंडळाचा दृष्टिकोण असतो.

७. अर्थसंकल्पात उपलब्ध संसाधनावर तीव्र ताण आल्यास केंद्र व राज्यामधील विभाजन केलेल्या व्यवस्थेवर मंत्रीमंडळात दडपण निर्माण होते. अशावेळी योजनेशी संबधीत सर्व हित लक्षात घेऊन नियोजन मंडळला मध्यस्थाची भूमिका पार पाडावी लागते.

८. प्रशासनामध्ये असणाऱ्या अडचणींचे शांतपणे निवारण करून, तसेच आवश्यक ते बदल करून उच्च प्रतिची उत्पादन क्षमता असलेली संस्कृती निर्माण करण्याची तजविज नियोजन मंडळाला करावी लागते.

९. प्रत्येक संसाधनांचा कार्यक्षमतेने वापर करण्याची गुरूकिल्ली ही सर्व स्तरावर योग्य स्वयंव्यवस्था संघटना निर्माण करण्यात आहे. याचा भाग म्हणून नियोजन मंडळ प्रचलित व्यवस्थेमध्ये बदल करून प्रशासनांतर्गत मदत व सल्ला देऊन चांगली व्यवस्था निर्माण करण्याची भूमिका बजावते.

१०. नियोजन मंडळाला प्राप्त झालेल्या अनुभवाचा विस्तृत प्रसार होण्यासाठी नियोजन मंडळ उपलब्ध माहिती प्रसिध्द करते.

नियोजन मंडळाला नियोजन प्रक्रियेमध्ये वरील प्रमाणे भूमिका पार पाडावी लागते.

- **राष्ट्रीय विकास परिषदेची भुमिका (Role of National Development Council)**

राष्ट्रीय विकास परिषदेची स्थापना प्रथम १९५१ मध्ये झाली. राष्ट्रीय विकास परिषद केंद्रीय मंत्रीमंडळे व राज्यसरकार यांच्यामध्ये समन्वय घडवून आणण्याची भूमिका पार पाडते.

राष्ट्रीय विकास परिषदेचे पंतप्रधान हे अध्यक्ष असतात. राज्य सरकारचे मुख्यमंत्री आणि नियोजन मंडळाचे सभासद यांचा यामध्ये समावेश असतो.

भारतात नियोजनांची आखणी केवळ राष्ट्रीय नियोजन मंडळाकडून होत नाही तर नियोजनामध्ये विकेंद्रीकरणाचा अवलंब केला असल्याने भारतातील नियोजन' बहुस्तरीय नियोजन' (Multi- levelplanning) आहे. प्रथमतः जिल्हापातळीवर योजना आखली जाते त्यानंतर राज्य स्तरावर व नंतर नियोजन मंडळ संपूर्ण राष्ट्रासाठी योजना तयार करते. ही योजना केंद्र सरकार व राज्यसरकार यांच्या योजनांचे एकत्रिकरण असते. या सर्व प्रक्रियेमधून तयार झालेल्या योजनेला मंजूरी मिळविण्यासाठी प्रथम तो आराखडा (Draft Plan) नागरिकांच्या टिकाटिप्पणीसाठी व त्याचवेळी संसदेच्या दोन्ही सभागृहामध्ये मांडला जातो. त्यावर चर्चा होऊन मग तो 'राष्ट्रीय विकास परिषदेकडे' (National Development Council) मंजुरीसाठी पाठविला जातो. ज्या ठिकाणी योजनेचे अंतिम स्वरूप निश्चित होते.

ज्यावेळी खूप काळ एकच राजकीय पक्ष केंद्रामध्ये तसेच राज्य सरकारमध्ये सत्तेवर टिकून राहिलेला असेल, तर राष्ट्रीय विकास परिषद कुठली परिणामकारक भुमिका बजावत नाही. पण सर्वसाधारण निवडणूकीत जेव्हा वेगवेगळे राजकीय पक्ष सत्ता मिळवितात त्यावेळी अधिक परिणामकारक व केंद्रीय योजना बनवणे व ती सफल करणे अवघड होते.

अशावेळी या संदर्भात राष्ट्रीय विकास परिषदेला नवीन वळण देण्याची भुमिका पार पाडावी लागते. अभ्यास मंडळाला राष्ट्रीय विकास परिषदने मागील कार्यात सुधारणा घडवून आणण्याच्या बाबतीत आणि भविष्याकालीन योजनेसाठी अधिक परिणामकारक मार्ग व मध्य काढण्याबाबतीत सल्ला दिलेला आहे.

अभ्यास गटाने राष्ट्रीय विकास परिषदेच्या कार्याच्या व संघटनेच्या संदर्भात अनेक शिफारशी केल्या. सुधारित मंडळ व त्यांचे पत्र काही छोटया बदला बरोबर भारत सरकाने स्वीकारले आणि त्यानुसार ७ ऑक्टोबर १९६७ मध्ये त्याबाबत ठराव करून राष्ट्रीय विकास परिषदेची पुणर्बांधणी झाली.

पुनर्बाधणी झालेल्या परिषदेमध्ये, नियोजन मंडळाचे सचिवच राष्ट्रीय विकास परिषदेच्या सचिवाचे काम पाहतात. त्यांनी आवश्यक त्या प्रशासकीय सेवा व इतर मदत करावी अशी अपेक्षा असते.

यामुळे राष्ट्रीय विकास परिषदेला भुमिका पार पाडाव्या लागतात त्या पुढील प्रमाणे ........

१. देशाची संसाधने अधिक सामर्थ्यवान व गतिशील करण्याचा प्रयत्न आणि तसेच महत्वाच्या क्षेत्रासाठी व देशातील सर्व विभागांच्या समतोल व जलद विकासासाठी सर्वसमावेशक धोरण आखण्यासाठी राष्ट्रीय विकास परिषद हातभार लावते.

२. तसेच राष्ट्रीय नियोजनाच्या कामकाजात वेळोवेळी सुधारणा करते. राष्ट्रीय विकासावर परिणाम करणारे सामाजिक व राजकीय महत्वाच्या प्रश्नांच्या बाबतच्या धोरणांचा विचार परिषद करते.

३. राष्ट्रीय नियोजनाची अंमलबजावणी करताना उद्दिष्ट्ये व लक्ष साध्य करण्यासाठी योग्य कृती विषयक शिफारशी राष्ट्रीय विकास परिषद करते.

४. राष्ट्रीय विकास परिषदेचे गव्हर्नर व अस्तित्वातील प्रादेशिक संघटन व मुख्यमंत्री हे पुन्हा योजना सादर करतात. तसेच केंद्रीय व राज्याच्या मुख्यमंत्र्यांनासुध्दा विनिमयात सहभागी होण्यासाठी बोलावले जाते. त्यामध्ये -

अ. योजनेसाठीच्या संसाधनांचे मुल्यमापन करून, नियोजनाचा आराखडा तयार करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वांच्याबाबत आदेश दिले जातात.

ब. देशाच्या विकासावर परिणाम करणारे सामाजिक व आर्थिक धोरणासंबंधी महत्वाचे प्रश्न विचारात घेते.

क. योजनेच्या कामकाजात वारंवार सुधारणा करते आणि योजनेची लक्षे व ध्येये गाठण्यासाठी आवश्यक असणाऱ्या उपायांची शिफारस करते, राष्ट्रीय विकासासाठी लोकांचा निश्चित सक्रिय सहभाग व सहकार्याचा समावेश यामध्ये असावा. यासाठी प्रशासकीय सेवा, कमी प्रमाणामध्ये विकसित प्रदेशांना

पुर्ण विकासाची खात्री जर लोकांना दिली तर जनता सुध्दा श्रम करून योजना यशस्वी होण्यास व संसाधने उभी करण्यास मदत करते.

याप्रमाणे राष्ट्रीय विकास परिषद योजनेच्या आराखडयाची मार्गदर्शक तत्वे तयार करण्याचे आदेश देते. या मार्गदर्शक तत्वांच्या संदर्भानुसार नियोजन मंडळ आपल्या कार्याची मांडणी करते.

राष्ट्रीय विकास परिषद ही सरकारची अतिशय उच्च योजना आखणारी संस्था असून नियोजनाच्या प्रक्रियेत ती अशा पध्दतीची महत्वाची भुमिका पार पाडते.

### ३.२.४ नीति आयोग :

केंद्र सरकारने १ जानेवारी २०१५ रोजी नीती आयोगाची स्थापना केली. नीती म्हणजे - नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मिंग इंडिया होय. यालाच मराठीत 'राष्ट्रीय भारत परिवर्तन संस्था' असे म्हणतात. नीती आयोग हा पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली केंद्र व राज्य सरकारांना धोरण आखणीसाठी विचारगट म्हणून कार्य करणार आहे. सदर आयोग पूर्वीच्या ६५ वर्षे जुन्या असलेल्या नियोजन आयोगाची जागा घेणार आहे. देशाच्या पंतप्रधानांनी १५ ऑगस्ट २०१४ रोजी लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात नियोजन आयोग बरखास्त करून त्या जागी नवीन संस्था (थिंक टँक) स्थापन करून त्यामध्ये सर्व बदलत्या आर्थिक आणि सामाजिक गरजांचा समावेश होईल, असे घोषित केले आहे. त्याप्रमाणे सरकारने या नीती आयोगाची स्थापना केली आहे. नियोजन आयोगाच्या कार्यप्रणालीत फक्त केंद्राकडून राज्याकडे अशा एकाच दिशेने धोरणात्मक विचारांचे संक्रमण होत होते, परंतु या नवीन आयोगात दोन्हीही दिशांनी विचारांचे समायोजन होणार आहे.

**नीती आयोगाची उद्दिष्टे :**

१) विकास प्रक्रियेत राज्यांना सहभागी करून घेऊन एक सहकारी संघराज्य निर्माण करण्यास पोषक वातावरण तयार करणे.

२) गाव पातळीवर विश्वसनीय नियोजन करण्यासाठी यंत्रणा विकसित करण्यात येईल आणि सरकारच्या उच्च पातळीवर तिचे एकत्रीकरण करण्यात येईल.

३) आर्थिकदृष्ट्या वंचित घटकांकडे विशेष लक्ष देणे

४) देशाची आर्थिक धोरणे आणि व्यूहरचना ठरविताना राष्ट्रीय सुरक्षिततेच्या मुद्यांचा विचार करणे.

५) दीर्घकालीन धोरणे आणि कार्यक्रम प्रणाली विकसित करून त्यांच्या प्रगती व गुणवत्तेकडे लक्ष देणे.

६) देशातील शैक्षणिक धोरण आणि संशोधन संस्था तसेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील समान विचारांच्या संस्थांना सल्ला देऊन त्यांच्यातील भागीदारी बळकटीकरणासाठी प्रयत्न करणे.

७) राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील तज्ज्ञांचा सामुदायिक संप्रदाय निर्माण करून त्याद्वारे ज्ञानाधारित नाविन्यता आणि उद्योगाधारित वातावरण निर्माण करण्यात येणार आहे.

८) विकास कार्यक्रमांना गती देण्यासाठी आंतरसंरचनीय आणि आंतरविभागीय विषयांच्या सोडवणुकीसाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देणे.

९) प्रशासन आणि शाश्वत व समान विकासासाठी माहिती उपलब्ध होण्यासाठी संशोधन केंद्र स्थापन करणे.

१०) सरकारद्वारे सुरू करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचे प्रभावीपणे नियंत्रण करून त्यांचे मूल्यमापन करणे व उपलब्ध साधनसामग्रीची उपलब्धता निश्चित करणे.

११) सरकारी कार्यक्रमांची व्यवस्थितरीत्या अंमलबजावणी करण्यासाठी तंत्रज्ञान अद्ययावतीकरण आणि क्षमता बांधणीकडे लक्ष देणे.

**नीती आयोगाची कार्ये :**

१) योजना अंमलबजावणीवर देखरेख आणि त्यांच्या मूल्यांकनाबरोबर तंत्रज्ञान सुधारणा करणे.

२) नीती आयोग पंचवार्षिक योजना आणि राज्यांमध्ये निधी वाटपाचे काम पूर्वीच्या नियोजन आयोगाप्रमाणे करणार नाही.

३) नीती आयोग राज्यांच्या सल्ल्याने देशाच्या विकासाचा राष्ट्रीय अजेंडा तयार करून तो पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांना सोपवेल.

४) सक्षम राज्य व सशक्त देशाच्या सिद्धांतावर हा आयोग काम करणार आहे.

५) जिल्हा स्तरापासून केंद्र स्तरापर्यंत योजना लागू होतील, अशी यंत्रणा तयार करण्याची जबाबदारी नीती आयोगाकडे असेल.

६) धोरणकर्ते आणि संबंधित क्षेत्रांच्या तज्ज्ञांच्या सहकार्याने आर्थिक धोरणात राष्ट्रीय सुरक्षेचीही जबाबदारी सांभाळण्याचे काम नीती आयोग करेल.

७) केंद्र व राज्य सरकारांना धोरणात्मक मुद्द्यांवर रणनितीक आणि तांत्रिक सल्ला देण्याचे कार्य हा आयोग करेल.

८) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या आर्थिक मुद्यांचा समावेश या आयोगात असेल.

९) नीती आयोग अन्य राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय थिंक टँक शिवाय शैक्षणिक व धोरणात्मक संशोधन संस्थांच्या संपर्कात राहणार आहे.

**नीती आयोगाचे सात स्तंभ :**

१) समाज आणि वैयक्तिक घटकांच्या आशा-आकांक्षा पूर्ण करण्यासाठी कार्यक्रम निश्चित करणे.

२) लोकांच्या अंदाजित गरजा ओळखून त्यांना प्रतिसाद देणे.

३) विकास कार्यात लोकांचा सहभाग देणे.

४) महिलांचा सर्व पातळीवर विकास करणे.

५) समाजातील सर्व घटकांचे समावेशन प्रामुख्याने आर्थिकदृष्ट्या वंचित, अनुसूचित जाती जमाती आणि इतर मागासवर्गीय, ग्रामीण भाग आणि शेतकरी, युवक तसेच सर्व संवर्गातील मागासवर्गीय यांच्या विकासाकडे लक्ष देणे.

६) देशातील युवकांना समान संधी उपलब्ध करून देणे.

७) सरकार अधिक दृश्य आणि प्रतिसादात्मक व्हावे यासाठी तंत्रज्ञानाच्या साह्याने पारदर्शकता आणणे.

नीती आयोग हा नागरी/ग्रामीण भागात विकास योजना तयार करण्यासाठी तंत्रज्ञान विकसित करीत असून त्यासाठी लागणाऱ्या योजना तयार करून उच्च पातळीवर आपले स्थान निर्माण करण्याचे कार्य करणार आहे. नीती आयोग हा अर्थव्यवस्थेचा विकास करण्याकडे वाटचाल करीत असून आपली पाऊले त्या दिशेने उचलत आहे.

**नीती आयोगाची रचना :**

अध्यक्ष - पंतप्रधान

उपाध्यक्ष - प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ अरविंद पनगारिया

नियामक परिषद/ गव्हर्निंग कौन्सिल - सर्व राज्यांचे मुख्यमंत्री व केंद्रशासित प्रदेशांचे गव्हर्नर जनरल.

पूर्ण वेळ सदस्य - पाच स्थायी सदस्य असतील.

अर्ध वेळ सदस्य - जास्तीत जास्त दोन (देशातील नामांकित विद्यापीठ आणि इतर संस्थांमधून निवड).

पदसिद्ध सदस्य- १) श्री. राजनाथ सिंह (केंद्रीय गृहमंत्री

२) श्री. अरुण जेटली (केंद्रीय अर्थमंत्री)

३) श्री. सुरेश प्रभू (केंद्रीय रेल्वेमंत्री)

४) श्री. राधामोहन सिंह (केंद्रीय कृषिमंत्री)

विशेष निमंत्रित - नितीन गडकरी, यावरचंद गेहलोत, श्रीमती स्मृती इराणी.

मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) - सिंधूश्री खुल्लर

नीती आयोगाच्या कामकाजाचा तपशील अद्यापही जाहीर झाला नाही, परंतु त्यांची पूर्वतयारी मात्र केली आहे. त्यांच्या कामकाजाची रचना, कार्ये, उद्देश्य स्पष्ट झाले आहेत.

या अगोदरच्या नियोजन आयोगाची जागा नीती आयोगाने घेतल्यामुळे त्या दोन्हीतील फरक जाणून घेणे उचित ठरते.

| घटक | नीती आयोग | नियोजन आयोग |
|---|---|---|
| आर्थिक | आर्थिक बाबतीत नीती आयोग सल्लागारी मंडळ/थिंक टँक म्हणून काम करणार | केंद्र सरकारची विविध मंत्रालये आणि राज्यांना निधी वाटप करण्याचे महत्त्वपूर्ण वाटा. |
| पूर्णवेळ सदस्य | नीती आयोगामध्ये दोन पूर्णवेळ सदस्य असणार. | नियोजन आयोगात आठ पूर्णवेळ सदस्य होते. |

| | | |
|---|---|---|
| राज्यांची भूमिका | नियोजन प्रक्रियेत राज्यांना महत्त्वाचे स्थान मिळणार आहे | या प्रक्रियेत राज्यांची भूमिका केवळ राष्ट्रीय विकास परिषदेपुरती मर्यादित होती. |
| सदस्य सचिव | उपमुख्य कार्यकारी अधिकारी नेमण्यात येणार. | सचिव किंवा सदस्य सचिव नेहमीच्या पद्धतीने नेमण्यात येत असे. |
| अर्धवेळ सदस्य | गरजेनुरूप अर्धवेळ सदस्यांची नेमणूक करण्यात येणार आहे. | नियोजन आयोगामध्ये अशी अर्धवेळ सदस्य नेमण्याची तरतूद नव्हती. |

नियोजन आयोगात राज्याचे मुख्यमंत्री हे विकास परिषदांचे सदस्य होते, परंतु त्यांना योजना आयोगात सहभागी होता येत नव्हते. तो सहभाग आता नीती आयोगात करता येणार आहे. यामुळे सर्वांमध्ये 'एकी हेच बळ' ही जाणीव निर्माण होऊन अर्थव्यवस्थेचा विकास होण्यास मदत होणार आहे.

प्रत्येक राज्यांनी मागण्या करून केंद्राने त्या पुरवाव्यात असे न होता देशाचा एकत्रित विकास होण्यास मदत होणार आहे. त्याद्वारे ज्या प्रदेशाचा मानव विकास निर्देशांक कमी आहे व जो समाज मागास आणि वंचित आहे त्यांचा विचार नीती आयोगात करण्यात येणार आहे. केंद्राची एखादी योजना एखाद्या राज्यात यशस्वी ठरली तर ती यशस्वी होण्यामागे काय कारण आहे ते शोधून इतर राज्यांना लागू करण्याचे काम नीती आयोगद्वारे होणार आहे. वेगवेगळ्या योजना केंद्र सरकारच्या माध्यमातून राबविल्या जातात, परंतु या योजना किंवा एखादा कार्यक्रम हा मंत्रालयापुरता मर्यादित नसतो तर इतर खाती व संस्थांचा संबंध असतो. अशांना यात समाविष्ट केल्यास संबंधित योजना यशस्वी होऊ शकते.

नीती आयोग हा केंद्र व राज्य सरकारसाठी थिंक टँक म्हणून कार्य करणार आहे. जगात एकूण ३००० थिंक टँक असून त्यामध्ये सर्वाधिक थिंक टँक अमेरिका या देशात आहेत. या थिंक टँकचा जगाच्या आर्थिक धोरणांवर मोठा प्रभाव पडल्याचे दिसून येते. पहिल्या १५० थिंक टँकमध्ये ६ भारतीय थिंक टँकचा समावेश होतो.

## ३.३ सारांश :

भारतासारख्या विकसनशील देशाला आपला जलद आर्थिक विकास साध्य करावयाचा असेल तर नियोजनाच्या माध्यमातून ते साध्य होऊ शकेल. भारतामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळापासून ब्रिटीश राजवटीतही नियोजनाच्या संदर्भामध्ये विचार केला जात होता. त्याच काळामध्ये अनेक विविध योजनाचे आराखडे तयार करण्यात आले होते. त्यामध्ये मुंबई योजना, जनता योजना, गांधी योजना युध्दानंतरची पुनर्बांधणी योजना, कोलंबो योजना इत्यादी.सर विश्वेश्वरय्या यांच्या अध्यक्षतेखाली भारतासाठी 'नियोजित अर्थव्यवस्था' हा ग्रंथ प्रथम प्रसिध्द झाला. त्यानंतर नियोजनाचे आर्थिक विकासातील महत्त्व ओळखून १९३४ मध्ये राष्ट्रीय नियोजन समितीची स्थापना केली. त्यानंतर पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली १९५० मध्ये नियोजन मंडळाची स्थापना झालीआणि खऱ्या अर्थाने तेव्हापासून नियोजन मंडळाचे कार्य सुरू झााले. प्रत्येक योजनेचा आराखडा तयार करताना नियोजन मंडळाला

अनेक प्रक्रिये मधून जावे लागते. ही योजना केंद्र सरकार आणि राज्य सरकार या दोन्ही पातळ्यावर तयार केली जाते. आराखडा तयार करण्याचे काम नियोजन मंडळाकडे सोपविलेले असते. हे नियोजन मंडळ योजनेचा आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी व मूल्यमापन करते. त्यामुळे नियोजन मंडळाला योजना तयार करीत असताना अनेक महत्वाच्या भूमिका पार पाडाव्या लागतात.

नियोजन मंडळ योजनेचा आराखडा तयार करीत असले तरी त्याला अंतिम मंजूरी राष्ट्रीय विकास परिषदे कडून मिळत असते आणि म्हणूनच राष्ट्रीय विकास परिषदेला मार्गदर्शकाची महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागते.

विकसनशील देशांचा विकास घडवून आणण्यासाठी समतोल प्रादेशिक विकास होणे गरजेचे असते. काही प्रदेश विकसित व काही अविकसित राहिल्यास देशाच्या आर्थिक विकासात अनेक अडथळे निर्माण होतात. त्यामुळेच पहिल्या योजनेपासून समतोल प्रादेशिक विकास व पुरेशी आर्थिक वाढ याचा विचार केला जातो.

## ३.४ पारिभाषीक शब्द :

- **नियोजन :** देशाच्या सर्वांगीण विकासाची सर्व समावेशक स्वरूपाची योजना होय.
- **राष्ट्रीयकरण :** देशातील खाजगी मालकीची असणारी साधनसंपत्ती सरकारच्या मालकीची करणे.
- **मसुदा :** योजनेच्या आराखड्याची सविस्तर मांडणी केलेला अहवाल.
- **संसाधने :** देशामध्ये उपलब्ध आसलेली सर्वप्रकारची साधनसंपत्ती.
- **विकेंद्रीकरण :** उद्योगधंदे एकाच ठिकाणी स्थापन न करता वेगवेगळ्या प्रदेशामध्ये स्थापन करणे म्हणजे विकेंद्रीकरण होय.
- **संवर्धन :** देशामधील उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तीचा कार्यक्षमतेने व पर्याप्तपणे वापर करून त्याची जपणूक करणे.

## ३.५ स्वंयअध्ययनासाठी प्रश्न (Self Learning Questions)

**अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा पूर्ण करा.**

१. भारतीय काँग्रेसने राष्ट्रीय नियोजन मंडळाची स्थापना ................यांच्या अध्यक्षतेखाली केली.

अ. सर विश्वेश्वरय्या	ब. पंडीत जवाहरलाल नेहरू

क. महात्मा गांधी	ड. टाटा बिर्ला

२. भारतीय नियोजन मंडळाने ................... मध्ये पहिल्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा तयार केला.

अ. मार्च १९५०	ब. जुलै १९५१

क. जून १९५५	ड. जानेवारी १९४४

३. भारतीय नियोजन मंडळाची स्थापना ................ मध्ये झाली.

अ. १७ जुलै १९४६ ब. १५ मार्च १९५०

क. जून १९३४ ड. १५ ऑगस्ट १९४५

४. भारतीय नियोजन मंडळाच्या स्थायी स्वरूपाच्या रचनेमध्येएकूण ..................... सभासद असतात.

अ. आठ ब. सात क. पाच ड. चार

५. नियोजन मंडळाचे ................ हे अध्यक्ष असतात.

अ. राष्ट्रपती ब.पंतप्रधान क. मुख्यमंत्री ड. राज्यपाल

६. भारतीय नियोजनाची रचना .................... स्तरीय असते.

अ. त्रिस्तरीय ब. बहुस्तरीय क. द्विस्तरीय ड. एकस्तरीय

**ब. एका वाक्यात उत्तरे लिहा :**

१. नियोजीत अर्थव्यवस्था हा ग्रंथ कोणी लिहीला ?

२. मुंबई योजना किती वर्षांसाठी तयार करणात आली होती ?

३. गाांधी योजना कोणी तयार केली ?

४. बाराव्या पंचवार्षिक योजनेचा कालखंड कोणता ?

५. नियोजन प्रक्रीया किती टप्प्यामधून पूर्ण होते ?

६. नियोजन मंडळाचा आराखडा शेवटी कोणत्या परिषदेकडे जातो ?

७. राष्ट्रीय विकास परिषदेचे अध्यक्ष कोण असतात ?

८. मसुदा आराखडा म्हणजे काय ?

## ३.६ स्वयंअध्ययन प्रश्नाची उत्तरे (Answers of Self Learning Questions) :

**अ. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा :**

१. पंडीत जवाहरलाल नेहरू

२. जुलै १९५१

३. १५ मार्च १९५०

४. आठ

५. पंतप्रधान

६. बहुस्तरीय

**ब. पुढील प्रश्नाची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

१. सर विश्वेश्वरय्या यांनी 'नियोजीत अर्थव्यवस्था' हा ग्रंथ लिहीला.

२. मुंबई योजना १५ वर्षासाठी आखण्यात आली होती.

३. गांधी योजना एस. अग्रवाल यांनी तयार केली.

४. बाराव्या पंचवार्षिक योजनेचा कालखंड २०१२ ते २०१७ आहे.

५. नियोजन प्रक्रियेचे एकूण सहा टप्पे आहेत.

६. नियोजन मंडळाचा आराखडा शेवटी राष्ट्रीय विकास परिषदेकडे जातो.

७. राष्ट्रीय विकास परिषदेचे अध्यक्ष पंतप्रधान असतात.

८. मसुदा निवेदन पत्रिका राष्ट्रीय विकास परिषदेकडे जाण्याआधी नियोजनाच्या पुढच्या टप्प्यातील योजनेचा जो आराखडा असतो त्याला 'मसुदा आराखडा' म्हणतात.

## ३.७ सरावासाठी स्वाध्याय (Question for Self Study) :

अ. भारतामध्ये १९५० पूर्वी कोणकोणत्या योजना आखण्यात आल्या होत्या ?

ब. भारतातील पंचवार्षिक योजनेची प्रक्रिया स्पष्ट करा :

क. भारतीय नियोजन मंडळाची भूमिका स्पष्ट करा.

ड. राष्ट्रीय विकास परीषदेची भूमिका स्पष्ट करा :

इ. भारतात समतोल प्रादेशिक विकासाची गरज का आहे ?

## ३.८ क्षेत्रीय कार्य (Field Work) :

१) भारतातील पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून आकराव्या योजनेपर्यंत नियोजन मंडळाने पार पाडलेल्या भूमिकेचा आढावा घ्या :

## ३.९ संदर्भ ग्रंथ :


१) विकसनशील भारत - रविंद्र दोशी.

2) Economics of Development and Planning - A. C. Agarwal.

3) Indian Economy, Problem of Development and Planning - A. N. Agarwal

4) Economic Planning - Theory and Practice - M. L. Seth, S. P. Singh.

5) Economics of Development and Planning - M. L. Jhingan.


◇◇◇

घटक ४

# भारताचे आर्थिक नियोजन - भाग २

अनुक्रमणिका


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ नियोजनाची उद्दिष्ट्ये
४.२.२ नियोजनाचे यश-अपयश
४.२.३ ११ वी पंचवार्षिक योजना
४.२.४ १२ वी पंचवार्षिक योजना

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द

४.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

४.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.७ सरावासाठी स्वाध्याय

४.८ संदर्भ ग्रंथ यादी


## ४.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास -

- आर्थिक नियोजनाची कल्पना सविस्तर अभ्यासता येईल.
- भारताच्या आर्थिक नियोजनाची दिशा समजावून घेण्यास मदत होईल.
- भारतीय नियोजनाचा एकंदर आढावा घेऊन नियोजनाची उद्दिष्ट्ये व फलश्रुती सविस्तर अभ्यासता येईल.
- भारतातील नवव्या व दहावी योजनेचा आढावा घेता येईल.

- भारतातील अकराव्या पंचवार्षिक योजनेची उद्दिष्ट्ये, आर्थिक संरचना, वित्तीय खर्च, यशापयश इ. चा सविस्तरपणे आढावा घेणे सोपे जाईल.

## ४.१ प्रस्ताविक :

आपण मागील घटकांमध्ये भारतीय अर्थव्यवस्थेत आर्थिक नियोजनाची सुरूवात स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात कशा पद्धतीने झाली, प्रत्यक्ष नियोजन प्रक्रिया कशी राबवली जाते, आणि राष्ट्रीय विकास परिषद व नियोजन मंडळ या दोन व्यवस्था नेमक्या कोणत्या भूमिका बजावतात. कि ज्यामुळे नियोजन लोकशाही मार्गातून राबवणे सोपे जाईल. या सर्व घटकांचा साकल्याने विचार करून देशाचा फक्त आर्थिक विकासासंदर्भात विचार न करता सर्वांगीन बाजूने समतोल विकास घडवून आणण्यासाठी नियोजन प्रक्रिया कोणत्या पद्धतीने राबविता येईल. याचाही मागील घटकामध्ये उल्लेख केलेला आहे.

प्रस्तुत घटकांमध्ये स्वातंत्र्यानंतर देशाचा विकास साध्य करण्यासाठी १९५१ पासून प्रत्येक पंचवार्षिक योजनांमध्ये प्राधान्यक्रमाणे उदिष्ट्ये गृहित धरण्यात आली. सुरूवातीला विकासाच्या प्राथमिक अवस्थेत अन्नधान्य समस्या सोडविण्यासाठी कृषी उत्पादन वाढीचे गृहित महत्त्वाचे वाटले, कालांतराने बदलत्या परिस्थितीनुसार उद्दिष्ट्ये बदलत गेली. जसे, उद्योग, स्वावलंबन, समतोल विकास, स्थैर्य, निर्यात वाढ इ. वरील उद्दिष्ट्यांची पूर्तता करण्यात कितपत यश मिळाले हे पाहणे तितकेच महत्त्वाचे असल्याने नियोजनाचे यश-अपयश ह्या घटकामध्ये त्याची सविस्तर चर्चा करण्याचा प्रयत्न केला आहे. ७ व्या पंचवार्षिक नियोजनापासून म्हणजे १९९१ नंतर भारतीय अर्थव्यवस्थेत मुक्त व्यवस्थेचा स्वीकार करून विकासाच्या नव्या मार्गाचा अवलंब केला. तेव्हा पासूनच वित्तीय संरचना हा महत्त्वाचा भाग बनला म्हणून ९ व्या व १० व्या योजनेतील वित्तीय संरचना हा भाग विस्ताराने स्पष्ट केले आहे. ११ वी पंचवार्षिक योजना ही नुकतीच संपली असल्याने या योजनेतील गृहित धरण्यात आलेली उद्दिष्ट्ये व त्यातून मिळालेले यश याची चर्चा केली आहे.

नियोजन हा मानवाला सुपरीचित शब्द आहे. मानूस नियोजन कल्पना पूर्वीपासून वापरीत आहे. येथे नियोजन याचा अर्थ, ''एखादी गोष्ट प्रथम ठरविणे व ती तशीच्या तशी पूर्ण करणे होय.'' उदाहरणार्थ उद्या मी कोल्हापूरला देवदर्शनासाठी जाणार आहे असे ठरविणे व उद्याला खरोखर कोल्हापूरला देवदर्शनासाठी जाऊन येणे, येथे नियोजन पूर्ण झाले असा अर्थ होतो.

नियोजनाचा आर्थिक विभागासाठी वापर करण्याचे श्रेय सर्वप्रथम रशियाकडे जाते. रशियाने सन १९२८ मध्ये सर्वप्रथम नियोजन ही कल्पना आर्थिक विकासासाठी पंचवार्षिक योजना म्हणून राबविण्यास सुरूवात केली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे रशियन योजना प्रत्येकी चार वर्षाची होती. तेथे एकूण पाच पंचवार्षिक याजेना (१९२८ ते ३२ ते ३६ते १९४० ते १९४४ व १९४४ ते १९४८) या कालावधीत राबविल्या. रशियामध्ये पंचवार्षिक योजना किंवा नियोजनाचे यश 'न भूतो न भविष्यती' असे होते. नियोजनामुळे रशियाने केवळ २० वर्षात संपूर्ण आर्थिक विकास घडवून आणला व पुढे नियोजनाला सुट्टी दिली. म्हणून रशियाच्या नियोजनाकडे अनेक देश आकृष्ट झाले. भारताने देखील रशियाकडूनच बोध घेतला व नियोजनाला सुरूवात केली. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात नियोजनाचे कांही प्रयत्न

टाटा-बिर्ला, एम्.एन्.रॉय, एस्.एन्. अगरवाल इ. केले. पंडित नेहरू काँग्रेस पक्ष इ. देखील प्रयत्न केले. पुढे १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्यानंतर पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली नियोजन मंडळाची स्थापना करण्यात आली व सन १९५१ पासून पंचवाषिक योजनेला सुरूवात केली. देशात आत्तापर्यंत ११ पंचवार्षिक योजना राबविण्यात आल्या. योजना काळातील नियोजनाची उद्दिष्टे संक्षिप्तपणे व सर्वकषपणे सांगता येतील.

## ४.२ विषय विवेचन :

प्रस्तुत पाठात भारताच्या नियोजनाची ठळक उद्दिष्ट्ये नवव्या व दहाव्या पंचवार्षिक योजनेचे आर्थिक प्रबंध यशापयश क्षेत्रनिहाय खर्च, यशापयश इ. ची चर्चा करण्यात आलेली आहे.

### ४.२.१ नियोजनाची उद्दिष्ट्ये -

**१) आर्थिक वाढ** (Economic Growth) :

भारतीय नियोजनात शेती, उध्योग, ऊर्जा, वाहतूक, दळणवळण इ. क्षेत्रात वाढ घडवून आणणे यावर भर दिलेला दिसतो. पहिल्या योजने पासून ते पुढील प्रत्येक योजनेत कमी अधिक प्रमाणात शेती, उद्योग, ऊर्जा, वहातूक, दळणवळण, ग्रामीण विकास इ. वर भर देण्यात आला.

सामान्यत: आर्थिक वाढ याचा अर्थ विविध वस्तू व सेवांचा वाढत्या प्रमाणात दिर्घकालीन पुरवठा करण्याच्या क्षमतेत वाढ घडवून आणणे होय. भारत सरकारने त्याला अनुसरून पहिल्या योजनेत २.१%, दुसऱ्या योजनेत २.५%, तिसऱ्या योजनेत ५.६%, पुढे ७%, ९%, ११% याप्रमाणे वृद्धीदराचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. हे उद्दिष्ठ कमी अधिक दराने साध्यही झाले. थोडक्यात भारतात वेळोवेळी आर्थिक वाढीचे उद्दिष्ठ ठेवले गेले. परंतु आर्थिक विकासाला सरासरी दर कमी राहिला. याबाबत प्रा. राजकृष्ण म्हणतात की, हा 'हिंदू विकास दर' आहे.

खरे पहाता नियोजन काळात भारताचे राष्ट्रीय उत्पन्नात लक्षणीय वाढ झाली. परंतु वाढती लोकसंख्या, अज्ञान, दारिद्र्य इ. अनेक कारणांमुळे आर्थिक वृद्धी हे उद्दिष्ट मर्यादितपणे साध्य झाले.

**२) आत्मनिर्भरता** (Self-Reliance) :

सामान्य आत्मनिर्भरता याचा अर्थ, स्वावलंबन असा होतो. भारतीय नियोजनात आत्मनिर्भरतेतून स्वयंपूर्णता साद्य करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते. भारताच्या पंचवार्षिक योजनेत परकीय मदतीवरील अवलंबन कमी करून देशांतर्गत उत्पादनात विविधता आणणे, आयातीत घट करण्याचा प्रयत्न करणे यावर भर देऊ केल्याचे दिसते. जेणेकरून निर्यातक्षम वस्तूंची निर्मीती करून आयातीची परतफेड करता येईल.

भारताच्या पहिल्या दोन पंचवार्षिक योजनेत आत्मनिर्भरता किंवा स्वावलंबन उद्दिष्टाला फारसे महत्त्व नव्हते; मात्र तिसऱ्या, चौथ्या, पाचव्या योजनेत या उद्दिष्टाला प्राधान्य देण्यात आले. सहाव्या, सातव्या व पुढे प्रत्येक योजनेत देखील अप्रत्यक्षरित्या आत्मनिर्भरता उद्दिष्ट ठेवले गेले. यामध्ये परकीय मदतीवरील परावलंबन कमी करून देशांतर्गत उत्पादनात विविधता निर्माण करणे, ज्या योगे महत्त्वाच्या परकीय वस्तूंच्या आयातीत घट होऊन निर्यातक्षम वस्तूंच्या आयातीत घट होऊन निर्यातक्षम वस्तूंची निर्मिती करून आयातीची परतफेड करण्यासाठी त्याचा वापर करणे

होय. भारतात व्यवहार तोलातील प्रतिकूलता कमी करण्याच्या दृष्टीने आत्मनिर्भरता उद्दिष्ठाला प्राधान्य दिले आहे.

योजना काळात अन्नधान्याच्या बाबतीत आत्मनिर्भरता उद्दिष्ठ साध्य झाले. लोखंड, पोलाद, यंत्रसामुग्री, अवजारे इ.चे उद्दिष्ठ बऱ्यापैकी सफल झाले. खनिजतेल, रसायने, खते इत्यादीचे परावलंबन मात्र कमी करण्यात अपयश आले. विज्ञान, तंत्रज्ञान, अणू-ऊर्जा, अवकाश संशोधन, आंतराळ यान इ. बाबतीत देखील आत्मनिर्भरता साध्य झाली. संरक्षण साहित्य, सामर्थ्य इत्यादीमध्ये ही स्वयंपूर्णता आली. थोडक्यात आत्मनिर्भरतेबाबत उल्लेखनिय यश प्राप्त झाले. तथापी परकीय गंगाजळी, विदेशी व्यापारातील तूट, आंतरराष्ट्रीय कर्जाचा भार इत्यादीबाबत नकारात्मक प्रगती झाली असल्याचे आढळून येते.

**३) बेकारी निर्मूलन** (Removal of unemployment) :

विकसीत व विकसनशील अशा सर्वच देशाना बेकारीची समस्या भेडसाविते. योजनेमध्ये पंचवार्षिक योजनेची चौकट कायम राखून बेकारी निर्मूलन उद्दिष्ठ ठेवण्यात येते. या करीता राजेगार संधी विस्तृत करण्यावर भर दिला जातो. भारतासारख्या देशात लोकसंख्या वाढ, गरीबी, विषमता इत्यादी अनेक समस्या आहेत. या समस्येची तिव्रता देखील कमी-जास्त आहे. म्हणून पंचवार्षिक योजनेच्या उद्दिष्ठात जवळजवळ सर्व योजनेत हे उद्दिष्ठ ठेवण्यात आल्याचे दिसते.

तज्ञांच्या मते, आर्थिक विकास व पूर्ण रोजगारी हे दोन शब्द परस्पर पर्यायी आहेत. रोजगार पातळी जसजशी वाढत जाते तसतशी विकासाची पातळी गतिमान होते. थोडक्यात आर्थिक विकास व रोजगार पातळी समदिशेने बदल घडून येतात. बेकारीमुळे मानवी संसाधनांचा अपव्यय होतो. दारिद्र्यात वाढ होते. म्हणून योजनेच्या प्रमुख उद्दिष्ठात या उद्दिष्ठाचा समावेश करण्यात आल्याचे दिसते. भारतात रोजगार संधी वाढविण्यासाठी नियोजन काळात ग्रामीण रोजगार कार्यक्रम, सीमांत शेतकरी व शेतमजूर योजना, ग्रामीण रोजगारीचा धडक कार्यक्रम, कामासाठी अन्न योजना, रोजगार हमी योजना, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम, जवाहर योजना, एकात्मिक ग्रामीण विकास योजना, स्वर्णजयंती ग्राम स्व-रोजगार योजना इ. अनेक योजनांची अम्मलबजावणी करण्यात आलेली आहे. अरूण घोष या विचारवंताच्या मते बेकारीची समस्या सोडविण्यासाठी गुंतवणूकीच्या संरचनेत व विविध विभागात अशारितीने बदल केला पाहिजे की, ज्या योगे प्रतिवर्षी किमान ३% नी रोजगार संधीत वाढ होईल.

**४) आर्थिक विषमता कमी करणे** (Reduction of Income Inequality) :

नियोजनाची अम्मलबजावणी करताना भारतात लोकशाही चौकट कायम ठेवावी लागते. आर्थिक विकास हे एकमेव उद्दिष्ठ ठेऊन चालत नाही. कारण योजनेची आखणी व अंमलबजावणी करताना उत्पादन व उत्पन्न वाढ हे उद्दिष्ट महत्त्वाचे असते. तितकेच महत्त्व उत्पन्नाची वाटणी योग्य करणे हेही आवश्यक ठरते. भारतासारख्या लोकशाही देशात आर्थिक समानता ही राजकीय समानते इतकी महत्त्वाची ठरते. विकासाची संधी सर्वांना प्राप्त झाल्याशिवाय खरी लोकशाही प्रस्थापित होऊ शकत नाही. हे ओळखून नियोजन कर्त्यांनी भारतीय नियोजनाचे आर्थिक विषमता नष्ट करणे हे प्रमुख उद्दिष्ठ ठेवले आहे.

आर्थिक क्षमतेचे केंद्रीकरण झाल्याने 'बळी तो कान पिळी' या उक्तीप्रमाणे गरीब उपेक्षित इ. दुःख, दारिद्र्य इ सहन करावे लागते तर जमिनदार, उद्योगपती, व्यापारी, बँकर, उच्चपदस्थ सरकारी अधिकारी इत्यादी ऐशआरामात जीवन जगतात. यातून उपभोगवादी चंगळवादी, अनुकरणवादी संस्कृती निर्माण होते. व्यसनाधिनता वाढते. समाजाचे

स्वास्थ्य बिघडते. याउलट समाजाचा एक मोठा गट दारिद्र्यात खितपत पडलेला असतो. आर्थिक विषमतेमुळे सामाजिक ताण, राजकीय अस्थिरता निर्माण होते. यामुळे देशाचे सार्वभौमत्व देखील धोक्यात येऊ शकते. म्हणून पंडित जवाहरलाल नेहरू यांनी उत्पन्न व संचयी वाटपातील विषमतेचा प्रश्न सोडविला नाही तर विकासाचे लाभ समाजातील भिन्न वर्गात कसे पाझरत जातील याकडे लक्ष केंद्रित केले आहे.

भारतात तिसऱ्या व चौथ्या योजनेत या उद्दिष्टांची अंमलबजावणी करण्यास सुरूवात झाली. यामुळे कुळकायदे जमिनदारी पद्धतीचे निर्मूलन, कमाल जमिन धारणा कायदा सरकारी शेती इत्यादी उपाय योजण्यात आले. काही पुढे २० कलमी कार्यक्रम, मक्तेदारी प्रतिबंधक कायदे, समन्वीत ग्रामीण विकास कार्यक्रम असे विविध कार्यक्रम राबविण्यात आले. किमान वेतन कायदे, बेकार भत्ता, सामाजिक सुरक्षितता योजनांची अंमलबजावणी, गरीबासाठीची अनुदाने व अंशदाने असे अनेक कार्यक्रम उदाहरणादाखल सांगता येतील.

**५) गरिबी निर्मूलन** (Removal of Poverty) :

सामान्यता नागरीकांच्या किमान गरजांची पुर्तता न होण्याची स्थिती म्हणजे गरीबी होय. अन्न, वस्त्र, निवारा, पिण्याचे शुद्ध पाणी, आरोग्य इत्यादीची पुर्तता न होणे यांचा गरीब या कक्षेत समावेश होतो. गरीबीबद्दल अनेक तज्ञ समित्या, अभ्यासगट इत्यादीनी आपले विचार मांडले आहेत. डॉ. दांडेकर व रथ समितीच्या मते, सरासरी २२५० कॅलरीज पेक्षा कमी उष्णांक रोजच्या आहारातून न मिळणारी व्यक्ती गरीब गटात येते किंवा दारिद्र्य रेषेच्या खाली येते.

गरीबी ही सर्वव्यापी समस्या आहे. गरीबी मध्ये सोपक्ष, निरपेक्ष इत्यादी विविध प्रकार पडतात. नियोजन मंडळाच्या चालू अंदाजानुसार २०१० मध्ये दारिद्र्य रेषेखालील भारतीय लोकसंख्येतील हिस्सा ३५% इतका आहे. म्हणजेच आजही दर ३ व्यक्तीत १ व्यक्ती गरीब असते. गरीबी निर्मूलन उद्दिष्ठाना अनुसरून नियोजनकारांनी राष्ट्रीय उत्पन्नात व दरडोई उत्पन्नात वाढ घडवून आणण्याच्या उद्दिष्ठाला प्राधाय दिले आहे. अपेक्षा अशी होती की, वाढत्या उत्पन्नाचा लाभ तळातील गरीबांना घेऊन त्यांचे जीवनमान उंचावेल; त्यांचे दु:ख हालअपेष्ठा इत्यादी कामी होईल. गरीबी निर्मूलन या करीता माजी पंतप्रधान इंदिा गांधीनी गरीबी हटावो ही घोषणाही दिली. योजना काळात जवळ जवळ प्रत्येक योजनेत गरीबी निर्मूलन या उद्दिष्ठाला अनुसरून निरनिराळे कार्यक्रम राबविण्यात आले. यामध्ये कृषी जलसिंचन, प्रकर्शीत शेती, ग्रामेद्योग, लघुउद्योग, रोजगार हमी योजना इत्यादी अनेक कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यात आली. नागरी भागातील गरीबी दूर करण्यासाठी औद्योगिकरण, तांत्रिक शिक्षण, व्यवसायिक शिक्षण, झोपडपट्टी सुधारणा, सार्वजनिक वितरण प्रणाली असे कार्यक्रम राबविण्यात आले.

**६) आधुनिकीकरण** (Modernisation) :

१९४७ पूर्वी भारत पारतंत्र्यात होता. भारतावर अनेक राजवटीने साम्राज्य गाजविले. भारताची अनेकांनी लुट केली. त्यामुळ भारत एक मागास, गरीब व अविकसित देश बनला. स्वातंत्र्यानंतर सरकारने पंचवार्षिक योजनेला १९५१ पासून सुरूवात केली. योजना काळात आधुनिकीकरण असे उद्दिष्ठ ठेवले. आधुनिकीकरण म्हणजे अर्थव्यवस्थेतील विविध प्रकारच्या संस्थात्मक रचनात्मक बदलाची एक प्रक्रिया होय.

आधुनिकीकरणात पारंपारीक उद्योग व नव उद्योजकांचे उद्योग यामध्ये यांत्रिक सुधारणा, विज्ञान, तंत्रज्ञान, विपणण, वहातूक, दळणवळण इ. मध्ये सुधारणेचा समावेश होतो. यामुळे एकूण उत्पादन, इत्यादीत वस्तूंची गुणवत्ता

इत्यादी वाढ होते. वस्तूंचा उत्पादन खर्च कमी होतो. वस्तूंचा बाजारातील खप देखील वाढतो. आधुनिकीकरणामुळे भारतातील लोखंड, पोलाद, पेट्रोकेमिकल्स, अलोह धातू, पेट्रोलियम खते, मोठी यंत्रे, इलेक्ट्रीकल्स इ. उद्योगाची प्रगती झाली. स्पर्धात्मकता वाढली, देशाची निर्यात क्षमतेत वाढ झाली.

आधुनिकीकरणाचा परिणाम म्हणून सार्वजनिक सेवा क्षेत्राचा विकास झालेला आहे. सार्वजनिक आरोग्यात देखील वाढ झाली. खेड्याचे विद्युतीकरण, कृषी जलसिंचन, पेय जल सुधारणा, रस्ते सुधारणा अशा सोईत खुप वाढ झाली.

**सारांश :** भारतीय नियोजनात वरील उद्दिष्ठा शिवाय सामाजीक न्याय, समतोल विकास, सामाजीक सुरक्षितता, कल्याणकारी राज्याची निर्मिती इत्यादी उद्दष्ट्ये देखील आहेत. यातील कांही उद्दिष्ठचे अल्पकालीन काही दिर्घकालीन, तर काही राजकीय, आर्थिक व सामाजिक स्वरूपाची असतात.

### ४.२.२ भारतीय नियोजनाची फलश्रुती किंवा यश अपयश

**प्रस्तावना :** २० वे शतक नियोजनाचे म्हणून ओळखले जाते. सध्या अनेक देशशतून नियोजनाचे प्रयोग केले जातात. नियोजनाचे यश-अपयश प्राप्त होते. भारताने स्वातंत्र्यानंतर खऱ्या अर्थाने पंचवार्षिक योजनेची अंमलबजावणी केली. १९५१ ते २०१२ अखेर भारतात एकूण अकरा पंचवार्षिक योजना पूर्ण करण्यात आल्या. त्याचा संक्षिप्तपणे आढावा खालीलप्रमाणे देता येईल.

**तक्ता क्र. ४.१ : पंचवार्षिक योजना :**

| | **योजना** | **कालावधी** | **योजनेवरील खर्च** |
|---|---|---|---|
| १) | पहिली योजना | १९५१-५६ | १,९६० को. |
| २) | दुसरी योजना | १९५६-६१ | ४,६७२ को. |
| ३) | तिसरी योजना | १९६१-६५ | ८,५७७ को. |
| ४) | चौथी योजना | १९६९-७४ | १६,१६० को. |
| ५) | पाचवी योजना | १९७४-७८ | ४०,७१२ को. |
| ६) | सहावी योजना | १०८०-८५ | १,१०,८२१ को. |
| ७) | सातवी योजना | १९८५-९० | २,२५,००४ को. |
| ८) | आठवी योजना | १९९२-९७ | ४,३४,१०० को. |
| ९) | नववी योजना | १९९७-२००२ | ८,५९,२०० को. |
| १०) | दहावी योजना | २००२-२००७ | ९,२१,२३१ को. |
| ११) | अकरावी योजना | २००७-२०१२ | ३६,४४,४१८ को |

**स्त्रोत :** Indian Economy - Mishra & Puri - 2011.

### (अ) भारतीय नियोजनाचे यश-अपयश :

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, भारतात नियोजनाला सुरूवात होऊन ६० वर्षाहून अधिक कालखंड पूर्ण झाला. योजनेचे यश नाकारता येणार नाही. आज देश ज्या स्तरावर किंवा टप्प्यावर उभा आहे त्याचे श्रेय नियोजनाला द्यावेच लागेल. यशाची चर्चा पुढीलप्रमाणे करता येईल.

**१) राष्ट्रीय उत्पन्नात वाढ :** भारतात १९५१ पासून पंचवार्षिक योजनेला सुरूवात झाली. १९५१ साली देशाचे शुद्ध राष्ट्रीय उत्पादन १,३२,३६७ कोटी रुपये इतके होते. ते २००१-०२ मध्ये ११,१५,१७१/- कोटी रुपये झाले. थोडक्यात ५० वर्षाच्या नियोजनात ५% हुन अधिक प्रमाणात प्रतिवर्षी वाढीला दर झाला.

**२) दरडोई उत्पन्नात वाढ :** सन १९५०-५१ रोजी भारताची लोकसंख्या ३६ कोटी इतकी होती. ती २०००-२००१ मध्ये १०२ कोटी झाली. योजनेच्या ५० वर्षात लोकसंख्या जवळपास तिप्पट झाली. परंतु देशाचे राष्ट्रीय उत्पन्न देखील लक्षणिय प्रमाणात वाढले. म्हणून दरडोई उत्पन्नात प्रतिवर्षी सरासरी २% हुन अधिक वाढ झाली.

**३) कृषी उत्पादन वाढ :** नियोजनाच्या ५० वर्षात भारतातील कृषी उत्पादन ५० दशलक्ष टनावरून २४० दशलक्ष टनापर्यंत वाढले. स्वातंत्र्यानंतर भू-सुधारणा, सिंचन सोईत झालेली वाढ रासायनिक खते, किटकनाशकांचा वापर, शेतीचे यांत्रीकीकरण, कृषी पतपुरवठ्यामधील वाढ इ. कारणामुळे भारतातील अन्नधान्य उत्पादन जवळपास पाचपटीने वाढत आहे.

**४) औद्योगिक प्रगती :** योजना काळात सरकारने औद्योगिक विकासाला प्राधान्य दिले; उद्योगाविषयी सकारात्मक व प्रोत्साहनात्मक निर्णय घेण्यात आले. त्यामुळे १९५० ते २००१ पर्यंत कोळसा उत्पादन १४ पट लोखंड उत्पादन २२५० पट सिमेंट ३०० पटीने वाढले. थोडक्यात औद्योगिक विकासात भांडवली वस्तूंच्या उत्पादनात लक्षणिय वाढ झाली.

**५) बचतदरात वाढ :** नियोजन काळात बचतीचे एकूण उत्पादनाशी असलेले प्रमाण १०.२ टक्केवरून २५.६ टक्के पर्यंत वाढले. बचतदरात वाढ झाल्याने देशातील भांडवल निर्मितीचा दरही वाढला.

**६) अन्नधान्य उपलब्धेत वाढ :** सजिवाला अन्नाची गरज असते. मानवी अन्नधान्यामध्ये गहू, तांदूळ, डाळी, भाजीपाला, फळे, दूध इ. समावेश होतो. सन १९५०-५१ मध्ये देशात अन्नाचा दरडोई उपभोग ३३४ ग्रॅम होतो. तो १९९६ मध्ये ४६४ ग्रॅम पर्यंत वाढला.

**७) खाद्यतेल उत्पादन वाढ :** मनुष्याला ऊर्जा प्राप्त होण्यासाठी स्निग्धपदार्थाची गरज असते. यामध्ये खाद्यतेल वनस्पती तूप इ. समावेश होतो. १९५०-५१ मध्ये याची उपलब्धता दरडोई ३.१ कि.ग्रॅम होती ती १९९६-९७ मध्ये ९.२ कि.ग्रॅम पर्यंत वाढली.

**८) दूध व मासळी उपभोगात वाढ :** भारतात नियोजन काळात दूध व मासळी उत्पादन व उपभोगात देखील वाढ झाली. दूध उपभोग दुपटीने तर मानसी उपभोग सरासरीने ३.५ पटीने वाढले आहे. यामुळे लोकांच्या कार्यक्षमतेत वाढ झाली आहे.

**९) चहा उत्पादन वाढ :** नियोजन काळात भारतातील चहाचे उत्पादन लक्षणिय प्रमाणात वाढले. गेल्या ५० वर्षात लोकसंख्या तिप्पटीने वाढली. तरीही चहाचा उपभोग सरासरीने २१४ ग्रॅम करुन ६५७ ग्रॅम पर्यंत वाढ होते.

**१०) कापड उपभोगात वाढ :** भारतात पंचवार्षिक योजना काळात विविध उत्पादनात वाढ झाली. यामध्ये कापड उत्पादनाला देखील अपवाद नाही. १९५० मध्ये दरडोई कापड उपभोग केवळ १२ मिटर होता तो १९९६-९७ मध्ये ३० मिटर पर्यंत झाला.

**११) सुखद वस्तू उत्पादन वाढ :** सामान्यपणे विजेचे दिवे, पंखे, फ्रिज, शिवणयंत्रे, स्कूटर, मोटार, इत्यादीचा समावेश होतो. योजना काळात भारतात सुखद वस्तूंचे उत्पादन खुप वाढले आहे. त्यामुळे राहणीमानाच्या दर्जात देखील वाढ झाली आहे.

**१२) पायाभूत सोईत वाढ :** देशातील पायाभूत सुविधामध्ये रस्ते, वहातूक, ऊर्जा, पाणी पुरवठा इत्यादीचा समावेश होतो. नियोजन काळात रस्ते वहातूक प्रवासी व मालवाहतूक सोई, विज, पिण्याच्या पाण्याच्या सोईत खुपच सुधारणा झाली आहे.

**१३) निर्यातीत विविधता :** १९५०-५१ पूर्वी भारतातून कच्चा माल, चहा, कॉफी, मसाल्याचे पदार्थ इत्यादी प्राथमिक वस्तूंची निर्यात केली जात असे. योजना काळात भारताच्या निर्यातीत खूप विविधता आली. सध्या भारतातून औद्योगिक वस्तू, मोटारी, स्कूटर, दागिने इत्यादी अनेक वस्तूंची निर्यात होत आहे.

**१४) लोकांच्या आर्युमानात वाढ :** नियोजन काळात भारतातील आरोग्य सोईत वाढ झाली. दवाखाने, औषधे, शस्त्रक्रियेच्या सोई, साथीच्या रोगाचे निर्मूलन इत्यादी वाढ झाली. त्यामुळे बालमृत्यू व एकूण मृत्यूदरात २१ टक्के वरून ९ टक्केपर्यंत घट झाली. नागरीकांचे सरासरी आयुर्मान ५१ वर्षे वरून ६१ वर्षे पर्यंत वाढले आहे.

**१५) शैक्षणिक सुधारणा :** १९५०-५१ पूर्वी भारतात शैक्षणिक सुविधा मर्यादित होत्या. नियोजन काळात शढक्षणिक सोईत, आरोग्य शिक्षण, अभियांत्रिकी शिक्षण, व्यवस्थापन, कृषी शिक्षण, दुग्ध शास्त्र, मत्स्य शास्त्र इत्यादी प्रकारे विविध शिक्षण सोईत वाढ झाली. सध्या भारतातील शैक्षणिक प्रगती जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे.

वरीलप्रमाणे योजना काळात सर्वच आघाड्यावर प्रगती घडून आली. यामुळे जननदर-मृत्यूदर इ. घट होत आहे. वैज्ञानिक व तांत्रिक प्रगती देखील हाते आहे.

**(ब) नियोजनाचे अपयश :**

नियोजनाचे अपयश म्हणजे नियोजनाचे फायदे किंवा लाभ सर्वच स्तरापर्यंत पोहोचणे होय. भारताच्या नियोजनात कांही अपयश आले आहे ते दुर्लक्षून चालणार नाही. अपयशाचे मुद्दे खालीलप्रमाणे सांगता येतील.

**१) गरीबी दूर करण्यात अपयश :** भारतात पूर्वीपासून निरपेक्ष व सापेक्ष गरीबी आढळून येते. १९५० पूर्वी

निरपेक्ष दारिद्र्य खुप जास्त होते. योजना काळशत रोजगार संधीतील वाढ, अन्नधान्य, उत्पादन वाढ इत्यादी कारणामुळे निरपेक्ष दारिद्र्य लक्षणियरित्या कमी झाले. मात्र सापेक्ष दारिद्र्यात वाढ झाली. आर्थिक विषमता, संपत्तीचे केंद्रीकरण, भ्रष्टाचार, काळा पैसा इत्यादीमुळे सापेक्ष दारिद्र्य वाढत आहे.

**२) बेकारी कमी करण्यात अपयश :** योजना काळात भारतात रोजगार विषयक अनेक कार्यक्रम राबविण्यात आले. लघु उद्योगाना मदत व प्रोत्साहन ग्रामीण रोजगार कार्यक्रम, हरितक्रांती, धवलक्रांती, निलक्रांती, लाल क्रांती इत्यदीमुळे रोजगाराच्या संधीत वाढ झाली आहे. तथापी भारतातील बेकारी समूळ नष्ट करण्यात अपयश आले आहे. आजही रोजगार विनियम केंद्रातील नोंदणीकृत बेकारांची संख्या ७ कोटी इतकी आहे.

**३) आर्थिक विषमतेत वाढ :** योजना कालावधीत कृषी औद्योगिक उत्पादन वाढले, रोजगार संधीत वाढ झाली. तथापी आर्थिक विषमतेत वाढ झाल्याचे दिसून येते. समाजातील श्रीमंत वर्ग श्रीमंत बनत गेला आहे. तर गरीबीचे प्रमाण वाढत आहे. संपत्तीचे केंद्रीकरण होत आहे.

**४) बड्या घराण्याचा उदय :** पंचवार्षिक योजना काळात औद्योगिक धोरण, कृषी धोरण, ग्रामीण विकास धोरणे इत्यादी जाहीर करण्यात आली. आर्थिक विकासाचे कार्यक्रम व धोरणामुळे मोठे शेतकरी मोठे उद्योगपती, मोठे गुंतवणूकदार इ. नवीन वर्ग निर्माण झाले. देशात टाटा, बिर्ला, जैन, चौगुले, दर्डा इत्यादी बड्या घराण्यांचा नव्याने उदय झाला.

**५) वित्तीय तूट वाढ :** योजना काळात सरकारने सार्वजनिक खर्चात खूप वाढ केली. यामुळे तूटीच्या अर्थकरण्यात वाढ झाली. परकीय कर्जातही वाढ झाली इत्यादी अनेक कारणामुळे भारतात महसुली उत्पन्नाच्या तुलनेत महसुली खर्च वाढत गेला व वित्तीय तूट वाढत आहे.

**६) भू-सुधारणा कार्यक्रमास अपयश :** दुसऱ्या योजनेपासून भारतात भू-सुधारणा करण्यात आल्या. कमाल जमीन धारणा कायदे, कुळ कायदे, जमीनदारी पद्धतीचे निर्मूलन, जमीनीचे फेरवाटप, तुकडेबंदी व तुकडेजोड इत्यादी कार्यक्रमांचा समावेश होतो. परंतू सरकारला भू-सुधारणा कार्यक्रम राबविण्यात अपयश आल्याचे दिसून येते.

वरील प्रमाणे भारताच्या नियोजनाला कांही आघाड्यावर अपयश प्राप्त झाले. तथापी यामुळे नियोजनाच्या यशाला नजरेआड करता येणार नाही.

### ४.२.३ अकरावी पंचवार्षिक योजना :

- **प्रास्ताविक**

भारतात डिसेंबर २००६ मध्ये अकराव्या योजनेचा आराखडा राष्ट्रीय विकास परिषदेने मंजूर केला. देशात एप्रिल २००७ ते मार्च २०१२ या पाच वर्षासाठी अकरावी योजना सुरू करण्यात आली. ही योजना अत्यंत महत्त्वकांक्षी म्हणून ओळखली जाते. या योजनेत 'अधिक वेगासह सर्वसमावेशक वृद्धी' 'Towards faster and more inclusive growth' हे योजनेचे ब्रिद वाक्य होते.

**अ) उद्दिष्ट्ये :**

१) स्थूल राष्ट्रीय उत्पन्न (GDP) चा वृद्धीदर ८% वरून १०% पर्यंत वाढविणे.

२) योजनाकाळात ७ कोटी नविन रोजगार संधी निर्माण करणे.

३) सुशिक्षित बेरोजगारांचे प्रमाण ५% पर्यंत कमी करणे.

४) अकुशल मजूरांच्या वास्तव मजुरीत २०% पर्यंत वाढ करणे.

५) देशातील भूकबळींची संख्या १०% पेक्षा कमी करणे.

६) प्राथमिक शाळेतील गळती ५२% वरून २०% पर्यंत घटविणे.

७) ७ वर्ष पेक्षा जास्त वयाच्या व्यक्तीचा साक्षरता दर ८५% पेक्षा जास्त वाढविणे.

८) स्त्री-पुरुष साक्षरता तफावत कमी करणे.

९) उच्च शिक्षण घेणाऱ्या युवकांची संख्या शेकडा १०% वरून १५% पर्यंत वाढविणे.

१०) बालमृत्यूचे प्रमाण दर हजारी २.३% पर्यंत व मातामृत्यूदर १% वर आणणे.

११) स्थूल जननदर २.१% पर्यंत घटविणे.

१२) २००९ पर्यंत सर्वांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे.

१३) ० ते ३ या वयातील मुलांच्या कुपोषण दर सध्याच्या निम्म्यावर आणणे.

१४) स्त्रिया व मुलींतील रक्तन्यूनता व रक्तक्षिरणता सध्याच्या ५०% पर्यंत कमी करणे.

१५) देशातील ग्रामीण व दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाना २००९ पर्यंत विज उपलब्ध करून देणे. तसेच योजनेच्या शेवटी लोकंना २४ तास विजपुरवठा करणे.

१६) १००० लोकसंख्येची खेडी २००९ पर्यंत मुख्य रस्त्यांना जोडणे.

१७) सन २००७ पर्यंत सर्व गावे टेलिफोनद्वारे जोडणे व २०१२ पर्यंत सर्व खेडी ब्रॉड बॅन्डने जोडणे.

१८) २०१२ पर्यंत सर्वांना निवासस्थाने (घर जागा) उपलब्ध करून देणे.

१९) देशातील जंगले व वृक्षांच्या संख्येत ५% पर्यंत वाढ करणे.

२०) हवेचे प्रदूषण रोखणे व जागतिक व्यापार संघटनेच्या दर्जानुसार देशातील प्रमुख शहराना हवेचा दर्जा प्राप्त करून देणे.

**तक्ता क्र. ४.६ : ११ व्या योजनेतील संसाधने**

| | तपशील | एकूण खर्च (रक्कम रु. कोटीमध्ये) | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | चालू राजस्वातील अधिशेष | १०,३९,०३९ | २८.५% |
| २) | बाजार उधार | १४,१७,१४२ | ३८.९% |
| ३) | विदेशशतून मदत | -- | -- |
| ४) | सार्वजनिक उघमातील संसाधणे | ११८८५३४ | ३२.६% |
| ५) | एकूण आर्थिक तरतुदी | ३६,४४,७१७ | १००% |

**स्रोत :** Indian Economy - Mishra & Puri - 2011.

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की,

१) अकराव्या योजनेचा वित्तीय आराखडा दहाव्या योजनेच्या आराखड्याच्या दुप्पटीपेक्षा जास्त आहे.

२) अकराव्या योजनेतील आर्थिक तरतुदीमध्ये चालू राजस्वातील अधिशेष जवळ जवळ २८.५% असल्याचे दिसून येते.

३) अकराव्या योजनेत बाजारातून उभी केलेली रक्कम एकूण योजना खर्चाच्या ३८.९% इतकी आहे. याचा अर्थ ही रक्कम २/५ इतकी असल्याचे दिसून येते.

४) या योजनेत सार्वजनिक उद्यमातील संसाधनांची रक्कम ३२.६% इतकी आहे.

थोडक्यात अकराव्या योजनेत योजनेचा आकार खुप मोठा असून योजना खर्चापैकी जवळ जवळ २/५ रक्कम बाजारातून उभी केलेली आहे. हे एक धाडस म्हणावे लागेल.

**तक्ता क्र. ४.७ : ११ व्या योजनेतील क्षेत्रनिहाय खर्च विभागणी**

| | क्षेत्र | एकूण रक्कम (रक्कम रु. कोटीमध्ये) | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | शेती व शेती आधारीत घटक | १,३६,३८१ | ३.७% |
| २) | ग्रामीण विकास | ३,०१,०६९ | ८.३% |
| ३) | विशेष क्षेत्र योजना | २६,३२९ | ०.७% |
| ४) | सिंचन व पूरनियंत्रण | २,१०,३२६ | ५.८% |
| | एकूण कृषीक्षेत्र | ६,७४,१०५ | १८.५% |

| | | | |
|---|---|---|---|
| ५) | ऊर्जा | ८,५४,१२३ | २३.४% |
| ६) | खनिज व उद्योग | १,५३,१२३ | २३.४% |
| ७) | परिवहन | ५,७२,४१३ | १५.७% |
| ८) | दळणवळण | ९५,३८० | २.६% |
| ९) | विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण | ८७,९३३ | २.४% |
| १०) | सामान्य आर्थिक सेवा | ६२,५२३ | १.७% |
| ११) | सामाजीक सेवा | ११,०२,३२७ | ३०.१% |
| १२) | सामान्य सेवा | ४२,२८३ | १.२% |
| | **एकूण** | **३६,४४,७१८** | **१००%** |

**स्रोत :** Indian Economy - Mishra & Puri - 2011.

वरील कोष्टकावरून असे स्पष्ट होते की,

१) अकराव्या योजनेत तुलनेने शेती क्षेत्राबाबत पूर्वीपेक्षा कमी तरतूद केली आहे. यामुळे शेतीच्या विकासावर प्रतिकूल परिणाम होण्याची भिती व्यक्त केली जाते.

२) या योजनेत सरकारने भारत निर्माण योजना या सारखा उपक्रम सुरू केल्याने उर्जे करीता करण्यात येणारी तरतुद २३.४% पर्यंत वाढविली.

३) या योजनेमध्ये शासनाने सामाजीक सेवा या क्षेत्रातील खर्चात खूप वाढ केली ही वाढ आधिच्या दहव्या योजनेपेक्षा ३% नी जास्त असल्याचे दिसून येते.

४) अकराव्या योजनेत परिवहन क्षेत्राची तरतूद देखील एकूण योजना खर्चाच्या १/६ इतकी ठेवल्याचे दिसून येते.

थोडक्यात अकरावी योजना मोठ्या आकाराची आहे. यापैकी बरीचशी रक्कम खुल्या बाजारातून उभी केली आहे. म्हणजेच एका अर्थाने 'कर्ज काढून सण साजरा करण्याचा प्रकार' असल्याची टिका केली जाते.

**ब) योजनेचे यश अपयश :**

सन २००७ ते २०१२ या कालावधीसाठी भारतात अकरावी योजना सुरू झाली. परंतु अल्पावधीत म्हणजे जून २००७ ला जागतिक अरिष्ठ किंवा संकट निर्माण झाले. अमेरिका सारख्या बलाढ्य देशाची अर्थव्यवस्था मंदीकडे झुकू लागली. तेथील प्रमुख बँका अतिरिक्त कर्जपुरवठा इ. वर तात्काळ परिणाम झाला. अमेरिकेतील मंदीच्या संकटाने हळूहळू जागतिक बाजारपेठेवर दुष्परीनाम घडवून आणला. अमेरिकेतील मंदी २००८-०९ पर्यंत टिकून राहिली. यामुळे भारताच्या अकराव्या योजनेच्या फलश्रुतीवर त्याचा प्रतिकूल परिणाम घडून आला ते खालील प्रमाणे सांगता येतील.

१) योजना काळात पहिल्या वर्षी आर्थिक वाढीला वार्षिक दर ९.७% होता तो २००८-०९ मध्ये ६.७% पर्यंत घटला.

२) अकराव्या योजनेत कृषी उत्पादन वाढीचा दर देखील ४.७% वरून ३.७% व तिसऱ्या वर्षी १.६% पर्यंत घटला.

३) या योजनेत अमेरिकन मंदीमुळे भारतातील औद्योगिक उत्पादनावर प्रतिकूल परिणाम झाला. उत्पादन १४.९% वरून ३.२% पर्यंत २००८-०९ मध्ये खाली आले.

४) अकराव्या योजनेत विज उत्पादन, नैसर्गिक गॅस, पाणी पुरवठा इ. वेग देखील लक्षणीय प्रमाणात घटल्याचे दिसून येते.

५) या योजना काळात भारतातील बांधकाम क्षेत्राच्या विकासाचा दर २००६-०७ मध्ये १०.६% होता तो. २००८-०९ मध्ये ५.९% पर्यंत घटल्याचे दिसून येते.

६) अकराव्या योजनेच्या काळात क्रुडतेल, कोळसा, विज, सिमेंट, लोखंड इ. क्षेत्रातील वाढीचा दर देखील लक्षणीय प्रमाणात घटला आहे.

७) योजना काळात भारताच्या निर्यातीचा दर वार्षिक २९% होता तो २०% पर्यंत घसरला आहे.

८) या योजनेत सुरूवातीला विचीत्र तुट १.३% होती ती जवळ जवळ दुप्पट म्हणजे २.४% इतकी झाली आहे.

९) अकराव्या योजनेत सुरूवातीला परकीय गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर व भांडवल बाजारात मोठी गुंतवणूक केली होती. परंतू अमेरिकेतील मंदीमुळे गुंतवणूकदारात घबराहट पसरली. यामुळे भारतीय शेअर व भांडवल बाजारावर देखील प्रतिकूल परीणाम झाला असल्याचे दिसून येते.

१०) सन २००७ ते २००९ या काळात भारत व अमेरिकेतील रूपया व डॉलर यातील विनिमयदर देखील १२% घसरली आहे.

११) अकराव्या योजनेच्या पहिल्या तिन वर्षाच्या काळात उत्पादीत वस्तूच्या वाढीचा दर देखील खालावला आहे.

वरील प्रमाणे ११ व्या पंचवार्षिक योजनेला कांही आघाड्यावर अपयश आल्याचे दिसून येते. तथापी शेवटच्या दोन वर्षामध्ये पुन्हा कृषी उत्पादन, औद्योगिक उत्पादन, वहातूक दळणवळ इ. अनेक क्षेत्रात उत्साहवर्धक वातावरण निर्माण झाले आहे.

### ४.२.४ १२ वी पंचवार्षिक योजना :

१२ व्या पंचवार्षिक योजनेचा कालखंड हा १ एप्रिल २०१२ ते ३१ मार्च २०१७ असा आहे. या पंचवार्षिक योजनेत ८२% आर्थिक वृद्धी दराचे लक्ष्य ठरविण्यात आले आहे. ''वेगवान, शाश्वत व अधिक समावेशक वृद्धी'' हे घोषवाक्य या योजनेचे आहे. स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३७% सरासरी स्थूल भांडवल निर्मितीचे लक्ष ठेवण्यात आले आहे. तसेच स्थूल देशांतर्गत बचत दर हा स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३४.२% अपेक्षित आहे. ११ व्या पंचवार्षिक

योजनेत ९% आर्थिक वृद्धी दर अपेक्षित होता मात्र तो साध्य झाला नाही. त्यामुळे १२ व्या पंचवार्षिक योजनेत कृषी क्षेत्रात ४% वृद्धी दराचे लक्ष्य ठरविण्यात आले आहे. तसेच उत्पादनक्षेत्र वृद्धी दर हा १०% ठरविण्यात आला आहे. या १२ व्या योजनेचा एकूण खर्च हा ४.७ लाख कोटी इतका निश्चित केला आहे.

१२ व्या योजनेचे अध्यक्ष डॉ. मनमोहन सिंग होते तर उपाध्यक्ष माँटेकसिंग अहलुवालिया हे होते. या योजनेत वेगवान विकास साध्य करणे, शाश्वत व अधिकाधिक समावेशक वृद्धी यावर अधिक भर देण्यात आला आहे. या योजनेत दारिद्र्य व बेरोजगारी, शिक्षण, आरोग्य, पायाभूत सोयी सुविधा इ. वर भर देण्यात आला आहे. या योजनेची लक्ष्ये खालील प्रमाणे निश्चित केलेली आहेत.

**१२ व्या पंचवार्षिक योजनेची लक्ष्ये :**

(i) १२ व्या पंचवार्षिक योजनेत ८.२% दराने स्थूल देशांतर्गत उत्पादन (GDP) वाढीचे लक्ष्य ठरविण्यात आले आहे.

(ii) ४% कृषी वृद्धीदर निश्चित केला आहे.

(iii) उत्पादनक्षेत्र वृद्धीदर हा १०% अपेक्षित आहे.

(iv) बचतीचे प्रमाण ३४.२% तर गुंतवणूकीचे प्रमाण ३९.३% या योजनेत लक्ष्य ठरविले आहे.

(v) आरोग्य व बालविकास खर्चाचे प्रमाण ११.४५% करण्याचे योजले आहे.

(vi) शिक्षणावरील खर्चाचे प्रमाण १२.७१% आहे.

(vii) १२ व्या योजनेअखेर दारिद्र्याचे प्रमाण १०% नी कमी करणे.

(viii) गैरकृषी क्षेत्रात ५०.३ दशलक्ष रोजगार निर्मिती करणे तसेच कुशल विकासावर भर देणे.

(ix) या योजनेच्या अखेरिस शाळेत जाण्याच्या सरासरी वर्षात ७ वर्षे शिक्षणाची वाढ करणे.

(x) कौशल्य विकासासाठी उच्च शिक्षण घेण्यासाठी २ दशलक्ष जागांची निर्मिती करणे.

(xi) माध्यमिक शिक्षणातील गळतीचे प्रमाण १०% पेक्षा कमी करणे.

(xii) साक्षरतेचे प्रमाण ८०% पेक्षा अधिक साध्य करणे.

(xiii) योजनेअखेर शिशुमृत्युदर २५ व मातामृत्युदर १ वर आणणे.

(xiv) योजनेअखेर जननदराचे प्रमाण २.१ वर आणणे.

(xv) १२ व्या योजनेअखेर पायाभूत सुविधांवर होणाऱ्या खर्चाचे प्रमाण स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या (GDP) ९% पर्यंत आणणे.

(xvi) ढोबळ सिंचन क्षेत्र १०३ दशलक्ष हेक्टरपर्यंत वाढविणे.

(xvii) योजनेअखेरीस देशातील सर्व खेड्यांना वीजपुरवठा करणे.

(xviii) ग्रामीण भागातील टेलिडेन्सिटी ७०% पर्यंत नेणे.

(xix) योजनाकाळात वनाच्छादित प्रदेशात दरवर्षी १ मिलीयन हेक्टरची वाढ करणे.

(xx) २०१७ अखेर ८०% गंभीर प्रदूषीत झालेल्या नद्या स्वच्छ करणे.

(xxi) ९०% भारतीयांपर्यंत बँकिंग सेवा पोहचविणे.

१२ व्या पंचवार्षिक योजनेत सार्वजनिक क्षेत्रातील साधनसामग्रीचे वाटप कसे केले गेले ते खालील कोष्टकाच्या साहाय्याने स्पष्ट करता येईल.

**सार्वजनिक क्षेत्रातील साधनसंपत्तीचे क्षेत्रीय वाटप**

| अ. क्र. | विकास घटक | एकूण खर्च (कोटी रु.मध्ये) | |
|---|---|---|---|
| | | रक्कम | % हिस्सा |
| १. | कृषी व संलग्न व्यवसाय | ३६३२७३ | ४.७४ |
| २. | ग्रामीण विकास | ४५७४६४ | ५.१६ |
| ३. | विशेष क्षेत्र कार्यक्रम | ८०३७० | १.०५ |
| ४. | सिंचन आणि पूर नियंत्रण | ४२२०१२ | ५.५० |
| ५. | ऊर्जा | १४३८४६६ | १८.७५ |
| ६. | उद्योग व खाणी | ३७७३०२ | ४.९२ |
| ७. | वाहतूक | १२०४१७२ | १५.७० |
| ८. | संचार | ८०९८४ | १.०६ |
| ९. | पर्यावरण | १६७३५० | २.१८ |
| १०. | आर्थिक सेवा | ३०५६१२ | ३.९८ |
| ११. | सामाजिक सेवा | २६६४८४३ | ३४.७४ |
| १२. | सामान्य सेवा | १०७९५९ | १.४१ |
| १३. | एकूण | ७६६९८०७ | १००.०० |

स्रोत्र : Planning Commission, Approach to the 12th five year plan.

सार्वजनीक क्षेत्रामध्ये १२ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये खर्चाची कशा प्रकारे विभागणी केली गेली आहे ते वरील कोष्टकात दर्शविले आहे.

एकूण खर्च हा ७६, ६९, ८०७ कोटी रु. इतका आहे. यापैकी सर्वात अधिक खर्च सामाजिक सेवा या घटकावर करण्याचे योजिले आहे. एकूण खर्चाशी त्याचे प्रमाण ३४.७४% इतके आहे. म्हणजेच सामाजिक

सेवेला या योजनेत विशेष महत्त्व दिले आहे. सामाजिक सेवेनंतर ऊर्जा व वाहतूक या विकास घटकांवर खर्च अधिक आहे. हा खर्च अनुक्रमे १८.७५% व १५.७०% इतका आहे. म्हणजेच या योजनेत सामाजिक सेवा, ऊर्जा व वाहतूक या महत्त्वाच्या विकास बार्बीकडे अधिक लक्ष दिले गेले आहे. कृषी व संलग्न व्यवसाय तसेच सिंचन या घटकांवर जवळपास १०% खर्च अपेक्षित आहे.

१२ व्या पंचवार्षिक योजनेत दारिद्र्य व बेकारी, शिक्षण, आरोग्य, पायाभूत सोयी सुविधा, पर्यावरण व शाश्वतता तसेच सेवा इ. घटकांकडे विशेष लक्ष दिले गेले आहे. या योजनेत सरासरी आर्थिक वृद्धीदर हा ८.२% अपेक्षित आहे. तो साध्य होतो की नाही हे पाहणे महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर कृषी क्षेत्रातील वाढ ही ४% दराने होईल असे लक्ष्य समोर ठेवले आहे. ते साध्य होते की नाही हे योजनेचा कालखंड संपल्यानंतरच कळेल. दारिद्र्याचे प्रमाण योजना काळात १०% नी कमी करणे तसेच जननदर २.१ पर्यंत खाली आणणे हेही लक्ष्ये या योजनेची आहेत ती कितपत यशस्वी होतात हे येणारा काळच ठरवेल.

## ४.३ सारांश :

जगातील नियोजन कल्पनेचा आर्थिक विकासासाठी प्रथम वापर रशिया या देशाने केला आहे. त्यांनी प्रत्येकी चार वर्षाच्या एकंदर पाच पंचवार्षिक योजना राबविल्या. येथील नियाजेनाने ‘न भूतो न भविष्यती’ अशी प्रगती घडवून आणली. यामुळे २० व्या शतकात नव्याने स्वतंत्र झालेल्या अनेक देशांनी आपआपल्या देशातून नियोजनाला सुरूवात केली.

भारतात पंडित जवाहरलाल यांचे नेतृत्वाखाली १९५०-५१ पासून योजनेला सुरूवात झाली. भारतात आजपावेतो एकंदर अकरा पंचवार्षिक योजना व पांच एकवार्षिक योजना पूर्ण करण्यात आलेल्या आहेत. देशातील नियोजनाला कृषी, सिंचन, ग्रामीण विकास, वहातूक, दळणवळण, आरोग्य, शिक्षण इ. आघाड्यावर घवगवीत यश मिळाल्याचे दिसून येते. तथापी भारतीय नियोजनाला दारिद्र्य निर्मूलन, बेकारी निर्मूलन, आर्थिक विषमता कमी करणे इ. कांही बाबतीत अपयश आल्याचे आढळून येते.

## ४.४ पारिभाषिक शब्द :

१) **नियोजन मंडळ**-आर्थिक नियोजनाचा सर्वप्रथम आराखडा तयार करणारी यंत्रणा.

२) **राष्ट्रीय विकास परिषद**-पंचवार्षिक योजनेच्या प्राथमिक आराखडा तपासून सुचविणारी व पंचवार्षिक योजनेला मान्यता देणारी यंत्रणा.

३) **एक वार्षिक योजना** - कांही कारणामुळे पांच ऐवजी केवळ एक वर्षासाठी योजनेचा आराखडा तयार करणे व राबविणे होय.

४) **नविन आर्थिक धोरण** - सन १९९१ साली भारतात आर्थिक पेचप्रसंगाच्या पातळीवर खासगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण अशा प्रकारचे नवीन परंतू संमिश्र धोरण होय.

५) **भारत निर्माण योजना** - सन २००६-०७ मध्ये भारत सरकारने सर्व खेड्यात विज पोहोचविणे व सर्व घरांना विज कनेक्शन देण्याचे धोरण होय.

## ४.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :

### अ) खालील प्रश्नांची उत्तरे दिलेल्या पर्यायातून योग्य पर्याय निवडून लिहा.

१) जगामध्ये सर्वप्रथम ............ देशात पंचवार्षिक योजनेची अंम्मलबजावणी करण्यात आली.
अ) भारत   ब) अमेरिका   क) रशिया

२) भारतीय नियोजन मंडळाची स्थापना १९५० मध्ये ........... यांचे अध्यक्षतेखाली करण्यात आली.
अ) डॉ. राजेंद्र प्रसाद   ब) पं. नेहरू   क) महात्मा गांधी

३) भारतात पहिल्या पंचवार्षिक योजनेत सरकारने सर्वाधिक भर ............ क्षेत्रावर दिला आहे.
अ) उद्योग   ब) ऊर्जा   क) शेती.

४) भारतात प्रथम पंचवार्षिक योजनेला सुट्टी केंव्हा देण्यात आली.
अ) १९६६-६९   ब) १९७८-८०   क) १९९० ते १९९२

५) दहाव्या पंचवार्षिक योजनेचा भारतातील कालखंड कोणता ?
अ) सन २००० ते २००५   ब) सन २००२ ते २००७   क) सन २००७ ते २०१२

६) १२ व्या पंचवार्षिक योजनेचा कार्यकाळ ............. असा आहे.
(अ) २०१२ ते २०१७   (ब) २००७ ते २०१२
(क) २००२ ते २००७   (ड) १९९२ ते १९९७

७) १२ व्या पंचवार्षिक योजनेत ............. इतके आर्थिक वृद्धी दराचे लक्ष्य निश्चित केले आहे.
(अ) ५.५%   (ब) ८.२%   (क) ९%   (ड) ७.८%

८) १२ व्या पंचवार्षिक योजनेचे अध्यक्ष ............. हे होते.
(अ) अटलबिहारी वाजपेयी   (ब) शरद पवार
(क) मनमोहन सिंग   (ड) पंडीत नेहरू

९) १२ व्या पंचवार्षिक योजने अखेरीस माता मृत्यूदर ............. वर आणण्याचे निश्चित केले आहे.
(अ) १   (ब) ५   (क) १०   (ड) २

१०) ............. इतका कृषी वृद्धी दर १२ व्या योजनेत निश्चित केला आहे.
(अ) ४%   (ब) ५%   (क) १०%   (ड) १%

### ब) खालील विधाने चूक की बरोबर ते सांगा ?

१) सन १९५० पूर्वी भारतात नियोजनाचे कांही प्रयत्न करण्यात आले.

२) दुसरी पंचवार्षिक योजना ही कृषिप्रधान म्हणून ओळखली जाते.

३) गरीबी हटावे हे नियोजनाचे उद्दिष्ट पांचव्या पंचवार्षिक योजनेतील आहे.

४) नविन आर्थिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर सहावी पंचवार्षिक योजना सुरू करण्यात आली.

५) भारत निर्माण योजना ही महत्त्वाकांक्षी योजना दहाव्या योजनेतील आहे.

## ४.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**अ)** १ - (क) २ - (ब) ३ - (क) ४ - (अ) ५ - (ब)

६ - (अ) ७ - (ब) ८ - (क) ९ - (अ) १० - (अ)

**ब)** १) बरोबर २) चूक ३) बरोबर

४) चूक ५) चूक

## ४.७ सरावासाठी स्वाध्याय :

१) भारतीय नियोजनाचे बेकारी व गरीबी निर्मूलन उद्दिष्टे सविस्तरपणे स्पष्ट करा.

२) भारताच्या योजनेचे अपयश कोणते ते थोडक्यात विषद करा ?

३) दहाव्या पंचवार्षिक योजनेचा वित्तप्रबंध स्पष्ट करा ?

४) अकराव्या पंचवार्षिक योजनेची उद्दिष्टे सांगा.

## ४.८ संदर्भ ग्रंथ यादी :

१) आर्थिक विकास व नियोजन : प्रा. डॉ. जे. एफ. पाटील, प्राचार्य पी.जे. ताम्हणकर.

२) विकासाचे अर्थशास्त्र, प्रा. डॉ. विजय कविमंडल

३) आर्थिक विकास व नियोजन, प्रा. डॉ. ज्योत्स्ना देशपांडे (नागपूर)

४) Economics of Development and Planning – By M. L. Jhingan

५) Indian Economy, Dr. A. N. Agarwal

६) Indian Economy, Rudra Datta & P. M. Sundaram.

७) Misra and Puri : Indian Economy, 2011.